म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ३०२५
REFBK-0024135

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

5 JUN 1988

3 SEP 1989

(क्र. मा. पहा)

५०००-३-८४

No. of

Date

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ता :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा
ी भरावी लागेल.

2 MAY 1984
27 JUN 1984
17 OCT 1984
12 DEC 1984
6 JUN 1985
JUN 1985
0 JUN 1985
12 JUN 1988

( कृ. मा. प. )
५०००-१२-८२

No. of

Date

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२५४
ग्रा. क्र. २४९.३५
निबंध
१७।२।८४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

संदर्भ निबंध [ललित निबंध]
3025
28934
१५४५४

# शालजोडी

मंगेश
विठ्ठल
राजाध्यक्ष

मौज प्रकाशन

REFBK-0024135

मौज प्रकाशन : ३१६
पहिली आवृत्ती : डिसेंबर १९८३
© १९८३, मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष

प्रकाशक
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

किंमत पंचेचाळीस रुपये

ग० ग० गोडसे
आणि
शपांडे
यांना

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

---

**सूचना :**—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

3 JUL 1985

9 JAN 1986

(क्र. मा. पहा)
५०००–३–८४

या संग्रहातील लेख १९४७ ते १९८० या काळातील, हे त्यांच्या पूर्वप्रसिद्धीची नोंद अन्यत्र दिली आहे तिच्यावरून स्पष्ट होईलच. बारा लेख तर वीस वर्षांपूर्वीचे आहेत. काळाचा हा संदर्भ मनात बाळगला नाही तर कदाचित काही ठिकाणी लिहिण्याचा रोख पुरा उमगणार नाही; कित्येक तपशील ओथट वाटतील. विषय शिळा होतो असे नव्हे—तो झाला असे वाटले तर लेखच फसला असे म्हणावे! पण जे तात्कालिक निमित्त काढून लिहिले तेच कधी फिके पडते, आणि त्याच्यातून आलेला काही तपशीलही. याच्याकडे लक्ष वेधण्यास हा काळाचा उल्लेख.

यातील काही लेख स्थळांविषयी आहेत, काही व्यक्तींविषयी. पुन्हा व्यक्तींपैकी काही खऱ्याखुऱ्या, काही काल्पनिक. वर्गवारी करण्यासारखे एवढेच लेख; पण ते वर्गही सैलपणे घ्यायचे. त्यांच्यावर वाङ्मयप्रकाराची रेखीव नावनिशी डकवता येणार नाही. उरलेल्या लेखांवर तर नाहीच नाही. राहवलेच नाही तर लघुनिबंध हा कसलीही सोय पाहणारा शिक्का आहेच. खरे म्हणजे तो या सगळ्याच लेखांची सोय पाहण्याइतका कामसू आहे. खरे म्हणजे, चालू शिक्का 'ललित निबंध' हा आहे; पण तो लालित्याचा सवंग वास नकोसा वाटतो!

या एकवीस लेखांपैकी सतरा दिवाळी अंकांसाठी लिहिलेले; एक विशेष अंकासाठी. अशी शुभकार्ये निघाली, आणि प्रेमळ अगत्याने संपादकांनी आमंत्रण दिले, आणि ते चिकाटीने स्मरण करून देत राहिले, म्हणून हे —आणि अन्यही—लेख लिहून झाले, याबद्दल त्या संपादकांचा मी फार ऋणी आहे.

१५ डिसेंबर १९८३ **मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष**

पूर्वप्रसिद्धी : येथे टीका केली जाते : स्वदेश, दिवाळी १९४७ □ टोपणनावांविषयी सत्यकथा, फेब्रुवारी १९४९ □ लेखक आणि त्यांची नावे : वीणा, दिवाळी १९६३ □ काबुली संस्कृत : मौज, दिवाळी १९४९ □ एका लेखकाच्या घराची गोष्ट : मंदार, दिवाळी १९६१ □ माझे आगामी आत्मचरित्र : सुगंध, दिवाळी १९७८ □ न लिहिलेले आमचरित्र : सुगंध, दिवाळी १९७३ □ फर्स्ट-नेम-ड्रॉपर : पूर्वा, दिवाळी १९७९ □ एक फारच यशस्वी प्राध्यापक : महाराष्ट्र टाइम्स, दिवाळी १९७५ □ मुंबई ग नगरी : दीपावली, दिवाळी १९५५ □ ब्राह्मण—पण भट नव्हे ! : दीपावली, दिवाळी १९५६ □ शामगढ आणि ट्रॅन्झिस्टर : दीपावली, दिवाळी १९६७ □ तिला चिरशांती लाभो ! : सुगंध, दिवाळी १९७१ □ शेवटची ट्रॅम : वसुधा (शंभरावा अंक), मे १९५९ □ जुने चित्र : मौज, दिवाळी १९६२ □ ग्रंथांची फुटली पेठ : सुगंध, दिवाळी १९८० □ आंब्रोली : मौज, दिवाळी १९६४ □ अळूर : ललित, जुलै १९७९ □ अनिल : सत्यकथा, मे १९५८ □ बाबुराव चित्रे : मौज, दिवाळी १९६१ □ नानांचे नवे खेळणे : केसरी, दिवाळी १९५९

| | |
|---|---|
| येथे टीका केली जाते | १ |
| टोपणनावांविषयी | ६ |
| लेखक आणि त्यांची नावे | ११ |
| काबुली संस्कृत | १८ |
| एका लेखकाच्या घराची गोष्ट | २४ |
| माझे आगामी आत्मचरित्र | ३४ |
| न लिहिलेले आत्मचरित्र | ४२ |
| फर्स्ट-नेम-ड्रॉपर | ५२ |
| एक फारच यशस्वी प्राध्यापक | ५८ |
| मुंबई ग नगरी | ७१ |
| ब्राह्मण—पण भट नव्हे! | ८२ |
| शामगढ आणि ट्रॅन्झिस्टर | ८९ |
| तिला चिरशांती लाभो! | ९७ |
| शेवटची ट्रॅम | १०५ |
| जुने चित्र | ११४ |
| ग्रंथांची फुटली पेट | १२४ |
| आंबोली | १३१ |
| अळूर | १४२ |
| अनिल | १५० |
| बाबुराव चित्रे | १५८ |
| नानांचे नवे खेळणे | १७२ |

# येथे टीका केली जाते

मरहूम व्हर्जिनिया वूल्फ या इंग्रज कादंबरी-लेखिकेने काही वर्षांपूर्वी अशी सूचना केली होती की, आता नियतकालिकांतील पुस्तक-परीक्षणे बंद करावीत; त्यांनी कोणाचे बरे होत नाही. एका पुस्तकाची पन्नास परीक्षणे येतात. वीस म्हणतात, असे पुस्तक जाहले नाही; वीस म्हणतात, ते वाचवत नाही; दहा काहीच म्हणत नाहीत. स्तुतीला निंदेचा छेद जाऊन लेखकाच्या हिशेबी शेवटी सुखदुःखाचे पूज्यच उरते. वरील प्रमाण इंग्रजी; मराठीत ते ३० : १ : १९ असे पडेल. म्हणून मराठी लेखकाला व्हर्जिनियाबाईंची सूचना थिल्लर वाटेल. एखाद्या नतद्रष्टाला परीक्षणांची रीतभात माहीत नसली तरी त्याच्यासाठी इतर संभावितांची गळचेपी का ? तेही खरेच ! बहुतेक वाचकांना मात्र बाईंचे म्हणणे मानवेल. एवीतेवी परीक्षणे ते वाचीत नसतातच. पण कोण जाणे, त्यांपैकी काहींना तरी आपण घेतो (किंवा उसनी आणतो) त्या पत्रांत असे काहीतरी कलात्मक, सांस्कृतिक, वगैरे येते याचे, ते न वाचताच, नैतिक समाधान वाटत असेल. याच कारणासाठी संपादकांची जमातही या सूचनेला विरोध करील. शिवाय त्यांना मोफत पुस्तके मिळणेही बंद व्हायचे ! म्हणजे त्यांचे स्नेही, आप्त, शेजारी यांचाही विरोध होणारच...पण असा विरोध गृहीत धरूनही त्या कल्पनेची तपासणी करावयास हरकत नसावी. इंग्लंडात तिचा उच्चार होऊन अवघी आठच वर्षे लोटली आहेत; तेव्हा आपल्याकडे तिला क्रांतिकारक, निदान नवी या बेताच्या अर्थाने, पुरोगामी म्हणता येईल. आणि अशा पुरोगामी वा क्रांतिकारक कल्पनांच्या चर्चांची आपल्याला सवय नाही असे आपला वैरीही म्हणू शकणार नाही.

वर दिला आहे तो त्या सूचनेचा केवळ पूर्वार्ध. उत्तरार्ध असा की पुस्तकांची असल्या सार्वजनिक परीक्षणांऐवजी खाजगी परीक्षणे व्हावीत. म्हणजे अ आपले पुस्तक ब या टीकाकाराकडे घेऊन जाईल; व ते काळजीपूर्वक वाचून तो अ ला तपशीलवार निर्णय कळवील व त्याबद्दल मुशाहिरा घेईल. या कानाचे त्या कानाला काही कळणार नाही. सर्व काही गुपचूप ! मूळ लेखिकेने या दाव्यातून 'टीकाकार' वगळले आहेत; तिची सूचना फक्त पुस्तकपरीक्षणकारांविषयीच आहे. पण पुस्तकपरीक्षणे (पोच व अभिप्राय यांत सामील आहेत.) लिहिणाऱ्यालाच आपण (ख्यातनाम) टीकाकार म्हणतो. तेव्हा यापुढे टीकाकार हा शब्द याच सैल आणि सोयिस्कर मराठी अर्थाने वापरला आहे.

—म्हणजे लेखक-टीकाकार यांचा संबंध काहीसा रोगी-डॉक्टर संबंधासारखा होणार. लेखकाने आपले लिहिणे घेऊन त्याच्याकडे जायचे. मग तो डॉक्टर, तो वाग्वैद्य, नीट चिकित्सा आणि निदान करून अनुपान आणि पथ्यपाणी समजावून देईल. लेखकाने ते विश्वासाने पाळल्यास (आणि टीकाकार अगदीच वैदू नसल्यास) योग्य वेळी गुण येईल. गुण न आल्यास पैसे परत असे चढाओढीच्या ईर्ष्येने कोणी टीकाकार सांगू लागला तरी आपले हित जाणणारा लेखक त्याला बधणार नाही. हाडी मुरलेला एखादा ज्वर असला तर तुमचा टीका-धन्वंतरी तो चार दिवसांत काय जादूटोण्याने बंद करणार ? साध्या दुखण्याखुपण्याचे निराळे. एखाद्या कवीतील वृत्तदोष त्याच्या ऐपतीप्रमाणे वृत्तदर्पणाचे किंवा छंदोरचनेचे चार वेढे देऊन महिन्याभरात काढता येतील. पण त्याला काव्यातून वारंवार नको तेव्हा क्रांती होत असेल—किंवा उठल्यासुटल्या अंगात राधाकृष्ण येत असेल—तर त्याला चरचरून डाग दिले तरी काही सहजासहजी ते हटणार नाही.

पण हे सगळे असे चोरूनमारून करण्याच्या रोगटपणाची आवश्यकता काय, लेखकाच्या दोषांची उघड चर्चा का नको, या शंकेचे उत्तर पुढीलप्रमाणे. तुमचा डॉक्टर तुमच्या व्याधींची चिकित्सा उद्या भर चव्हाट्यावर करू लागला तर कसे होईल ? "आँख के दर्द हटानेवाला" युनानी हकीम भोवती गर्दी जमवून एखाद्या बापड्याच्या डोळ्यांशी बोटांनी आणि सळीने सार्वजनिक चाळा करतो, आणि वर कडकडून व्याख्यान देत असतो. त्या रोग्याच्या जागी लेखक व हकीमाच्या जागी टीकाकार असे चित्र मनात उभे करा—की खाडकन सगळ्या शंका फिटतील. मोठा कडव्या काळजाचा मर्द लेखक असला—समजा, राजकीय कादंबरीकार आहे. त्याचा प्रत्येक नायक किमान पाऊण लाख लोकांपुढे भाषणे करतो, तुरुंगात चक्की पिसतो, पोलिसांच्या हातावर तुरी देऊन जंगले तुडवितो, चार-चार स्त्रियांवर प्रेम करतो—पण त्याच्या तन्दुरुस्तीची हमरस्त्यावर तपासणी केली तर त्याचे काळीज कळकळल्याशिवाय कसे राहील ! कसाही असला तरी तो माणूसच. खाजगीत, आतल्या पडद्याच्या खोलीत, तो सर्व काही ऐकून घेईल. अगदी कृतज्ञतेने, इतकेच नव्हे तर न पुसता सगळी बारीक दुखणी खुली करील आणि त्यांचा अद्ययावत् इतिहासही सांगेल. आपल्या लेखनात दोष आहेत, असतात, हे बहुतेक लेखक मोकळेपणाने कबूल करतील—पण ते खाजगी बोलण्यात. वर्तमानपत्रात जर तुम्ही त्याची खुलाशाने फोड करू लागलात तर ते लाजिरवाणे म्हणून अपमानकारक वाटते. मग ते विपर्यस्त, वैयक्तिक, विध्वंसक आणि कुत्सित असल्याचा कांगावा करणे हा मनुष्यस्वभाव आहे. पुस्तके म्हणजे लेखकाचा आत्मा असे आपण म्हणत असतो. मग शरीराप्रमाणे आत्म्याचेही आरोग्य पडद्याआड तपासलेलेच बरे नव्हे का ?

टीकाकाराच्या दृष्टीनेही ही पद्धत अधिक चांगली. पुस्तकपरीक्षणे लिहिताना वारंवार कसे अवघडल्यासारखे होते हे त्यालाच माहीत. लेखकाला दुखविण्याचे भय असतेच; त्याशिवाय इतर नाजुक अवधाने सांभाळायची. आपल्या पत्राचे लागेबांधे, साहित्यसंस्थांचे राजकारण, इतर लेखकांची रुसणीफुगणी, उद्या आपण काही पुस्तक लिहिले तर त्याची कशी संभावना होईल याची दूरदर्शी चिंता—ही सगळी अवजड लोढणी त्या बिचाऱ्याला वागवावी लागतात. स्नेहीमंडळींत झणझणीत टीका ठोकणारा पण लिहिताना गुळमुळीत स्तुती करणारा टीकाकार आपल्या परिचयाचा आहेच. पण तो त्या बिचाऱ्याचा दोष नव्हे; दोष परिस्थितीचा आहे. त्याची सुटका नवी परिस्थिती करील असा भरवसा वाटतो.

याशिवाय अशा टीकेसाठी पैसे मिळू लागल्यावर टीकाकारही जबाबदारीने काम करू लागेल. धर्मार्थ डॉक्टरप्रमाणे धर्मार्थ टीकाकारही उडवाउडवी करण्याचाच संभव अधिक. संपादकाच्या मोहबतीखातर अगर कोणाच्या तरी भिडेसाठी अगर साहित्यिक उमेदवारी म्हणून परीक्षणे लिहिणारा लेखक जेवढ्यास तेवढे हात राखून उतरणार. तेथे चुकारपणाबद्दल एकंदरीने आळीमिळीच असणार. मोफत टीकेच्या चालू नियतकालिक अन्नछत्रात शहाण्याने मिरपूड मागू नये; मिळेल त्यावर समाधान मानून घ्यावे लागते. पण टीकेसाठी दाम मोजल्यावर काम कच्चे निघाल्यास गिऱ्हाईक नाक मुरडेल—आणि पुनश्च फिरकणार नाही. म्हणून प्रत्येक टीकाकार आपली पत राखण्याविषयी फार जागरूक राहील.

हे रुग्ण-रूपक कल्पनेला मोठे उत्तेजक आहे. टीकाकार लेखकाला कसलीकसली पथ्ये घालून देईल. कोठ्याला न झेपणारे जड विलायती वाचन झोपण्यापूर्वी न करायचे कोणाला बजावील; कोणाला आंबून गेलेल्या रसचर्चेचा वासदेखील टाळण्याची ताकीद देईल; कोणा बिचाऱ्याच्या कवितेला मधुमेहासारखे होऊन तिच्यातून उगाच काही गोड-गुळगुळीत स्रवत असेल तर तो त्याचे गुळचट शब्द आणि विषय तोडील; उलट शब्दांची जळजळ होत असल्यास शीत उपचार करील; तर एखाद्याचे अगदीच विकोपाला गेले असले तर लेखनच बंद करून टाकील—निदान काही महिने.

भाषेचे आणि तंत्राचे बारीकसारीक दोष असतील तर तशा साहित्यिक सर्दीपडशाला साधा 'मिक्श्चरवाला' झटपट टीकाकार चालेल. पण दुखणे हट्टी आणि कठीण असले (समजा, आशयाचे असले) तर तो लेखकाला मोठ्या टीकाकाराकडे पाठवील. असले

'स्पेशलिस्ट' टीकाकार बहुधा तसल्या जातीच्या डॉक्टराप्रमाणे कळपाने धंदा थाटून लेखकाच्या सर्वांगीण चिकित्सेची महागडी आणि सक्तीची सोय करतील. त्यात मानसिक रोगाचे तज्ज्ञही असतील हे काय सांगायला हवे ?

तरीही एखादा हुशार वाचक विचारीलच की टीकाकाराला असा डॉक्टर बनविलात तरी वैदूंचा सुळसुळाट होईल त्याचे काय ? आणि सच्च्या डॉक्टरला जाहिरात करण्यास बंदी असते तशी या साहित्यिक डॉक्टरला असेल का ? अनेक टीकाकार दुकाने उघडून बसल्यावर गिऱ्हाईक खेचण्यासाठी त्यांच्यात चढाओढ सुरू होईल हे खोटे नाही. क्षेत्रातील बडव्यांप्रमाणे काही हावरट टीकाकार लेखकांच्या वंशावळी, परंपरा, गोत्रे मुखोद्गत करून बिचाऱ्यांची ओढाताण करतील; आपल्या पठणाची प्रतिष्ठा कोलाहलाने सांगतील. कोणी म्हणेल, मी प्रातःकाळी प्रतिभासाधनाचे प्रकरण म्हणतो, भोजनोत्तर छंदोरचनेतील जातिजृम्भण किंवा छन्दश्छाया होते, रात्रौ निजण्यापूर्वी लघुकथा कशा लिहाव्यात या ग्रंथाचा पाठ नियमितपणे करतो. कोणी रसविमर्श पचविल्याची प्रौढी सांगतील; कोणी अभिनव काव्यप्रकाश घोटल्याचा टेंभा मिरवतील. संस्कृत काव्यशास्त्री मम्मट, रुद्रट, भामह, दण्डी असल्या जबरदस्त नावांनी वजन मारतील. पण मला वाटते, एकंदरीने परदेशी दाखलेवाल्यांचीच भीड जास्त होईल. त्यांतले इंग्रजीवाले कदाचित् मागासलेले समजले जातील. कोठल्यातरी अनोळखी युरोपीयन विद्यापीठाच्या दीड वितीच्या दाखल्यावर 'स्त्रिया व मुले यांच्या रोगांचे खास निष्णात' अशी चार हाताची पाटी लावणाऱ्या काही डॉक्टरांप्रमाणे, इटालियन, झेक, रशियन यांची अवजड नावे पेलत त्यांच्या खास जडीबुट्टीची शिफारस करणारे टीकाकार विशेष भाव खातील...कोणी साक्षात्काराचा आव आणील; कोणी मोरोपंताचा बुरसलेला बटवा वारशाने आपल्याकडे आला आहे अशी आवई उठवील; कोणी राजकारणाच्या 'चरका'तून बहात्तर रोगांवर गुणकारी दवा पिळून काढील, किंवा अज्जीच 'तिकडची' पेटंट औषधे कडव्या आग्रहाने तुमच्या गळ्यात बांधील. आणखी काही...आणखी काही...असे वैदूंचे अनेक प्रकार माजतील, ते उठल्यासुटल्या हमरीतुमरीवर येतील, हे सर्व खरे. पण वैदूंच्या भीतीने कोणी दुखणे दाबून ठेवत नाही. ज्याला समज आहे तो योग्य माणसाकडे जाईलच; ज्याला समज नाही त्याला वैदूच योग्य. समसमा संयोग होऊन साहित्याचे काही अधिक नुकसान होण्याचा फारसा धोका नाही. खरा लेखक खऱ्या चिकित्सकाकडे, जाहिरातीकडे दुर्लक्ष करून, आपल्या पायाने चालून जाईल. वैदू मात्र लंब्याचवड्या पाऱ्यांवर विसंबून न राहता पाठीवर पडशी टाकून साहित्यिकांच्या गल्लीबोळांतून, कल्हईवाल्याच्या सुरात, दारे ठोठावीत जातील—"पुस्तकावर टीका

करायची आहे काय ? कविता दुरुस्त करतो, लघुकथा ठीक करून देतो, कादंबरीचे सखोल परीक्षण करतो..." या ओरडीतही कोणी मौलिकता, लालित्य, भारदस्तपणा इत्यादी वैशिष्ट्ये आणण्याची सांगूनसवरून खटपट करतील. त्यांची काय साहित्यिक 'सालंमिश्री सफेतमिश्री' वगैरे गुणकारी द्रव्ये असतील त्याचाही ते पुकार करतील.

पण त्यांची कर्मे उगाळण्यात हशील नाही. जेथे धंदा तेथे ढोंग आहेच. आपण बोलत आहोत प्रामाणिक धंदेवाइकांविषयी. त्यांना कोणाची लाचारी न करता उजळ माथ्याने हा साहित्याचे आरोग्य सुधारण्याचा धंदा करता येईल. त्यासाठी स्वार्थत्यागाचे सोंग आणायला नको. फुकट्या लेखकापासून उपद्रव होणार नाही; व मुख्य म्हणजे, स्वतःशी इमान राखता येईल.

पण इतके सगळे रामायण ऐकूनही काही साहित्यिक म्हणतील, "हे ठीक आहे दिसायला, पण त्यात गंमत नाही. ही खासगी टीका कशाला ? आम्ही सगळेच लोकांसाठी—जनताजनार्दनासाठी—करतो; मग टीकाही त्याच्या साक्षीनेच होऊ द्या. आमच्या विरुद्ध अगदी कडक टीका झाली तरी चालेल, पण टीका करा. आमचं नाव निंदेसाठी तरी येऊ द्या, पण अगदी ठणठणीतपणे येऊ द्या. आम्हांला मुक्याने मारू नका." यात प्रामाणिकपणा आहे !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२५
२४१३५
नि. क्र.
निबंध १५२८४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## टोपणनावांविषयी

दत्तो अप्पाजी तुळजापूरकरांवरील प्रत्येक मृत्युलेखाने 'संदेश'च्या 'वत्सलावहिनी' म्हणजे तेच हे गुपित बोलून दाखविले. म्हणजे ते तेवढेसे गुपित नव्हते तर. म्हणजे मामा वरेरकरांचा वर्षभरात धीर सुटेपर्यंत जसे 'एक गतभर्तृका, पुणे' हिचे गुपित सोवळे राहिले होते तसे नव्हे. 'वत्सलावहिनी' हा अच्युतराव कोल्हटकरांचा 'स्त्री-पार्ट' असा साधारण समज. पडद्याआड आणि रंगपटात जाण्याची सवलत असलेल्या, किंवा ती घेणाऱ्या, मोजक्या शिष्टमंडळींना पात्रांची बारीक माहिती असली, तरी बाहेरचे भाबडे सहसा जाहिरात, ऐकीव माहिती आणि अंदाज यांच्या आधारावरच टाळ्या पिटतात. परवा पुण्यात एका बाईचा काहीसा असाच गैरसमज झाला. त्या प्रथमच बालगंधर्वांच्या नाटकाला गेल्या होत्या, व एका नीटस आणि इवल्याशा स्त्रीला बालगंधर्व कल्पून ती गाऊ लागली की डोलण्याचा अभिनय मनापासून करीत होत्या. हे बराच वेळ चालले. पुढे कोणा सज्जन शेजाऱ्याने त्यांचा समज दुरुस्त केल्यावर बाईंचा राग आणि निराशा, बालगंधर्वांप्रमाणेच, डोळ्यांत मावेनात! त्याच्याशी आपल्याला कर्तव्य नाही. आपले बोलणे गैरसमाजापुरते आहे. वत्सलावहिनींचा सगळा ढंग अच्युतरावांच्या नाटकीपणाशी जुळत असल्यामुळे साधारण वाचकांनी मनात तशी गाठ मारून ठेवली. विशेषतः वृत्तपत्रांतील नावांबाबत अशा अनेक गाठी सांगीवांगीच्या बळावर वर्षानुवर्षे टिकून असतात. कधी खरे नाव फोडणे सोयीचे नसते म्हणून, किंवा कधी एका टोपणनावाखाली अनेकांचा समावेश होतो म्हणून, सत्य गुलदस्तात ठेवावे लागते, आणि उघड्या कानांनी असत्य ऐकावे लागते.

सत्याला मरण नाही म्हणतात; पण असत्यही कमी चिवट नसते. आणि टोपणनाव हे तसे पाहिले तर मुळातच असत्य. तेव्हा त्याबाबत आपणही थोडा सैलपणा केल्यास खपावा असे काहीजणांना वाटत असावे. जणू चोरावर मोर होण्याची करामत. तिचे इंग्रजी मासले आहेत. वॉल्टर स्कॉटने आपल्या कादंबऱ्या कसल्याशा टोपणनावाखाली प्रसिद्ध केल्या; त्यांचा बोलबाला झाला. पुढे एका मजलशीत ते नाव आपलेच अशी खासगी बातमी खुद्द स्कॉटजवळच एका गृहस्थाने उच्चारली तेव्हा योग्य तो धडा शिकून त्याने पुढील कादंबऱ्या आपल्याच नावाने प्रसिद्ध केल्या. तीच कथा जॉर्ज एलिअटची. मेरी ॲन ईव्हन्ज या बाईने काही कारणांमुळे ते पुरुषी नाव घेतले. ते पहिले पुस्तक

गाजले आणि हा बुवा कोण म्हणून चौकशा सुरू झाल्या. ज्या परगण्यातील चित्रे तिने रेखाटली होती त्यांतील एका मामुली लेखकावर तो भाग्याचा आळ आला, आणि त्या गव्रूनेही मान डोलावली.

अशीच आणखीही उदाहरणे आढळतील. आपल्याकडेही श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांनी दुसऱ्याचे कर्तृत्व आपण पचवू पाहणाऱ्या साहित्यिक संभावितांविषयी कोठेतरी उल्लेख केला आहे. वाङ्मयचौर्याची ही पोटशाखा मानावी लागेल. येथे नक्कल करण्याचेही श्रम नाहीत. फक्त ते नाव निघताच किंचित हसायचे अथवा लाजायचे. मात्र मिळणारी कीर्ती खाजगी असते इतकेच. पण नाहीतरी आपल्या साहित्यिक कीर्तीचा पसारा तसा फारसा मोठा नसतोच—अगदी चारपाच नशीबवान नावे सोडल्यास! ती मोठी नावे 'खरी' असे आपण धरून चालतो.

आपली टोपणनावे ही बहुधा उघड टोपणनावे असतात. म्हणजे वेषांतर बेमालूम न करता ते वेषांतर आहे याची जाहिरात केल्यासारखे होते. गुप्त पोलीस हा गुप्त पोलिसासारखा दिसू नये हा कायदा लेखकाला लागू नाही. माणसाचे तसले नाव असणेच शक्य नाही. एक तर ती अमुकाग्रज अथवा तमुकसुतासारखी प्रामाणिक नाती दाखविणारी असतात; किंवा 'आलमगिरां'सारखे उघड आव्हान देतात. अथवा वाजवीहून अधिक सुरेख असतात. विभावरी शिरूरकरचा तेथेच पाय घसरला आणि लोक डोळे फाडून पाहू लागले. पण त्यामुळे ज्यांची नावे खरोखरच सुरेख आहेत अशा लेखकांची कुचंबणा होते आणि आईबापांच्या (अथवा कुळाच्या) रसिकतेचे पाप फेडावे लागते. आपल्या एका नव्या कवीबाबत असे होते. त्याचे नाव—विशेषतः आडनाव—कोणाला खरे वाटतच नाही. एकंदरीने मराटमोळी आडनावे इतकी निबर असतात की त्यांत नाजुकपणा म्हणजे खोटेपणा असा आपला ग्रह होतो. संशयाला जागा राहू नये म्हणून, समजा, हरी वामन कुळकर्णी असे टोपणनाव एखाद्या लेखकाने घेतले, असे होत नाही. तो साधे नाव घ्यायचे झाले तरी 'चिंतामण चिंचवडकर' अशी काही तरी अनुप्रासाची मखलाशी करील. तसे नसते तर प्रसिद्ध लेखकांच्या खऱ्या नावांविषयीही संदेह उत्पन्न होऊन त्यांच्यावर हक्क सांगणारे कोणीतरी निघालेच असते. माझ्या ओळखीचे एक थट्टेखोर गृहस्थ 'मीच वि० स० खांडेकर या नावाखाली लिहितो' असे कधी कधी गंभीर मुद्रेने सांगतात. अर्थात तशी एखादी शाळकरी पोर सोडल्यास त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवत नाही—इतके ते गंभीर असतात. म्हणून श्री० खांडेकरांनी तिकडे लक्ष देण्याचे कारण नाही.

एकंदरीने आपल्याकडे टोपणनावांचा प्रघात फार. विशेषतः कवींत. त्याची कारणे काय असतील ती असोत! (कवित्वाची लाज वाटते, तो एक चोरून करण्यासारखा प्रकार आहे असे वाटते, हे एक असावे!) 'कवींचा कवी' केशवसुत येथपासून तो आजवर अर्ध्याहून अधिक कवी बुरखेवाले निघतील. मला वाटते, पंचवीस-तीस वर्षांपूर्वी मराठी काव्यप्रांताचा गोषा झाला होता. गोविंदाग्रजांवर बुरखे घेतण्याची फॅशन फार झाली. आईबाप आणि भावंडे यांच्या नावांचा घरगुती जिव्हाळा आणि संस्कृत संबंधदर्शकाचा भारदस्तपणा असा सोज्वळ संगम होऊ लागला. त्यांतील सर्वांत शास्त्रशुद्ध टोपणनाव वापरणारा कवी म्हणजे जननीजनकज. हा काव्यशास्त्रविनोद त्या काळी फार गाजला होता. माधव जूलियनच्या परदेशी उत्तरार्धाने आणि संकराने मोठे कुतूहल चाळवले होते. त्याशिवाय माधवानुज होते, आणि एक केवळ माधव. दुसरे केशवसुत म्हणजे श्री० ना० के० बेहेरे. (टोपणनावांच्या अर्थहीनतेचे आणखी प्रमाण कशाला?) त्याशिवाय केशवकुमार अत्रे. अशा रीतीने संध्येतील पहिल्या नावाशीच आपले बरेच कवी घोटाळत राहिले, हे त्या पूर्वीच्या पिढीतील सात्त्विक नावे लक्षात घेता साहजिक आहे. पुढे, मुख्यतः 'मनोरंजन'च्या कर्तबगारीने, बंगाली गोडवा येऊ लागल्यावर राजस नावांची पैदास सुरू झाली. गिरीश कानेटकर, कुमार खांडेकर, अनिल देशपांडे वगैरे. आज ही नावे (म्हणजे पहिली) शाळांच्या हजेरीपटात डझनांनी निघतील. पण तेव्हा नवीनपणामुळे त्या नावांनाच काव्य चिकटले होते. चालू पिढीने असले नावनिशीचे लालित्य इतके उपसून टाकले आहे की यापुढील कवींना वेगळेपणासाठी कदाचित काहीतरी भेसूर नावेच धारण करावी लागतील.

बुरख्यावरून दागिने घालणाऱ्या गडकऱ्यांच्या हपापलेल्या यामिनीप्रमाणे टोपणनावानंतर पदव्या दाखविणारे लेखक आढळतात. प्रेमगीताच्या शेवटी 'कवी गंगाकुमार', बी० ए० (ऑ०), एस० टी० सी०, एम० आर० एस० टी० (इंग्लंड) असा विद्येचा तपशीलवार पुरावा आला, तर ते प्रेम थिल्लर नाही याची गॅरंटी समजावी असा उद्देश असणे शक्य आहे. क्वचित् कोणी टोपणनावानंतर आपले पुरे नावही कंसात स्पष्ट करतो. या दृष्टीने उत्तर हिंदुस्तानी प्रघात चांगला. तेथे टोपणनाव हे बुरख्यासारखे नसून पदवीसारखे असते. पुऱ्या नावानंतर अवतरणचिन्हांत ते बसवतात. जसे एखादा उर्दूचा अल्ताफ हुसेन 'हाली', अथवा हिंदीचा मेघवर्मा 'मुकुल'. म्हणजे गैरसमजाला अथवा फसवेगिरीला जागा नाही. व्यवहार आणि काव्य, माणूस आणि कवी, यांची स्पष्ट सांगड घातली जाते. हा प्रयोग मराठीने केला तर? जेथे टोपणनावामागील व्यक्ती सर्वांना माहीत असते तेथे ते सोंग उगाच चालू ठेवण्याचे संकट तरी टळेल. नाहीतरी अशा

ठिकाणी टोपणनावाचा हा बुरखा केव्हाच सरकलेला असतो; फक्त झूल म्हणून वागवावा लागतो.

पण टोपणनावेच कशाला? काही वर्षांपूर्वी एका प्रमुख मराठी मासिकाने शक्यतोवर ती टाळण्याचा चंग बांधला. एकदा त्यात एका प्रसिद्ध विनोदी लेखकाची कविता आली; कवितेखाली त्याचे पूर्ण नाव छापले होते, पण ती चिठ्ठी डकविण्यात आली होती ती ब्रीद पाळण्यासाठी. तेव्हा आम्ही ते पान उजेडाआड धरून मुळात छापलेले टोपणनाव पाहून घेतले. असो. खोट्या नावाआडून लेखक बेजबाबदारपणे लिहितो म्हणावे, तर खऱ्या नावाने तो सहसा खोटेच, म्हणजे गुळगुळीत आणि तोंडदेखले, लिहितो असा विपरीत अनुभव आहे. कदाचित टोपणनावाने तो अधिक प्रामाणिकपणे लिहिण्याचा संभव आहे. काही वर्षांपूर्वी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'ने पुस्तकपरीक्षणे विननावाने छापण्याचा प्रयोग केला; तो इतका यशस्वी झाला, परीक्षणे इतकी निर्भीड आणि प्रामाणिक होऊ लागली, की तो थांबवावा लागला. पुन्हा (खऱ्या) नावाने परीक्षणे सुरू झाली. तेव्हा नावात काय आहे, अशी बिचाऱ्या शेक्सपिअरचीच, पण जरा निराळ्या अर्थाने री ओढावी लागेल. कचदिल माणसात वेषांतराने धाडस उतरणार नाही आणि एखाद्या उनाड नाऱ्याला उघड्यावर संभावितांत बसवला म्हणून तो शुभ बोलेलच असे नाही.

—आणि आपण खरे नाव म्हणतो ते खरे कोणत्या अर्थाने? बोलूनचालून व्यवहाराच्या सोयीसाठी हाडामांसाच्या एका नगावर डकविण्यात आलेली ती चिठी. कुळाची खातरजमा होण्यासाठी आडनाव आणि बापाच्या ऋणाचा उच्चार म्हणून ते एक नाव. या लंब्या नावात 'स्वत्व' कोठले? तेव्हा निवडणुकीसाठी मतदारांच्या याद्या अथवा रेशनकार्डे यांच्यासाठी नेहमीचे नाव, तसे लिखाणासाठी दुसरे. ते निदान स्वतःच्या पसंतीचे असते, जुलमाने लादलेले नसते. नावापासून मौलिकता...तेव्हा उगीच कोणी कोणाला खोटे म्हणू नये.

पण लेखक टोपणनाव का घेतो? कोणी म्हणेल, भित्र्या पोरवयात आत्मविश्वास नसला म्हणजे तोंड लपवायला ते बरे. लेखन फसले तर आपल्यापुरतीच खंत; जमले तर 'मीच तो' म्हणून शुभवर्तमान पसरविता येते, आणि वर प्रसिद्धिविन्मुखतेचे श्रेयही पदरात पडते. पण हे पूर्ण सत्य नव्हे. हा दुहेरी व्यक्तिमत्त्वाचा खेळ आहे. दररोजच्या धक्काबुक्कीने मलिन झालेले खुरटे, बावळे व्यक्तिमत्त्व तुमच्या व्यावहारिक नावाशी बांधलेले

असते. नकोत त्या आठवणी त्याच्या मागे वळवळत असतात. पण एक निराळे आणि निर्मळ व्यक्तिमत्त्व आपण कोठेतरी अंतरात खोल जपून ठेवलेले असते, आणि एकांतात ते बाहेर काढून हळुवारपणे घासूनपुसून त्याच्याकडे डोळे भरून पाहतो. डॉ० जेकिल आणि हाईड या स्टीव्हन्सनच्या प्रसिद्ध कथेतील दुहेरी जीवन येथे उलट दिशेने ध्यायचे. आपल्यात सुंदरतेचा अंश आहे ही ओळख पटली की कळत-नकळत तो मोहरू लागतो. कधीतरी काही क्षण त्याचा सुवास अंगभर भिनतो—एरव्ही आहेच नेहमीचे मठ्ठ, रसगंधहीन आयुष्य. पण थोड्या जिवंत क्षणांपुरते आपण अन्य कोणीतरी असतो. तेव्हा कारकून कारकून नसतो आणि वकील कायद्याच्या बकाल जंजाळातून बाहेर पडतो. त्या अन्यपणाची, सुटकेची, साक्ष म्हणून टोपणनाव. अर्थात हा अलिप्तपणा नावापुरताच नको; पण टोपणनाव ही त्याची निशाणी आहे. कित्येकदा निशाणीची गरज नसते. एकाच नावाने ते दोन्ही 'मी' झाकू शकतात; कधी ते दोन मी अगदी सरमिसळ असतील. साधारणतः त्या दोघांच्या मेळावर कलेचे स्वास्थ्य बरेचसे अवलंबून असते. हे काहीसे तिपायी शर्यतीसारखे आहे. गोड कविता लिहिणाऱ्या माणसाची राहणी कळकट असू नये, हा आग्रह निरर्थक आहे; कारण ती दोन माणसे असतात. कलेच्या व्याकरणात असले द्विवचन मंजूर आहे; तेथे एकवचनीपणाची प्रतिष्ठा कशाला! पण कोणी म्हणेल, मग अनेकवचनही का नको? तेही खरेच. इमर्सनने 'माझ्यात समूह आहे' असे सांगून टाकलेच आहे.

पण या झाल्या सगळ्या कलेच्या पवित्र तात्त्विक बाता! टोपणनाव वापरणाऱ्या दरोबस्त लेखकाला असे दुसरे सुंदर आणि नाजुक व्यक्तिमत्त्व असते हे त्यालासुद्धा बापड्याला खरे वाटणार नाही—अर्थात्, म्हणून ते खरे नव्हे असे समजण्याचे कारण नाही. पण टोपणनावाची अशी वकिली केली तरी, ते कोणी मोठ्याने उच्चारताच 'ओ' म्हणणाऱ्या माझ्या परिचयाच्या एका आत्मसंतुष्ट लेखकाचे हसू आल्याशिवाय राहत नाही.

# लेखक आणि त्यांची नावे

लेखकांच्या टोपणनावांविषयी मी चौदा वर्षांपूर्वी एक लेख लिहिला. त्याचे मळकट कात्रण मला शोभेशा गबाळग्रंथी गळाठ्यात कोठे खितपत पडून होते, त्याचा नुकताच माझ्या पत्नीने उद्धार केला. कारण एका प्रकाशक-स्नेह्यांना माझा एखादा ‘ संग्रह ’ काढण्याची अनिवार उबळ आली होती. मी तो जुना लेख नव्या चर्वीने वाचून काढला; बरे वाटले. कोण जाणे, आपलेच लिखाण खूपसे जुने झाले, मध्यंतरी दृष्टीआड झालेले असले, की ते आपल्यालाच आवडू लागते. जुन्या कपड्यांप्रमाणे त्याला कसला तरी छानसा वास येतो. तो वास काहीसा कागदाचा आणि काहीसा काळाचा असतो...पण उगाच स्वतःचे चोरटे कौतुक वाटू लागते खरे !

त्या लेखाला जणू पूरक म्हणून लेखकांच्या खऱ्या नावांविषयी लिहिण्याही सुरसुरी आली ती मात्र केवळ त्या कौतुकातून नव्हे. त्याच सुमारास एक दूरचा प्रवास घडला. त्यात डोळ्यासमोर धरायला म्हणून छानसे इंग्रजी पुस्तक घेतले होते; वेगळ्या आकाराचे, वेगळ्या वेष्टनाचे, आणि विशेष म्हणजे फ्रेंच लेखकाचे. (आपल्या ‘ इंग्रजी ’ अद्ययावत्पणाला इंग्रजेतर युरोपीय लेखक अधिक का भावतात ?) ज्यँ कॉक्तूच्या नाटकांचे पुस्तक होते. त्यातील *Holy Terrors* या नाटकातील इस्थर नामे एक स्त्री म्हणते :

The very essence of fame is to make an impossible name widely accepted. Think of some famous names . . . Shakespeare, Bacon . . . All impossible really. If a young author came along and told me his name was Anatole France, I'd advise him to change it straightaway ! But it didn't prevent Anatole France from making his name, so to speak . . . did it ? Make your name a household word; that's the secret.

—मी तेथेच पुस्तक मिटले आणि झटकन मनातून आपल्या थोरथोर लेखकांची नावे सरकून गेली. म्हटले, खरे बोललीस बये. अगदी पोरसवदा लेखक सोडा, पण मराठी

लेखकांपैकी बहुतेकांची नावे कशी बाळबोध आणि बेचव होती, आणि आहेत. आपल्या संततीला कोणी चुकून तसली नावे देणार नाही; विशेषतः त्यांतील काही आडनावांच्या वाटेला आपल्या पोरीबाळींना कोणी खुषीने जाऊ देणार नाही.

पण असली कित्येक नावे आपण सदैव आदराने घेत असतो. (मग त्यांची पुस्तके वाचत नसलो तरी चालेल.) शिक्षक विद्यार्थ्यांना, वडील मंडळी लहानांना, त्यांची कर्तव्यबुद्धीने संथा देतात. ती नावे कधी कर्णकठोर—किंवा जिव्हाजड—आद्याक्षरांसह, कधी चमत्कारिक आद्याक्षरांसह, घेतली जातात. आदराच्या आवेगाने आपली विनोदबुद्धी आणि नादग्रहणशक्ती बोथट होत असावीत. खाडीलकर हे आडनाव तसे तापदायक नाही. एकंदरीत असली 'करान्त' नावेच तापदायक नसतात. अर्थात मोगलगिद्दीकर अथवा इंगळहळ्ळीकर यांसारखे अपवाद आहेतच. पण त्यांचा वापर विनोदी लेखांत अधिक असतो. पण कृ० प्र० ही काय आद्याक्षरे झाली ? तेच माडखोलकरांच्या 'ग० त्र्यं०'चे; अथवा केळकरांच्या 'न० चिं०'चे. म्हणूनच काकासाहेब, भाऊसाहेब, तात्यासाहेब असली तोंडी आणि लेखी सलगी अपरिचितही करीत आले ?

पण ही आद्याक्षरांची फॅशनच मुळी साहेबाकडून उचललेली. स्वदेशीकरणाच्या होषात आपण ती आजवर कशी टिकू दिली कोण जाणे ? त्यातही एक मौज आहे. आपले आद्याक्षर म्हणजे संपूर्ण अक्षर असते; इंग्रजी लेखनपद्धतीमुळे ते त्यांच्या सव्वीस मुळाक्षरांपैकी असते. तेव्हा 'कृ० प्र०'चा 'के० पी०' होतो; आणि तशी इंग्रजी आद्याक्षरे आपल्याकडेही कालपरवापर्यंत छापण्यात येत! बोलण्यात अजून येतात. देशपांडे मंडळींना त्यांची बाधा फार झाली. (कारण साहित्यात देशपांडे मंडळी फार झाली!) वऱ्हाडचे दोन प्रसिद्ध देशपांडे ए० आर० आणि पी० वाय० म्हणून ओळखले जातात. शाळा-कॉलेजापासून ते सोबती. तेव्हा कदाचित 'हजेरीपटा'ने ते अंगवळणी पाडले असावे. आणि त्या काळात, मला वाटते, ते तेवढे चमत्कारिक वाटतही नसावे. (वस्तुतः वऱ्हाड प्रांत पुण्या-मुंबईहून अधिक परंपराप्रिय आणि उगाच वेळ वाचवण्यासाठी लघुलेखन म्हणून आद्याक्षरे वापरतो असे म्हणण्याचा घायकुता आव न आणणारा!) पण तसे म्हणावे तर त्या काळच्याच आणखी दोन साहित्यिक देशपांड्यांचे तसे इंग्रजीकरण झाले नाही. ना० घ० आणि गु० ह० ही अक्षरे तशीच प्रचारात राहिली. पण अलीकडे गाजलेल्या येथील देशपांड्यांच्या मराठी पु० ल०पेक्षा इंग्रजी पी० एल०चा तोंडी वापर अधिक असावा अशी शंका येते. कोण जाणे, (विभक्तिप्रत्यय लावण्यासाठी) सामान्य रूप म्हणून 'पुल' हा शब्द वेंधळा वाटतो (जसे : पुल्ना—

किंवा पुलंना—पुलंचा इत्यादी). पुकाराने प्रारंभ होणारे आणखी साहित्य-पुरुषोत्तम आहेत. उदाहरणार्थ, पु० भा० भावे, पु० शि० रेगे, पु० ग० सहस्रबुद्धे. यांचे इंग्रजीशिवाय चालत आले. कविवर्य रेग्यांनी आपल्या नावाचा पुरु० शिव० रेगे असा वेगळाच संक्षेप काही काळापूर्वी केला होता. पण ती पद्धत कुणी उचलली नाही; त्यांनी स्वतःच ती टाकली. हल्लीच कोठे वाचले की न० चिं० केळकरांनी एकदा तेच केले होते : नर० चिंता० केळकर! आद्याक्षरांऐवजी आद्यद्वयक्षरांची ही टूम पसरली तर कित्येक नावांची रूपे मोठ्या मौजेची होतील. अर्थात् त्याला तीन अक्षरी नावे चालणार नाहीत—दोन्ही नावे. हा खेळ करून पाहण्यासारखा आहे. एक शंका : दुहेरी नावांची आद्याक्षरे वापरतात, पण एकेरी (म्हणजे स्वतःच्या) नावाचे आद्याक्षर वापरीत नाहीत. प्र० पाध्ये अथवा व्यं० माडगूळकर नाही! इंग्रजीत तसे होते.

आद्याक्षरांचे हे पुराण हवे तेवढे लांबवता येईल. पण आटपले पाहिजे. इतकेच की देशपांड्यांमुळे कुळकर्ण्यांची जबर आठवण होते—आणि पु० लं०सारख्या वा० लं०ची! कृ पां चा द्वितीय स्थानीचा अनुस्वार जरा गलथान आहे. तो मकार की नकार? (म्हणूनच का त्यांची इंग्रजी आद्याक्षरे अधिक वापरात आहेत?) या डझनभर कुलकर्ण्यांत एकजण मात्र इंग्रजी आद्याक्षरे कटाक्षाने वापरतात. ते जी० ए० कुळकर्णी. आपले संपूर्ण नाव त्यांनी अजून गुलदस्तात ठेवले आहे. हल्लीच गाजलेल्या एका साहित्यिक चर्चेचा खाजगी पण छापील वृत्तांत कालच हाती आला. त्यातील सर्व साहित्यिकांची नावे संपूर्ण छापली आहेत. ती वाचल्यावर कोणी आद्याक्षरांचाच हट्ट का धरतो, किंवा कोणी दुसरे, म्हणजे पितृस्थानचे, नाव का गाळतो याचा अंदाज आला.

इंग्रजी आद्याक्षरांवरून आठवले. इंग्रजीवर देशी कुरघोडी करण्याचा एक प्रकार क्वचित दिसतो. तो असा : आपल्या भाषेतील आद्याक्षरे रोमन लिपीत लिहायची. म्हणजे, समजा, *Na. Si. Phadke* नाही, फडके तसे काही करत नाहीत. खरे म्हणजे कोणाही मराठी लेखकाने ही शक्कल वापरू नये हे आश्चर्यच नव्हे काय?

सुटसुटीतपणासाठी पितृनाम टाळायची पद्धत आता फार जुनी झाली. तीस वर्षे होऊन गेली तिला. तसे करणारे अनंत काणेकर पहिले का? पण त्यांच्याही पूर्वी के० नारायण काळे हा नावाचा अजब प्रकार लोकांपुढे आला होता. स्वतःचा संकोच आणि वडिलांना जणू पुरे श्रेय. (कित्येक वर्षांपूर्वी ग० कृ० गणेश जोशी या विक्षिप्त नावाने एक लेखक लिहीत.) पण लवकरच असले नावनिशीतील नावीन्य ओसरून गेले. नवसाहित्याने

याबाबत काही खास क्रांती केली नाही. मर्ढेकर 'बा० सी० 'च राहिले. गं० गो० गाडगिळांचे मात्र गंगाधर गाडगीळ झाले. वेगळी लकब दाखविली ती विंदा करंदीकरांनी. स्वतःच्या नावातील आद्याक्षर तेवढे त्यांनी छाटले; आणि अंत्याक्षराला आकार दिला, आणि एकंदर नावाला नादवत्ता! करंदीकर पुढे गद्यात उतरले ते मात्र गो० वि० या सीध्या आद्याक्षरांनी! 'विंदा 'ने लालित्यामुळे आरंभी कित्येक वाचकांची कविलिंगाबद्दल फसगत केली होती म्हणतात. अर्थात 'कवि तो आहे कसा आननी' हे समक्ष पाहीपर्यंत. पण खरे म्हणजे, त्यांच्या कवितेच्या प्रकृतीवरून ते ओळखता यायला हवे होते. (अर्थात्, नेहमीच तसा अंदाज बांधू गेलो तर फार गफलती होतील!) असो. करंदीकरांची याबाबत कोणी नक्कल केली नाही हे विशेष. अर्थात् तसे सोयीचे नाव हवे. केवळ 'गो 'चा ग्रास करून काम भागते तर गोपाळचा 'पाळा' झाला असता. पण ते कानाला पटले नसते. आमचा एक वात्रट स्नेही म्हणतो की करंदीकरांच्या काव्यवाचन-सहकाऱ्यांनी त्यांचे अनुकरण केले असते तर पाडगावकरांवर 'गेशा' होण्याचा आणि बापटांवर 'संता' होण्याचा प्रसंग ओढवला असता! पण ते दोघे कवी तसे लेचेपेचे नाहीत. एकंदरीत नवकवी स्वतःच्या ठाम नावाने लिहितात असे म्हणता येईल. अगदी दिलीप पुरुषोत्तम चित्रे देखील! टोपणनावाचा सोस त्यांना फारसा नाही.

कवींबाबतच्या लिंगसंभ्रमाची दोन अलीकडची उदाहरणे चटकन आठवतात. एक 'आरती प्रभू' यांचे. त्याने म्हणे एक जाणते संपादक सपशेल फसले होते; मग वाचकांचे काय? (आरती प्रभूही नंतर गद्यात शिरले ते चिं० त्र्यं० खानोलकर या टणक नावाने.) दुसरे उदाहरण माणिक गोडघाटे या वऱ्हाडातील कवीचे. पण ते त्यांचे खरे नाव—टोपण नव्हे. शिवाय त्यांनी एक स्त्रैण टोपण वापरूनही काही संपादकांना म्हणे बेचैन केले होते!

पण कवीला कवीसारखे नाव हवेच का? कवी कवीसारखा दिसला पाहिजे का, यासारखाच तो प्रश्न. देहाचा घाट दुसराच कोणी तरी देतो. फार तर वरची नक्षी आपल्या हाती असते. हिंदी कवीप्रमाणे लांब केस ठेवले, डोळ्यांत सुरमा घातला, तरी नाकाडोळ्यांची बनावट कशी बदलणार? पण ही असली भुलावणी हिरव्याकोवळ्या मुलामुलींसाठी ठीक आहे. प्रौढ रसिकाला कवी आहे तसा चालतो—नाही, हवा असतो. तो उगाच 'कवी' दिसण्याचा प्रयत्न करू लागला तर उलट नकोसा वाटतो. बोरकरांसारखा निसर्गतःच तसा असला तर उत्तमच. पण लिहिण्याप्रमाणे दिसण्यावागण्यातही कृत्रिम कवित्व नको. तसेच नावातही. टोपणनाव तर सांगूनसवरून खोटे असते. पण खरे मानले जाणारे

व्यवहारातले नाव कित्येकदा मुळातले नसते. छानछोकीसाठी कोणी 'गोड गोड' आडनाव वापरू लागतो, कोणी अगदीच गद्य दिसते म्हणून स्वतःचे पाळण्यातील नाव टाकून 'काव्यमय' दिसणारे नाव घेतो. कोण जाणे, जरा प्रौढपण आल्यावर त्या नव्या नावातील बालिश गोंडसपणाने अवघडल्यासारखे होत असेल का?

पण हा खटाटोप व्यर्थ आहे. सुंदर नावाने कोणी लेखक तरला नाही की गबाळ्या नावामुळे कोणी मागे पडला नाही. 'बालकवि' हा किताब त्या कवीला लहानपणी मिळाला; तो चिकटला. पण त्र्यंबक बापूजी ठोमरे हे आपले खरखीत नाव त्यांनी कवितांखाली टाकले असते तरी त्या कवितांची (आणि कवीची) मोहिनी उतरली नसती. तेच हरी नारायण आपटे यासारख्या बाळबोध नावाचे. अर्थात् त्यांचा काळच तसा बाळबोध होता. नारायण सीताराम फडके हे किती सोज्वळ नाव. वस्तुतः फडक्यांच्या नायकांची नावे कशी छानछान असतात. (त्यांच्या पुण्याईमुळे ती लौकरच रूढही झाली.) पण फडक्यांनी स्वतःचे नाव ललित करून टाकले नाही. (अर्थात् त्यांच्या अनेक वाचकांना आपल्या लाडक्या कादंबरीकाराचे नाव नादमधुर असते तर आणखी गोड वाटले असते. पण आपण रसिक वाचकांविषयी बोलत आहोत.) 'मनोरंजन'चे काशिनाथ रघुनाथ मित्र बंगालीच्या अतिरिक्त प्रेमाने 'मित्र' न होता 'आजगावकर'च राहिले असते तरी त्यांची कर्तबगारी कमी गाजली नसती. मर्ढेकरांचे राठ आडनाव त्यांची (किंवा कोणाचीच) कविता न वाचणाऱ्यांच्याही तोंडी खेळत आहे. त्यांच्या कवितेला भेसूर, ओंगळ, विकृत म्हणून नाक मुरडणाऱ्या नाजुक सौंदर्यवाद्यांनीदेखील त्यांच्या नावाविषयी काही वाईट म्हटले नाही!

खऱ्या नावाने लिहिण्याचा प्रघात अलीकडे वाढला आहे—अगदी कवींतसुद्धा; तसेच संपूर्ण नावाने लिहिण्याचाही. चांगले आहे हे. मुखवटा घालून लिहायचे, किंवा मुखवटा घालून काव्य करायचे आणि तो उतरून गद्यकर्म करायचे हे कशाला? मुद्दाम वेगळेपणाचे सोंग आणल्यासारखे वाटते ते. आणि काही खाजगी कारणासाठी, आपण लेखक (विशेषतः कवी) आहोत हे छपविण्यासाठी, कोणी तसे केले तर समजू शकते. पण चारचौघांनी एकत्र जमून मसलतीने सोंगे काढायची हा प्रकार ताबुतासारखा वाटतो. पूर्वी शाळेतल्या मैत्रिणी म्हणे एकमेकींना अशी लाडिक, आळीमिळीची नावे देत! कृष्णीची कुसुम वने आणि नमीची नलिनी. (आता तसे करायला संधी मिळत नसावी. असे नावाचे लालित्य काळालाही मागे टाकीत आहे. इतके की कुसुम आणि नलिनी ही नावेही कोणाला बाशी वाटत असतील.)

त्यावरून आठवली आपल्या लेखिकांची नावे. त्यांना आद्याक्षरांची इंग्रजी सवलत कधी मिळाली नाही. स्त्रियांनी—कोर्टकचेरीसारखी सरकारी नावनिशी हवी असते अशी ठिकाणे व प्रसंग सोडल्यास—संपूर्ण नाव लिहिण्याची प्रथा नव्हतीच म्हणा. अगदी रमाबाई रानडे अथवा कमलाबाई किबे अशा पैठणीतील नावांतही 'स्वतःच्या' (म्हंजेच 'तिकडच्या') नावाची लेखी गाठ मारलेली नसे. मात्र मराठीतील पहिल्या कादंबरीलेखिकेचे नाव साळूबाई भ्र० भाऊसाहेब तांबवेकर असे होते! तीस सालानंतर लेखिकांची नवी आणि नव्या दमाची लाट आली; त्यामुळे जी खळबळ आणि उलथापालथ झाली त्यात नावानंतरच्या 'बाई'चा आणि पूर्वीच्या कु० किंवा सौ० या स्थितिदर्शक आद्याक्षरांचा लोप व्हायला आरंभ झाला. मात्र उजळ माथ्याने संपूर्ण नाव बदलण्याची स्त्रियांना संधी मिळते, पुरुषांना नाही. तिचा दोघीतिघींनी तरी लालित्यासाठी फायदा उठवल्याचे स्मरते. विशेष म्हणजे मुखवट्यांची गरज फारच थोड्या लेखिकांना भासली. त्यांतल्या 'विभावरी शिरूरकर' हा बाळूताई खऱ्यांचा मुखवटा अतिशय गाजला, तोही जे लिहिले त्यामुळे. नुसते नावही जरा (त्या काळच्या) कादंबरीतल्यासारखे दिसत होते. मात्र त्या वेळच्या एका लेखिकेने आपले 'बंबेवाले' हे खणखणीत आडनाव तसेच वापरले.

कित्येक खरी नावेही आरंभी अशी कादंबरीतल्यासारखी, म्हणजे खोटी, वाटली. शरच्चंद्र मुक्तिबोध यांचे असेच झाले. पुण्यामुंबईकडच्या वाचकाला ज्या पांढरपेशा (आणि मुख्यतः 'उच्च' जातींतील) नावांची सवय, त्यापलीकडचे काही आले तर तो बिचकायचा. आणि साहित्य हे आपल्यासारख्यांसाठीच आणि आपल्यासारख्यांविषयीच ही त्याची निष्ठा. म्हणून 'आपल्या' भाषेहून निराळे काही दिसले की ते अशुद्ध, अशिष्ट, म्हणून त्याला हसण्यासारखे वाटायचे (आणि अजूनही वाटते). तशीच दूरच्या प्रदेशांतील अपरिचित नावेही त्याला चमत्कारिक वाटत. मुक्तिबोध माळव्यातले. तेच वऱ्हाड आणि मराठवाडा येथील भाषेच्या आणि नावांच्या लकबीविषयी. त्यात पुन्हा आता 'इतर' वर्गांतील लेखक पुढे येऊ लागले आहेत. बिनसवयीची नावे दिसतात. उद्धव शेळके आणि गजमल माळी आणि तल्हार आणि खरात. असली नावे पुष्कळांना अजून टोचत असावीत. 'मराठमोळी' नावे कथाकवितांत खपतात—नव्हे, कसलातरी 'प्रादेशिक' आणि 'मऱ्हाटी' उमाळाही आणतात. पण त्या कथाकवितांच्या वर किंवा खाली ती कशीशीच वाटतात का? पात्रांना शोभतात, पण लेखकांना नाही?

कोण जाणे, सवयीची नसती तर या प्रदेशातील नावेही दूरस्थ वाचकाला तशीच

चमत्कारिक वाटली असती; कित्येक वाटतही असतील. अर्थात् शेवटी नावांतील आवडीनिवडीबाबत काही सांगवत नाही—म्हणून आहे इतकी तरी विविधता आपण पाहतो. 'नावांचे सौंदर्यशास्त्र' निश्चित करण्याचा गंभीर आव कोणी आणू नये. (सुदैवाने तसे होण्याचा फारसा धोका नाही; कारण इंग्रजीत कोणी तसे केलेले नाही !) हा पूर्णतः खाजगी आवडीचा प्रश्न असतो. शामराव ओक यांचे मूळ नाव शांताराम होते. पण त्याला कसला तरी 'हलका' वास येतो म्हणून त्यांनी ते बदलले म्हणे, पण आडनाव नाही बदलले ! मला स्वतःला माझे पहिले नाव कधी फारसे आवडले नाही; पण ते बदलायचे राहून गेले बेटे. आद्याक्षरे वापरायला मी नेहमी विरोध केला. अनेक संपादकांनी केवळ सवयीने ती वापरली. पण हा लेख प्रसिद्ध करणारे संपादक माझे पूर्ण नाव छापतील अशी आशा आहे.

# काबुली संस्कृत

काही महिन्यांपूर्वी वर्तमानपत्रांतून अशी एक आवई उठली की, अफगाणिस्तान सरकारने काबूल विद्यापीठात संस्कृत भाषा हा आवश्यक विषय करण्याचे ठरविले आहे. मोठी खळबळ उडाली, अभिनंदने झडली आणि ज्यांच्यात विद्वत्तेपेक्षा देशाभिमान अथवा धर्माभिमानच अधिक, अशा काही पुढाऱ्यांनी आत्मगौरवाचे उतावळे संदेश ठोकले. या आरोळ्यांत एक सूर असा की सोमनाथाची अब्रू घेणारा गझनीचा महमूद अथवा पानिपतला मराठ्यांची लांडगेतोड करणारा अहमदशहा अबदाली असल्या असंस्कृत अविंधांवर इतिहासाने कशी कुरघोडी केली. सत्याचा आणि सद्धर्माचा विजय असो! त्या रानदांडग्या मूर्तिभंजकांचे आजचे वारसदार मवाळपणे मांडी घालून 'शक्लृ पच् मुचि रिच् वच् विच्'ची अवघड संथा घेतील किंवा देवे म्हणतील. ऐतिहासिक दुष्कर्माचे सोज्वळ प्रायश्चित्त घेतील. तेव्हा घाऊक धर्मांतरे झाली; कित्येक शतकांच्या गनिमी वाटपहाणीनंतर आता 'पुश्तूतून संस्कृतात भाषांतर करा' या विद्यालयीन सक्तीने जणू त्यांचा लेखी बदला घेतला जाईल. आजवर सुका मेवा, हिंग आणि सावकार यांची ज्या देशातून आयात केली, त्याला संस्कृत पाठमाला आणि त्यावरील मंजिऱ्या यांची जबरीची आयात आमच्या शालोपयोगी पुस्तकांच्या कारखान्यांतून करावी लागणार.

आपल्याच कर्तबगारीमुळे आपला देशाभिमान हल्ली मरगळल्यासारखा झाला होता. त्याला केवढी पुष्टी मिळाली. कसलीतरी पठाणी जडीबुट्टी! प्राचीन इतिहासाचे सोयीचे तपशील संशोधकमंडळी चेकाळल्यासारखी घडाघडा बोलू लागली. कंदाहार म्हणजे गंधार आणि पेशावर म्हणजे पुरुषपुर, ही उजळणी झाली. अशाच इतर रासवट नावांना गोंडस रूप देण्यासाठी ललित लेखण्या शिवशिवत असतील. वायव्येकडचे सगळे बौद्ध अवशेष पुन्हा अभिमानाने खणून काढले. बृहद्भारताच्या महत्त्वाकांक्षांना चिथावणी मिळाली. भाषाशास्त्र्यांनी वंशावळ तपासून पुश्तू आणि संस्कृत या भाची-मावशी किंवा तसेच काहीतरी असल्याचे प्रेमळपणे बजावले. या सगळ्या विद्वान सुखसोहळ्यात आजवरच्या लोकप्रिय वैरांचा निरास झाला; नव्या प्रेमाच्या हुडहुडीने जुन्या द्वेषाचे पेटके क्षणभर थंडावले...

असले सोहळेच दुर्दैवाने लौकर थंडावतात; तसे झाले नाही तर या पठाणप्रेमाचे,

भारदस्त भाषा टाकायची म्हणजे, आपल्या सांस्कृतिक जीवनावर किती सखोल आणि सर्वंकष परिणाम होतील! आजवर पठाण हा अपशब्द होता. धमकीसाठी इतकी गुणकारी असामी शोधून मिळत नसे. पुढे हिंदूकरणाच्या होषात कोणी त्याच्या जागी गुरख्याची स्थापना केली, आणि कुकरीच्या खुनी कहाण्या रंगविल्या; तरी ती भीती आकार धरीना खरी. हा सगळा लांबीरुंदीचा सवाल आहे. गुरख्याचे एकंदर बांधकामच बसक्या घाटाचे; उलट, पठाणाची मोजमापे कशी ऐसपैस असतात. त्याची कारणे काहीही असोत. असा हा कुद्रती बनाव आहे; शब्दाने तो बदलायचा नाही. 'मेला गुरखा आहेस' असे तापलेली मातृदेवता झोंड पोरावर खेकसली तर तो डरणार नाही. मर्दानी 'डिझाइन्'च्या, आणि बाण्याच्या, (म्हणजे खोटा नाजूकपणा न दाखविणाऱ्या, लाडिकपणे न बोलता, माणसासारखे बोलणाऱ्या) मुलीला 'पठाण' म्हणण्याऐवजी 'गुरखा' म्हणण्याने अधिक विनोद पैदा होईल कदाचित! पण आता पठाण म्हणताना अवघडल्यासारखे वाटेल. सावकारी जुलमाच्या उपमेचा सर्व भार बिचाऱ्या लुकड्या मारवाड्यावर पडेल; आणि ती जबाबदारी पार पाडण्यासाठी त्या बापड्याला रक्तशोषणाच्या आणखी अहिंसक क्लृप्त्या योजाव्या लागतील.

भाषेवरून साहित्य. तसा मराठी साहित्यात पठाणाचा वावर फारसा नाही. ऐतिहासिक कवितांत त्याला खलपुरुषाची भूमिका दिलेली कोठेकोठे आढळते. कत्तल, बलात्कार, धर्मांतराची जबरी इत्यादी रंगत आणणाऱ्या, नाट्यपूर्ण करामतींचा मक्ता सहसा तोच सांभाळत असे. आपल्या वाङ्मयीन राष्ट्रवादात मुसलमान हा वैरी; नाटककादंबऱ्यांतील राजकीय रूपकांत कालपर्यंतच्या सत्ताधाऱ्यांची 'छाया' म्हणून तो 'फिट्ट' बसत असे. आणि त्यात पठाण म्हणजे अगदी म्लेंच्छार्क! त्याला काहीही शोभून दिसते! पण विनोदाचार्य अत्र्यांच्या एका विडंबनकवितेत तो 'पसरला सहा अन् फूट' असे झाले आहे. मरहूम कादरखां काबुलवाला यावरील त्या रसाळ शोकगीतात खिसमिसची खैरात आहे, आणि हिंग आणि सुरमा आहे. पण पठाणाचा मुडदा आहे म्हणून त्याच्याशी सलगी केली आहे असे नाही. त्यांच्या 'श्यामले'तील प्रेमी कवी पठाणी खाक्याचा आहे. 'माजूम मी, तूं याकुती / मी हिंग काबुलि, तूं मिरी', 'कांदेबटाटेभात मी / मुर्गी बिचारी तूं परी', 'अक्रोड मी कंदाहरी / तूं साहऱ्यातिल खर्जुरी' असल्या कडक रूपकांनी माशुकाची (खोटी) तारीफ नाहीतर कोण करणार? अर्थात् ही कविताही विडंबनच आहे—माधव जूलियनांच्या पहिल्या प्रेमगीतांचे. तेव्हा त्यांची कविता फारसी शब्दांनी बुजबुजलेली असायची. (फारसी ही अफगाणिस्तानची राजभाषा आहे.) प्रेमपत्राला बखरीची वातड कळा यायची. पुढे या पापाचे प्रायश्चित्त म्हणून, बाटग्याच्या

कर्मठपणाने, कवी उलट दिशेला भडकला आणि त्याने आपल्याच कवितेचे वपन आरंभिले—आणि तिला सोवळी केली. उलू पठाणाचा पाहता पाहता शुचिर्भूत पंडित बनला. 'बुतशिकन व्हा'—मूर्ती फोडा—असे पहिल्या जोषात म्हणणारा कवी शेवटी आपल्याच शब्दमूर्तींची मोडतोड आणि दुरुस्ती करू लागला. मराठी कवितेतून हशाने पठाण हद्दपार केला. कधीकधी वाटते की हे गैर झाले. आजची गोडगोड आणि मुर्दाड भावगीते (म्हणजे प्रेमगीते) ऐकल्यावर आणि ती म्हणताना लचकणाऱ्या किंचित्पुरुषांना पाहिल्यावर पठाणाचीच आवश्यकता भासते. ती हरवलेली रग परत आली पाहिजे. असो. हे काव्याबाबत. मराठी रंगभूमीवरही पठाण थोडाबहुत वावरलेला आहे. ऐतिहासिक मग्रूरपणासाठी; क्वचित् नाटकातील विनोदासाठीही. 'खामोष', 'तोबा तोबा', 'अफसोस' असल्या तोंडभरल्या उद्गारांनी विनोद पिकून उर्दूही आणल्यासारखे होते, आणि वेगळ्या वेषाने डोळ्यांचेही कौतुक भागते. आपल्या कथाकादंबऱ्यांना पठाणाचा थोडा वास लागलेला आहे—पण फारच थोडा.

पण आता कदाचित हा मामला बदलून, आर्जीकडून लागणाऱ्या या नव्या नात्याच्या मुर्वतीखातर, प्रेमळ पठाणांची पंगत आपल्या वाङ्मयात बसेल. पठाणाला अगदीच नायक केला नाही, तरी 'खलनायकाचे पारिपत्य करून नायकनायिकेचे मीलन घडविणे' इत्यादी सच्छील भूमिका त्याच्यावर सोपविल्या जातील. तो शीलाचा रखवालदार बनेल. मग संकटातील नायिका अन्य कोणाचा धावा करणार? त्याने दिलेल्या हिंगाची चुरचुरीत फोडणी कथानकाला देता येईल; जसे, तिच्या—म्हणजे फोडणीच्या—मोहाने बहकलेला नायक पुन्हा मार्गावर येतो. शेवटच्या प्रकरणात, अथवा अंकात, सगळा (एकदाचा) आनंदीआनंद झाल्यावर तो उपकारकर्ता पठाण "अश्रुसिक्त नयनांनी" सर्वांचा निरोप घेता घेता बदामपिस्ते आणि अक्रोडअंजिरांची मासिक भेट नवपरिणीतांना पाठविण्याचे पौष्टिक आश्वासन देईल. नवकवितेत त्याचा बेताल चोळणा आणि जरतारी जाकीट आणि तुकतुकीत लांब केस यांतून वेड्याविद्या प्रतिमा झरणे अशक्य नाही. बेमालूम रूपांतरे ठोकणारे, सखोल रसग्रहणे करणारे, लोकगीते हळवेपणाने जमा करणारे इत्यादी विविध प्रकृतींचे साहित्यिक पुश्तूवर उठतील. इतकेच नव्हे तर एखादा 'तौलनिक टीकाकार' पठाणांवर मराठी शिक्के मारीत सुटेल; जसा हा अमूकखां म्हणजे पुश्तूचा आचार्य अत्रे, तमूकखां म्हणजे पुश्तूचा मनमोहन इत्यादी. हे सगळे भविष्य इतर कोणत्याही भविष्याइतके विश्वसनीय मानायला हरकत नाही.

अर्थात्, संस्कृत जारी झाल्यावर हिंदुकुश आणि काराकोरमच्या पलीकडे काय खळबळ

उडेल याच्या अंदाजाला निबंधमालाच लागेल. अवघा यवनलोक ढवळून निघेल. ती देववाणी उच्चारताना, चिवट जोडाक्षरे, खैबरघाटाच्या लांबीचे समास, आणि विसर्गाचा बुभुःकार यांच्याशी मुकाबला करताना कसलाही पठाणी जबडा हैराण होईल. तशी पुरतू भाषा नाजुकपणे ओठांभोवती घोटाळणारी नाही; तिचे काही वर्ग वाजवीहून अधिक 'कण्ठ्य' आहेत; ते घशाच्या अंतर्गृहातून ओढून काढावे लागतात. सुस्त गळ्याला तापविण्यासाठी खर्जाशी गुरकावून झगडणाऱ्या मेहनती गवयाची करामत त्या बोलीत लागते. पण ती संस्कृतपुढे लटपटेल असे वाटते. काहीतरी निमित्त काढून खडतर तपश्चर्या करणाऱ्या उग्र ऋषीमुनींची भाषा ती. ती काय त्या धटिंगण पठाणांना झेपणार? पण तेही काही कमी जबरदस्त नाहीत; पाठ सोडणारे नाहीत. आज नाही उद्या निदान एखादा लघुगीर्वाणकोश (व्युत्पत्त्यांसह) पचवतील. श्री० न० वि० गाडगिळांनी "पुण्यातील एक नामवंत वैद्यराज" कालिदासाच्या उज्जयिनीला, संस्कृत कवितेच्या माहेरघरी, गेले असता भाजीकडे बोट दाखवून "इस वस्तुजातका मूल्य क्या है?" अशी कोणा माळणीला पृच्छा करते झाल्याचे लिहिले आहे. उद्या कदाचित काबूल-कंदाहारलाही भर बाजारपेठेत संस्कृतात सौदे जमतील; खाटकाच्या दुकानावर संस्कृतप्रचुर पाटी झळकून अलम मंडीला पुण्याच्या रस्त्याची अवकळा येईल. मोहल्ल्यांतून पुरुषसूक्ताचे घोष घुमतील. आणि मद्रेसा, मस्जिद यांतून सोट्याच्या धाकाने अमरकोश पाठ केला जाईल. षड्दर्शनांचे निरूपण होईल, आणि कुमारसंभवाचा अन्वयार्थ दाढीतल्या दाढीत लाजत लावला जाईल. महामहोपाध्याय झुल्फिकारखांचे अस्तित्व मग शक्य आहे. कल्पना आवरत नाही. उन्हे उतरली आहेत. दिवसभर मेंढ्या हाकून (अथवा दुसऱ्या एखाद्या टोळीचे चार लोक कापून) थकलेला कुणी पठाण जवान उघड्यावर खाटले टाकून त्यात आपला अस्ताव्यस्त देह कोंबीत, डाव्या हाताने सुरई गोंजारतो आणि आजुबाजूला कोणी वडीलधारे माणूस नाही हे पाहत, उजव्या हाताने आपल्या कपड्यांच्या घामट घोळातून हलकेच 'गीतगोविंद' काढतो...अहाहा! इराणी उमरखय्यामची ऋणफेड अशी अर्धीमुर्धी का असेना पण आम्ही करणार!

आणि संस्कृतला सरावलेल्या पठाणांना हिंदी देशभाषांची गोडी सहज लागेल. त्यातल्या त्यात आजची मराठी तर अगदी संस्कृतसारखी दिसणारी. ज्याचे संस्कृत कच्चे त्याला ती अगदी आपलीशी वाटेल. मराठी पुस्तकांची ते भाषांतरे करतील. कोणत्या लेखकांची याचा अंदाज करणे मौजेचे ठरेल! असे हे 'सांस्कृतिक दळणवळण' सुरू होईल; आपली असर त्यांच्यावर पडेल. त्यांच्या जिरग्यातून 'कला आणि जीवन' अथवा

'आशय आणि आकृती' अथवा नुसतेच सौंदर्यशास्त्र यांवर मार्मिक चर्चा होतील. मग आपल्या काही चर्चापटूंना बोलावणे येणार नाही कशावरून? कदाचित हे फार होत आहे. प्रकृतिभेद राहणारच. काही झाले तरी, समजा, उद्या एखादा बुळा पठाण पोरगा मराठी भावगीत गुणगुणू लागला तर त्याचा खात्मा केल्याशिवाय ते राहतील का?

ज्या वृत्तपत्रीय वार्तेतून असले स्वप्नरंजन शक्य झाले, तिचा पुढे अफगाण वकिलातीने इन्कार केला; आणि असा खुलासाही केला की काबूल विद्यापीठात संस्कृत भाषा आवश्यक केली ती फक्त भाषाशास्त्राचे उच्च अध्ययन करणाऱ्यांसाठी. वैदिक संस्कृत, प्राचीन फारसी, अवेस्ता इत्यादी भाषा एका कुळातील म्हणून हा आग्रह! या खुलाशाने सगळा उत्साह जिरला. आपुलकीचा भास क्षणभर झळकून गेला—आणि जुने दुरावे घट्ट झाले.

खरे म्हणजे त्या दुराव्यांमुळेच उत्साह उफाळला होता. परक्या देशावर, विशेषतः जुन्या वैऱ्यांच्या देशावर, आपल्या भाषेची पकड बसत आहे याचा तो आनंद. मुलूखगिरीची रानटी हाव नव्या संस्कृतीने मारलेली नाही; कारण या संस्कृतीचा आपल्याला फक्त वरवर स्पर्श झालेला आहे. युरोपात आणि अरब-तुर्कांच्या राज्यांत सत्तीचे वेदघोष ऐकण्याची स्वप्ने आपल्या अनेक महाभागांना पडत आली आहेत. त्यांतील काही पुढारीही होऊ शकले. त्यांचा पुढारीपणाच असल्या बालिश आकांक्षांवर आणि त्यांचे चऱ्हाट लावून केलेल्या लोकरंजनावर आधारलेला आहे. आपले आजचे जीवन कंगाल झालेले आहे. ते शृंगारण्याची हिंमत उरलेली नाही. तेव्हा कालच्या मानीव वैभवाच्या आठवणी काढून त्यांच्या गुंगीत राहणे सुखकर वाटते. आपला धर्म, जात, संस्कृती, भाषा, यांची इतरांवर कुरघोडी कशी होईल, हीच दरिद्री विवंचना. पुरोगामी म्हणविणारे कित्येक अर्धवट जीवही अजून यातून बाहेर पडलेले नाहीत. जरा बारीक नजरेने पाहिले तर राजकारण, साहित्य इत्यादी क्षेत्रांत आघाडीवर असलेल्यांपैकी बहुसंख्य माणसे त्याच जातीची आहेत, हे ध्यानात येईल. मग विश्वबंधुत्वाची आणि मानवप्रेमाची अघळपघळ भाषा कितीही होवो! उद्या काही हजार गुजराती किंवा कानडी यांच्यावर मराठी लादले गेले तर तो आपला विजय समजला जाईल.

—म्हणून पठाणांना संस्कृत शिकावे लागणार याचा आनंद. त्यांच्यावर सक्ती होत असली तरी ती त्यांच्याच सरकारकडून हे विसरलो, आणि शेसवाशे वर्षे आपण परक्याच्या सक्तीने इंग्रजी शिकलो त्याचीही खंत नाही. पण असल्या खंती गिळून

टाकण्यासाठीच, मला वाटते, हे सगळे दुरभिमान आपण जपत असतो. मग संस्कृत ही भाषा मेलेली का असेना; हजारांत एकाला ती चुकतमाकत येत असेल! पण असले निर्बुद्ध अभिमान मेलेल्या गोष्टींविषयीच वाटणार!

# एका लेखकाच्या घराची गोष्ट

खुद्द बापूनेच वेळोवेळी जे सांगितले त्यावरूनच ही गोष्ट जुळवली आहे. इतरांकडून ऐकले ते दुसऱ्या कानाने सोडून दिले. विशेषतः इतर लेखकांकडून. त्या जातीत अगोदरच हेवेदावे फार; त्यात कल्पनाशक्तीचे थोडेफार वरदान! तेव्हा त्यांना 'वाहवा' म्हणावे, पण विश्वास ठेवू नये. बापूही लेखक खराच. पण तो स्वतःसंबंधी प्रामाणिकपणे बोलतो. कसला आव नाही, की छक्केपंजे नाहीत; निदान खाजगीत. आपली वर्मे आपणच सांगतो—जणू ती दुसऱ्याची असल्यासारखी. याच्या लिखाणाचे वर्म मात्र कोणी काढता कामा नये! असो. बापूचे खरे आणि पुरे नाव येथे सांगायला त्याची आडकाठी नाही. पण नकोच ते. असली गंमत घरगुती नावानेच, म्हणजे जवळजवळ निनावीच, बरी.

प्रत्येकालाच घर बांधायचे असते; टुमदार आणि फुलझाडे असलेले आणि शांतसे. अर्थात स्वतःला राहण्यासाठी. बापूनेही लहानपणापासून मनात घराचे आराखडे काढले होते. कधी जवळपास कोणी नाहीसे पाहून, कागदावरही. आता तो चित्रकलेवर अधिकारवाणीने बोलत असला तरी शाळेत असताना त्याचे आणि ड्रॉइंगचे संबंध अगदीच वाईट होते. आम्ही वर्गबंधू म्हणून ठाऊक. रंग हिरवा की निळा हेदेखील बेटा चाचरत ओळखायचा. पण क्रमिक पुस्तकात एखादे घराचे चित्र असले, मग ते कितीही खत्रूड असो, त्याच्याकडे तो एकटक पाहत राहायचा. आम्ही म्हणावे, "बाप्या, घर कधी पाहिलं नाहीस? ते का शहामृगाचं चित्र आहे की जिराफाचं?" मग हसून सावरायचा तो; पण ते खरे नव्हे.

त्याचेही बरोबर. तो राहायचा फणसवाडीतल्या एका चाळीत. त्या दोन खोल्या म्हणायच्या एवढेच; एक बीळ आणि दुसरे पोटबीळ. त्यात आठदहा माणसे; न वारा न उजेड, ओल मात्र भरपूर. डबड्यातली किरटी तुळस ही दाराबाहेरची बागशाही. जणू तिच्याच सावलीत बसून तो वाच वाच वाचे. हाती सापडेल ते. तो बसे त्या गॅलरीत पोरांचे खेळ चालत—एखाद्या माउलीचे पित्त खवळेपर्यंत. चाळीबाहेरच्या मोकळ्या जागेत तर एकसारखा कल्ला चालू असे; पण बापूला त्याची क्षिती नसे.

त्या वयात खूप वाचणाऱ्यांचे जे होते तेच बापूचे झाले. म्हणजे तो ध्येयवादी झाला. पंचवीस वर्षांपूर्वीची ही कथा आहे. त्या काळी ज्या साच्यातले ध्येयवादी असत तसला श्रमजीवी दलितांविषयी सहानुभूतीचा समाजवाद, स्त्रियांच्या कुचंबणेविषयी करुणेचा सुधारणावाद, भौतिक सुखापारचे श्रेयस धुंडणारा आदर्शवाद, 'शहरातून खेड्याकडे चला'चा अर्धराजकीय आणि अर्धसाहित्यिक उच्चजीवनवाद, इत्यादी विचारप्रणाली एकसमयावच्छेदेकरून आणि गोडीगुलाबीने त्याच्या ठायी नांदत होत्या. पुढे तो शाळेतून कॉलेजात गेला. तेच मिश्रण चालू राहिले; घटकांचे प्रमाण थोडेफार बदलले असेल. आता 'घटक दोन'मधील स्त्रियांविषयीची करुणा जरा कमी होऊन कुतूहल उपजले. आणि तो लेखकही झाला. पहिल्या नसल्या तरी दुसऱ्या दर्जाच्या नियतकालिकांतून त्याचे लिखाण प्रसिद्ध होऊ लागले; कॉलेजातील आणि शेजारची मुलेमुली बोट दाखवू लागली. 'आम्ही साहित्यिक'—अथवा 'कलावंत'—'वुइ इंटलेक्चुअल्स' असे म्हणायची त्याला सवय जडली...

ते सगळे ठीक, पण ते घराचे वेड काही कमी होईना. आता तऱ्हेतऱ्हेच्या इंग्रजी मासिकांतून त्याची छायाचित्रे तो शोधू लागला; त्या विषयावरची दोनतीन सचित्र पुस्तकेही त्याने परीक्षेला नेमली असल्यासारखी मन लावून वाचली. सहलीला गेला की सुंदर बंगल्यांपुढे रेंगाळू लागला. इतका की सोबत्यांनी नकोनकोत ते संशय घ्यावेत...

पण तो आता मोकळेपणाने त्याविषयी बोलूही लागला. आपण घर बांधणार ते कशा धर्तीचे : ही अशी बैठकीची खोली, ती 'स्टडी', तिला ऐसपैस फ्रेंच खिडकी, खिडकीशी टेबल, पलीकडे मोगरीचे ताटवे आणि, हो, खिडकीपाशी रातराणी... बेडरूमही तीच. बस्स, त्याच्या 'प्लॅन'मध्ये घराचे आणखी भाग सहसा नसत. आणि ते बांधणार कुठे असे कोणी विचारले तर कपाळाला आठी घालून बापू म्हणे, "अर्थात् दूर कुठंतरी, एखाद्या खेडेगावात. स्टडीतून नदी दिसली पाहिजे आणि डोंगर. निवांतपणं लिहितावाचता आलं पाहिजे तिथं. फणसवाडीत राहून मी इतकं लिहितो...पण माझ्यातील कलावंताला विकासाची संधी मिळायला हवी." त्याची चेष्टा करत असू आम्ही; पण तळमळीने बोलायचा तो. अगदी उकळी यायची विचाऱ्याला. तरी मी एकदोनदा हळूच विचारले, "काय रे बाप्या, पैसा कुठून आणणार या घरासाठी?"

"पैशाचं काय," तो म्हणे, "कष्ट करून मिळवीन. पण सुंदर घर बांधीन..."

आणि बापू कष्ट करूही लागला. त्याची नोकरी शिक्षकाची; त्यात काही फारसा पैसा नसला, तरी पोट-उद्योग शक्य होते. शिकवणीचा तर राजरोस आहे; कधी लहानसे परीक्षेचेही काम मिळे, किंवा तसलेच काही. लेखणीने नाव मिळत होते; पैका कमीच. कलेसाठी लिहिण्याची निष्ठा अजून हरवली नव्हती हे एक. दुसरे म्हणजे वरच्या दर्जाच्या मासिकांत झळकावे ही धडपड होती, आणि अशी मासिके सहसा दर्जाच देतात, द्रव्य नाही. कोण जाणे, अगोदर वरच्या वर्गात स्थान घट्ट करून ठेवले की मागून पैसा येईल असा दूरदर्शी हिशेब असेल ! पण नाही, बापूला तेवढा व्यवहार कळत नसे तेव्हा. अजून कामकऱ्यांबद्दल आणि खालच्या मध्यमवर्गाबद्दल पिळवटून लिहायचा बापडा—आणि कधी त्यांच्यातील सुंदर परस्परसंबंधाबद्दल.

बँकेतील ठेव तीन आकड्यांपार गेली, चार आकडे नजरेच्या आवाक्यात आले, तसा बापू घराच्या दिशेने हालू लागला. सुटीच्या दिवसांत जवळपासच्या गावी जाई. एकर-गुंठ्याचे कोष्टक मनातल्या मनात घोकत जमिनी पाही. कधी त्याला विचार सुचे, जुने घर घ्यावे, झोपडीवजा; थोडक्यात पडेल. मग हवी तशी डागडुजी करून घ्यावी. झोपडी म्हणताच शाळाकॉलेजच्या दिवसांतील उदात्त भावना पुन्हा भरून यायच्या. मग त्याला आवरणे कठीण होई. अशा त्याच्या चारपाच सफरींत तरी मी त्याच्याबरोबर होतो. एक आठवण स्वच्छ आहे. मुंबईहून गाडीने पुण्याला जाताना कामशेतच्या जरा अलीकडे टेकाडावर एक उजाड, मोडके घर दिसे. पायथ्याशी मोटाररस्ता, त्याला लागून रेल्वे, पलीकडे इंद्रायणी. झाले, बापू प्रथमदर्शनीच प्रेमात पडला. ऐकेना. मी म्हटले, गड्या, सांभाळ; गाडी वळणावर वेगाने जाताना दुरून ते छान दिसते; पण त्याच्या भिंतीत खिंडारे आहेत, म्हणून त्याला झोपडे म्हणणार आहेस का? आणि जवळपास कुत्र्याचीदेखील वस्ती दिसत नाही की रे! पण ऐकेना. पुढच्या रविवारी कामशेतची ट्रिप काढली. स्टेशनापासून मैलभर तंगडतोड केली; ठेचाळत ते टेकाड चढलो. म्हटले, "नीट पाहा. या भिंतीत विटांपेक्षा भोकं अधिक आहेत. छपरातून तुझं ते निळं आकाश मस्त दिसतं. रात्री चंद्र, चांदण्या वगैरे सेवेला हजर. मग कविताच कविता." तरीसुद्धा महाशय विचारमग्न होते. "पण इंद्रायणी काय दिसते इथून, वंडरफुल!" यावर माणूस काय बोलणार? तसाच बखोट्याला धरून त्याला फरफटत खाली आणला. कधी त्याला झटका येई समुद्रकाठी घर बांधण्याचा. मग किनाऱ्याने फिरायचा तो. पण हे सगळे झटके लौकर जिरत. सोयी-गैरसोयीच्या विचारामुळे नव्हेत, तर अंकगणितामुळे. सगळे मिळून कोठल्या क रकम भडकायची...

आणि नुकतीच लढाई संपली होती; पैशाची पत उतरत होती. मास्तर-माणूस कसचे घर बांधतो ! बिऱ्हाडाला भाड्याची जागा मिळविणे हा त्याला पुरुषार्थ वाटावा अशी परिस्थिती निर्माण झाली होती. हजार दोन हजारांत व्हायच्या लहानशा घराचा संकल्प केलेला; पण आता आकडा फुगू लागला. चार, पाच, सात हजार, काही विचारू नका. अशा समयी कोणी संकल्पावर पाणी सोडले, कोणी हट्टाला पेटले. बापूही पेटला. तो निष्ठेचा प्रश्न होता. त्याच्या इतर निष्ठांपैकी काही वारगळल्या होत्या; काहींचा तोंडवळा बदलला होता. ही मात्र तशीच राहिली.

बापूने कंबर कसली. आणखी कष्ट करायचे—पण आता नगद पैशासाठी. वारगळलेल्या निष्ठांपैकी ही एक लढाईत गारद झाली म्हणे. अनुभवाने कडवटलो आणि कडूपणा म्हणजे शहाणपणा असे काहीसे बोलू लागला तो. शिक्षकीचा व्यवसाय होताच; तो दुय्यम व्हावा इतके त्याचे इतर उद्योग वाढले. पूर्वी तो शिकवण्या करीत असे तो पालकांची गरज, स्थिती आणि भीड सांभाळून. आता तो वर्षारंभापासून मठ्ठ धनिक बाळे हेरून ठेवायला लागला. ती सावजे सोपी आणि गुबगुबीत. आपले दर परवडत नाहीत त्यांनी वर्गात लक्ष द्यावे, नाहीतर ‘ क्लासा ’त नाव घालावे, नाहीतर शाळा सोडावी, असे तो कडवट हसू आणण्याचा प्रयत्न करीत म्हणू लागला. पुढे मागणीला मान तुकवून त्याने आपला ‘ क्लास ’ही काढला. त्याला शाळेच्या अधिकाऱ्यांनी आक्षेप घेतला, तेव्हा बापूने त्यांना ठणठणीत सुनावले, मी असले निर्बंध जुमानत नाही. शाळेच्या बाहेरचा वेळ कसा खर्च करायचा हे मी ठरविणार. त्याने तडकाफडकी राजिनामा दिला आणि श्रीमंतांची मुले खूप आहेत अशा एका शाळेत तो अधिक पगारावर गेला. तेथील शिक्षकांना भरपूर स्वातंत्र्य होते; त्याचा त्याने उपयोग करून घेतला. आपले काम मात्र तो मन लावून करीत असे; “ त्याशिवाय जम बसत नाही, ” असे तो म्हणे. ते खोटे नव्हते.

लेखनातही तेच. ठराविक वेळी मांडी घालून, मान मोडून, लिहायचा बापू. तारीख चुकवायची नाही, दिलेले वायदे कटाक्षाने पुरे करायचे, असा त्याचा बाणा होता. आणि आता वायदे करताना तो मासिकाचा दर्जा पाहायचा नाही. त्यालाच आता दर्जा होता आणि त्या दर्जाचे तो टक्के करायचा. त्याचे म्हणणेही चूक नव्हते, “ आम्ही कलेसाठी लिहायचं, किंवा स्नेहासाठी किंवा आणखी कसल्या मूल्यासाठी. या चोरांनी मात्र धंदा सांभाळायचा आणि लोणी मटकावायचं ! आम्ही काय पोटात काटे भरतो ? छट्, आज रोख उद्या उधार हेच आपलं मूल्य. ” लोण्यावरून आठवले. जास्तीत जास्त पैसा

मिळवायचा आणि कमीत कमी खर्च करायचा असा दुहेरी व्यवहार बापू शिकला. "घरी मी पाव चहात बुडवून खाईन. लोकांकडे मी गेलो तर मात्र मला पावाला लोणी लागतं. मुरंबा मिळाला तर हवाच असतो." या बोलण्यात प्रामाणिकपणा तरी खासच आहे. आपल्याकडे बुभुक्षित कंजुष लोकांचा इतका सुळसुळाट आहे. पण मोठ्या संभावितपणे करतात ते सगळे. आपल्याला बापूचे अधिक पसंत आहे. तो सिगरेट ओढतो, पण शक्य तोवर दुसऱ्याच्या. तेच इतर षोकांचे. कोणी त्याला एकदा विचारले, "बापुराव, तुम्हांला काही व्यसनं वगैरे?" बापू फटकळपणे म्हणाला, "माझ्या शेजारी बसलेल्या माणसाचं व्यसन ते त्या वेळी माझं व्यसन. आपले उगाच चोचले नाहीत." लोक तक्रार करतात त्याच्याबद्दल; पण कोणी म्हणतात, "ठीक आहे; एवढा मोठा लेखक आहे; दिली पानसिगरेट तर त्याच्या तोंडून काही ऐकता येतं. एरव्ही मास्तर आहे बिचारा!" बापू हे जाणूनबुजून करी; आणि वर मान करून, लाचारीने नव्हे. उधळपट्टी हा मूर्खपणा आहे असे तो नेहमी म्हणतो व उधळ्या स्नेह्यांना घट्ट जवळ करतो. एकटा असला की ट्रॅमने जाईल, पण बरोबर स्नेही असला तर सराईतपणे टॅक्सीला खुणावील.

—आणि एके दिवशी आम्ही ऐकले की, बापूने शेवटी घर बांधायला जागा घेतली. चिंचवडजवळ, नदीकाठीच. बापू खूष होता. जागा मोठी आणि मोक्याची होती आणि जमीन चांगली. पुन्हा थोडे झाडपेड होते. आणि सौदाही चांगला जमला होता. आम्हा चार दोस्तांना तो तेथे घेऊन गेला. फक्त प्रवासखर्च आमचा. पण जेवणखाण नीट केले याने. कुणा साहित्यिक स्नेह्याचे पत्र आले होते. ते दाखवले. "बालपणापासून तुम्ही उराशी जपलेल्या स्वप्नाचा पूर्वार्ध साकार झाला याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन." बापू आपले कडवट हसू मुद्दाम आणून म्हणाला, "स्वप्न साकार झालं वगैरे ते सर्व ठीक आहे. पाचदहा वर्षांपूर्वी मीही तसली भाषा वापरायचो. झालं नव्हे, केलं. नाहीतर तशी वांझ स्वप्नं एका रात्रीत तीन पडतात." आम्हीही त्याला दुजोरा दिला.

खरे म्हणजे बापूपेक्षा आम्ही मित्रच अधिक खुळावलो होतो ती जागा पाहून. उद्या घर उठले म्हणजे आपल्यालाही राहायला मिळेल या स्वार्थी विचाराने नव्हे, तर आमच्या बाप्याने एवढे कष्ट उपसले ते फळ धरू लागले म्हणून. आम्हांला त्याचा नेहमीच अभिमान वाटायचा. आता तो वाढला. ज्यालात्याला सांगू लागलो आम्ही बापूच्या येत्या घराबद्दल. "आमच्या हातून काही होण्यासारखं असेल तर बेलाशक सांग," असेही त्याला आम्ही पुन्हापुन्हा म्हटले.

बापू सबुरीने घेत होता. टक्केटोणपे खाऊन जून झालेला तो; 'हिरवीकच्ची घायकुती' त्याला शोभली नसती आता (हे त्याचेच शब्द), पण त्या मार्गावर होता नक्की. घरबांधणीच्या नव्या शैलीविषयी तो वाचे, बोले; वियांच्या व्यापाऱ्यांचे कॅटलॉगही चाळत बसे. एकदा मला म्हणाला, "अगोदर माझ्या डोक्यात ते घर संपूर्ण तयार झालं पाहिजे. बारीकसारीक तपशिलांसह; अगदी कुंपणापर्यंत. मग ते कागदावर उतरायचं... आणि मग पुढचं." बरोबर. नंतर तो विटांचा भाव आणि सिमेंटची टंचाई यांविषयीही काहीसे म्हणाला वाटते...

दरम्यान त्याच्या उद्योगाचा प्रपंच आणि यशाचा पसारा वाढतच होता. "आमचं विद्येचं दुकान तेजीत आहे" म्हणायचा. क्लास बंद केला त्याने—त्याची 'गुड वुइल' दुसऱ्याला विकून. नाही म्हटले तरी त्याची दगदगच फार व्हायची. शिकवण्याही कमी केल्या. नेमक्या दोनतीन ठेवल्या त्या अर्थात् ठसठशीत होत्या. पण एक 'नवी लाईन' उघडली त्याने. (शब्द त्याचेच!) परीक्षेला उपयोगी पडतील अशा पुस्तकांची. "दोनतीन पुस्तकं पुढ्यात उघडून ठेवली की झालं. केल्यानं होत आहे रे." ही त्याची मखलाशी. खरोखरच पद्धतशीर काम करायचा. आणि लेखणी तर काय, तरबेज झालेली. अनेक विषयांवर लिहू लागला तसली पुस्तके. प्रथम त्याने आपल्या शाळेतल्या विद्यार्थ्यांना ती घ्यायला लावली, आणि जुन्या क्लासातल्या विद्यार्थ्यांनाही. पण लौकरच त्यांचा 'जम बसला' आणि कोणावर दाब न आणताही ती वेड्यासारखी खपू लागली. प्रकाशकांत चढाओढ लागली ती मिळविण्यासाठी. त्यात काय चुकले? तुमची ती टेक्स्टबुके इतकी रटाळ असतात, आणि ती शिकवतात इतक्या रूक्षपणे; आणि परीक्षेची भीती तर सदैव डोक्यावर लटकत असते. बापू म्हणतोच, "तुम्ही त्यांना गाइडं म्हणा, की आणखी काही म्हणा, पोरांना ती हवीत; मी ती लिहिणार."

साहित्यातही बापूची अशीच भरभराट होत राहिली. संपादक-प्रकाशक त्याच्याकडे खेट्या घालू लागले. तो मागेल तो भाव टिकवू लागले. काहीही लिहो—निबंध, टीका, कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, (कविता मागेच बंद केल्या होत्या.)—शाई वाळली नाही तोच कोणीतरी हावरेपणाने उचलायचा. "बघ, दोस्ता, मी लिहितो त्याचं सोनं नसलं तरी रुपं होतं." इती बापू. त्याच्या पेनला घट्टे पडले असतील; पण मागणी हटेना, आणि सगळा रोखीचा मामला. टपालाने लेख गेला तर तो व्ही० पी० ने. दिवाळीच्या मोसमाचे तर काही विचारू नका. चांगला तीन महिने रगाडा सुरू असतो. शाळेतल्या वेळापत्रकापेक्षाही या लेखनाचे अधिक कडक. दिवाळींचा भावही चढा असतो.

पण किती श्रम करावे माणसाने? थकून जाई बापू; पण त्या थकण्यात केवढी खुषी असे!

खुषीला आणखीही कारणे होती. या सुमारास बापू अचानक संसारात पडला. त्याच्या गर्दीच्या वेळापत्रकात लग्न कोठे बसेल असे फारसे वाटले नव्हते. पण ते बसले; "अगदी फिट बसलं" ही त्याचीच कबुली.

कोणी कुत्सितपणे आम्हांला विचारी, "का हो, लग्नाचं काय मिळालं मित्रवर्यांना? ॲडव्हान्स घेतला असेलच!" साफ खोटे. तसे काही असते तर बापूने लपवून ठेवले नसते. त्याचा खुल्ला कारभार. वहिनी कोठे लहानशी कारकुनी करून बापाच्या संसाराला हातभार लावीत. त्याच्या पुस्तकांवर (अगोदर 'गाइडां'वर, आणि मग 'साहित्या'वर) त्यांचे मन जडले होते. एके दिवशी आपली इवलीशी 'पर्स' घेऊन बापूच्या घरी आल्या, नि तेथेच राहिल्या. मग टामट्रूम झाले; बापूने चारजणांना गोडधोड घातले. त्याच्या सुदैवाने वहिनी मोठ्या टापटिपीच्या निघाल्या; अगदी हाडाच्या संसारी. त्यांनी नोकरी सोडली आणि त्याचे पाहू लागल्या. हिशेबठिशेब, वसुली, पत्रव्यवहार, लेखांची सुवाच्य नक्कल करणे, तोंडी सांगितलेला मजकूर उतरून घेणे, अशी चिटणिशी त्या चोख बजावू लागल्या. बाप्याचा पैसा चारी हातांनी सांभाळला जाऊ लागला...

लग्नाअगोदर वर्षभर जणू प्रसादचिन्ह म्हणून बापूची फणसवाडी सुटली. एका शिकवणीच्या वशिल्याने त्याला, मुंबईच्या भाषेत, 'ब्लॉक' मिळाला. लहानसाच होता, पण स्वतंत्र. वस्तीही मोठी तालेवार नव्हती; आपली प्रार्थनासमाजाजवळचीच; पण मोठी सोयीची जागा, बाजारहाटाला आणि वाहन मिळायला. पुढे वहिनी आल्या, त्यांनाही पसंत पडली. ब्लॉकच्या छोट्याशा गॅलरीत त्यांनी दोन कुंड्यांतून कसली तरी फुलझाडे लावली.

...खरंच, चिंचवडजवळच्या बापूच्या त्या जागेतील फुलझाडे अजून तशीच त्याच्या डोक्यात राहिली होती. आणि घर? आम्ही कितीदा म्हटले, आता गृहिणी आली, तेव्हा सत्तेचे घर हवेच; चार दिवस निवांतपणे जायला—आता निवांतपणालाही अर्थ आला. पण बापूचे घर अजून गृहकर्म्याच्या—म्हणजे आपल्या आर्किटेक्टच्या—निळ्या कागदावर उतरत नव्हते. वहिनीच एकदा म्हणाल्या की या सगळ्या व्यापातून चिंचवड नेहमी कसे जमणार? ना धड पुण्यात. गाड्या सोयीच्या नाहीत, आणि इतर गैरसोयी आहेतच...

आम्ही दोघेतिघे मित्र मागे बापूबरोबर गेलो होतो ते पुन्हा तेथे जाऊन आलो एक दिवस. पावसाळा संपतासंपता जागा अशी तरारून आली होती...

मुंबईत बापूचे भाग्य ओसंडून जात होते. नवऱ्याचा पैसा कुठे ठेवू नि कुठे नको असे वहिनींना झाले असेल. इतर सगळे तेजीत होतेच; पण साहित्यात त्याने आणखी एक 'नवीन लाईन' खोलली होती. बापू भाषांतरे करू लागला. अशी झटपट करायचा; आणि पुन्हा इतकी चरखल, की स्वतंत्र लेखन वाटावे. म्हणून त्याचा भावही त्याने स्वतंत्र लेखनाचाच ठेवला. तोही काही प्रकाशकांनी मान्य केला; कारण त्यांना अनेक इंग्रजी पुस्तके भाषांतर करून घ्यायची निकड होती; पैशाचा मुबलक पुरवठा होता... आणि बापूला पैसा हवा होता; त्याला घर बांधायचे होते.

...आणि अचानक कानी आले की बापूने चिंचवडजवळची जागा विकून टाकली म्हणून! आम्हा मित्रांना धक्का बसला. अशी सुंदर जागा. का करावे बापूने हे? काहीतरी तसेच कारण असले पाहिजे खास. पण कोण जाणे, त्याला विचारावेसेच वाटेना. काही दिवसांनी कळले. वहिनी कोणाला सांगत होत्या म्हणे की आता पुण्यात सुंदरसा 'प्लॉट' घेणार म्हणून. गणेशखिंडीकडे, नाहीतर पेशवेपार्कजवळ. पुण्यात 'वीक-एंड'ला जाणे सोपे पडते; शिवाय, तेथे संबंध आहेत—प्रकाशक आणि संपादक आणि त्यांसारखी उपयोगी माणसे—आणि सांगायचेच म्हणजे, पुण्यात वेळप्रसंगी डॉक्टर मिळतात, तसले चिंचवडला कोठचे? अर्थात, हे सगळे मुद्दे खोटे नाहीत, पण...

मग एके दिवशी समजले की बापूने जमीन विकली ती शाईच्या कारखान्याला. भाव फार चांगला आला—अगदी दामदुप्पट झाली—असे ऐकले. आमच्या डोक्यात बापूच्या घराचे जे चित्र होते ते पुसून गेले. "त्यावर शाई सांडली," असे भोपर्डीकर म्हणाला.

हल्लीहल्ली बापूची भेट मोठी मुष्कील झाली आहे. तो सारखा कामात. वहिनीही त्याच्या बरोबरीने राबत असतात, चिटणिशीत. आता बापूच्या व्याख्यानाचे कार्यक्रम ठरविण्याचेही आले आहे. तो बोलतोही छान; मोठे मार्मिक आणि चुरचुरीत असे म्हणतात. (कारण मी अजून त्याचे भाषण ऐकलेले नाही.) खूप बोलावणी असतात. पैसेही भरपूर घेतो वाटते. कोणी म्हणतात शंभर, कोणी दीडशे. लोकांना सवय असते वाढवून सांगायची. काहीतरी अपवाद उठवतात. काय म्हणे, कोठल्या सभेत

आभारप्रदर्शनाचे भाषण केले त्याचे पैसे घेतले; कोठल्याशा धर्मार्थ संस्थेला भेट द्यायला गेला होता तेव्हा शेरे-बुकांत चार ओळी लिहिल्या त्यांचे पैसे मागितले. शुद्ध फाजीलपणा सगळा...

शेवटी परवा भेटला. फार दिवसांनी गप्पा झाल्या. अजून त्याच्या डोक्यात घराचे होते, बरे का! खूप विचार केला आहे त्याच्यावर. त्याला नवीन काहीतरी हवे...कार्बुजिए आणि फ्रँक लॉइड राइट आणि ग्रोपिअस की अशाच काही नावांच्या त्या कलेतील क्रांतिकारकांच्या तंत्राबद्दल कितीतरी सांगत होता...

लौकरच त्याने पुण्यात गणेशखिंड रस्त्यावर छानसा 'प्लॉट' घेतला; काहीतरी वीसएक हजार पडले. पण बापूच्या इतमामाला साजेसा होता. एवढा मोठा लेखक; एवढा पैसा कमावलेला पुन्हा. आमचा उत्साह उसळला. आम्ही जागा पाहून आलो. भोपर्डीकराला (की भातखंड्याला) म्हटलेदेखील की, या बाजूला असे सुंदरसुंदर बंगले आहेत, पण उद्या बाप्या तोंडात मारील यांच्या...

नक्कीच मारील. हा कोणा कारखानदाराचा बंगला नाही. एका मोठ्या कलावंताचा असणार. आता बापूचे नाव एवढे दुमदुमत होते की त्याच्या घराला आपल्याही कलेचा हातभार लावायला इतर कलावंत आणि व्यावसायिक अहमहमिकेने पुढे सरसावतील. त्यांच्या हौसेला पारावार नसणार, आणि बापूच्या थैलीलाही नाही आता. त्याने दोन कसली मोठी बक्षिसे नुकतीच पटकावली होती, आणि त्याच्या एका कादंबरीचा चित्रपट होत होता. आणखी कथानकांना मागणी होती. त्यानेही पटकथा आणि संवाद लिहिण्याचा कोठल्या परदेशी संस्थेचा अभ्यासक्रम टपालाने पुरा केला होता. आता पैशाचा नुसता पूर!

आम्हा मित्रांचा उत्साहही उताला चालला होता. मला तसे घरातले—स्थापत्य-शास्त्रातले—काही कळत नाही; पण संगदोषाने म्हणा, अगदी अद्ययावत घरांची चित्रे मी पाहिली होती. स्वप्नात दिसत तसली नव्या नव्या थाटाची...कधी अगदी विक्षिप्त तऱ्हेची. एकात प्रचंड वाकडातिकडा जिनाच डोळ्यांत भरायचा. एखादे दारेखिडक्या नसलेले...एका घरात तर प्रवेशच मुळी न्हाणीघरातून, आणि एक तर चक्क अधांत्री... स्वप्नेच ती, पण बाप्याचे काही सांगता येत नाही...

कोणाचे काही सांगता येत नाही हेच खरे. अशा एकामागून एक बातम्या आल्या. बापू आणि वहिनी हल्ली दुर्मिळच झाल्या आहेत, पण बातम्या खोट्या नव्हेत.

बापूने गणेशखिंडीचीही जागा विकून टाकली. कोणा संस्थानिकाचा तिच्यावर डोळा गेला, आणि लहरीखातर त्याने बसल्या ठिकाणी बापूच्या अंगावर हजाराहजारांच्या चाळीस की पन्नास नोटा फेकल्या म्हणे. लगोलग बापू बसने शहरात गेला, आणि आप्पा बळवंत चौकाजवळ एक जुना दुमजली वाडा त्याने विकत घेतला. नेहमीच्या चटपटीतपणाने दहा हजाराला त्याच्या डागडुजीचे कंत्राट दिले. दर्शनी भाग 'आधुनिक' करायचा; आत तीन भाडेकरूंची सोय करायची. स्वतःसाठी दोन खोल्या टाकठीक करून आणि रंगवून घ्यायची व्यवस्था केली...आणि विसरलोच, मधला चौक आणि बाजूच्या दोनतीन खोल्या यांचा लग्नसराईत मंगलकार्यालय म्हणून उपयोग करता यावा अशा सोयी करून घेतल्या...

आणि हो, सहा कुंड्या (फुलझाडांसकट) चौकात ठेवण्यासाठी विकत आणल्या.

आणि इतके करून झाल्यावर सकाळच्या जनतेने तो वहिनींना हे सगळे सांगण्यासाठी मुंबईला गेला. त्या माउलीचा यात काही दोष नाही.

# माझे आगामी आत्मचरित्र

वय म्हणून काहीतरी आहेच शेवटी. आपण त्याला विसरू म्हटले तरी ते बेटे स्वतःला विसरू देत नाही. अलीकडे डोळ्यांचा त्रास होऊ लागला. चष्म्याच्या काचा बदलल्या, फ्रेम्स बदलल्या, डॉक्टरही बदलून पाहिले. शेवटी एका डॉक्टरांनी ठामपणे सांगितले : "चष्म्यात काही दोष नाही; तसं म्हटलं तर डोळ्यांतही नाही! दोष आहे रक्ताभिसरणात. वरच्या भागात रक्त पोचावं तसं पोचत नाही. म्हणून दृष्टी मंद झाली आहे. पण मेंदूलाही रक्त नीट पोहचत नसणार. तुमची स्मरणशक्ती कमी झाली आहे. खरं की नाही?" मी "होय" म्हटले. डॉक्टरना बरे वाटले, आपले निदान खरे ठरल्याबद्दल.

आणि हे सगळे काही मित्रांना जरा सजवून सांगत होतो, विशेषतः मेंदू आणि स्मरणशक्तीबाबतचे. त्यांच्यावर अपेक्षित परिणाम झाल्याचे स्वच्छ दिसत होते. सहानुभूतीने माना हलल्या. साजेसा आवाज काढून एकाने विचारले, "मग आता काय करण्याचा विचार आहे?"

मी सरळ सांगून टाकले, "आता आत्मचरित्र लिहिणार."

"म्हणजे मेंदूचा लेखनाशी संबंध नसतो हे तुमचं तिरपागडं मत सिद्ध करून दाखवण्यासाठी?" कोणीतरी विचारले.

"नाही. स्मरणशक्ती कमी झाली की आत्मचरित्र लिहिणं सोपं, म्हणून!"

मंडळी हसली. मनापासून की काय कोण जाणे! काहीजण हा माझा नेहमीचा विक्षिप्त तिरकसपणा, किंवा विरोधाभासाची कसरत, अशी स्वतःची समजूत करून घेऊन सौजन्यादाखल हसले असणार.

त्यांना खरे वाटो न वाटो, मी म्हटले ते अगदी मनापासून होते, कारण ते अनुभवातून आलेले होते. माझे वाचन अफाट, आजतागायत आणि चौफेर असते हा माझ्याबद्दल

प्रचलित असलेला समज गोड असला तरी गैर आणि भाबडा आहे. असो, पण माझे जे काही वाचन असेल त्यात आत्मचरित्रांना खास स्थान आहे. किंबहुना, माझ्या पुढ्यात ताजी कादंबरी आणि ताजे आत्मचरित्र ठेवले—ताजेच कशाला, चांगले शिळे झालेलेसुद्धा—तर मी तेच उत्साहाने उचलीन. आणि एखाद्या पुरुषश्रेष्ठाच्या आत्मचरित्राइतकेच तो शिक्का न बसलेल्या सामान्य माणसाचे आत्मचरित्र मला आकर्षित करते. अशी सामान्यांची आत्मचरित्रे मला इंग्रजीतच अधिक आढळली. मराठीत श्रेष्ठांचीच फार. म्हणजे आपल्याकडे एकंदर श्रेष्ठच फार असा एक आनंददायक निष्कर्ष त्यातून निघतो. पण तो आनंद जरा संशयास्पदच! दुसरा निष्कर्ष अधिक विश्वसनीय. तो म्हणजे आपली 'सामान्य' समजली जाणारी पण ज्यांच्यापाशी सांगण्यासारखे खूप आहे अशी माणसे लिहिण्याच्या वाटेला सहसा जात नाहीत. आपण अनुभवलेले प्रसंग आणि पाहिलेली माणसे यांच्याविषयी ती बोलतात तेव्हा आपल्याला धरून ठेवतात. पण कोणी ते लिहून काढा म्हटले की आक्रसतात, त्यांना भीतीच वाटते.

लिहिण्याचा उद्योग आपण अल्पसंख्याकांपुरता राखून ठेवला आहे. परवापरवापर्यंत या अल्पसंख्याकांचा संकोच बराचसा पदवीधरापर्यंत असे; त्यांना 'सुशिक्षित' म्हणत. तसल्या स्त्रियांना 'सुविद्य' म्हणत, पण त्यासाठी पदवीपर्यंत पोचण्याची आवश्यकता नसावी असे वाटते! कोल्हटकर, खाडिलकर, केळकर हे महान नाटककार बी० ए०, एलएल० बी०, म्हणजे दोन पदवीवाले, आपल्याला एकही नाही, याची म्हणे राम गणेश गडकऱ्यांना फार खंत असे. वस्तुतः खुद्द कोल्हटकरांनीच 'मनोरंजन'कार मित्रांवरील मृत्युलेखातही ते—म्हणजे मित्र—पदवीधर लेखकांबाबत पक्षपात करीत असे म्हटले आहे. त्या काळीं लेखनाला, विशेषतः ग्रंथलेखनाला, पदवीचा परवाना फार उपयोगी पडत असे. लेखक हे समाजातील ब्राह्मण होते, मग जन्माने ते कोणत्याही जातीतील असोत. आपल्या पवित्र समाजरचनेतील जाती 'गुणकर्मविभागशः' झालेल्या आहेत असे कनिष्ठ जातींना बजावणारे विधान त्या काळी वरिष्ठ जातींत फार लोकप्रिय असे. ते दांभिक असले तरी लेखनाचे कर्म करणाऱ्यांना ब्राह्मण मानले जाई एवढ्यापुरते खरे होते! अर्थात् लेखकांपैकी बहुतेक जन्मानेही ब्राह्मण असल्यामुळे—कारण 'सुशिक्षण' त्यांनाच अधिक लाभे—ते एकंदरीने ठीक जमले. अर्थात् 'इतर' जातींना शुद्ध आणि प्रौढ, म्हणजेच कठीण, मराठी लिहिता येणे शक्य नाही अशी ब्राह्मणांपेक्षा त्या 'इतरां'चीच अधिक बळकट श्रद्धा असल्यामुळे त्यांच्यातील सुशिक्षितही लिहिण्याच्या वाटेला फारसे जात नसत. असा साहित्याचा प्रपंच फार थोड्या लोकांपुरता होता. बाकीचे 'सामान्य'. ते कसे लिहिणार? आणि जे (जन्म आणि शिक्षण या दोन

अपघातांमुळे) 'असामान्य' त्यांच्या बहुशः मर्यादित, परिपाठी, परीटघडीच्या जीवनात वाचकांचे लक्ष वेधून घेईल असे काही असण्याचा फारसा संभव नव्हता. आणि असे वेगळे, प्रतिष्ठितपणाच्या साच्यात न बसणारे काही अवघड असले (आणि ते असणारच!) तरी त्याचा उच्चार करायचा नसे. काहीसा संकोच आणि काहीसे सोंग. वाचकांपुढे तयार आदर्श ठेवण्याची नैतिक जबाबदारीही असे. असले आत्मचरित्र म्हणजे मोठेपणाचा, यशस्वी जीवनाचा, अहवाल असायचा. जणू आपणच आपला मृत्युलेख लिहिलेला—अशा गौरवाच्या सुरात! अर्थात् भरपूर तपशील घालून वाढवलेला. मग भाविक वाचकही मृत्युलेख वाचल्यासारखाच मख्ख मुद्रेने तो वाचणार. त्याच्याचसाठी ते सारे असे.

हा सगळा सपकपणा जरा तिखटमिखट करायचाच म्हटला तर आपले विरोधक किंवा वैरी यांच्या 'चरित्रा'चे तुकडे त्यात मधूनमधून टाकायचे. या कृतीला दुहेरी गुण येतो. लेखनाची चव वाढते आणि आपला मोठेपणा अधिक उठून दिसतो. आत्मचरित्र आणि चरित्र या दोन वाङ्मयप्रकारांच्या मिश्रणाचा अभ्यास करण्यासारखा आहे. हे एखाद्या विद्वानाच्या वाचनात आले तर तो यामागे लागेल अशी आशा करूया.

गेल्या वीसपंचवीस वर्षांत मराठीत आत्मचरित्राला बरे दिवस आले आहेत. (तेवढे चरित्राला का आले नाहीत याचा उपरिनिर्दिष्ट विद्वान विचार करील का?) ते संख्येनेच नव्हे, तर गुणांनीही, आणि काहीसे विविधतेने. युगप्रवर्तक लेखकापासून ते यशस्वी जादुगारापर्यंत, आणि गाजलेल्या कलावंतापासून ते धाडसी सर्कसवाल्यापर्यंत. पुरुषांप्रमाणे स्त्रियांचीही—आणि पुरुषांहून बहुधा संख्येने अधिक आणि गुणाने कदाचित काकणभर सरस. यांतील काही जुन्या, 'सोज्वळ' पुरुषी घाटाची; पण 'स्त्रैण' ऐवजाची. मात्र अगदीच 'आपल्या' पुरुषाचा पदर—अंगरखा किंवा उपरणे म्हणायचे होते मला—धरून लिहिलेली नव्हेत. फार पूर्वी काही घरंदाज स्त्रियांनी लिहिली तशी : आडून 'इकडच्ये' चरित्र लिहिल्यासारखी. ते सगळेच लिहिणे घरगुती, माजघरापुरते आणि अंगभर नेसल्यासारखे मर्यादशील : अगदी 'कुलस्त्रैण' म्हणावे असे! आमचे मित्र पु० भा० भावे यांच्या पूर्ण पसंतीस उतरेल असे.

पण अलिकडची काही स्त्रियांची आत्मचरित्रे सांगूनसवरून मोकळीमोकळी आहेत. कितपत मोकळी हे अर्थात् तिऱ्हाइताला कसे कळणार? स्त्रीने स्त्रीलाच आठवणी सांगितल्यासारखी वाटतात ती; म्हणूनच का पुरुषांना त्यांचे एवढे कौतुक, अशी एक

गमतीची कल्पना मनात येते—इतकी गमतीची की ती खोटी असावी! एक डोळा स्त्रीवाचकावर ठेवून लिहिणारे पुरुष कथाकादंबरीकार आपल्याला ठाऊक आहेतच. त्याची परतफेड म्हणून एक डोळा पुरुषवाचकावर ठेवून असली आत्मचरित्रे या स्त्रिया लिहीत असतील का? की दोन्ही डोळे? खरे म्हणजे या आत्मचरित्रांना कादंबरीची रंगत आलेली आहे.

'आत्मचरित्र' हा शब्दच मुळी या पन्नास वर्षांतला. पुस्तकी आणि प्राध्यापकी, म्हणजे भाषांतरी. इंग्रजी 'ऑटोबायॉग्राफी'चा मराठी अवतार. 'आठवणी' हा आपला जुना शब्द; आणि कोण जाणे, 'आठवणी काढणे' हा शब्दप्रयोगच स्त्रियांबाबत अधिक वापरला जातो, किंवा जात असे का? त्यासोबत 'डोळे गाळीत'सारखा शब्दप्रयोग. पण या दुसऱ्या शब्दप्रयोगाला, मला वाटते, स्त्रियांविषयी अनुकंपा दाखवण्याच्या जमान्याचा वास आहे. उगाच शब्दांशी चाळा करून कोणी व्रात्य इसम म्हणेल की वरच्या परिच्छेदात उल्लेख केला आहे तसली आत्मचरित्रे म्हणजे 'डोळे मोडीत' आठवणी काढणे होय.

पण स्त्रीजात आठवणीला घट्ट, असा तिचा सार्थ लौकिक आहे. अगदी पिठामिठाचा क्षुल्लक तपशील त्या विसरायच्या नाहीत—एकदा आठवणीला उकळी आली की. विसरभोळेपणा ही पुरुषांची मिरास असे दिसते—विशेषतः नवऱ्यांची, असे बहुतेक बायका विश्वासपूर्वक म्हणतील. साहित्यातच पाहा. गोकुळचा स्त्री-अवतार नाही; धुंडिराजसारख्या माफक विसराळू पुरुषाचासुद्धा नाही. स्त्रियांनी लिहिलेली बहुतेक आत्मचरित्रे बारीकसारीक बाबी नेमकेपणाने सांगतात; त्या कौटुंबिकच हव्यात असे नाही. आणि बहुधा या बाबी बोलक्या असतात. तुलना केली तर कदाचित असे आढळून येईल की सामान्यतः पुरुषाच्या आत्मचरित्रात ठळक, 'सार्वजनिक' गोष्टींवरच भर असतो. 'सार्वजनिक' म्हटले, पण लेखकाला त्यात आपली गुंतवणूक दाखवायची असते. कित्येकदा त्या सार्वजनिकतेच्या प्रकाशात जमेल तेवढा स्वतःला उजाळा द्यायचा असतो. त्या प्रकाशाने कधी लेखकाचेही डोळे दिपत असावेत. परिणामी, त्याच्या स्मरणात गोंधळ उडत असणार. आणि काहींचे डोळे तर स्वतःच्या उजाळ्याने दिपत असावेत अशी शंका येते.

खाजगी आणि सार्वजनिक यांचे धागे जुळवताना अशा लेखकांची तारांबळ उडाली तर नवल नाही. पण तारांबळ ही काही दाखवायची गोष्ट नव्हे—मग लिहायचे कशाला!

आपली मांड पक्की दिसली पाहिजे. आपण लिहिलेला शब्दन् शब्द सरळ चित्रगुप्ताच्या खातेवहीतून उतरून काढल्यासारखा वाटला पाहिजे. हे जमणे कठीण; पण ते जमविणे, यात केवढी बहादुरी आहे!

असल्या आत्मचरित्रात चतुराई असते, आणि दिसते, ती स्मरणशक्तीची. माणसाने बाळलीलांपासून कालच्या पराक्रमापर्यंत सगळे काही सलगपणे आणि सूत्रबद्धपणे लिहून काढणे म्हणजे चेष्टा नव्हे, चमत्कार आहे. त्यामागील स्मरणशक्ती ही अतिमानुष— अतिमानुष कसली, अमानुषच! तिने लहानमोठे, कडूगोड, खारटतुरट—सगळे समबुद्धीने स्वाहा केलेले असते; आणि ते कसे नीट क्रमाने, चापूनचोपून लावून ठेवलेले असते. लेखनकर्म सुरू झाले की एकामागून एक ते नग यंत्रातल्याप्रमाणे बाहेर यायचे.

अशा स्मरणशक्तीच्या लेखकांबद्दल मला परम आदर वाटतो—किंवा वाटला पाहिजे अशी भावना होते! आताचे सोडा, पण जेव्हा माझी स्मरणशक्ती साधारण धडधाकट होती तेव्हाही तीनचार वर्षांपूर्वी नक्की काय, कधी घडले हे मला संगतवार सांगता येत नसे. मागचे पुढे, पुढचे मागे, व्हायचे; मधले काही दुवे हरवायचे. आणि जे घडले ते निश्चित का हे तेव्हाही धड उमगत नसे; मग तीनचार वर्षांनंतर कोठले? हे मात्र कबूल करायला हवे की कधी बैठकीत जुन्या गोष्टीचा उपसा निघाला आणि बोलता बोलता जीभ तापली, की मी सगळे असे धडाधडा सांगत असे की ते जणू आदल्या दिवशीच माझ्या समक्ष झाले होते. श्रोत्यांवर प्रभाव पडे; माझ्यावरही पडे; आणि आश्चर्य वाटे की स्मरणाची कवाडे अशी एकाएकी खुली कशी झाली? पुढे तो प्रभाव उतरला की मलाच संशय येई की इतक्या सोयिस्करपणे खुली झाली ती कवाडे कल्पनाशक्तीची असावीत. माझ्या एकादोघा बैठकबंधूंना तो संशय तेव्हाच आला असावा ही जाणीवही त्रास देई.

स्वानुभवाने आलेला शहाणा संशय अलीकडची काही गाजलेली—गाजवलेली आत्मचरित्रे वाचताना त्रास देऊ लागला. तीसचाळीस वर्षांपूर्वीच्या घटनांबाबतही स्थळकाळाचा निश्चित तपशील, रेखीव व्यक्तिवर्णन, ध्वनिमुद्रित केल्यासारखे संवाद, हे सगळे एकजिनसी साहित्य तयार होतेच कसे? वर्षानुवर्षे पुढील उद्योगावर दृष्टी ठेवून व्यवहारबुद्धीने बारीकसारीक नोंदी ठेवणाऱ्या डायऱ्या लिहिल्या होत्या का?...धोब्याला दिलेल्या कपड्यांच्या याद्यांसारख्या? प्रो० केरूनाना छत्रे या गेल्या शतकातील नामांकित गणितज्ञाच्या डायऱ्या सापडल्या; त्यांतील बराचसा भाग संसाराच्या जमाखर्चाने

व्यापलेला आहे! आमच्या श्री० ना० पेंडश्यांसारखा पाहिले, वाचले, वाटले, ते चाळीसएक वर्षे दररोज कसोशीने लिहून ठेवणारा माणूस आहे, पण तो अपवादासारखा. त्या इतर आत्मचरित्रकारांनी असले स्मरणकोश ठेवले असतील असे वाटत नाही. की त्यांची स्मरणपट्टीच इतकी विलक्षण संवेदनक्षम आहे आणि तिने टिपलेले दशकानुदशके स्वच्छ टिकवून धरण्याइतकीही विलक्षण आहे? तशा एखाद्या लेखकाबाबत असे वाटते की खुद्द तोच इतका संवेदनक्षम असता तर किती बरे झाले असते!

—आणि ते परिपूर्ण साहित्य पुन्हा इतक्या टापटिपीने आणि सुबकपणे एकत्र बांधलेले असते! कट्टर आकृतिवाद्यालाही संतोष देईल असे. एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे, असे सुरळीतपणे, नव्हे, सुळसुळीतपणे सगळे उलगडत जाते. तंत्रशुद्ध कादंबरीसारखे. कोठे सुरकुती नाही, की सुटलेली सुते नाहीत, की गबाळग्रंथीपणा नाही! आतील मालही तसा असतो.

शेवटी, कला म्हणजे निवड; अनुभवाच्या प्रचंड गळाठ्यातून जे अर्थपूर्ण ते निवडणे ही कलावंताची कसोटी असे साहित्यावरील प्राथमिक पुस्तके सांगत आली आहेत—पण म्हणून ते खोटे नाही. आपला 'तो' आत्मचरित्रकार काय निवडतो, म्हणजे त्याला काय अर्थपूर्ण वाटते, ते पाहण्यासारखे असते. ते काहीसे प्रवासवर्णनासारखे आहे. वेळापत्रक, खाद्यपेयांच्या याद्या आणि गाइड बुक्स यांच्या लगद्याला प्रवासवर्णन म्हटले गेले आहे; आणि जे पाहिले त्याचे अंतरंग सजीव करणाऱ्या लेखनालाही आम्ही तेच म्हणतो. कोणी आत्मचरित्रकार आपल्या यशाची कथा तयार करतो—सगळे तपशील भरीत, आणि आपण त्यांना सर्वस्वी पात्र कसे होतो ते सांगत; कोणी आपल्याला कसली व किती आमंत्रणे आली, व आपण ती स्वीकारून किती कर्तबगारीने पार पाडली, व त्याबद्दल आपला कोणी, कसा, गौरव केला याचा पाढा वाचतो; कोणी हितशत्रूंच्या कारवायांना आपण कसे धीरोदात्तपणे तोंड दिले याचे आदराने वर्णन करतो; कोणी निःसंग, कोणी कलासक्त, कोणी किंचित् संत, कोणी आणखी काही. असे प्रत्येकाचे आत्म-लीळाचरित्र, भाविकतेने लिहिलेले. चरित्रनायकात दोष, आणि त्याच्या चरित्रात चुकीचे वर्तन, संभवत नाही. किंवा आठवत नसतील. जे नकोसे वाटते त्याचा त्याग करण्याकडे स्मरणशक्तीचा कल असतो असे मानसशास्त्री म्हणतातच.

—आणि जे हवेसे वाटते ते निर्माण करण्याकडे कल्पनाशक्तीचा कल असतो. जे हुकलेले असते, ज्याच्याबद्दल दुसऱ्याचा हेवा केलेला असतो, ज्याची दिवास्वप्ने कुरवाळलेली

असतात, त्यांना या आत्मचरित्रकारांची कल्पनाशक्ती कागदावर प्रत्यक्षात आणते. आता माझेच सांगतो. माझ्यात थोडे गुण असले तरी हजरजबाबीपणा हा त्यांपैकी एक नाही. असे कित्येकदा घडले आहे की कोणी मला काही विपरीत आणि लागट बोलला तर मी मुखस्तंभ झालो. पण त्या बोलण्याला मार्मिक आणि झगझगीत उत्तर मला नंतर सुचले; आणि ते पुन्हा मनात घोळवल्यामुळे मला भास होऊ लागला की आपण ते उत्तर खरोखरच दिले म्हणून! भास होतो—त्याचे होणे हे खरेच!

आपण सत्य म्हणतो तो सत्याभासच असतो याविषयीची घोर चर्चा विद्वान करीत असतात; पण तो जंजाळ येथे नको. आपल्या आयुष्यात काय घडले हे आत्मचरिकार लिहितो, तेव्हा त्या घटनांचे काय भास-आभास त्याच्यापाशी असतात ते त्याचे त्या वेळेपुरते सत्य. अन्य वेळीं दुसरे आत्मचरित्र लिहिले असेल तर त्यातील काही भास निराळेच असतील! शेवटी हा भासांचाच खेळ असला तर स्मरणशक्तीचे लाड कशाला चालू द्यायचे? तिने काही ढोबळ गोष्टी पुरवल्या की झाले; उरलेला भार कल्पनाशक्तीवर सोपवता येतो. ती मधले दुवे पुरवते, नक्षीकाम करून शोभा वाढवते. पुन्हा हे सगळे ती बिनबोभाट, नामानिराळी राहून करते. श्रेय जाते ते त्या लेखकाच्या स्मरणशक्तीला. ती मिरवते—आणि तिच्या आधारावर लेखकही मिरवतो. सांगूनसवरून कादंबरी लिहिली तर त्यातील वास्तव काय, अवास्तव काय, याची टीकाकार चेंगटपणे चिकित्सा करीत बसतात; तिची जडणघडण, व्यक्तिचित्रणे वगैरे तपासून उणी काढतात. कारण कादंबरी हे जीवनाचे प्रतिबिंब हे त्यांना पाठ असते, म्हणून डोळ्यांत तेल घालून ते त्याची पारख करतात. पण आत्मचरित्र म्हणजे जीवनाचा भाग—साक्षात बिंबच. त्याच्यापुढे ते मऊ येतात—कारण त्यांची मुख्य शस्त्रेच निकामी होतात!

आता माझी स्मरणशक्ती काम देईनाशी झाली आहे; काही फारसे बिघडत नाही. थोडेफार आठवते आपल्या आयुष्याबद्दल ते पुरे आहे. आपल्यापाशी भासांचा ठेवा बऱ्यापैकी आहे; आणि प्रखर नसली तरी कामचलाऊ कल्पनाशक्ती आहे. तेव्हा आत्मचरित्राच्या मागे लागायला हरकत नाही.

आणि ते लिहिले की आपोआपच माझ्या स्मरणशक्तीचा गवगवा होईल. कोण जाणे, त्यामुळेच कदाचित तिची प्रकृतीही सुधारेल! उपाय म्हणून करून पाहण्यासारखा आहे.

—आणखी एक : आत्मचरित्रात मी स्वतःविषयी दोनचार वाईट, चक्क लाजिरवाण्या

गोष्टीही सांगेन. (तशा आहेत माझ्यापाशी थोड्या.) त्यामुळे माझ्या सत्यप्रियतेचाही गवगवा होईल! आणि माझे आत्मचरित्र वेगळेपणाने उठून दिसेल!

# न लिहिलेले आत्मचरित्र

अलीकडेच मला साठ वर्षे झाल्याचे समजताच अनेक माणसे समाचाराला येऊन गेली. लहान मुलांचे वाढदिवस हल्ली उत्साहाने साजरे होतात; आणि पन्नाशीपार गेलेल्यांचेही कटाक्षाने स्मरले जातात. एवढ्या मोठ्यांबाबत हे वर्षावर्षाचे कौतुक का ? क्रिकेटमध्ये बॅटस्‌मनचे नव्वद लागल्यावर प्रत्येक रनला टाळी पडते ती शतकाच्या अपेक्षेने; तसेच हे असावे. जेथे स्कोअर-बोर्डवर फक्त दसकड्याने आकडे लागतात तेथेही नव्वदनंतर एकएक रन चढवली जाते !

अर्थात् बरे वाटले नाही. उतरत्या वयाची अशी समारंभाने आठवण करून दिली जाणे पुरुषालासुद्धा आवडणे कठीण. पण तसे दिसून देता कामा नये. प्रसंगाला साजून दिसेल अशी ठेवणीतली मुद्रा चढवून बसायला हवे. हसणेही तीर्थरूप हवे. कसोशीने असली औचित्ये मी पाळलीही. एका गोष्टीचे मात्र खरोखरच बरे वाटत होते. हा सत्कार तोंडी होता; काहींबाबत तर अबोल होता. क्वचित पत्राने झाला, पण कोणी छापील चहाता निघाला नाही हे सुदैव. तो निघण्याची फारशी भीती नव्हती म्हणा. एक तर तसे लागेबांधे असलेले (किंवा जमवलेले) नियतकालिक राहिले नाही. आणि दुसरे म्हणजे कोणी तसे करावे एवढे संचित माझ्या लेखणीनेही गोळा केलेले नाही.

ते गोळा करण्याची वेळ आता टळून गेलेली आहे. एखादा फाटक्या तोंडाचा हितचिंतक म्हणेलही की आता लिहायचे ते 'वुइल अँड टेस्टमेंट्'. पैकी वुइलचा खटाटोप करावा इतकी माया जवळ नाही. 'टेस्टमेंट'चे निराळे. जन्मभर जे पाहिले, वाचले, अनुभवले, त्याचा परिपाक म्हणून युक्तीच्या चार गोष्टी इतरेजनांना सांगाव्यात हे थोरामोठ्यांनी केले आहे. पण ते आपले काम नाही. तसे इतक्या वर्षांत, यदृच्छेने असेल, पण बरेचसे पाहिले, अनुभवले; वाचलेही थोडेफार. पण त्याचा स्वादिष्ट मुरंबा, आणि तोही लोकांसाठी, घालण्याची कला हवी ना ! आणि जे वाचले त्याचेच कामसूपणे सार काढण्याचे (आणि ते पातळ करून वाढण्याचे) कसबही आपल्यापाशी कधी नव्हते.

उरले आत्मचरित्र. प्रत्येक माणसाला निदान तेवढे एक पुस्तक लिहिता येईल अशा अर्थाचे एक (अर्थात इंग्रजी) अवतरण आपणा सर्वांच्या परिचयाचे आहे. तेवढा

अनुभव प्रत्येकाच्या गाठीशी असतो हा त्यामागील अभिप्राय असावा—की कल्पनाशक्ती? कोण जाणे? अवतरणचिन्हे घातली की मधल्या शब्दांना आपण देऊ तो अर्थ! असो. माझ्या हातून दोनतीन पुस्तके घडली आहेत. तेव्हा मला त्या अवतरणाचा आधारही नको. म्हणून आत्मचरित्र लिहिण्याच्या कल्पनेशी मन खेळू लागले.

एकंदरीने माझे लिहिणे म्हणजे कल्पनेशी खेळच असतो; हे कोणीही म्हणावे असे माझे कर्तुक आहेच. मी आत्मचरित्र लिहायला घेतले तर ते पुढील जन्मी कदाचित पूर्ण होईल असे आमचे परम मित्र ठणठणपाळ म्हणणारच. (म्हणा! म्हणा!!) पण यात केवढ्या शक्यता आहेत!...दोन जन्म, त्यांना जोडणारा लेखणीचा बोगदा. जननान्तरस्मरणानि...तरी आत्मा एकच! उभयान्वयी...आणि अव्यय! असल्या आत्मचरित्राचा पूर्वभाग बहुधा प्रामाणिक उतरेल! आपल्या काही थोरांच्या आत्मचरित्रांतील कित्येक स्मरणे त्यांच्या चालू पिंडाशी इतकी विसंगत असतात की ती पूर्वजन्मातील असावीत असा संशय येत राहतो. असो. दुसरे एक आठवले. आत्मचरित्र नव्हे, पण आत्मचरित्रांतील वेच्यांचे एक संकलन करायला मी पंधरासोळा वर्षांपूर्वी आरंभ केला. अजून ते पुरे होत नाही—कारण दरम्यान आत्मचरित्रे वाढत चालली अशी सबब मी स्वतःला सांगत आलो. पण माझे स्नेही श्री० बाळ सामंत यांनी आठएक वर्षांपूर्वी तसे एक संकलन प्रसिद्ध करून त्याची आवृत्ती पाहता पाहता खपवूनही टाकली. उद्योगी पुरुषसिंह वगैरे. इतकेच नव्हे, तर जणू खिजवण्याकरता ते पुस्तक मला आणि माझ्या पत्नीला अर्पण केले. तिचा काय बरे अपराध?

माझ्या त्या सोप्या सबबीचे सोडा, पण मराठीत गेल्या वीसपंचवीस वर्षांत आत्मचरित्र या लेखनप्रकाराला तेजी आली आहे. त्या मानाने चरित्रे कमी. हे कसे? चरित्र लिहायचे म्हणजे तयारी मोठी लागते. चरित्रनायक, त्याचा गोतावळा, त्याचे प्रतिस्पर्धी, त्याचे कार्य, इत्यादींविषयीचा तपशील बिनचूक हवा. वाचकांना नसला तरी टीकाकारांना तो ठाऊकच असतो, कारण नायक ही सार्वजनिक व्यक्ती असते. आत्मचरित्राचा विषय ही तुमची खाजगी मालमत्ता. स्वतःविषयी तुम्ही म्हणाल ते खरे. ज्यांच्याविषयी वाईट लिहायचे ते, आणि जे तुमच्याविषयी फार चांगले बोलत—असे लिहायचे ते, हयात नाहीत एवढी खबरदारी घेतली म्हणजे झाले. आणि आत्मचरित्र म्हटले म्हणजे प्रतिभेला कसे मोकळे रान मिळते! तसेच लालित्यालाही. 'मी' हे तर त्याचे केंद्रस्थान. अलीकडच्या काळात कित्येक कथा-कादंबरीकारांनी स्वतःच्याच चरित्रातून घटना आणि पात्रे उचलली. व्यंकटेश माडगूळकरच घ्या. त्यांच्या 'मी'ला तसा मेक-अपही करावा

लागला नाही. साधे गहिवराचे ग्लिसरीन-थेंबही लावले नाहीत! अशी ही आत्मचरित्रवजा कथा-कादंबरी. याउलट, आत्मचरित्र कादंबरीवजा करायचे. सगळे काही आखीवरेखीव. खटके आणि उत्कंठा आणि निरगाठ आणि इतर ललित युक्त्या. आणि मुख्य म्हणजे 'मी' कसा? कादंबरीनायकासारखा : उपजत सर्वगुणसंपन्न. (रूप हासुद्धा एक गुणच!), शील तर अठरा कॅरट, संकटसमयी धीरोदात्त; आणि अर्थातच प्रणयचतुर. पण ती कला आणि चातुरी सगळ्या आत्मचरित्रकारांना साधणे नाही. त्याला कादंबरीकाराचे हाडच हवे!

एक तात्त्विक प्रश्न सोडून द्यावा : एकाच व्यक्तीची दोन चरित्रे लिहिली जातात, तर एकाच व्यक्तीची दोन आत्मचरित्रे का नसावीत? पण हा प्रश्न केवळ तात्त्विक राहिलाच नाही. तशी ती दोन असू शकतात याविषयी आचार्य प्रल्हाद केशव अत्रे व प्राध्यापक नारायण सीताराम फडके यांचेही एकमत आहे. आणखी काय हवे? त्यांनी प्रत्येकी दोनदोन लिहिली. तेही खरे; नंतर सुचत जाते. मांडणी, किंवा ज्याला नवविद्वान घाट म्हणतात तो, बदलून आहे तोही ऐवज सजवता येतो. खरे म्हणजे काही ग्रंथांची सुधारून वाढविलेली आवृत्ती निघते तशी आत्मचरित्राची का निघू नये? एकदा हातून निर्माण झाली ती अगदी दगडावरची रेघ असा अहंकार बरा नाही. माणसाप्रमाणे त्याचे लेखनही या अर्थाने गतिमान असावे. अर्थात माझ्या बाबतीत हे सगळे केवळ तात्त्विक. एक लेख लिहून होताना मारामार, तेथे दोन आत्मचरित्रे! (म्हणजे किती जन्म लागतील, ठणठणपाळ?)

या तात्त्विक प्रश्नांचे असे असते. एकाच्या संसर्गाने दुसरा उपटतो. गहनपणादेखील चरत जातो. दुसरा प्रश्न उपटला तो पायघोळ आणि लफ्फेबाज साहित्यिक शैलीत कसा दिसतो पाहू या. आत्मचरित्र या ललितकृतीविषयी साकल्याने विचार करताना तिच्या घाटाच्या संदर्भात मला असे सतत वाटत आले आहे की त्याचा अंत अंगभूत नसल्याने त्याची कलात्मक अपरिहार्यता जाणवत नाही. मराठीत सांगायचे म्हणजे, आत्मचरित्रात नायकाची कथा शेवटापर्यंत नेता येत नाही. अगदी नेमाने दैनंदिनी लिहिणाऱ्यालाही 'तो' सद्‌गदित क्षण पकडता येणार नाही; नंतरचे सोडा. थोडी गैरसोयच आहे. अगदी 'आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां' अशा पुरोदृष्टीचा किंवा दिव्यदृष्टीचा 'म्या' असला तरच तो शेवटचा संपूर्ण सोहळा (अगदी विमानाच्या नंबरासकट), आणि पुढचेही सव्यापसव्य पाहू शकेल. पण मग त्यालाही अंत नाही. तस्मात् द्रष्ट्यांनी किंवा दैवी पुरुषांनी आत्मचरित्र लिहू नये. ते त्या फंदात पडणारच नाहीत म्हणा. पण आपल्या

एकादोघा आत्मचरित्रकारांविषयी असे वाटते की निदान द्रष्टेपणाची तेवढी सवलत त्यांना दिली असती तर त्यांनी आसन्नमरण अवस्थेतील आपल्या स्थितप्रज्ञतेचे उदात्त चित्र काढून अहितकर्त्यांना क्षमा केली असती; आणि एकूण 'शेवटचा दीस गोड' करून टाकला असता. इतकेच नव्हे तर नंतरचे संस्कार सगळ्या तपशिलांसकट रसाळपणे आणि हृदयद्रावकपणे शब्दांकित केले असते; आणि दुखवट्याच्या सभा, श्रद्धांजली, अग्रलेख, खास अंक, इत्यादींची नेटकी नोंद केली असती. थोडक्यात, स्वतःप्रमाणे आपले मरणही अमर करून सोडले असते. मगच 'समाप्त'. म्हणजे ग्रंथाचा अंतही अपरिहार्य. अर्थात श्रद्धांजलीच्या सुरात स्वतःविषयी लिहिणारे लेखक आहेतच!

आत्मचरित्रलेखक बनायला लागणारी प्राथमिक पात्रता माझ्यापाशी नाही—कारण माझी स्मरणशक्ती दुबळी आहे. चार दिवसांपूर्वी मला कोण भेटला आणि तो काय म्हणाला ते मला कित्येकदा धड आठवत नाही; मग पन्नास वर्षांपूर्वीच्या भेटीची निश्चित तिथी, निश्चित वेळ, निश्चित स्थळ (अमुक नाक्यावर किंवा तमुक इमारतीच्या तिसऱ्या जिन्यावरील पाचव्या पायरीवर) सांगणे, इतकेच काय पण बोलणे झाले असेल ते 'टेप' केल्यासारखे शब्दशः आठवणे, असले चमत्कार पाहिल्यावर आपण तर दडपून जातो. काहींना ते अतिमानुष देणे असते. श्री० ग० त्र्यं० माडखोलकर यांना ते आहे. लिहितानाच नव्हे तर खासगीत बोलतानाही, "एकवीस साली सप्टेंबरच्या आठ तारखेला भाद्रपद शुद्ध त्रयोदशी होती. बुधवारी दुपारी पावणेचार वाजता मी काकासाहेबांकडे, म्हणजे खाडिलकरांकडे, जायला निघालो होतो. गिरगाव बॅक रोडवर आता देशमुख लेन आहे त्या कोपऱ्यावर श्रीपादराव डांगे व बेंजमिन हॉर्निमन भेटले. डांगे म्हणाले, 'गजाननराव, जम्नादास मेहतांना तुम्हांला तावडतोब भेटायचे आहे.'" असे ते लीलया सांगून टाकतात. अशा स्मरणमुद्रितांपुढे—दृक् आणि श्राव्य, दोन्ही तऱ्हांच्या—काळही हात टेकतो, तेथे आमचे काय? कोणी म्हणेल, मला कोण क्षुल्लक माणूस काय फडतूस म्हणाला ते स्मरणात तरी का राहावे? ते खोटे नाही. पण मला अखिल भारतीय कीर्तीची नसली तरी महाराष्ट्रापुरते नाव असलेली चारदोन माणसे भेटली आहेत. पण ती नेमकी कधी, आणि कशाविषयी आम्ही बोललो, काही आठवत नाही; इतकी बेभरवशाची आमची आठवण. तसे म्हटले तर कधीकाळी एखाद्या थोर माणसाची 'दैवें पडली गांठ' तर सर्वसाधारण स्मरणशक्तीला सगळा मामला कलमवार साठवून ठेवणे शक्य आहे; पण माडखोलकरांना तर वर्षानुवर्षे इतकी मोठमोठी माणसे भेटत आली आहेत की केवळ संख्येमुळे ती त्यांच्या व्यवहारात सामान्यांसारखी भासतात. तरीही पुराभिलेखखात्यासारखे, म्हणजे दप्तरखान्यासारखे,

त्यांच्यापाशी सगळे सुसंगत, क्रमवार, तपशीलवार, बिनचूक लावून ठेवलेले आहे. असामान्य! केवळ पत्रव्यवहार—आपला व इतरांचाही जमवून—फार काय, दैनंदिनी लिहूनदेखील—इतकी लख्ख नोंद ठेवणे शक्य नाही. खरोखरच असामान्य!

आणखी एका अचाट स्मरणशक्तीचे प्रयोग नुकतेच देखिले. ते श्री० गो० नी० दांडेकरांनी 'स्मरणगाथा' म्हटली तेव्हा. सगळा बोलपट अस्खलितपणे उलगडत गेला. रिळामागून रीळ. नेपथ्यादाखल निसर्गाची उदंड देखणी रूपे पुरवलेली होती. संवाद वेधक. चित्रण-मुद्रण सगळे गोमटे. गीते म्हणाल तर ठायी ठायी वेल्हाळ मराठी-संस्कृत-हिंदी पद्ये पट्टीच्या कीर्तनकाराच्या कौशल्याने पेरलेली. आख्यानही बहुत रसाळ. रसभाव फुली फुलून आलेले. अवघा श्रोता डोलत राहतो, डुंबत राहतो. नाट्य, समर, हर्षामर्षाचे उमाळे ...सगळे कोंदून येते. ओहो, गाथा कसली, महाभारतच ते. तरी ही पहिलीच पर्वे आहेत. तीस वर्षांपर्यंतच कथा पोचते. पुरे होईल तेव्हा या अनुभवामृताचा विस्तार केवढा अपार असेल, या कल्पनेनेच तितीर्षू भयचकित होतो. काय आठवावी क्रीडा. असे काही पाहिले की माझी बापुडी स्मरणशक्ती हिंपुटी होते. इतुकेच की क्वचित् प्रसंगी दांडेकरांवरसुद्धा एखादा दुवा गळून गेला म्हणून कष्टी होण्याची पाळी येते. म्हणजे माडखोलकरांइतकी त्यांची स्मरणशक्ती परिपूर्ण नाही; तिच्यात मानुष अंश आहे.

असे काही वाचल्यावर आत्मचरित्रलेखनाच्या वाटेला जाण्याची हिंमत होत नाही. दांडेकरांनी तीस वर्षांत जे पाहिले, भोगले, त्याच्या पासंगालासुद्धा माझ्यासारख्याचे त्याच्या दुप्पट काळातील अनुभव येणार नाहीत. आम्ही आपले वर्षानुवर्षे नित्यकर्मे चाकोरीतून इमानेइतबारे पार पाडीत राहिलो. व्यवसाय केला तोही शिक्षणाचा. इतका निरुपद्रवी, पडदानशीन व्यवसाय आणि कोठला? रोमांचांचे मळे फुलायला याहून निकस भूमी कोणती?

पण त्याचे काही सांगता येत नाही. तसे कागदी रोमांचही फुलवता येतात. पुष्कळदा त्यांचीच शोभा डोळ्यात अधिक भरते. ते सोडले तरी अनुभव हा साक्षात् स्वतःचाच असावा लागत नाही हे ललितलेखनाचे एक तत्त्व सांगितले जाते. तो दुसऱ्याचा असू शकतो, किंवा एखाद्या पुस्तकातून घेतलेला. त्याला आडगिऱ्हाइकी म्हणण्याचे कारण नाही. आपल्या समाजाच्या अनुभवातही आपण एका दृष्टीने भागीदार असतो. कधी आपल्या कल्पनेतूनही तो निर्माण होतो—कल्पनाशक्ती मात्र तेवढी प्रबळ हवी. स्वप्नरंजन

हा कलावंताचा हक्कच आहे. काळाच्या भुलावणीमुळे भास होऊ लागतात. असत्याचे नसते व नसत्याचे असते होऊ लागते. एके काळची दिवास्वप्ने वास्तवाच्या चौकटीत जागा धरून बसतात. मग त्यांना हुसकणे कठीण. महा चेंगट.

कित्येकांचे तसे होत असावे. पण मला त्यातील काही जमेल असे वाटत नाही. स्वप्नांविप्नांबाबत आपण जरा संशयीच. दुसऱ्यांच्या इतकेच स्वतःच्या स्वप्नांबाबतही. स्वप्न जरा जास्त रंगत आले तर मलाच हसू येते. आणि त्याचा फ्यूज जातो.

मग आपल्याकडे स्वतःविषयी, जेवढ्यास तेवढे, बिनमसाल्याचे, लिहिण्यासारखे काय आहे? भोवताली खूप रामायणे घडली; पण आपल्या कथेत ती कशी घुसडायची? आता अगदी सनवारीच पाहायची तर माझ्या हयातीत दोन महायुद्धे झाली! पहिले, मी एक ते पाच वर्षांचा असताना! पण आत्मचरित्रनायक कितीही महान झाला तरी त्या वयात तो इतका जागतिक कसा होणार? दुसरे, माझ्या ऐन तरुणपणी झाले. त्या महायुद्धाचे मराठी मनावर आणि साहित्यावर आणि कलेवर दूरगामी परिणाम झाले असे आपण तर बुवा म्हणत आलो. तेव्हा ते झाले असावेत. पण ते आंतरिक. आम्ही केले काय त्या सहा वर्षांत? युद्धाच्या रम्य कथा मन लावून वाचल्या; आणि रॅशनचे धान्य खाल्ले. हो, आणि हवाई हल्ल्यापासून (स्वतःचे व देशबांधवांचे) संरक्षण करण्यासाठी काही तासांचे प्रशिक्षण घेताना दहाबारा फुटांवरून उडी मारावी लागली तेव्हा पावले झिणझिणली. हा त्या महायुद्धाशी दूरचा का होईना पण संबंध असलेला शारीर अनुभव. पण त्या झिणझिण्या वाचकापर्यंत पोचवण्याचा प्रयत्न केला तर त्याला बहुधा हसूच येईल. म्हणजे समजदार वाचकाला. आणि आपण तर त्याच्याचसाठी लिहितो!

अलीकडच्या काळात आपली तीन संक्षिप्त युद्धे झाली. ('मिनी वॉर्स'चे हे मराठीकरण ठीक?) चीनशी एक व पाकिस्तानशी दोन. चीनचे प्रकरण दूर ईशान्य सीमेपुरतेच राहिले. पाकिस्तानशी पहिले युद्ध झाले तेव्हा कसा कोण जाणे, आमच्या 'वॉर्ड'साठी एक समिती होती तिच्यात अडकलो; तिच्या दोनतीन सभा भरल्या आणि युद्ध संपले. फक्त एके दिवशी दुपारी 'ॲक ॲक' तोफांची सरबत्ती ऐकू आली. तिच्याबद्दल एकमेकांना सांगण्यात थोडे रोमांच पैदा केले. खरे सांगायचे म्हणजे एरव्ही झगझगाटामुळे डोळ्यांना शिणवणारी मुंबईतील रात्र त्या ब्लॅक-आउटमध्ये डोळे निववू लागली, उगाच सुंदरही दिसू लागली, ही एक सुखदायक आठवण मागे राहिली आहे. पाकिस्तानशी दुसरे युद्ध झाले त्याने चार दिवस कमीच घेतले; पण ती बला अगदी दाराशी आली

होती. निदान काही वेळा तसे वाटले. आता ब्लॅक-आउट अधिक काळ होता, आणि हवाई भोंगे अधिक होत. रात्रीबेरात्रीच अधिक. आणि एकदा तर कोणाचेही आत्मचरित्र सजवील असे काहीतरी घडले. समय रात्रीचाच. भोंगा झाला. मागोमाग आकाशात लाल गोळे निरनिराळ्या दिशांनी झेप घेताना दिसून आले. वाटले की युद्ध युद्ध म्हणतात ते हेच! बॉम्ज, बॉम्बर्स, असले तीस वर्षे शिळोप्यात वापरलेले शब्द अकस्मात सजीव झाले. धड भीतीही वाटत नव्हती; कुतूहलही वळवळत होते. असे ते अर्ध-बधिर क्षण संपण्याआधीच संशयखोरीही जागी झाली. हे सगळे नुसते दृश्यच का ? हे गोळे एवढे शांत आणि अहिंसक का ? आणि ते इतके सुंदर कसे—अस्मानी रोषणाईसारखे ? अर्थात् ही संशयरत्नमाला मौलिक नसावी. पन्नास लाख मुंबईकरांपैकी पाचदहा लाखांच्या मनात तरी ती चमकली असावी. नंतर समजले की त्या गोळ्यांना ‘ट्रेसर्स’ म्हणतात, आणि कधी शत्रूची विमाने मधल्या चौक्यांना गुंगारा देऊन शहरापर्यंत पोचली तर त्यांचा शोध घेण्यासाठी जे करायचे त्याची ती रंगीत तालीम होती. काहीसे अपेक्षाभंगासारखे झाले. पण त्या क्षणांनी ‘थ्रिल’ म्हणतात ते भरपूर दिले. भीती थोडी डोके वर काढीत होती ती दबली, पण त्यानंतर काही दिवस तरी त्या क्षणांची आठवण झाली की तिची लहर रक्तातून सळसळायची. तशी ती लाखांच्या रक्तातून कमीअधिक वेगाने सळसळली असणार—माझ्यासारख्या बघ्यांच्या. तेव्हा मुंबईच्या आत्मचरित्रात येण्यासारखा प्रसंग आहे हा, माझ्या नाही. एकूण युद्धे आपल्यासारख्याच्या कामाची नाहीत.

खरेच, लढाईच्या जवळपासही कुठे न जाता तिच्यात भाग घेतल्यासारखे कोणी लिहिले असेल का ? घरबसल्या एका परदेशातील मुशाफरीचे साद्यंत वर्णन एका हरहुन्नरी लेखकाने केल्याचे जाणते सांगतात. पुस्तके हवी तेवढी असतात. योग्य तो मजकूर उचलून त्याचे एकजीव मिश्रण करण्याची योजकता हवी, आणि थोडा ‘मी’ त्यात मिसळायचा. अर्थात खूप ‘मी’पण असलेले लेखकच असले उद्योग करतात. अशाच तंत्राने तुरुंगवासाचेही प्रत्ययकारी वर्णन लिहून काढता येईल. पण युद्धाइतकेच युद्धाचे अनुभव लिहिणे धोक्याचे आहे. उद्या कोणी तज्ज्ञ चुकीवर बोट ठेवायचा. तेवढा गरम मसाला तुमच्या आत्मचरित्राला पचायला कठीण. पण आपल्या स्वातंत्र्ययुद्धाचा मसाला माफक गरम म्हणून सोयीचा. लज्जत वाढते आणि अंगाशी येण्याचा संभव कमी. युद्ध हेच मुळी तेथे रूपक आहे, तेव्हा आपल्या अनुभवालाही रूपकाचे वजन येते, आणि वास्तवाची फार मिजास तेथे चालत नाही. त्या एकूण ‘युद्धा’त—म्हणजे सगळ्या लहानमोठ्या चळवळींत मिळून—लाखांनी लहानमोठा, बरावाईट भाग घेतला;

जन्मठेपेपासून कोर्ट उठेपर्यंतच्या कैदेच्या खडतर शिक्षा माणसांनी भोगल्या. सगळ्यांनाच काही सरकारी ताम्रपट मिळाले नाहीत. तेव्हा आपले सोवळेभांडे त्या पंक्तीत टाकण्याचा कोणी विचार केल्यास ते सहज खपून जाईल.

समजा, मीच तो विचार केला ! कोणत्या वयात आरंभ करावा ? येथे काही रंगरुटाला वयाची अट नसते, की शारीरिक मापांची. दोन वर्षांपूर्वीच्या बांगला देशाच्या स्वातंत्र्ययुद्धात नाही का आठदहा वर्षांच्या मुलामुलींनीदेखील जासुदी आणि अन्य धोक्याची कामे केली ? देशसेवेचा स्फुल्लिंग आपल्यात कधी पडला बरे ?

या विषयातील पहिली आठवण आहे नवव्या वर्षीची. तेव्हा प्रिन्स ऑफ वेल्सच्या भेटीविरुद्ध निदर्शने होत होती. (हे मोठेपणी वाचले.) एकदा रात्री आमच्या घरासमोर निषेधाची गाणी गात काही माणसे आली होती; आणि अंगात ताप फणफणला असल्यामुळे आईच्या कडेवर बसून आत्मचरित्रनायक ते बघत-ऐकत होता. पण त्या तापाचा संबंध असा स्वातंत्र्यसंगराशी लावणे म्हणजे जरा अधिकच होईल नाही का ? —आत्मचरित्रातसुद्धा ? दोनतीन वर्षांनंतर एक राजद्रोहाचे कृत्य केल्याचे स्मरते. एका गोऱ्यासारख्या दिसणाऱ्या (बहुधा अँग्लोइंडियन) माणसापुढे खादीची टोपी धरून ती विकत घेतोस का म्हणून चक्क विचारले. त्याला काय ते समजले नसावे, पण द्रोह झालाच ! निदान बाजूला उभ्या असणाऱ्या एका शिपायासारख्या दिसणाऱ्या माणसाने तसे करू नये म्हणून हसत बजावले. हा प्रसंग मला वाटते खूपच रंगवता येईल. पुढे देशभक्तीची कक्षा वाढत वाढत मेळ्यांतील गाणी-संवाद मनोभावाने ऐकणे, 'केसरी' आणि अच्युतराव कोल्हटकरांचे (तेव्हा चालू असेल ते) पत्र मोठमोठ्याने वाचणे, भल्या पहाटे व्यायामशाळेत जाऊन दंड, नमस्कार, लाठी, लेजीम इत्यादी राष्ट्रबलवर्धक उपाय आचरणे, हे आणि यांसारखे उद्योग आले. (पण आमच्या शाळेत कोल्हटकरांची पत्रे मनातल्या मनात वाचणे हासुद्धा टिळकद्रोह गणला जाई ! असे त्रांगडे होते ते !) पंचवीस की सव्वीसमध्ये स्वामी श्रद्धानंदांचा खून झाला तेव्हा मी माझ्याच हस्तलिखित मासिकात त्यावर ज्वलंत संपादकीय लिहिले होते. आपले पहिले राजकीय लिखाण म्हणून ते प्रेमादराने मिरवता येईल. सोय पाहणारी स्मरणशक्ती असती तर ते धडाधडा उद्धृतही करता आले असते.

तीस-एकतीसच्या असहकार-चळवळीच्या वेळी मी कॉलेजात होतो. जणू वेळ साधून. त्यातून किती तरी रचता येईल. ते नेटके रचण्याइतके मी वाचलेले आहे; तेव्हाही

वाचीत असे. पण, काय सांगू, हातून काही घडलेच नाही. खोटे खपवायचे झाले तरी त्याला खऱ्याचा थोडा तरी मुलामा लागतोच ना! हरताळ पडून कॉलेज चुकले याची खुषी असे; प्रभातफेऱ्यांची आणि चरख्याची चेष्टा करीत असू. अगदी आठवण खरवडून काही गोळा करायचे म्हटले तर हेच : कधी राजकीय पुढाऱ्यांची व्याख्याने ऐकली; कधीमधी खादी वापरली; स्वदेशीच्या प्रसारासाठी काढलेल्या एका दुकानात काही महिने स्वयंसेवा केली. ही खरवडदेखील सपक आणि अळणी निघाली. रात्री फार उशिरा घरी परतत असता पोलिसाने हटकले होते—पण त्याने तरी किती चव येणार? सारांश, ती मोठी पर्वणी माझ्याबाबत—म्हणजे माझ्या संकल्पित आत्मचरित्राबाबत—व्यर्थच गेली.

पुढची मोठी पर्वणी म्हणजे बेचाळीस. आणि बेचाळीस म्हणजे भूमिगत. फार रोमँटिक काळ. इतक्या माणसांविषयी ती तेव्हा भूमिगत असल्याचे, किंवा त्यांनी भूमिगतांना आश्रय दिल्याचे, त्यांच्या स्वतःकडून किंवा इतरांकडून ऐकले की कल्पना चेकाळते. त्या शब्दाचा अक्षरशः अर्थ घेऊन इतके लोंढे पृथ्वीच्या पोटात वावरत होते तर मग भारतातील किंवा महाराष्ट्रातील 'वरची' लोकसंख्या बरीच घटली असली पाहिजे हा विक्षिप्त विचार त्रास देऊ लागतो. आपण त्या 'वरच्या', नेहमीच्या वेषातल्या, रंगहीन मेंढरांत होतो हे सांगणे नलगे. पण मेंढरूदेखील कधी क्षणभर रांग सोडून हुंदडते. एकदा दुपारी दादरला काही गडबड झाली; ती पाहायला एका स्नेह्यासमवेत गेलो होतो; आणि सोजिरांनी रस्त्यात उग्र रूप धारण केले तेव्हा आम्ही उभयता तेथून सावधपणे, पण त्वरेने, अंतर्धान पावलो. पण रंगोटी करावीसे वाटावे असे काहीतरी आवाहन त्या दिवसांत आहे खरे. कोणी कोणी केली, आणि कोणाची कांती मूळचीच हे आपण कसे सांगणार? आपली सूरत मात्र अशी आहे की त्यावर असले कोणतेच पूट चढणार नाही. उगाच हसे व्हायचे. त्या गुप्त रेडिओवरून आपण जनतेला चिथावीत होतो, किंवा गुप्त 'बुलेटिन'मध्ये ज्वालाग्राही लेख लिहीत होतो, किंवा त्याचे अंक वाटत होतो, यावर कोणाचा विश्वास बसेल? मग रेल्वेचे रूळ उखडून टाकणे, सरकारी तिजोरीवर डाका घालणे, भाजीच्या पिशवीतून बॉंब नेणे, असली चित्तथरारक धाडसे आपल्या लेखणीच्या नशिबी कोठली?

आणि बेचाळिसच्या लाटेत कोरडा राहिला त्याने उगाच आला हजरतच्या दाढीला हात घातल्याची, किंवा सालाझारला हादरवल्याची जळजळीत भाषा वापरू नये हे शहाणपणाचे. ते पटते. मी तर संघाची टोपी घातल्याचे किंवा दलाची गाणी म्हटल्याचे देखील लिहिणार नाही.

आता जमाना आला आहे तो कैफियतवजा आत्मचरित्राचा. पाद्र्यापुढे पापाचा पाढा वाचल्यासारखे करणाऱ्या. मात्र येथे त्यातील पश्चात्तापाचा भाव इतरांसाठी असतो. म्हणजे कथेतील इतर पात्रांसाठी. वाचकांसाठी नव्हे ! वाचकांना तर ती फारच पसंत पडतात. पापभीरू मध्यमवर्गीय वाचकाला त्याने गुदगुल्याही होतात, आणि आपण फारच पापभीरू आहोत हेही जोराने जाणवते. मला हेही जमेलसे दिसत नाही. एक तर आवश्यक तेवढे अनीतिधैर्य कधी जवळ नव्हते; म्हणून तशी आंतरिक गुह्ये नाहीत. आणि मुख्य म्हणजे मी पुरुष आहे. हा नवीन बाज फक्त स्त्रियांसाठी असावा असे दिसते; म्हणून गुदगुल्या विशेष.

चुकलेच ते. आता पश्चात्ताप काय कामाचा ? वेळीच भलत्या मार्गाने, निदान शतपावलीपुरता, गेलो असतो तर त्या कमाईच्या बळावर स्वतःला आणि वाचकांना झुलवले असते, लेखणीचे रंग उडवले असते. पुढे आपल्या पापांचा कबुलीजबाब देऊन क्षमा मागता यावी अशा तऱ्हेचे जीवन तो जगला हे एका लहानशा इंग्रजी लेखकाबद्दल दुसरा एक लेखक (आणखी कोण ?) म्हणाला तेच खरे. अगोदर सुचले नाही. आता फार उशीर झाला आहे.

तेव्हा आत्मचरित्र लिहिण्याचा विचार सोडावा. पुढच्या जन्मी मात्र आरंभापासून जय्यत तयारी केली पाहिजे. बहुधा तेव्हा माझ्या लेखणीचीही कुडी बदलून ती कमी नाटाळ असेल. मग त्याच जन्मात ते लिहून होईल.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२५
निबंध २४.१.३५
१७।२।८४
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

## फर्स्ट-नेम-ड्रॉपर

प्रत्येकालाच मला वाटते असा एखादा तरी मित्र असतो—किंवा मैत्रीण—किंवा असा माणूस निदान माहितीचा असतो की ज्याच्या सहज बोलण्यातही मोठमोठी नावे सलगीच्या सुरात येतात. आणि सलगी सहसा आडनावाशी नसते—म्हणजे कुळाच्या वा कुटुंबाच्या नावाशी, तर ज्याला ब्रिटिश साहेब पहिल्या नावाशी म्हणेल—किंवा अमेरिकन साहेब दिलेल्या नावाशी—म्हणजे माणसाच्या स्वतःच्या नावाशी, असते. त्या नावाचा संक्षेप करून सलगी घट्ट असल्याचे सुचवता येते. आणि बारशाच्या वेळी दिलेले व पुढे कागदोपत्री स्थिर झालेले ते सरकारी नाव, किंवा त्याचा संक्षेप टाळून, फारच घरगुती नाव वापरले की तो घट्टपणा ऐकणाऱ्याच्या मनात किंवा कानात, फारच भरतो. अर्थातच तो संक्षेप किंवा ते घरगुती नाव एकवचनातच बसते.

उदाहरणार्थ, कोणी गोविंदराव कुलकर्णी घ्या. सरळ गोविंदराव म्हणण्यात थोडे आदराचे अंतर राहतेच. ते कमी होत होत गोविंदा, गोंदू (किंवा गोंद्या), बाळ्या (किंवा बबड्या) आले की तसा घट्टपणा वाढत जातो. गोविंदराव कुलकर्ण्यांची प्रतिष्ठा जेवढी अधिक तेवढे बाळ्या-बबड्या करणाऱ्यांचे मोठेपण अधिक परिणामकारक. त्यासाठी अर्थात सलगी सोडाच, पण स्नेह लागतो असेही नाही. कोण जाणे, कदाचित आपला बाळ्याबबड्या करणाऱ्याच्या अस्तित्वाचीही खबर गोविंदराव कुलकर्ण्यांना नसेल.

अर्थात गोविंदराव काही उपजताच 'राव' झाले नाहीत. म्हणजे मांडीवर मुतणाऱ्या मुलालाही प्रतापराव किंवा बाळासाहेब म्हणणाऱ्या एखाद्या खऱ्याखोट्या खानदानी कुटुंबात उपजले नसल्यास ते बबड्या, गोंदू, गोविंदा अशा इयत्ता करीतच रावपर्यंत चढले असणार. घरातील वडील माणसेही निदान परक्यांपुढे, त्यांना पुरे नाव चढवणार, आणि गोविंदराव खरोखरच म्हणजे मानाने—नुसत्या वयाने नव्हे—मोठे झाल्यावर ती वडील माणसे आपापसातही त्यांच्या नावाशी असा पोरखेळ सहसा करणार नाहीत.

पण गोविंदरावांच्या मोठेपणाशी ज्याला नाते लावायचे आहे त्याला असा खेळ फलदायी असतो. आता समजा, गोविंदराव राजकीय पुढारी आहेत. तर "गोंदू काल शिवाजी पार्कवर काय मस्त बोलला!" किंवा समजा, तो गाजलेला नाटककार आहे तर "इलाज

नाही; गोंद्याचा हट्टच आहे त्याच्या नवीन नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला आलं पाहिजे म्हणून!" किंवा नामांकित गायक असला तर, "बबड्यापुढं—म्हणजे गोविंदराव कुलकर्णी रे—कसला भीमसेन घेऊन बसलास!" अथवा उलट पवित्रा घेऊन, "मी बबड्याला टणकावलंच, तू झाला असशील मोठा गवई, पण तालात बोंब; महंमद हुसेन खां तबल्यावर बसला की तुला खाऊन टाकतो!" आणि खांसाहेबाला म्हमद्या केले की एका दगडात दोन पक्षी (पक्षी दोघांशी सलगी) आणि संगीतसृष्टीही पादाक्रांत केल्याची सूचना!

हे काही कुजबुजायचे नसते हे सांगणे नलगे. भोवतालच्या आठदहा तरी अनोळखी लोकांना (उदाहरणार्थ, बसमध्ये किंवा आगगाडीत) सहज ऐकू जाईल अशा आवाजात, पण अगदी सहजपणे, आपल्या शेजारच्या माणसाला सांगायचे असते. हटकून गुण येतो. त्यांपैकी पाचसहाजण तरी "हे म्हणजे गोविंदराव कुलकर्ण्यांचे अगदी अंतरंगमित्र दिसतात!" असे एकमेकांना आदराने कुजबुजत, किंवा निदान मुद्रेने सांगतात.

कोणी आदरभावाने, किंवा केवळ कुतूहलाने किंवा कदाचित शंकेखोरपणे, त्या मैत्रीचा ठाव घेण्यासाठी चौकशी केली तर एवढे हाती लागायचे : हे गृहस्थ गोविंदरावांबरोबर एकाच शाळेत एकाच काळी होते, किंवा फार तर अगदी एकाच तुकडीत होते, किंवा त्यांच्या शेजाऱ्यांच्या कोण्या स्नेह्याचे आप्त होते, किंवा एके काळी ते एकाच लोकलगाडीच्या त्याच डब्यातून उभ्याने प्रवास करीत. यांतले काहीच नसेलही; ती सगळीच कल्पनाशक्तीची करामत असेल. पण असा प्रामाणिक खोटेपणा फारसा आढळत नाही! थोडेसे खरे आणि बरीचशी कल्पनेची रंगोटी असली मिश्र निर्मितीच अधिक. क्वचित बरेचसेही खरे असेल, पण ते कुण्या एका काळचे...पुढे कसलाच संबंध उरला नसेल...तरीही तळाला चिकटलेली तेवढी आठवण मोठा आवाज करून खरवडून काढावी इतके गोविंदराव आज मोठे झाले आहेत ना!

प्रामाणिक खोटेपणाचा एक खास नमुना आठवतो. वीस-पंचवीस वर्षांपूर्वीचा. माझ्या नेहमीच्या लोकलगाडीत मधल्या एका स्टेशनवर एक मध्यमवयीन गरगरीत गुजराती गृहस्थ चढायचा. तो डब्यात शिरताच चहुबाजूंनी कलकलाट उठे, "केम मनुभाय, आजे सिनेमाना पास कोए आप्यु छे, अशोककुमारे? के सोराब मोदीए? के दिलीपकुमारे?" असा फिल्मी दैवतांच्या नामावळीचा गजर व्हायचा. त्याने गांगरून न जाता मनुभाई निर्विकारपणे आज या, उद्या त्या 'स्टार'ने अमुकतमुक फिल्मचा फ्री पास आपल्याला दिला असा तपशील पुरवी...अर्धा डबा हे सवालजवाब ऐकून खूष होई,

इतक्या मोठ्या आवाजात ते चालत. ते पासबीस मिळत असल्याचे सगळे उघडउघड खोटे असे. मग मनुभाईला तसा खरोखरच भ्रम झाला होता की त्या लोकांची गंमत करण्यासाठी तो ते सोंग वठवीत असे? कोण जाणे!

जे फिल्मी स्टारबाबत तेच इतर क्षेत्रांतल्या 'ष्टार' लोकांबाबत: खेळांतील, संगीतातील, रंगभूमीवरील, साहित्यातील आणि राजकारणातील. गावस्करचा कौतुकाने सुनील म्हणून उल्लेख करणे निराळे, आणि सुनीलने स्वतःच्या बॅटिंगचे रहस्य आपल्याला कसे सांगितले ते खुल्या आवाजात चवाठ्यावर सांगणे निराळे. तसेच अमोल (म्हणजे पालेकर), किंवा चंदू (म्हणजे पेंढारकर), दिदी (म्हणजे लता मंगेशकर), बाबूजी (म्हणजे सुधीर फडके), डॉक्टर (म्हणजे लागू, पण बहुवचनात!), विजय (म्हणजे तेंडुलकर), चिंतू (म्हणजे चिं० त्र्यं० खानोलकर) पी० एल० किंवा पु० ल० (म्हणजे पु० ल० किंवा पी० एल०!)...किंवा अगदी भाई, यांनी आपल्याला किंवा यांना आपण काय सांगितले हे इतरेजनांना सांगण्याची सवय लागणे!

राजकारण हे तर मुळी 'राज'कारण. सबसे ज्यादा. तेथील ष्टारांभोवती अधिक मोठी आणि अधिक मातबर वलये असतात (त्यांतील स्वयंप्रकाशी किती आणि परप्रकाशी किती याची चौकशी करायची नसते!). तशी वलये सर्वच लोकप्रिय माणसांभोवती असतात; चित्रपटवाल्यांची तर फारच रंगीबेरंगी, झगमगती—इतकी की ती तकलुपी आणि थिल्लर वाटतात—असे आपण प्रौढपणे मानतो, किंवा सांगतो. पण राजकारणाची वलये आगळीवेगळी; ते किंवा त्यांचे राजकारण कितीही बालिश असले तरी त्या वलयांत आपण बौद्धिक रंग पाहतो, निदान तसला वर्ख चिकटवतो. शिवाय ती पावरबाज असतात. त्यांच्या तालावर देशाचे—देशाचेच का, अखिल जगाचेसुद्धा—नशीब फिरत राहते असे आपण मानत असतो; निदान आपल्या जिल्ह्याचे तरी! खुद्द त्याचे नशीब किती बलवत्तर असेल ते कोणी सांगावे? आजचा रिकामा राजकारणी हा उद्याचा मंत्री असेल; आजचा चिल्लर जिल्हापती हा परवा राष्ट्रपतीही बनेल!

तशी शंभरएक वर्षे आपण मराठी लोक राजकारणाबद्दल लिहीत आणि बोलत आलो. तावातावाने आणि वरच्या सुरात. स्वातंत्र्याची वगैरे चळवळ सुरू होती तेव्हा तर विशेष. विरोधकांसंबंधी लिहिताना-बोलताना अधिकच चेव. ते मुख्यतः त्यांची धोरणे, त्यांची वक्तव्ये, फार तर त्यांच्या भानगडी यांबद्दल. पण हे सगळे अंतर ठेवून; जवळिकीचा आभास निर्माण न करता. तसा आभास प्रथम निर्माण करण्याचे श्रेय आपल्या एका

प्रसिद्ध (पण आता कै०) कादंबरीकाराकडे जाते. त्यांच्या लेखांवरून आणि बऱ्याचशा बोलण्यावरून असा ग्रह होई की त्यांच्या प्रांताच्या पुढाऱ्यांची, मंत्र्याबिंत्र्यांची धोरणे, डावपेच, त्यांच्या साक्षीने, कित्येकदा त्यांच्या सल्ल्यानेही निश्चित होत. अर्थात त्यांचे सर्वज्ञत्व राजकारणापुरते मर्यादित नव्हते. सर्वच मोठ्या माणसांची गुह्ये त्यांच्या तोंडावर असत—साहित्यिकांची तर विशेष. आणि तेही अगदी थेट माजघरातील—किंवा शय्यागृहातीलसुद्धा ! पण अशी गुह्ये चिवडतानासुद्धा ते कादंबरीकार कधी एकवचनात उतरले नाहीत—लिहिण्यातच नव्हे तर बोलण्यातही. अशी त्या सद्‌गृहस्थांपाशी आदब होती, संयम होता !

गुह्यांवरून आठवले, गुप्त चळवळीनंतर असल्या जवळिकीला, म्हणजे जवळिकीच्या सार्वजनिक उच्चाराला, विशेष जोर येतो. बेचाळिसच्या चळवळीत महाराष्ट्रात किती भूमिगत होते, कोणास ठाऊक ? जे आजवर कानी पडत आले त्यावरून हजारांनी, कदाचित लाखांनीही, असावेत. पुन्हा या भूमिगतांना, अर्थात जिवावर उदार होऊन, आश्रय देणारे, त्यांचे गुप्त निरोप आणि खाणेपिणे पोचविणारे यांचीही संख्या तेवढीच अब्ब असावी ! त्या कडक गुप्ततेची गरज संपल्यावर आपण त्या चळवळीची (दुसरी की तिसरी ?) फळी म्हणून कशी रोमांचकारक कामगिरी केली याचा ते जाताजाता, किंवा जातायेता, उल्लेख करीत राहिले, तर ती काही बढाई होत नाही. पण असले उल्लेख तोंडीच जास्त; लेखी कमीच. यात विनय, प्रसिद्धिविन्मुखता या आदरणीय गुणांइतकाच लेखी विधानांची कोणी संशयात्मे चिकित्सा करीत राहतील या शक्यतेचाही भाग असतो.

आणि ज्याला आश्रय दिला, पोलिसांपासून वाचवले, तो भूमिगतही मातब्बर हवा. सामान्य चळवळ्याचा काय उपयोग ? म्हणजे लिहिण्याबोलण्यासाठी. उदाहरणार्थ, अच्युतराव पटवर्धनांवर हा प्रसंग, मला वाटते, अगणित वेळा आला असणार : म्हणजे आपल्याविषयी असे सांगितले जाण्याचा ! ते येणार याची पूर्वसूचना कशी आली, ते कसे आले, कोणत्या वेषात आले, काय जेवले, काय बोलले, आणि पोलिस मागावर आहेत याचा वास येताच एकाएकी अदृश्य कसे झाले (पण पुनर्वेषांतर करून) हे सगळे तपशीलवार पद्धतीने आणि रसभरित भाषेत किती जणांनी वर्णन केले असेल याची पटवर्धनांनाही कल्पना करणे शक्य नाही ! एखाद्या संशोधकाने छडाच लावायचा म्हटले तर दत्तगुरूसारखे ते सकाळी औदुंबरला, दुपारी नृसिंहवाडीला, संध्याकाळी गाणगापूरला, असा अतिमानुष संचार करीत असेदेखील सिद्ध व्हायचे ! (भौगोलिक चूकभूल द्यावी-घ्यावी !) त्यांचा उल्लेख पहिल्या नावानेच, ‘अच्युतराव’ म्हणून होई. आपुलकीइतकेच

राजकारणात पटवर्धनांची धाकटी पातीही होती हेही त्याचे कारण असेल. सहकारी एकवचनात त्यांचा उल्लेख करीत, पण ते अगदी निकटचे सहकारी...

आता काळ बदलला आहे. लोकशाहीची पाळेमुळे खोल गेल्यामुळे असेल बहुतेक, राजकीय श्रेष्ठी, मंत्री, वगैरे आपल्या परसदारी असल्यासारखी कित्येक माणसे बोलतात. अशी आपुलकी, अशी सलगी! बरे वाटते, आपल्या लोकशाहीचे भवितव्य उज्ज्वल असल्याचा साक्षात्कार होतो.

आता यशवंतराव चव्हाणांचेच पाहा ना. त्यांच्या पहिल्या नावावरच कितीतरी लोक भागवून घेतात. अग्रलेखातसुद्धा. आणखी यशवंतराव राजकारणात आहेत, पण नुसते यशवंतराव एकच! दुसरे चव्हाणही आहेत तसे. आणि पाटलांचे विचारूच नका. राजकारणाच्या क्षेत्रातील त्यांचा बुजबुजाट सोडा, मंत्र्यांतसुद्धा ते इतके असतात की मुख्यमंत्र्यांचीदेखील गफलत होत असेल! एका मल्याळी माणसाला म्हणे पाटील शब्दाचा अर्थच मंत्री असा स्पष्टला! मागचे मुख्यमंत्रीच वसंतदादा पाटील होते; त्यांना बोलतालिहिताना कोणी वसंतराव करीत, कोणी दादा. असेच राजारामबापूंचे बापू सहज होतात—त्याला ओळखपाळख लागत नाही. आणि आता शरदराव. इतक्या नायकयोग्य नावाचा मुख्यमंत्री (महाराष्ट्रातही) पूर्वी झाला नव्हता. तोंडात घोळवावे असे नाव... त्याला ‘पवार’ची जोड कशाला? आणि एकवचनात घुसणाऱ्यांसाठीही फार सोयीचे! नाहीतरी तेथे राव जरा विसंगतच दिसते. म्हणून असेल, सरकारी आमंत्रणपत्रिकांत, पायाभरणीच्या किंवा उद्‌घाटनाच्या शिलालेखांत, शरच्चंद्रची डबल जोडाक्षरांची प्रतिष्ठा...!

एकवचनी लोकांसाठी त्याहून सोयीचे नाव असणारे (आता, हाय, माजी) मंत्री म्हणजे मधू दंडवते. त्यांच्या नावामागील प्रा० ची प्रतिष्ठा केव्हाच गळली. (ते नामांकित प्राध्यापक होते तरीही.) आडनाव जरा थोराड तेव्हा त्यांचे चड्डीनावच फार रुळले; म्हणजे एकवचन करणे सोपे झाले. हट्टाने बहुवचन करायला पवारांचा चंद्र जरा चमत्कारिक दिसेल...मधुसूदन किंवा मधुकरपंत यांतील मूळचे नाव कोणते?

पण असे खरे नाव कोरडे, औपचारिक वाटते; वैयक्तिक स्पर्श देऊ पाहणाऱ्या, म्हणजे ललित ढंगाच्या, लिखाणासाठी ते निरुपयोगी! राजकारणावर रटाळ, कंठाळी, वृत्तपत्री आजवर माणसे लिहीत आलीच; ते सदैव व्यासपीठावर बसल्यासारखे असे. आता त्याला

माणसांत आणले पाहिजे, माजघरात खेचले पाहिजे. सभांतून, लेखांतून, पत्रकांतून, इतकेच काय मुलाखतींतूनही, राजकीय प्रश्नांची उकल करणाऱ्या प्रा० दंडवत्यांपेक्षा माजघरात (किंवा अगदी स्वयंपाकघरातही) पाटावर बसून ऑम्लेट खाता खाता मधूने तशी उकल केली तर ती वाचकाला अधिक चांगली भिडेल. आणि ते ऑम्लेट आपणच कसे केले याचाही लेखकाने (किंवा लेखिकेने) चवदार तपशील दिला तर आणखी परिणाम! नुसती प्रश्नाची प्राध्यापकी उकल असण्यापेक्षा त्यात थोडा गुपितवजा मसाला टाकला तर विचारूच नका! गुपितावरून पुन्हा आठवले. जसे बेचाळीस तशी आणीबाणी; म्हणजे भूमिगत, त्यांचे आश्रयदाते, इत्यादी. मला वाटते, खुद्द भूमिगतांपेक्षा त्यांचे आश्रयदातेच अधिक लिहीत-बोलत असतात. बऱ्याचशा भूमिगतांचे कार्य भूमिगतच राहते; आश्रयदात्यांचे उजळपणे मिरवते. आणि आश्रयदात्यांनी आश्रयार्थी भूमिगताला अग-अरे करावे हेही साहजिकच, आणि कर्तव्याच्या वाट्याबरोबरच त्याच्या रोमांचातीलही वाटा उचलावा यात काही अयोग्य नाही.

माझ्या एका स्नेह्याच्या लेखनात अशा आपुलकीचा नेहमी पूर वाहत असतो. ती आपुलकी पुन्हा एकाच नव्हे, चारपाच क्षेत्रांतल्या नामवंतांशी, असे त्यांचे सर्वस्पर्शी कर्तृत्व (निदान ओळखीपुरते). तो तर सहज एका वाक्यात नसली तरी एका परिच्छेदात मृणाल (गोरे), किशोरी (आमोणकर), नंदू (नाटेकर), सतीश (दुभाषी आणि किंवा आळेकर), बाबा (आमटे), व्यंकटेश (माडगूळकर) अशी थोराथोरांची फर्मास भेळ बनवतो; फारच चेकाळला तर आणखीही दोनतीन टाकतो...

त्याबद्दल त्याची मी चेष्टा करीत असलो तरी, खरे सांगू, मलाही जरा बरे वाटते! त्या मोठमोठ्या नावांच्या परावर्तित प्रकाशात तो उजळतो, तसा त्यांच्या प्रकाशात थोडासा मीही!

बोलण्यात मोठमोठी नावे वापरून त्यांच्याशी आपला संबंध सूचित करणाऱ्याला इंग्रजीत 'नेम-ड्रॉपर' म्हणतात. पण ते सामान्यतः पुरे नाव. हा जो 'पहिले' नाव वापरण्याचा आपला अलिकडचा खास मराठी बाज, त्याला काय म्हणायचे?

'फर्स्ट-नेम-ड्रॉपर?' येथे तरी आपण इंग्रजांवर कडी केली म्हणायची!

'फर्स्ट-नेम ड्रॉपर'ला योग्य मराठी अनुवाद कोणी सुचवील का?

# एक फारच यशस्वी प्राध्यापक

माझे आणखीही एका गोष्टीबाबत नाव बद्दू झाले आहे. ती म्हणजे सभासमारंभ टाळणे : लग्नसमारंभ, शोकसभा, एकसष्टी, अभिनंदन, उद्‌घाटन, इत्यादी प्रकार. म्हणून प्राचार्य घाटपांड्यांच्या अभिनंदन-सभेत मला पाहून अनेकांना आश्चर्य वाटले असणार, काहींना गंमतही. मला स्वतःला थोडे चोरट्यासारखे वाटत होते, ते भलत्या ठिकाणी दिसल्याबद्दल का?

पण तसे वाटावे असे त्यात काही नव्हतेही. नाही म्हटले तरी घाटपांड्यांना मी वर्षानुवर्षे पाहिलेले—दुरूनजवळून. कोणे एके काळी मी त्यांचा विद्यार्थी होतो. त्या दोन वर्षांत थोड्याफार जवळून—म्हणजे विद्यार्थी प्राध्यापकाला पाहू शकतो तेवढ्याच जवळून. पुढे पाचसात वेळा काही कामाप्रसंगांनिमित्त एकत्र आलो, एवढेच. एरव्ही दुरूनच. अलीकडे अनेक वर्षे वर्तमानपत्रांमुळे त्यांचे नाव वारंवार डोळ्यांपुढे असे. ओळखीपाळखीचेही काही दुवे होते. गाठभेट मात्र क्वचितच होई. बहुधा अकस्मातच. पण हा अकस्मातपणा आणि क्वचितपणा चटकन विरघळून जावा असा त्यांच्या बोलण्यावागण्यात ओलावा असे. तो सगळ्यांबाबतच...

पण हे तर विषयारंभीच विषयांतर झाले. निघाले घाटपांड्यांच्या अभिनंदन-सभेवरून. अभिनंदन ते विद्यापीठाचे कुलगुरू झाल्याबद्दल.

वक्त्यामागून वक्ते गहिवरत होते. गुण संपता संपेनात. मधूनच असा खुळा भास होई, की शोकसभाच चालू आहे. पण खुद्द घाटपांड्यांचीच प्रसन्न मूर्ती व्यासपीठावर मध्यभागी झळकत होती—भाषणांना कधी डोलून, कधी स्मिताने, कोणी फारच अतिशयोक्ती केली तर विनयाने नकार दाखवीत, अशी दाद देत. पण भाषणे एकंदरीने निर्जीव होत होती. गौरवाचे तेच तेच गंजलेले छाप उठवले जात होते. तो सगळा रटाळपणा निर्विकार चेहऱ्याने ऐकत असता डोक्यात एक विक्षिप्त विचार वळवळत होता...

स्वतः घाटपांड्यांनाच गौरवाचे भाषण करायला सांगितले तर? ते बहार उडवून देतील. गौरवाचे किंवा शोकप्रदर्शनाचे भाषण त्यांनीच करावे अशी बोलवा होती. नेटकी

शब्दयोजना, नेमकी अवतरणे, भावनेचा शिडकाव, यांचे कसे छान रसायन जमवीत. या लकब्रींचा उपयोग त्यांनी स्वतःवरही सराईतपणे केला असता. असला प्रसंग सोडा, पण स्वतःवर बोलणे हे घाटपांड्यांच्या सरावाचे नव्हते असे नाही.

खरे म्हणजे घाटपांड्यांनी जे तऱ्हेतऱ्हेचे आणि भरघोस यश मिळवले, त्यांमागील विविध गुणांना एकवटणारे सूत्र म्हणजे त्यांच्या ठायी असलेली आपल्या गुणांची निष्ठापूर्वक जाणीव...

या निष्ठेच्या बळावरच एके काळचे माध्यमिक शिक्षक एका मातबर विद्यापीठाचे कुलगुरू झाले. पण ही काही त्यांच्या आकांक्षेची शेवटची पायरी नव्हती. त्या जातीच्या आकांक्षेला तशी शेवटची पायरी नसतेच म्हणा. त्या सभेतील 'प्राचार्य घाटपांड्यांचा असाच उत्कर्ष होत राहो, आणि महाराष्ट्राच्या (किंवा भारताच्या) शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक जीवनात...' वगैरे वगैरे या प्रत्येक भाषणाच्या शेपटातील उत्कर्षाची कलमे शिक्षणमंत्रीपद, राज्यपालपद, परदेशात वकील म्हणून नेमणूक यांसारखी होती. तशा वावड्या आताच उडू लागल्या आहेत. किंबहुना, प्रत्येक वेळी ते वरच्या पायरीवर गेले, की वावड्या त्यांना आणखी वर नेत. त्याविषयी त्यांना कोणी विचारले तर ते फक्त खांदे उडवून निःसंग हसू आणीत. पण जणू सृष्टिक्रमाने ते वरवरच जात राहिले. सायकलींचा सुळसुळाट असलेल्या स्वीडन की अशा कोणत्याशा देशात बालक जन्माला येते तेच दोन चाकांनिशी असा कोणी विनोद केला आहे. प्राचार्य घाटपांडे जन्माला आले तेच पाठीला शिडी असलेले असा त्यांच्याविषयीही विनोद झाल्याचे ऐकले आहे. विनोदाचे सोडा, पण ते सदैव चढत राहिले हे मात्र खरे!

एवढा यशस्वी माणूस, तेव्हा परिचय, मुलाखती इत्यादी छापील संस्कार त्याला चुकायचे नाहीत; आणि ते तो सहसा चुकवायचाही नाही—घाटपांडे तर नक्कीच चुकवायचे नाहीत. कोणाचे मन मोडू नये असले संकोची सौजन्य त्यात कदाचित अधिक असेल, पण प्रसिद्धीच्या प्रकाशाची त्यांना 'ॲलर्जी' नव्हती हेही महत्त्वाचे आहे. ती ज्यांना असते, त्या प्रकाशविन्मुख दिवाभीतांविषयी त्यांचे मत बरे नसे हे आलेच. कोणा परिचयलेखकाने त्यांना सूर्यनारायणाचे प्रसन्न स्वागत करणाऱ्या तेजःपूजक सूर्यफुलाची उपमा दिली ती सार्थच आहे. असो. तर त्यांच्याविषयी वेळोवेळी वाचलेले लेखन, ऐकलेले वृत्तांत, आणि माझा व माझ्या परिचितांचा त्यांच्याशी आलेला संबंध यांच्या आधारावर त्यांचे चरित्र संक्षेपाने सांगतो.

घाटपांड्यांचे कर्तृत्व तसे अनेक क्षेत्रांत चमकले, पण विद्या हे प्रधानक्षेत्र. ती त्यांनी वर्षानुवर्षे दिली आणि प्राचार्यादि अधिकारपदावरून देवविली; म्हणजे ती त्यांनी उत्तम रीतीने संपादन केली असली पाहिजे. पण असे दिसते, की त्यांचे यश तेवढे उज्ज्वल नव्हते—अगदी शेवटच्या परीक्षा सोडल्यास. शाळेत तर म्हणे त्यांची गणना मागासलेल्यांतच असे. उच्च शिक्षणासाठी पुणे निवडले. विद्येचे माहेरघर असा त्याचा गवगवा असे. तेथील कॉलेजमध्येही आरंभी जवळजवळ तसेच. पण असे काहींचे होतेही. कोणाची महत्त्वाकांक्षा विलंबाने स्फुरते, कोणाला ज्ञानाची रुची उशिरा लागते. घाटपांड्यांनी बी० ए० ला प्रथम अर्थशास्त्र हा मुख्य विषय घेतला, पण त्या विषयाला गर्दी फार, तेव्हा एक टर्म होऊन गेल्यावर तो बदलून इतिहास घेतला. त्या विषयाच्या वाटेला तेव्हा फारसे कोणी जात नसे; म्हणजे प्राध्यापकांच्या मार्गदर्शनात आणि मर्जीत वाटेकरी कमी असा हिशेब त्यामागे असेल का ? त्या प्राध्यापकांचा व्यासंगही दांडगा होता. पण आणखी एक टर्म संपल्यावर 'परि तूं जागा चुकलासी' असा साक्षात्कार होऊन घाटपांड्यांनी पुण्यातीलच दुसऱ्या एका कॉलेजात प्रवेश मिळवला. तेथील प्राध्यापक पूर्वीच्या प्राध्यापकांहून ज्ञानात उजवे होते असे नव्हे; खरे म्हणजे फारच डावे होते. पण ते बी० ए० च्या परीक्षेत पेपरसेटर असत व आपल्या विद्यार्थ्यांचे परीक्षेत हमखास कल्याण करण्याविषयी त्यांचा सार्थ लौकिक होता. आणि घाटपांड्यांबाबत तो सार्थ ठरलाही; त्यांचे कल्याण झाले—म्हणजे तत्पूर्वीच्या कर्तबगारीच्या तुलनेने. एम० ए०च्या दुसऱ्या वर्षासाठी घाटपांड्यांनी कॉलेजच नव्हे, तर शहरही बदलले ते असाच काही अंदाज बांधून. तोही लागू पडला, आणि घाटपांड्यांचे घोडे सचैल नसले तरी बऱ्यापैकी न्हाऊन निघाले. अशी ज्ञानाची व्यवहारज्ञानाशी फलदायी सांगड घालण्याचे विद्यार्थिदशेतच कमावलेले कसब पुढे त्याच व्यवसायात पडल्यावर त्यांनी शतमार्गांनी वाढवले; आणि ज्ञानाचाच व्यवहार केला, तोही मोठ्या वाकबगारीने.

शिक्षण हेच आपले कार्यक्षेत्र हे घाटपांड्यांनी केव्हाच मनाशी योजून ठेवले होते. विद्यादानासारखे दुसरे पुण्य नाही, राष्ट्रोद्धाराचे ते एकमेव साधन, प्राचीन परंपरा, स्वार्थत्याग, टिळक-आगरकर, इत्यादी घोषांनी त्या काळच्या पुण्याचे शैक्षणिक वातावरण मंतरलेले होते. आणि घाटपांड्यांनीही अगदी टिळक-आगरकरांच्या जोडपावलांवर जणू पाऊल टाकून आरंभ केला तो शाळाशिक्षक म्हणून. याचे हेही कारण होते, की प्राध्यापकाची नोकरी तेव्हा आताइतकी सुलभ नव्हती. उभ्या-आडव्या महाराष्ट्रात जेवढी कॉलेजे होती, तेवढी आज एकेका जिल्ह्यात आढळतील व घाटपांड्यांनी दूरदर्शीपणे अशी शाळा निवडली, की जिच्या संस्थेची कॉलेजेही होती. असो. त्या व्यावसायिक

बालवयातही त्यांना उमगले, की शाळेच्या कामाहून संस्थेचे उद्योग महत्त्वाचे. त्या उद्योगांची रहस्ये त्यांनी पाहता पाहता आत्मसात केली आणि त्यांचा यथोचित वापर करून आपल्याच संस्थेच्या एका कॉलेजात लौकरच प्रवेश करून घेतला.

—आणि घाटपाड्यांच्या कर्तृत्वाला विशाल क्षेत्र मिळाले. संस्थेचे ते आजीव सभासद होते हे काय सांगायला हवे ? म्हणजे अधिकारपदे आली; कारभाराची सूत्रे हाती आली. हे सगळे अर्थात एकदम घडले नाही. पायरीपायरीने—पण पाऊल कधी मागे पडले नाही; आणि पुढे पडत गेले तेही झपाट्याने. कारभार पाहिला तो लाखांच्या व्यवहारापासून दैनंदिन किडुकमिडुकापर्यंत. त्यामुळे त्याच्या नाड्या हाती आल्या आणि वचक वाढला. शिक्षक-प्राध्यापकांच्या नेमणुका, बढत्या, बदल्या यांचे सव्यापसव्य म्हणजे हातचा मळ झाला. असो. यथाकाळ घाटपांडे आपल्या कॉलेजचे प्राचार्य झाले. यथाकाळ हे केवळ सवयीने म्हटले; ते अक्षरशः घ्यायचे नाही. ज्येष्ठता, शैक्षणिक लायकी यांबाबतच्या कंटाळी पायऱ्या ठोकरून देऊन—नव्हे, त्या न ठोकरता एका टांगेत दोनदोन, तीनतीन, अशा ओलांडून काळाचा खूपच संक्षेप केला. नाहीतर, पटवर्धन त्यांना अनेक वर्षांनी वडील—वयाने आणि प्राध्यापक म्हणूनही. तसेच डोंगरे, सोमण व आणखी कितीतरी. विद्वत्ता किंवा अध्यापनकौशल्य म्हणाल, तर डॉ० केतकर किंवा गडकरी यांची त्यांतील ख्याती अशी, की परगावचेच नव्हेत, तर परप्रांतांतील विद्यार्थीही त्यांच्या नावामुळे कॉलेजकडे ओढले जात. पुन्हा ते ज्येष्ठतेतही उणे नव्हते. पण घाटपांड्यांचे बळ होते कारभारात; पैसा आणि इमारती उभारण्यात; अंतर्गत शिस्त लावण्यात, आणि बाहेरचे संबंध सांभाळण्यात. शेवटी संस्था काय, चालवायची असते, वाढवायची असते. ती तंत्रे काही वयाने किंवा पुस्तकी विद्वत्तेने येत नाहीत. घाटपांड्यांत ती उपजतच आली असावीत असे वाटण्याइतक्या सहजपणे आणि सराईतपणे त्यांनी ती वापरली, आणि आपल्या कारकिर्दीत कॉलेजचे आणि संस्थेचे भले केले. त्या वर्षांचे त्यांचे अहवालच पहा की.

घाटपांड्यांची कर्तबगारी अशी त्यांच्या संस्थेच्या आणि कॉलेजच्या अंगी लागली, तशी त्यांच्या स्वतःच्या अंगी थोडीशी तरी न लागती तरच नवल. त्या काळात का होईना, पण शेसव्वाशे इतकाच पगार असे. तो हाती मात्र पडे. नवख्या, इतकेच काय, कित्येक गरजू अथवा अदमुऱ्या अनुभवी प्राध्यापकांप्रमाणे, तेवढ्या रकमेला सही देऊन पाचपन्नास कमी घेण्याची पाळी त्यांच्यावर कधी आली नाही. अर्थात तशी सही द्यावी लागे ती सरकारी नियम व अनुदान आणि संस्थेचे हित व हिशेब सांभाळण्यासाठी !

आणि स्वतःची प्रतिष्ठाही. असो. पण तसे न करताही घाटपांड्यांनी ते सर्व छान सांभाळले खरे. शिवाय, तसल्या स्वार्थत्यागी वेतनातही त्यांनी आपल्या संसाराचा सदैव वाढता गाडा सुखाने चालवला; कोठे वंगण कमी पडू दिले नाही. स्वतःचा टुमदार बंगला उभा केला. यावरून, घाटपांड्यांनी फार मोठ्या प्रमाणावर, आणि साक्षात, भ्रष्टाचार चालवले होते असा कोणी तर्क बांधला, तर तो फारसा बरोबर ठरणार नाही. प्राध्यापकाच्या व्यवसायात द्रव्यसंपादनाचे अन्य, एकंदरीने शिष्टमान्य असे, मार्ग आहेतच. त्यांचा घाटपांड्यांनी यथाशक्ती उपयोग करून घेतला.

त्यांतील राजमार्ग म्हणजे परीक्षकी. परीक्षा हा आपल्या शिक्षणाचा मध्यबिंदू. त्या भरवणे आणि त्यांचे निकाल जाहीर करणे हे विद्यापीठे आणि त्यासारख्या संस्थांचे प्रधान कर्तव्य. आनुषंगिक कर्तव्ये म्हणजे अभ्यासक्रमात बदल करीत राहणे, पाठ्यपुस्तके, प्राध्यापक आणि परीक्षक नेमणे. आणि या नेमणुकी व तत्सम कार्ये करणाऱ्या समित्यांची नेमणूक करणे. थोडक्यात, आपल्या विद्यापीठांच्या उद्योगाचे सारसर्वस्व 'नेमणूक' या एका शब्दात आहे. पुन्हा प्रत्येक वेळी, शक्यतोवर ती लोकशाही म्हणतात त्या पद्धतीने करायची असते. त्याचेही शास्त्र आहे. घाटपांड्यांनी आपल्या संस्थेच्या अनुभवाने त्यात पारंगतता मिळवली होतीच. तेव्हा याही क्षेत्रात त्यांनी यश मिळवले, ते पाहता पाहता एकामागून एका अंगावर पकड बसवीत.

अर्थात त्यांनाही आरंभ करावा लागला, तो एका खालच्या परीक्षेला साधा परीक्षक म्हणून; पण परीक्षांच्या व परीक्षकीच्या वरच्या श्रेणी द्रुतगतीने त्यांच्यापर्यंत आल्या. या देशात स्वातंत्र्य मिळताच सैरावैरा विकास होऊ लागला; विद्येनेच काय पाप केले होते ? तीही बघता बघता फुगू लागली. म्हणजेच, विद्यापीठे वाढली, कॉलेजे वाढली, विद्यार्थी वाढले, प्राध्यापक वाढले, इतकेच नव्हे तर, खास अभ्यासाचे पोट-विषयही वाढले, म्हणून परीक्षा वाढल्या—म्हणून परीक्षक. असे हे सुष्टचक्र सुरू झाले. या पर्वणीत आपले कल्याण करून न घेईल तो हतभागी. आपले घाटपांडे अर्थातच त्या कोटीतील नव्हेत. ते या विद्याविकासाला उत्साहाने सामोरे गेले. परीक्षकीला त्यांनी कधी नाही म्हटले नाही. आपले विद्यापीठ तर होतेच; पण इतर विद्यापीठांचेही मन मोडता येईना. त्यात अर्थातच 'एकमेकां साह्य करूं'ची सहकार्यवृत्ती होती; कोणी कुत्सितपणे म्हणत तसे त्यात केवळ 'साटेलोटे' नव्हते. परिणामी, 'किती घेशिल दो करांनी' असे होऊ लागले; पण ते हटले नाहीत.

खास अभ्यासाचे पोट-विषय वाढल्याचे वर म्हटलेच आहे. घाटपांड्यांच्या भाषेत, "ज्ञानवृक्षाला नवनवीन शाखा फुटत आहेत; नवकिसलयांनी फुलत आहेत"; आणि असे त्यांचे वक्तृत्व एकदा फुलू लागले, की बोधिवृक्ष काय आणि अश्वत्थवृक्ष काय ('ऊर्ध्वमूलमधःशाखं' वगैरे), आणि आधारवड काय, उपमा-उत्प्रेक्षांचा सडा पडू लागे. असो. पण येथे ज्ञानाच्या प्रत्येक फांदीला डहाळ्याच डहाळ्या फुटत होत्या; आणि दर एक डहाळीला तज्ज्ञांचे मोहोळ लटकलेले होते. खुद्द घाटपांड्यांचा विषय इतिहास, त्याचेच पाहा. अभ्यासाच्या क्षेत्राची लांबी-रुंदी आणि अभ्यासाची खोली यांचे प्रमाण व्यस्त असते, या तत्त्वाच्या आधारावर त्या क्षेत्राचा अधिकाधिक संकोच करण्याकडे कल होता. इतिहासाचे कालशः खंड पडलेच; शतकवार तज्ज्ञ तयार होऊ लागले. पण भारताप्रमाणे महाराष्ट्राची शकले पाडून शकलवार तज्ज्ञांची सोय करण्यात आली. कोकणचा इतिहास, विदर्भाचा (नागपूर सोडून) इतिहास, हे विषयसुद्धा केवळ दोन प्रश्नपत्रिकांच्या मानाने अस्ताव्यस्त वाटू लागले; मग जिल्ह्यांच्या इतिहासाला एम० ए०च्या विषयाची प्रतिष्ठा येऊ लागली. अर्थात खास करून मोठा इतिहास असणाऱ्या, अथवा घडविणाऱ्या, जिल्ह्यांच्या! उदाहरणार्थ, सातारा किंवा यवतमाळ. साताऱ्याच्या दोन पेपरांपैकी एक सबंध पेपर तर फक्त कऱ्हाडवर; आणि यवतमाळपैकी एक पुसदवर. असे ज्ञानाचे इंटेन्सिव्ह कल्टिव्हेशन (हा घाटपांड्यांचा आवडता शब्दप्रयोग) तालुक्यापर्यंत पोचवण्यात, आणि अगदी अद्ययावत करण्यात घाटपांड्यांचा मोठा हात होता असे ऐकिवात आहे.

आता तज्ज्ञतेचे विषय वाढले, तेव्हा तज्ज्ञांची संख्याही वाढणे आवश्यकच होते —निदान विद्यापीठांतून. स्वतः घाटपांडेच अशा अनेक, किंवा वेळ पडेल त्याप्रमाणे कोणत्याही, पोट-विषयात तज्ज्ञ म्हणून विद्यापीठांच्या फार उपयोगी पडत, ते काही नेहमीच त्यांच्या स्थानमाहात्म्यामुळे नसे हे म्हटले पाहिजे. त्यांपैकी कित्येक विषयांवर थोडेफार संशोधनात्मक लिखाण त्यांच्या नावाने प्रसिद्ध झाल्याचे जाणत्यांना आठवत असेलच. अशा रीतीने घाटपांडे प्रत्येक परीक्षा-सत्रात पंधरावीस ठिकाणी तरी परीक्षक असत; काही हजार पेपर तपासून देत. (त्यांची पत्नी आदरमिश्रित विनोदाने त्याला "ह्यांचे पेपर भाजून काढणे" म्हणायची!) पुन्हा पेपर काढण्यासाठी, तारखा जमवून, आज येथे, उद्या तेथे, असे त्यांना अवतरावे लागे; प्रवासातच प्रश्न काढण्याइतका वेळ मिळे. आपल्या या क्षेत्रातील दीर्घ अनुभवाला विद्यापीठ आणि विद्यार्थी मुकू नयेत म्हणून आपणच पूर्वी काढलेल्या पेपरांतील प्रश्न ते पुन्हा घालत. अनेकदा, मोठ्या मनाने, इतरांचेही. कधी तेवढाही वेळ अथवा स्वास्थ्य नसल्यास, आपल्या कॉलेजातील

हाताखालच्या अध्यापकांवर ते काम सोपवीत—काहीसे हक्काने. एकदा तर म्हणे इतकी धांदल झाली, की गाडीतल्या एका सहप्रवाशाकडूनच त्यांनी एक पेपर काढून घेतला. ते खरे असेलच असे नाही. पण घाटपांड्यांनी पेपर काढून आणले नाहीत, किंवा नीट काढले नाहीत, तरी त्यांचे सहकारी ते काम स्वतः करीत—इतका दरारा म्हणा किंवा दबदबा म्हणा, त्यांनी मिळवला होता.

हजारांनी पेपर तपासायचे, तेव्हा त्यातही घाटपांडे इतरांचे सहकार्य घेत. ते घ्यावेच लागे. त्या इतरांत अनेकदा कुटुंबीयही असत. एखाद्या परीक्षेला 'मॉडरेटर' असले, तर हाताखालच्या परीक्षकांवर संपूर्ण विश्वास टाकून सह्या करून मोकळे होत. "विश्वास टाकला की माणूस उत्तम काम करतो; अविश्वास दाखवला की त्याचं काम बिघडतं", असे सूत्ररूपाने ते आपले समर्थन करीत त्यात अगदीच तथ्य नाही असे कोण म्हणेल ?

घाटपांड्यांच्या चरित्रातील हा विद्यापीठ-अध्याय पूर्ण व्हायला आणखी दोनतीन लीलांचा तरी उल्लेख आवश्यक आहे. परीक्षकांच्या नेमणुकी हा त्यांचा हातखंडा खेळ होता, वर्षानुवर्षे होता. आपल्या कॉलेजात नवीन प्राध्यापक नेमताना, त्याने वेतनाबद्दल खळखळ केली, तर घाटपांडे त्याला समजावून सांगत—"हे पाहा, पगार एवढाच; पण तुम्हांला निदान दोन तरी परीक्षांची कामं देईन. शिवाय, परीक्षांची दोन सुपरविजन्स. म्हणजे किती झाले एकंदर ?" अर्थातच, नकोशा झालेल्या माणसाला परीक्षकी मिळू नये याचीही ते व्यवस्था करू शकत. हे त्या माणसाच्या गुणावगुणांवर अवलंबून असे हे सांगायला हवे ? तसेच पुस्तके नेमण्याबाबत. आपल्याच विषयातील नव्हे, तर अन्य विषयांतीलही आपल्याला हवी ती पुस्तके ते हस्तेपरहस्ते नेमून घेत. मराठीचे वाचन नसले, तरी ती मातृभाषा. तो अधिकारही ते गाजवू पाहत. मग पुरेसा परिचय नसल्यामुळे कधी गफलत होई. एका देशपांड्यांची पुस्तके दुसऱ्यांच्या नावावर, एका कुळकर्ण्यांची दुसऱ्यांच्या, असे झाले तर त्याला या देशपांडे-कुळकर्ण्यांची मराठी साहित्यातील गर्दी हेही एक कारण म्हटले पाहिजे. अर्थात घाटपांड्यांना यादीत हवे असत ते काही प्रकाशक. चांगला प्रकाशक चांगलीच पुस्तके प्रकाशित करणार हे त्यांचे याबाबतचे सुटसुटीत सूत्र होते. आणि कधी खासगी बैठकीत मोकळेपणाने ते सांगतही—"अहो, तुमच्या या आधुनिक साहित्यात आहे काय ? एक पुस्तक नाही तर दुसरे. सगळेच तकलुपी आणि थिल्लर. आमचे ते ज्ञानेश्वर, रामदास, वामनपंडित यांचं निराळं !" अर्थात ते प्राचीन श्रेष्ठही त्यांनी वाचलेले नव्हते; तेवढा वेळ तरी कोठे होता ? पण त्यांच्याविषयी घाटपांड्यांना मोठा आदर असे. असो. या

मर्जीतल्या प्रकाशकांकडून त्यांना सरळ टक्केवारी मिळत असे, यावर मात्र माझा मुळीच विश्वास नाही. असा सरळ अनाचार करणे हे घाटपांड्यांच्या वृत्तीत बसत नसे. ते प्रकाशक घाटपांड्यांची, अथवा त्यांच्या शिफारशीची, पुस्तके प्रसिद्ध करीत, हा फारच दूरान्वयाचा संबंध झाला. त्या प्रकाशकाकडून त्यांना भेटीदाखल मोठमोठी पुस्तके मिळत म्हणे. हा कसला आरोप? एक तर तुमच्या स्थानामुळे, किंवा विद्वत्तेमुळे, पुस्तके दिली जातातही; आणि दुसरे म्हणजे अशी पुस्तके घेतली याला पुरावा काय?

यावर एका संशयखोराचे टिपण : "पुरावा नाहीच; कारण ती पुस्तके घाटपांड्यांच्या घरी आढळणार नाहीत. त्यांच्याकडे फारशी पुस्तके नसतातच. भेटीदाखल आलेली पुस्तके आपल्याच कॉलेजच्या ग्रंथालयाला देण्याचा त्यांचा प्रघात आहे— पुस्तकविक्रेत्यांहून थोडा अधिक वटाव देऊन—किंवा पुस्तकविक्रेत्यांनाच विकण्याचा." खरेखोटे कोण जाणे! पण "उगाच पुस्तकांची साठेबाजी करून व्यासंगाचा देखावा करणं मला आवडत नाही," असे खुद्द घाटपांडे मला एकदा म्हणाले होते. अधिकाधिक विद्यापीठांच्या—व अन्य संस्थांच्याही—अधिकाधिक समित्या व पोटसमित्यांवर जागा मिळवण्याची घाटपांडे सदैव खटपट करीत असत हा त्यांच्याबद्दलचा प्रवादही सैल असावा. अशा संस्थांच्या कारभारात शिस्त आणणे, त्याला योग्य वळण लावणे, यासाठी आपल्या दीर्घ आणि विविध अनुभवांचा व कर्तृत्वाचा त्यांना फायदा देणे हा हेतू त्यात आहे असे का म्हणू नये? तसा फायदा त्या संस्थांना मिळाल्याचे अनेकांनी वेळोवेळी म्हटले आहे, ते नेहमीच उपचार म्हणून नसावे.

(पुन्हा तोच संशयखोर : "त्या संस्थांना आणि समित्यांना काय फायदा मिळाला असेल तो असो. पण घाटपांड्यांना यथेच्छ मिळाला, आणि तो रोकड. जास्तीत जास्त भत्ते कसे मिळतील या हिशेबाने सभांच्या तारखा ठरवून घेण्याचा त्यांचा अनुभव दीर्घ होता." आता हे भत्त्यांचे तंत्र सभाशास्त्राचाच एक भाग झाला असल्याकारणाने बिचाऱ्या घाटपांड्यांना कसा दोष लावायचा? आणि त्याचा फायदा आपल्यासारखा इतर काही सभासदांना ते करवून देत हे कबूल केलेच पाहिजे.)

असो. अशा रीतीने घाटपांड्यांच्या विद्यापीठातील कामगिरीमुळे, कॉलेजसाठी त्यांनी जो स्वार्थत्याग केला त्याची पुरी झळ लागण्यापासून ते थोडे बचावले. पुढे ते कॉलेज सुटले, स्वार्थत्यागाची आवश्यकता संपली, पण विद्यापीठांतून येणारा ओघ काही आटला नाही.

ते कॉलेज सुटले ते मतभेदांमुळे. संस्था, त्यातून महाराष्ट्रातील, म्हणजे ते आलेच. मतभेद थोडेसे मुरल्यावर कडवट होणारच. मग आरोप, प्रत्यारोप, राजिनामे, ही संस्कारमालिका आलीच. आपल्या अमदानीत विद्यार्थ्यांच्या संख्येत मोठीच वाढ झाली, म्हणून अध्यापकांच्या, म्हणजे विद्यापीठातील निवडणुकींसाठी हाती आलेल्या मतांच्या, संख्येत; तसेच इमारती फोफावल्या, गंगाजळीं फुगली—असे असताही हे व्हावे? 'हें फल काय मम तपाला?' अशी हुतात्म्याची मुद्रा लेऊन घाटपांडे बाहेर पडले. ते सर्वच खोटे होते असे नव्हे. पण व्यवहारचतुर माणूस. निवृत्तिवेतन मिळण्यासाठी लागणारी किमान सेवा झाल्यानंतरच, आणि पुढच्या सेवेची व्यवस्था झाल्यानंतरच, त्यांनी बाणेदारपणे राजिनामा दिला.

आता अनुभवाच्या जोडीला दुखावलेला स्वाभिमान आपले बळ घेऊन आला. लाथ मारीन तेथे संस्था काढीन अशी धमक आली. नव्या संस्था काढल्या, त्या रंगारूपाला आणल्या; जुन्या संस्थांत प्रवेश केला, त्या काबीज केल्या. पण एकीच्याही पाशात अडकले नाहीत. संस्था निरनिराळ्या, तशा त्या हाकण्याचे तंत्रही प्रत्येकीच्या परिस्थित्यनुरूप वेगवेगळे. शहरी संस्थेचे ग्रामीण संस्थेला कसे चालेल? मध्यमवर्गीय, सुशिक्षित, उच्चजातीय, सहसा सेवानिवृत्त—म्हणजे थकलेल्या—संचालकाच्या मंडळाशी मुकाबला करताना यशस्वी ठरलेले धोरण, उच्चजातीय सुशिक्षितांवर सकारण अविश्वास असणाऱ्या, नवश्रीमंत, कमीअधिक जवान संचालकांबाबत कसे कामी येईल? ग्रामीण भागात आबादीआबाद झाली आहे; ती ज्यांच्या घामामुळे आणि चलाखीमुळे, त्यांनी 'शहाणे करून सोडावे इतरजन' या किंवा यासारख्या हेतूने कॉलेजे काढलेली असतात. त्यांचे मन कसे मोडायचे? ते या क्षेत्रात नवखे, तेव्हा त्याना थोडे चुचकारून घेतले पाहिजे; आपल्या तत्त्वांना मुरड घालायला हवी; हे घाटपांड्यांनी ठीक जाणले. एखाद्या मळेवाल्याला वा कारखानदाराला वा व्यापाऱ्याला आपल्या कॉलेजातील शिक्षक हे आश्रितांसारखे वाटले तर तो त्याच्या अननुभवाचा किंवा त्याच्या स्वतःच्या क्षेत्रातील अनुभवाचा दोष आहे, आणि तसे वाटणे सर्वस्वी चुकीचे नाही, हे घाटपांडे आपल्या शिक्षकवर्गाला समजावून देत. ज्या नाठाळांनी ते समजून घेण्याचे नाकारले त्यांची वाट ते मोकळी करीत. असे त्यांनी संचालक सांभाळले. त्यांच्यात्यांच्यात, अथवा गावात, गटबाजी असली तर शक्यतो सर्वांना सांभाळले—नाहीतर, निदान ज्यांचा पक्ष न्यायाचा व प्रबळ होता त्यांना!

'सांभाळणे' हा घाटपांड्यांच्या यशामागील विशेष गुणांपैकी एक असावा. 'सांभाळून

घेणे ' हा मात्र नसावा. म्हणजे जेथे त्याची काहीच आवश्यकता नसेल तेथे त्या गुणाची लुडबूड त्यांनी चालू दिली नाही. अर्थात सांभाळून घ्यावे लागते कनिष्ठाला. पण त्याला सांभाळून घेणे म्हणजे बेशिस्तपणाला, स्वैर विचाराला, उत्तेजन देण्यासारखे होते अशी घाटपांड्यांची धारणा होती. त्यामुळे प्राचार्य म्हणून ते प्राध्यापकांना नेहमीच जरबेत ठेवत—मग बिचाऱ्या कारकुनांचे काय ? सांभाळावे लागते वरिष्ठाला—मग तो संस्थेतील असो, किंवा बाहेरचा—अधिकार, दौलत यांनी वरिष्ठ झालेला. त्याच्या संबंधितालाही —मग तो तांत्रिक दृष्टीने तुमचा कनिष्ठ असला तरी. असे म्हणतात, की घाटपांड्यांनी प्राचार्य म्हणून अशा 'संबंधित' विद्यार्थ्यांना, तशा एखाद्या प्राध्यापकालाही, उत्तम सांभाळले. एरव्ही ते कणखर राहिले. ही तारेवरची कसरत. येरा गबाळाचे काम नाही.

त्या सभेत घाटपांड्यांच्या विद्वत्तेचीही वारेमाप स्तुती झाली. एवढ्या ज्येष्ठ-श्रेष्ठ प्राध्यापकाची त्याबाबत झाली नसती तरच चमत्कारिक वाटले असते. लेखन, संशोधन, याहून विद्वत्तेचे दुसरे उघड पुरावे कोणते ? त्यांच्यावरून वाचनही गृहीत धरता येते. घाटपांड्यांच्या नावावर दहाबारा पुस्तके तरी आहेत, त्यांतील बहुतेक त्यांच्या विषयावरील, म्हणजे इतिहासावरील. समाजोद्धारक विषयांवरील लेखांचे व भाषणांचे एकदोन संग्रह आहेत. त्यांची इतिहासावरील पुस्तके त्या विषयाच्या विविध शाखांवर आहेत; आणि त्या त्या शाखेतील अभ्यासक्रमाला घट्ट धरून केवळ विद्यार्थ्यांच्या हितासाठी लिहिलेली आहेत. विद्यापीठातील परीक्षक पेपर काढताना त्यांच्याबाहेर जाऊच शकत नाहीत, कित्येकदा त्यांतील नेमकी वाक्ये उचलूनच प्रश्न काढतात, असा त्या पुस्तकांचा गवगवा आहे. इतकी गुणकारी पुस्तके, तेव्हा त्यांना बाजार उत्तम मिळत आला आहे, त्यांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघाल्या, हे काय सांगायला हवे ? आरंभीच्या काळात घाटपांडे आपल्या विद्यार्थ्यांना ती घ्यायला लावत असे म्हणतात. पुढे विद्यार्थी आपसूकच ती घेऊ लागले; त्यांना आपले हित-अहित कळतेच. घाटपांड्यांचा व्यवसायात उत्तम जम बसला आणि गोतावळा वाढला, तशी इतर अनेक कॉलेजांतून ती पुस्तके घाऊक उठू लागली. या उद्योगात थोडा देवघेवीचा भाग होता अशी पुष्कळांना कुशंका येई. अकारण वैरी म्हणतात, "ही पुस्तके म्हणजे केवळ परीक्षेची 'गाइडस्'; प्रश्नोत्तररूपात नाहीत इतकेच. मग भले प्रतिष्ठित नाव दिलेले असो. आणि तीही इतर चार पुस्तकांतून तुकडे उचलून तयार केलेली." टीकेला आणखी एक आधार म्हणजे त्यांच्या काही पुस्तकांवर सह-लेखक म्हणून इतर काही प्राध्यापकांची नावे असतात, ती प्रदेश, जातपात इत्यादी बाबी लक्षात घेऊन प्रकाशक शोभेसाठी (आणि खपासाठी) घालतात. कधीकधी तर आवृत्तीप्रमाणे ती

बदलतातही! पण, कोणी म्हणतात, की खुद्द घाटपांड्यांचेच नाव शोभेसाठी असते. आपल्याला कसे कळणार? इतके खरे की, इतर एवढे उद्योग करून इतकी पुस्तके प्रसिद्ध करणे—म्हणजे लिहिणे—हे काही सोपे नाही.

आणि कोणी काही म्हटले तरी या पुस्तकांत तसे थोडेफार संशोधन आहेच. वीसपंचवीस पुस्तकांतून गोळा केलेले ते संशोधन, आणि चारपाच पुस्तकांचे मंथन करून मिळवलेले आणि वाचकांना विनासायास ग्रहण करता येईल, आणि उपयोगी पडेल अशा रीतीने मांडलेले, ते मात्र पोटभरू लेखन! हा या क्षेत्रातील "उच्चपणाचा टेंभा (snobbery)" आहे. घाटपांड्यांच्या काही अभिमान्यांचे हे म्हणणे विचार करण्यासारखे आहे. आणि अगदी तांत्रिक अर्थाने संशोधन म्हणता येईल ते घाटपांड्यांकडून मुळीच झालेले नाही असे नाही. तसले काही संशोधनपर निबंध जोडनावाने प्रसिद्ध झाले आहेत.

—म्हणजे घाटपांड्यांच्या मार्गदर्शनाखाली ते संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावासह. कुत्सितांनी याचेही भांडवल करायला सोडलेले नाही! पण जो नेमका मार्ग दाखवतो त्याचे ते संशोधनच असते, नाही का? पुढे तपशील भरण्याचे, तो ठाकठीक मांडण्याचे काम विद्यार्थ्यांचे. आणि आपल्या विद्यापीठांतून मार्गदर्शकाला संशोधन-निबंधाचे श्रेय मिळण्याची प्रथा जुनीच आहे.

त्याशिवाय, दरवर्षी नेमाने भरणारी अखिल भारतीय इतिहास परिषद, आणि इतिहासाच्या विभागीय परिषदा. त्यांत घाटपांड्यांचे निबंध सादर केल्याचे त्या परिषदांच्या अहवालांत नमूद आहे, त्यांचे गोषवारेही काही संग्रहांत आढळतात. आता अशा परिषदा, त्यांत वाचले जाणारे (किंवा न जाणारे) निबंध, यांविषयी कुशंका चिवडीत बसणारे लोक आहेतच. पण अशांना कोण बुझावू शकणार?

प्राध्यापकाबाबत विद्वत्तेचे आणखी एक रूप म्हणजे त्याचे अध्यापन. मी घाटपांड्यांचा विद्यार्थी होतोच, तेव्हा ते काहीसे नव्या दमाचे प्राध्यापक होते; त्यांचे इतर व्याप अजून अचाट वाढलेले नव्हते. तरी थोडे होतेच—तेव्हा कित्येकदा त्यांना वर्ग चुकवावा लागे; कित्येकदा मीच चुकवत असे. पण ते बऱ्यापैकी शिकवत. त्याच नोट्सवरून ते दरवर्षी शिकवत असे नापास झालेले विद्यार्थी अनुभवावरून सांगत. पण बहुतेक प्राध्यापक तेच करीत असत. घाटपांड्यांचा भर व्याख्यान देण्यापेक्षा नोट्स्

देण्यावर असे. कॉलेजचीच परीक्षा असली, की त्या नोटस्वर सहज गुजारा होई; म्हणून ते एकंदरीने लोकप्रिय होते. त्या काळी ते खासगी शिकवण्या करीत; त्या विद्यार्थ्यांना तर कॉलेजची परीक्षा फारच सोपी जाई, अशी शिकवण्याची हातोटी असे. अलिकडच्या काळाबद्दल मात्र असे ऐकिवात आहे, की अगोदर प्राचार्य म्हणून घाटपांड्यांना शिकवण्याचे कामच कमी असे; पण तेही इतर कामांमुळे त्यांना फारसे करता येत नसे—तीव्र इच्छा असूनही. केलेच तरी कसेबसे उरकीत. आपल्या जुन्या नोटस् पाहण्याइतकीही फुरसत नसल्यामुळे कशी तरी वेळ मारून न्यावी लागे. पण विद्यार्थ्यांनी (अपवाद सोडता) तक्रार केली नाही हे मुद्दाम लिहिले पाहिजे. इतका त्यांच्याविषयी आदर होता—आणि दरारा.

घाटपांड्यांचा व्यवसाय विद्यादानाचा असला तरी त्यांचे कर्तृत्व त्या क्षेत्रापुरते मर्यादित नाही. सामाजिक व सांस्कृतिक या व्यापक नावांखाली होणाऱ्या तऱ्हेतऱ्हेच्या चळवळींशी त्यांनी संबंध ठेवले. वैश्विक एकतेसाठी कार्य करणाऱ्या संस्थेपासून ते देशस्थ ऋग्वेदी ब्राम्हणांच्या संमेलनापर्यंत सर्व ठिकाणी ते पुढारीपणाने वावरत; शास्त्रीय परिषद, बुद्धिवादी संघ, याप्रमाणेच अध्यात्माला वाहिलेल्या संस्था-संस्थाने, यांचे ते अध्यक्ष-उपाध्यक्ष वगैरे काहीतरी असत. साहित्य, संगीत, चित्रकला, इत्यादींचेही त्यांना वावडे नाही—म्हणजे त्याविषयीच्या संस्थांचे! अशा विविधांगी व्यासंगाच्या आणि रसिकतेच्या, आणि एकंदर कर्तबगारीच्या, पुण्याईवर घाटपांड्यांना तीनदा की चारदा परदेशयात्रा घडल्या. त्याही निरनिराळ्या दिशांना तोंड असणाऱ्या देशांच्या. त्या त्या देशांच्या वकिलातींशी, त्यांनी उघड किंवा आडून चालविलेल्या संस्थांशी, त्यांनी गोडीचे संबंध ठेवले आहेत. त्यांतून मिळतेही पुष्कळ. शब्दांवर खेळ करण्याचा पोरकट छंद असलेला माझा एक मित्र म्हणतो त्याप्रमाणे—द्रवापासून द्रव्यापर्यंत. आपल्याही 'ऑल इंडिया' या दोन शब्दांनी ज्यांचे नाव सुरू होते अशा अगणित संस्था आहेत (म्हणून त्या सहसा दिल्लीत असतात!). त्यांनाही सेमिनार, सिंपोझिअम, स्टडी-ग्रूप यांसारखे लहानमोठे मेळावे भरवावे लागतात. त्यांतील कित्येकांत, कित्येकदा तर बादरायणसंबंधाने, घाटपांडे मौजूद असत—पण कधी आमंत्रणाविना नाही. अशा सर्व ठिकाणी—देशीपरदेशी—ते प्रसंगानुरूप अगदी चपखल भाषणे करीत. गायक जसा मैफिलीत सहसा त्याच चिजा पेश करतो, त्याप्रमाणे घाटपांडे आपली काही नीट बसलेली भाषणे अशा ठिकाणी पुन्हापुन्हा करून दाखवतात—फार तर, जरा 'पदे फिरवून', किंवा थोडा नैमित्तिक विनोद टाकून. इतक्यांदा बोलायचे, तेव्हा प्रत्येक वेळी नवा माल तरी कोठून आणायचा? गायकाच्या उपमेवरून आठवले, घाटपांड्यांना गाण्याची कधीच

आवड नव्हती; म्हणजे समजही नाही. सांस्कृतिक उपचार म्हणून कोठे गाण्याच्या बैठकीला मारूनमुटकून बसावेच लागले, तर लौकरच डुलक्या येऊ लागत—त्यापरती गाण्याला दाद नाही! पण संगीतावरील तात्त्विक चर्चेत भाग घेण्यास त्यांनी नाही म्हटले नाही. भारतीय संगीत आणि पाश्चात्य संगीत, मेलडी आणि हार्मनी, असल्या विषयांवर ते थोडेसे, आणि थोड्या मोकळेपणेच, बोलतही. अमेरिकेत तर म्हणे त्यावर त्यांनी व्याख्यानेही दिली—आणि ती श्रोत्यांच्या पसंतीस उतरली. या यशात वक्तृत्वाचाही भाग असणारच.

शेवटी घाटपांडे कुलगुरू झाले. 'शेवटी' अशासाठी म्हटले, की ते कुलगुरू होणार, झालेच, अशा बातम्या गेली चारपाच वर्षे तरी मधूनमधून उठत; छापूनसुद्धा येत. खरे म्हणजे त्यांच्याच नव्हे, आमच्याही अपेक्षेप्रमाणे, जरा विलंबच झाला. मध्ये मंत्रिमंडळात उगाच उलथापालथ झाली नसती तर, तर ते केव्हाच त्या पदावर चढले असते. सचिवालयात त्यांचे अलीकडे वरेच वळण असे. मंत्री, उच्च अधिकारी, मंत्रिमंडळाबाहेरील वजनदार राजकारणी, यांच्याशी त्यांनी जवळीक बांधली होती. वृत्तपत्रांशी—मुख्य संपादकापासून ते बच्चा वातमीदारापर्यंत—सलोख्याचे संबंध ठेवले होते, आहेत, आणि ठेवावे लागणारच; अजून त्यांना पुष्कळच पुढे जायचे आहे. त्यासाठी आपुलकीची बेगमी करून ठेवायला हवी.

आता कुलगुरू म्हणून घाटपांडे किती यश मिळवतात याकडे सर्वांचे लक्ष आहे —मित्रांचे, शत्रूंचे, तटस्थांचे. पण यश मिळविण्याची त्यांना सवय जडल्यासारखी झाली आहे. आजवर अनेकदा कठीण परिस्थितीत, कट्टर वैऱ्यांना तोंड देत, त्यांनी ते मिळवले. हे नवे आव्हान त्या मानाने सोपे आहे. विद्यापीठ हे त्यांचे खास क्षेत्र; त्यात ते तीसपस्तीस वर्षे खेळलेले आहेत. त्यात लागणारे सर्वच डावपेच त्यांच्या अंगात मुरलेले आहेत. त्यांना यश चुकणार नाही—किंवा यशाला ते चुकणार नाहीत.

प्राध्यापक घाटपांडे आणखी एकदा यशस्वी होवोत अशी, त्यांचा एक विद्यार्थी म्हणून, जो कोणी नियंता असेल त्याच्यापाशी मी प्रार्थना करतो.

# मुंबई ग नगरी

या मुंबईइतकी कीर्ती आणि दुष्कीर्ती फार थोड्या शहरांच्या नशिबी आली असेल. कोणीही उठावे आणि तिच्याबद्दल वाकडे बोलावे; पण जो तो तिच्यासाठी हपापलेला! दूरच्या भावड्यांना मुंबईची खरीखोटी वर्णने ऐकून-वाचून आणि तिच्या निवडक स्थळांची चित्रे पाहून ती स्वर्गाची संक्षिप्त आवृत्ती—पण अधिक मसालेदार—असल्याचा साक्षात्कार होतो, व 'याचि देहीं याचि डोळां' ती 'घडावी' अशी तळमळ लागते. बाहेरगावांहून मुंबईत येणाऱ्या आगगाड्यांच्या खिडक्यांशी जे विस्फारलेले डोळे आणि उघडी तोंडे दिसतात ते पाहून मला मुंबईकराला धन्य वाटते. या स्वर्गाचा मी भाडेकरी. पण मुंबईला नरकाची उपमा देणारा नीतिबाज भेटला की, नाही म्हटले तरी जरा खांदे पडतातच.

—तसे पाहिले तर ही मुंबई म्हणजे पश्चिम हिंदुस्थानच्या कुशीतले एक हाडकुळे बेट; पण त्याचे नशीब असे फळफळले की अख्ख्या हिंदुस्थानची नाडी तेथे हाती लागावी. कानामागून येऊन तिखट झाली म्हणूनही मुंबईने काही खोडांचा दुस्वास ओढवून घेतला. तिची आधुनिकता म्हणजे परंपरेचा अभाव; तिचा ताजेपणा म्हणजे पुराणपणाचा स्फूर्तिदायक आणि कुबट वास तिला नाही—असा त्यांचा खानदानी हिशेब. मुंबईला कधी वाळवी लागलीच नाही—अशी तिची सदैव हालचाल होत राहिली!
येथे तीस लाख लोक. सगळे प्रमुख धर्म त्यांत आले—शाखा-उपशाखांसह. भाषा म्हणे सदुसष्ट; त्यांतल्या काही नवलाच्या म्हणून सोडून दिल्या तरी वीसएक भाषा अशा आहेत की ज्या बोलणाऱ्यांची संख्या भरपूर. इतके वैचित्र्य मुंबईत आहे म्हणून तिला 'बकाली' असे कोण हिणवतात; 'अठरा पगड' जाती म्हणून नाक मुरडतात. आपलीच जात—किंवा पोटजात—श्रेष्ठ, तिला दुसऱ्याचा विटाळ नको, अशी या नाकांची ऐट. पुरे गाव नाही तरी निदान वस्ती अलग हवी. मुंबईतल्या 'खिचडी'त ते कसे जमणार? तसे या खिचडीतही न मिसळणारे खडे आणि गुठळ्या आहेत म्हणा!

मुंबईची गुलहौशीपणाबद्दलही बरीवाईट ख्याती चालत आली आहे. ती फॅशन्सची गंगोत्री. मुंबईतला आजचा ढंग वर्षा-दोन-वर्षांत इतर गावी पसरतो—किंवा पसरत असे असे म्हणावे; कारण आता आपले चित्रपट हे साजशृंगाराची चालतीबोलती विद्यापीठे

झाली आहेत. त्यांच्या पराक्रमाने चोळीची नवी आखुडाई अथवा बुशकोटाची ताजी ढिलाई मुंबईच्या डोळ्यात भरते त्याच 'आठवड्या'त कोल्हापूरच्या आणि बारामतीच्या हौसेलाही बेचैन करते. वाण फक्त शिंप्याची. त्याशिवाय चित्रपटांच्या जाहिराती आणि जाहिरातवजा नियतकालिके आहेतच. त्यांच्यावरून बेतता येते. अर्थात् मुंबईची चैनबाजी, शान, केवळ कपड्यांपुरती नाही; त्यात अनेक तऱ्हेची चैनबाजी येते. म्हणून 'जिवाची मुंबई' करण्याचा परस्थाला इतका सोस लागतो. ही महानगरी, मोहमयी, मस्तवाल नगरी, तिच्या नादी लागो नये असा पवित्र इशारा अनेकांनी दिला. सुंदर खेड्यातील निष्पाप माणूस मुंबईला येताच कसा बिघडतो, या सोज्वळ बोधकथेचा व्यापार कित्येकांनी केला आहे—पडद्यावर विशेष, कारण अंधारात असले बोध विशेष ठसतात! हे बिघडवण्याचे कंत्राट मुंबईने फार वर्षे सांभाळले.

—पण मुंबई जरा हाताची सैलच! छानछोकी, टापटीप, थाटमाट, तिच्या रक्तात आहेत. अर्थात हे पैशाचे खेळ आहेत. पण पैसे राखून कंगाल कळा आणण्याचे सुतकी कसब काही ठिकाणी दिसते ते तिच्यात नाही. मुंबईत दररोज दिवाळी असा तिचा सनातन लौकिक; मग विशेष उत्सवानिमित्त झडणारी रोषणाई पाहण्यासाठी लोटणारी गर्दीही पाहण्यासारखी होते. खऱ्या मुंबईकराच्या जिवाला गर्दीशिवाय करमत नाही; पण शांतपणा प्रकृतीला हितावह या तात्त्विक पाठांतराची बूज राखण्यासाठी तो सुटीच्या दिवशी नेहमीची वाहती गर्दी टाळून चौपाटीच्या अथवा जुहूच्या गर्दीच्या भोवऱ्यात घुमत राहतो. पाऊणशे-शंभर वर्षांपूर्वीच्या 'मुंबईवर्णना'तही "अबब, काय हो गर्दी!" असे चमत्काराचे उद्गार आहेत. आता लोकसंख्या काही पटींनी वाढली, वाहने तर बेसुमार वाढली—तरी उद्गार तेच आहेत. तेच इमारती, रस्ते, दुकाने इत्यादी वैभवाविषयी. अर्थात् हे उद्गार तुलनेचे. रिप व्हॅन विंकलप्रमाणे तेव्हा झोपी गेलेला आज जागा झाला तर या विश्वरूपदर्शनाच्या धक्क्याने तो कायमचा झोपी जायचा!

मुंबईचे हे वैभव जरी गेल्या शेदोनशे वर्षांतील असले तरी ती काही अगदीच कालची नाही. तिलाही इतिहास आहे—काही शतकांचा. तोही असा आहे की मागे जाता जाता पुसट होत गेला तरी निदान राजवटीची नावनिशाणी ओळखता येते. त्यामागील असा की पुराणे, काव्ये आणि व्युत्पत्तिशास्त्र यांचे पिटले. देवदेवतांचा वास दिला की ते रुचकर होते. धार्मिकांच्या मते मुंबई धर्मलंड असली, तरी श्रीरामचंद्र मलबार हिलवर सीतामाईच्या शोधार्थ (दक्षिणेकडे जाताना) गेल्याची सुरस कथा ती अभिमानाने सांगेल; आणि वाळकेश्वर रामाने स्थापिले व बाणगंगा ही त्याच्याच बाणाची करामत हा पुरावा

दाखवील. बोंबील हा मत्स्यविशेष खास मुंबईचा (कोणी मुंबई शब्दाची व्युत्पत्ती त्याच्यापर्यंत पोचवली आहे.) त्याच्या सुक्या रूपातील उग्र गंध शाकाहाऱ्यांत अन्नद्वेषाची बाधा आणतो, तर सच्च्या मत्स्याहाऱ्याची क्षुधा प्रज्वलित करतो. ताज्या अवस्थेतील त्याचा बिलबिलीतपणा मात्र कित्येक मत्स्याहाऱ्यांनाही नकोसा वाटतो. त्याला जबाबदार श्रीरामप्रभूच. कथा अशी आहे की लंकेचा सेतू बांधण्यासाठी सर्व माशांनी मदत केली; फक्त बोंबील अंगचुकार निघाला. तेव्हा क्रोध येऊन रामाने त्याला हातात धरून चुरडले आणि भिरकावून दिले—तो पडला मुंबईजवळ! असा मुंबईच्या बोंबलाला श्रीरामाचा हात (आणि वास) लागला आहे! पांडवांचे (दहा) पाय मुंबईच्या उपनगरांना लागले असावेत अशा अंदाजाला जागा आहे. प्रिन्सेस डॉकच्या खाली जंगल पुरले असल्याचा सुगावा साठ वर्षांपूर्वीच लागला. धरणीकंपांनी मुंबईला जन्म आणि तिची घडण दिली. म्हणून उद्या उद्योगी संशोधक तिचा कसला इतिहास खणून काढतील हे कोणी सांगावे? सर्वगामी श्रीकृष्णाची एखादी लीला येथे घडली असेलही!

आता थोडा इतिहास. फार प्राचीन काळी खुद्द मुंबई हिशेबात नव्हती तरी तिचा शेजार मोठा मातबर होता. सोपारा, चौल, (घारा)पुरी, कल्याण, इत्यादिकांचे नाव देशोदेशी दुमदुमत होते. हा सगळा अपरान्त प्रदेश. सम्राट अशोकाच्या आधिपत्याखाली तो होता. या मौर्य घराण्याखेरीज शातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार, या घराण्यांनी त्यावर कमीअधिक काळ सत्ता गाजवली. तेराव्या शतकात देवगिरीचे यादव येथे अवतरले. त्या कुळातील बिंबराजाने १२९४ साली माहीमला गादी स्थापली. ही खुद्द मुंबईच्या इतिहासाची निश्चित सुरवात. पाठारे प्रभू, पाचकळशी, भंडारी आणि पळशे ब्राह्मण या बिंबराजाच्या लवाजम्यात—पैठणहून—आले म्हणतात. तोपर्यंत मुंबईतील मुख्य वस्ती कोळ्यांची असे. 'मुंबई' शब्दाच्या मुळाविषयी संशोधकांत नेहमीप्रमाणे अनेक मते आहेत. त्यांपैकी एक मुंगा नामे कोळ्यात ते मूळ पाहते (मुगभाटात त्याचा फक्त अनुस्वार गहाळ झाला आहे!). असो. शतकभराने मुसलमानी अंमल आला. आणखी दोन शतकांनी—१५३४ मध्ये—पोर्तुगिजांनी येथे पाय रोवला. ते या देशात आले "मसाले आणि मेंढरें" (म्हणजे ख्रिश्चन कळपाची भरती) यांच्या शोधार्थ. पैकी व्यापार त्यांना जमला नाही. पण जबरदस्तीने त्यांनी कळप मात्र फुगवला. साष्टीत तर उच्छाद मांडला—विशेषतः जेझुइट पाद्र्यांनी. १६६१ मध्ये पोर्तुगालच्या राजकन्येचे इंग्लंडच्या राजाशी लगीन झाले तेव्हा आंदण म्हणून नवऱ्याला मुंबई मिळाली. पण वधूपक्षाने कुरबूर करून ती (म्हणजे मुंबई) नीट हाती द्यायला चार वर्षे घेतली. मात्र हा पांढरा हत्ती पोसण्यात अर्थ नाही हे जाणून तीन वर्षांत ईस्ट इंडिया कंपनीकडे राजाने ती

लावून दिली. वर्षाला १० पौंड (म्हणजे दीडशे रुपये) या भाड्याने! पुढे कंपनीने ठाणे सुरतेहून मुंबईला हलवले. या इंग्रजांच्या मराठे आणि शिद्दी यांच्याशी खटखटी झाल्या; पण ते कातडी बचावून राहिले. वेळ पाहून त्यांनी नखे बाहेर काढली...पुढचा इतिहास पोराबाळांनाही माहीत आहे.

मुंबईचा जुना भूगोल या इतिहासापेक्षाही मनोरंजक आहे. इतके विलक्षण फरक अन्यत्र क्वचितच पडले असतील. मूळची सात बेटे; त्यांतील मधले मुंबई. या बेटांमधून खाड्या होत्या. परळाहून 'मुंबई'ला होडीने जायचे; उतरल्यावर 'पायधुणी'; असे स्थळनावांचे अर्थ उलगडतात. धोबीतलावावर खरोखरच मुंबईची धुणी होत. (त्याशिवाय तेथे फाशी देणे व शिक्षेचे अन्य प्रकार लोकरंजनासाठी उघड्यावर करीत). खाजगाने दुर्गंधी सुटे; रोगराई फार. साहेब टिकेना. गावाला मुडदेघर म्हणू लागला. तेव्हा सुधारणेच्या मसलती होऊन, हळुहळू सात बेटांचे एकीकरण झाले. प्रथम वरळीला बांध घालून समुद्र रोखला. मग भरणी घातली. गाव अंगाने भरले. साष्टी घट्ट करणे ओघानेच आले. १८०३ मध्ये शीव-कुर्ला आणि १८४५ मध्ये माहीम-बांद्रा हे रस्ते होऊन मुंबई-साष्टीचा पायी व्यवहार सुरू झाला. मुंबई बेटाच्या दक्षिण भागात खरोखरीचा 'कोट' होता, आणि भोवती खंदक. त्याला तीन दरवाजे होते आणि तेथे सक्त पहारा असे. १७१६ मध्ये पुरा झालेला हा कोट १८६२–६४ मध्ये पाडून टाकला. कोट गेला, फक्त त्याचे नाव, आणि चर्चगेटसारखे एखादे, अशी भोके राहिली आहेत. बॅकबेची भरणी पंचवीस-तीस वर्षांमागची. तिचे राजकारण गाजले. मुंबईची भूक वाढतच होती. पाच वर्षांपूर्वी साष्टीतील मोठा लचका—जोगेश्वरी ते भांडूप—पचवून ती महामुंबई झाली; साष्टीचा उरलेला भागही—वसईच्या खाडीपर्यंतचा—तिच्यात सामील करावा अशी योजना आहे. गेल्या महायुद्धाने बहुतेक शहरांना सूज आणली, तशी मुंबईलाही आणली. ती नंतर उतरेल असे वाटले होते, पण तसे झाले नाही. पण मुंबईला खरी सूज चढली ती १८६४ च्या सुमारास. अमेरिकेतील यादवी युद्धामुळे इंग्लंडच्या बाजारात हिंदी कापसाला तेजी आली. आणि मुंबईचे सोने झाले. १८६९ मध्ये सुएज कालवा सुरू झाल्यावर मुंबई आणखी भरभराटली. पैसा वाढला, माणसे वाढली—म्हणून शहरही पाय पसरू लागले. ते अजून पसरत आहे.

अशी ही सदा उफाड्याची नगरी. तिच्या अंगांचे जुजबी वर्णन करायचे म्हटले तरी ग्रंथ होईल. सुरसपणात त्याच्या तोडीला टिकणारी कादंबरी मिळायची नाही. ही मुंबई आपल्या कादंबऱ्यांत वारंवार येते, पण शोभा म्हणून—प्रेमाची अथवा बोधाची अथवा

राजकारणाची शोभा वाढवायला. पूर्वी बाहेरगावी (कथेतसुद्धा) प्रेम करणे अवघड जाई; मुंबईत ते सहज खपे. असा तिचा बदलौकिक. खरी मुंबई क्वचितच रंगवली गेली आहे. खेड्यांबद्दलच्या खोट्या कादंबऱ्या, तशाच मुंबईबद्दलच्या…

…पण तशी मुंबई एकरूपी, एकरंगी नाही. मलबार हिल–मरीन ड्राइव्हचे मिजासी ऐश्वर्य आणि परळ–कामाठीपुरा–धारावीचे भयाण दारिद्र्य या दोन टोकांचा काय संबंध आहे ? (अर्थात कार्यकारणभावाचा सोडून !)…मध्ये गिरगाव–दादर–उपनगरे यांचे मिजासी दारिद्र्य आहे. त्यांत अनेक इयत्ता आहेत; थराला थर लागला आहे. पण तो 'लागला' आहे—दाटीवाटीमुळेच नव्हे तर मुंबईच्या प्रकृतीमुळेही. जुन्यानव्या दिल्लीसारखी येथे गरिबी-श्रीमंतीची आणि जुन्यानव्याची पॅकबंद वाटणी नाही. ताजमहाल हॉटेलच्या फूटपाथवर लोक झोपतात; खोपटी पलीकडे सारून बादशाही इमला उभा राहतो—विशेषतः उपनगरांत. हा सरमिसळपणा की नुसतीच गुंतागुंत ? कोणाला त्याचा अभिमान वाटतो, कोणाला धोका ! मुंबईची सर्वधर्मपरिषद झाली आहे; गुण्यागोविंदाने लोक एकत्र काम करतात पण, जमल्यास, अलग अलग राहतात. पारशी मूठभर, तेव्हा ते 'कॉलनी' करून राहतात; पण 'हिंदू कॉलनी'ही आहे—आणि जाती-पोटजातींच्या 'हाउसिंग सोसायट्या' आहेत ! आपापल्या 'संस्कृती'चे डबके निर्धाराने राखीत आहेत. मुसलमानांचे मोहोल्ले मध्यमुंबईत आहेत. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत त्यामुळे रणभूमी सोयिस्करपणे आखता येई. तसे इतरत्र मुसलमान खूप आहेत; माहीम-वांद्र्याला त्यांची केवढी वस्ती आहे. पण दंग्यांत ते निधर्मी बनून तिऱ्हाईतपणे बातम्या वाचीत. खाटीकखाना वांद्र्याला, पण कापाकापी भेंडीबाजारात !

हे दंगेही तेवढ्यापुरते. संपले की चार दिवसांत सगळे सुरळीत. पुन्हा गिरगावचा हौशी ब्राह्मण भेंडीबाजारातल्या मुसलमानी हॉटेलात मुर्गी खायला हजर! १८७४ त मुसलमान-पारशांचा दंगा झाला होता म्हणे, आणि १९२१ त पारशी विरुद्ध हिंदु मुसलमान असा सामना झाला. पण हे अपवाद. 'सरकारमान्य' प्रतिस्पर्धी म्हणजे हिंदू आणि मुसलमान. गेले ते दिवस ! मुसलमानांतही शाखा आहेतच. मुंबईच्या 'चहाबाजी'चा जनक आणि आधार जो इराणी तो 'न हिंदुर्न यवनः' असा त्रिशंकुवत्. दंग्यांत कधी त्याच्या यावनी वासामुळे तापून हिंदू त्याचे कप फोडत—पण त्याचा चहाचा बंब फोडण्याइतकी त्यांना उकळी येत नसे. मुसलमान एकंदरीने नोकरी-व्यवसायांपेक्षा धंद्यांत अधिक. आर्जवी चलाखपणामुळे धंद्यांतील त्यांची बरकत हटलेली नाही.

पारशी हे खास मुंबईचे पीक. मोठी मजेची जात. 'मजा' हा त्यांचा आवडता शब्द—त्याचा अर्थ फार व्यापक. खाण्यापिण्याचे शौकी, हौशी, मनमोकळे. एके काळी मुंबईच्या शाळाकॉलेजांतून दंगामस्तीचा मान त्यांचा असे. आता ते मवाळ झाले. बाहेर फार साहेबाळलेले, पण कुळाचारांत कर्मठ. संजाण ते नवसारी या गुजरातच्या पावलांत त्यांची धर्मभूमी—आणि सर्वस्व. मुळे तेथे. मुंबईत त्यांनी अमाप पैसा कमावला—आणि मुंबईला त्यांनी अमाप पैसा दिला. धर्मादायात जातधर्म पाहिला नाही. आपल्यांतली गरिबी दुसऱ्यांना दिसू नये म्हणून झाकली; मदत देऊन सावरली. तसे यांचे सगळ्यांशी संबंध खेळीमेळीचे. पूर्वी क्रिकेटच्या चौरंगी सामन्यापुरती मैदानावर हिंदू-पारशी वैमनस्याची वार्षिक आवृत्ती निघे. विशेषतः हिंदू म्हणजे 'दक्षणी', 'तात्या'—पारशी हा 'बावा'. तंबूतंबूंत रणघोष उठत, जातीची वर्मे निघत. पण सगळे तोंडी, कधी हातघाईवर मामला आला नाही—असे 'लुटुपुटीचे' ठरे! या इवल्याशा समाजाचे पुढे काय होणार?

मुंबईकराला खिश्चन म्हणजे सर्व खिस्तधर्मी नव्हेत. गोरे तर नव्हेतच. ते सरसकट 'युरोपियन'. फक्त गोवेकर 'किरिस्तांव'. साष्टीतही 'किरिस्तांव' आहेत—पण त्यांची भाषा (गोमंतक) कोकणी नव्हे. थोडेसे नोकरीपेशांतले लोक सोडले, तर ते शेतकरी-बागाईतदार. 'गोंयकार' अनेक व्यवसायांत सापडतात—मुख्यतः शिंपी, संगीत-वादक आणि मोठमोठ्या हॉटेलांतून वेटर. टॅक्सी-ड्रायव्हरच्या धंद्यात त्यांचा मोठा भरणा असे; आता शिखांची संख्या त्यात वाढत आहे. चांगले कपडे शिवून घ्यायचे असले तर एखादा फर्नांडीस किंवा डिसूझा शोधला पाहिजे अशी मुंबईकरांची श्रद्धा. हॉकी, फुटबॉल या खेळांत व ॲथ्लेटिक्समध्ये त्यांची मिरास मोठी; पण इतर खेळांत त्यांचे नावही सहसा ऐकू येणार नाही. चिराबाजार, धोबीतलाव आणि वांद्रे या किरिस्तावांच्या मुख्य आळ्या. गोव्यातील गावकरी येथे 'कुडां' (क्लब) करून राहतात. दाई आणि 'आया' या व्यवसायांत त्यांच्या स्त्रिया फार. पारशी नाकावरून, किरिस्तांव एकंदर बोलण्याचालण्यावरून ओळखू येतो; पण यहुदी—म्हणजे ज्यू—तसा वेगळा दिसत नाही. तो भायखळा-नागपाड्याकडे राहतो व पुरा मराठी बनला आहे. कुलाबा जिल्ह्यातील एखाद्या गावाच्या नावापुढे 'कर' जोडून त्याचे आडनाव होते. एके काळी मुंबईतील मराठी प्राथमिक शिक्षणाचा भार या समाजातील स्त्रियांनी वाहिला.

गुजराती हा, अर्थातच, मुख्यतः व्यापारात आढळतो—किराणा मालापासून ते प्रचंड आयात-निर्यातीपर्यंत. शेअरबाजार त्यांचाच. पण कायदा आणि वैद्यकी यांतील वरिष्ठ

श्रेणीतही गुजराती पुष्कळ आहेत. जुन्या मुंबईत त्यांची विशेष गर्दी काळबादेवी-भुलेश्वर भागात आहे. उपनगरांतही त्यांचे खास लत्ते म्हणजे सांताक्रूझ, विलेपार्ले (पश्चिम), मालाड, कांदिवली, बोरिवली, आणि घाटकोपर. 'लोकल' गाड्यांतून, 'बाजारा'त जातायेताना ते 'रमी' अथवा 'सात हाती' मन लावून खेळतात—आणि खेळत नसले की तेजी-मंदीच्या गोष्टी बोलतात. अशा गोष्टीत फक्त 'श्रीमंत शेटिया'लाच रस असतो असे नव्हे, तर त्याच्या गरीब नोकरालाही असतो.

मुंबईतील माटुंगा विभागाला 'माटुंगम्' म्हणण्याचा प्रघात तेथील मद्रासी गर्दीवरून पडला. इतर भागांतही ते आहेत—पण तुरळक. त्यांचे 'सार्वजनिक' जीवन माटुंग्यात. दाक्षिणात्य संगीत आणि नृत्य यांच्या जलशांना हजारांनी लुंगी जमते. शिवाय स्त्रियांचीही संख्या मोठी असते. मद्रासी हा हाडाने 'अकौंटंट' आणि 'टैपिस्ट'; फाडफाड इंग्रजी बोलतो—जरा तामीळच्या अंगाने, आणि गतीने. मोठा कामसू आणि वरिष्ठांना संपूर्ण 'स्याट्टिसफॅक्शन्" देणारा. म्हणून कचेऱ्यांतून आणि बँकांतून त्याची वीण वाढती आहे. मुंबईला त्याने इडलीडोशाचे आणि काळ्या कॉफीचे व्यसन लावले; पण मुंबईचे काही व्यसन त्याने स्वतःस लावून घेतले नाही. राजकारणाची चर्चा हे व्यसन त्याने इडलीबरोबर आपल्या प्रांतातून आणले असावे. त्याला आद्याक्षरांचा सोस असावा; एकेकाला चारपाच असतात. त्याचे 'अंगवस्त्रम्' म्हणजे फक्त उत्तरीय; ते निर्मळ असते, पण त्याला उघडे राहणे आवडते. उघड्यानेच तो 'बॉल-बॅडमिंटन' खेळतो. हा त्याचा खास खेळ; त्यात प्रत्येक बाजूला डझनभर गडी लुंगी आणि चित्त विचलित होऊ न देता कसे उड्या मारतात हे चकित होत्साते प्रेक्षक डोळे भरून पाहतात. तसेच ते बघत राहतात, जेव्हा किंमती पोशाखांतील सिंधी ललना आणि त्यांचे तेवढेच किंमती मर्दसवंगडी, रस्त्यावर उभे राहून कसल्याही कळकट हातगाडीवाल्याकडून पाणी-पुरीसारखी खाद्ये ग्रहण करतात तेव्हा. फाळणीनंतर मुंबईत सिंधी हजारांनी आले. त्यांनी येथील जुन्या व्यापारी जमातींशी मुकाबला दिला. कापडाची दुकाने, मिठाईची दुकाने, कॉलेजे उघडली, आणि शहरभर भडक रंग आणि उग्र वास उधळले. पेपरमिंट विकीत गाड्यांतून हिंडणारी मळकट सिंधी मुले पाहिल्यावर सिंधची दुर्दशा बोचू लागते—पण एरव्ही डोळ्यांपुढे नाचतात ते सिंधी पाहिल्यावर, निर्वासित ते की आपण, असा संभ्रम मुंबईकराला पडतो. इतर प्रांतांतील लोकही येथे आहेत, पण इतके डोळ्यांत भरत नाहीत—शीख सरदारजी सोडून. त्याची उंची, दाढी आणि फेटा डोळ्यांत मावत नाहीत.

आता आपला मराठी समाज. त्याचे सगळे बरेवाईट प्रकार मुंबईत सापडतील. काही मुंबईत मुरलेले, तर काहींच्या मुद्रेवर सदैव भाव असा की आपण खरे कोकणचे किंवा देशावरचे किंवा आणखी कोठचे तरी; फक्त पोटासाठी येथे आहोत—सबब निरपराधी! म्हणून असे लोक इतरांशी पुरे एकजीव होत नाहीत. "मुंबईत पहाल तो आपल्याच घाईत, क्वचितच शेजाऱ्याचें असे नाव माहीत"—इती माधव जूलियन. पण घाई हेच कारण नव्हे. अर्थात् शेजाऱ्यांविषयी फाजील चौकश्या करण्याचा, आणि त्यांच्या व्यवहारात तोंड घालण्याचा स्वदेशी सद्गुण त्यांच्यात नाही हे खरेच आहे! मात्र बहुतेक असे की शेजार आपल्या जातीचा पाहतील. तत्त्वतः जातिभेदाचा बीमोड टाळ्या वाजवून मान्य करतील—पण व्यवहार तेवढा मोकळा नाही. जातीच्या संस्था पुष्कळ आहेत. सर्व मराठी लोकांची संस्था असली तरी तिच्या कार्यकर्त्यांची जातवारी तपासून कुरबूर होतेच—निदान कुजबूज. चाकरीतदेखील ती दृष्टी आहे. काही कचेऱ्यांत काही जातीचीच माणसे आढळणार हे ठरल्यासारखे. मात्र प्रत्येक जात दुसऱ्या जातीविरुद्ध स्वार्थाची तक्रार तावातावाने करील! नव्या पिढीला या विषाराची तेवढी बाधा झाली नसावी असे वाटते—पण पंधरावीस वर्षांपूर्वी तेच वाटत होते.

या जातींची उडती तपासणीही मनोरंजक ठरेल. गुण आहेत, गुणांच्या अतिरेकातून कोठेकोठे दोष उपजले आहेत. प्रत्येकीच्या चालीरीतींत, भाषेच्या लकबीत, वृत्तीत, थोडा वेगळेपणा आढळेल. यात परंपरेचा मोठा भाग आहे. ती नेहमीच जाणूनबुजून स्वीकारलेली असते असे नाही. माणसे कित्येकदा दिसतातही निराळी. मुंबईची हवा या वेगळेपणाला थोडीशी मारक आहे खरी—पण कित्येकजण तो हट्टाने टिकवतात. ब्राह्मण समाज तसा विविध आहे; पण इतिहासाने चित्पावनांना उठाव दिला व ब्राह्मण म्हणजे चित्पावन असा कोता ग्रह निपजला. कित्येक चित्पावनांनाही तो मानवला. इतिहास कोसळला तरी उठाव राहिला. अशी 'सदाशिव पेठ' मुंबईतही आहे. मासळी आवडती, पण मिश्र वस्तीत आपल्या त्या खाण्याचा वास येऊ नये म्हणून हिकमती लढवणारी कुटुंबे खूप आहेत. मासळीला 'बाजार' म्हणतील, मटणाला 'डबल टी'. सारस्वत ही बुद्धिमान जात व तिच्या बुद्धीला माशांचे खत गुणकारी ठरते असा प्रवाद आहे. सारस्वत आणि कायस्थ प्रभू मुली सुंदर असतात या समजामुळे इतर जातींतील होतकरू प्रेमी त्यांच्यावर प्रेम करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगतात आणि मनातल्या मनात करतातही. कायस्थ दादरला आणि ठाण्याला अधिक आढळतील. महाडच्या भागात त्यांची धर्मभूमी; तेथील 'सोडा' (पेय नाही, तर सुकी मासळी!) हा प्रसाद. बाजीप्रभू, राम गणेश आणि चिंतामणराव देशमुख ही

त्रिमूर्ती. आपल्या इतिहासाचा या समाजाला सार्थ अभिमान आहे—आणि त्यातूनच थोडा कडवटपणाही आला आहे. गोड, नाजुक नावे ठेवण्याची प्रथा कायस्थांनी सुरू केली असे वाटते. पाठारे प्रभू हा दुसरा प्रकार बराच निराळा आहे. ते पुरे मुंबईकर. ठाकुरद्वार, खार ही त्यांची मक्का-मदिना. यांची आडनावे तोंडात घोळवावीत अशी—विजयकर, नवलकर, धुरंधर, धैर्यवान, त्रिलोकेकर, ब्रह्मांडकर अशी झेप. या समाजात स्त्रियांचे वजन मोठे. "किती असती चतुर बहुपाककुशल। तशा चित्रकलापटु प्रभुनारी सकल." रांगोळ्या, भरतकाम इत्यादी चित्रकलेच्या 'स्त्रैण' विभागांत वर्षानुवर्षे बाबलीबाय, सोकरबाय, लहानीबाय यांची कर्तबगारी गाजली आहे. 'हजार पाकक्रिया' हे सुप्रसिद्ध पुस्तक एका पाठारे प्रभू भगिनीचेच. त्यातील 'हजार' हा शब्द अतिशयोक्तीचा नाही. इतका हा समाज भोजनाबाबत हौशी आणि कसबी आहे. परभी भाषा ठाकुरद्वारच्या आसपास कधी कानी पडते. ("आपले सामाला कनाय् सोकरी आल्लेय.") 'संशयकल्लोळा'ने त्यांचा वेष उचलला, पण भाषा नाही. तिच्यासाठी त्रिलोकेकरांचे 'हुंडा' नाटक वाचण्यासारखे आहे. स्त्रियांच्या जुन्या वेषासाठी रा० ब० धुरंधरांची चित्रे पाहावीत. जात म्हणून 'मराठे' हा शब्द थोडा अघळपघळच आहे. 'घाटी' हाही असाच एक शब्द. पटका, कोल्हापुरी 'पायताण' आणि अंदाजाने तिकडची वाटणारी बोली या आधारावर माणसाला मोघमपणे 'घाटी' म्हणायचे असा मुंबईचा शिरस्ता—अर्थात् गरीब माणसाला. 'कोकणी' हा शब्द तसा वापरीत नाहीत. मुंबईच्या गिरण्यांत कोकणचे स्त्रीपुरुषच अधिक. ज्याला 'गिरणगाव' असे नाव मामा वरेरकरांनी गिरगावला खिजवण्यासाठी दिले त्या परळ-लालबाग भागातील चाळींत हे कामगार राहतात. नाटकांची त्यांना फार आवड. ऐतिहासिक नाटकांची गिरगावातील सद्दी संपली, पण गिरणगावात ती चालू आहे. भाऊच्या धक्क्यावरून बोटीने गावी जातायेताना त्यांना अनंत आपदा सोसाव्या लागतात—पण गावच्या ओढीने त्या सोसतात. मुंबईचा पोलिस हाही बहुधा कोकणातीलच असतो; 'सखाराम' हे त्याचे सर्वसाधारण नाव! 'भंडारी' कोकणपट्टीचेच. मुंबईतील ताडीचा व देशी दारूचा धंदा एके काळी त्यांच्या हाती होता, आणि दर्यावर्दी म्हणून त्यांची ख्याती असे. कोळी हे आद्य मुंबईकर; मच्छीमारीपलीकडे त्यांची फारशी महत्त्वाकांक्षा नसावी. त्यांच्यात कर्तेपणा स्त्रीकडे, छानछोकी पुरुषाकडे, अशी पांढरपेशाला विपरीत भासणारी वाटणी असते. किंबहुना 'कोळीण' सगळ्यांना ठाऊक; त्या शब्दाचे पुल्लिंग म्हणून 'कोळी' धरून चालायचा! याशिवाय पाचकळशी (हे मुंबईच्या अगदी जुन्या रहिवाशांपैकी), चौकळशी, सोनार (म्हणजे दैवज्ञ), खत्री, कामाठी, इत्यादी कितीतरी आहेत. पण हा जाति-प्रपंच येथेच आवरावा.

मुंबईचा दूधवाला विसरून चालणार नाही. उपनगरांत गोरेगाव येथे सरकारी गवळीवाडा झाला, आणि तेथून बाटलीबंद दूध शहरभर जाऊ लागले, तरी दूधवाला ‘भय्या’; आणि ‘वसईवाला’—हा वसईपासून सफाळ्यापर्यंत कोणत्याही गावचा असेल, हिंदू किंवा ख्रिश्चन असेल—पण तो कावड वापरून तिच्यातून जमल्यास थोडी भाजीही आणेल, आणि चहाला ‘शाय’ म्हणेल. ‘भय्या’ हा तर विनोदाचा जुना विषय आहे —पण करुणेचाही व्हावा. वेळीअवेळी हंडे घेऊन तो लोकलगाड्यांतून पेंगत असतो; आणि रस्त्यानेही डोक्यावर हंडा घेऊन पेंगत चालतो—तोही धावल्यासारखा. त्याच्या हंड्यातील दुधात जाते त्याच्या निम्म्याने पाणी त्याच्या अंगाला लागले असते तर त्याची कळा थोडी सुधारली असती. गोठ्यांच्या वळचणीलाच तो राहतो. ज्या म्हशींची उस्तवारी करतो त्यांच्याइतकीही सुखसोय त्याला मिळत नसेल. प्रत्येकाची चूल निराळी; ‘तुलसी-रामायणा’चे सह-वाचन अथवा सह-गायन हाच त्याचा विरंगुळा, आणि त्याचे ‘क्लब्-लाइफ’. एक खाट आणि किमान भांडी ही त्याची दौलत. त्याचे खटले उत्तरेत जुन्या गोकुळाच्या आसपास असते. उत्तर दिशेने जाणाऱ्या कोणाही भैय्याला तो हारतुऱ्याच्या सन्मानाने पुढाऱ्यासारखा गाडीपर्यंत पोचवतो. आपणही एका शुभ दिनी असेच त्या दिशेने जाऊ, या आशेने त्याचे डोळे अशा वेळी लकाकतात.

मुंबईला अग्निमांद्याचे देणे असले, तरी जिव्हालौल्याचेही आहे. खाण्याजेवण्याच्या अगणित तऱ्हा आणि सोयी आहेत. इंग्रजी सपकपणापासून मोगलाई–पंजाबी–सिंधी मसालेदारपणापर्यंत चवीच्या जाती आहेत; दहा रुपयांच्या डिनरपासून आठ आण्यांच्या राइस-प्लेटपर्यंत खिशाची सोय आहे. चिनी ‘च्यॉव्-च्यॉव्’, मद्रासी सारभातम्, मत्स्याहार, गुजराती रसोई, पारशी धनसाक, भंडारी गरम मसाला...ही व आणखी कितीतरी पाकतंत्रे जारी आहेत. फराळाच्या दुकानांचे तेच. इराणी, मद्रासी, उडपी या परस्थांचा पाहुणचार अंगवळणी पडला आहे; स्वकीय आहेतच. ‘आरोग्यभुवनां’ची साथ काही वर्षांपूर्वी सुरू झाली. व्हिटॅमिनची कोष्टके आणि नवीन नावांची खाद्यपेये तेथे आढळतात. कोटातील ऑफिसातून ‘भट’ (राजस्थानी ब्राह्मण) हा कारकुनशाहीचा विसावा.

मुंबईची हवा काय वर्णावी! कसल्याही हवेची तरफदारी करणारा कडवा स्थानिक अभिमानही तिला पुरा पडायचा नाही. नऊदहा महिने रात्रंदिवस उकडते. दोनतीन महिने रात्री उकडत नाही. त्या मोसमात मुंबईकर गरम कपड्यांना ऊन दाखवितो—अंगावर घालून. घामट शौक! लहानमोठ्या सुटीत तो लोणावळा-माथेरान-महाबळेश्वरला

खास जातो. रविवारी जवळपास 'पिकनिक'ला जातो. तेथे एखादी झुळूक वाट्याला आली तर तिची गार आठवण पुढच्या पिकनिकपर्यंत पुरवून पुरवून वापरतो. मिश्र सहलींमुळे गारवा कमी होत असावा. म्हणून त्या सहली वाढत आहेत! ज्यांचे बिऱ्हाडबाजले (जागेच्या अभावी) लोकल गाड्यांच्या आवाक्याबाहेर असते ते वीकएंडला आपल्या गावी इमानेइतबारे संसार करायला जातात. शनिवारी दुपारी सुटणाऱ्या एका बोटीला 'हजबंड स्पेशल' हे केविलवाणे नाव आहे.

गडकऱ्यांनी इंदू-बिंदूला मुंबईतील दोन रेल्वेंची उपमा दिली आहे; आता त्या रेल्वेंच्या लोकलगाड्या कोळशाऐवजी वीज वापरत असल्यामुळे त्या उपमेचा रंग फिका पडला. उलटसुलट दिशेने दिवसाला सातशे गाड्या धावत असतात; लाखो लोक बसून, उभ्याने, लोंबकळत प्रवास, तक्रारी आणि चर्चा करतात. बसगाड्याही शेकड्याने आहेत. ट्रामगाड्यांतून (परवापर्यंत काही काळ) एका आण्यात एक प्रवास होई (तो आठ मैलांचा का असेना!), त्या काढून टाकण्यासंबंधी दर वर्षी चर्चा होते.

मुंबईत हजारांनी स्त्रिया नोकऱ्या करतात. त्यांपैकी बहुसंख्य मराठी. पंधरा वर्षांपूर्वीपर्यंत मास्तरीण अथवा नर्स याहून अन्य नोकरी करणारी मराठी स्त्री बोलण्याचा विषय होण्याइतकी अपवादात्मक होती. आता किमान शिक्षण होऊनही नोकरी न करणारी कुमारिका स्वतंत्र बुद्धीची वाटते!

मुंबईत साहित्य-संगीत-नाट्याचे मोठे उत्सव होतात; त्यांत मोकळ्या रसिकतेने स्त्रियाही भाग घेतात. अंग चोरून खोट्या शालीनतेने बसत नाहीत. अर्थात् 'दिखाऊ' स्त्रियांचा लफ्फेदार वर्ग आहेच—तो नेहमी होता. पण त्यांचा पोकळपणा आता तुलनेने अधिक उघडा पडतो. नवेपणाचे पोशाखी सोंग, थिल्लरपणा, क्वचित् हीन रुची हे दोष तरुण मुंबईकरांत दिसतील; पण ते काहीसे सगळ्या महाराष्ट्राचे आहेत. पण महाराष्ट्राचे दोष आणि गुण यांचा वारसा स्वीकारूनही मुंबईत आणखी काही तरी आहे. नव्या पिढीने पुष्कळ कोळीष्टके झाडून टाकली आहेत. पुढची दिशा शोधण्याची धडपड आहे. हिरीरी आणि ताजेपणा आहे. मुंबईला संस्कृतीच नाही असा ज्यांचा आक्रोश त्यांच्या संस्कृतीपासून सुटली हे तिचे भाग्य! ती विविध आहे, जिवंत आहे. खुंटाला बांधलेली नाही. हीच तिची संस्कृती. ती मराठी संस्कृतीचाच भाग आहे—तिला दिशा दाखविणारी आणि चैतन्य देणारी आहे.

## ब्राह्मण—पण भट नव्हे !

'गौड सारस्वत ब्राह्मण' या भारदस्त नावाऐवजी (अथवा 'सारस्वत' या त्याच्या गोंडस संक्षेपाऐवजी) सुटसुटीतपणे 'शेणवी' म्हटलेले त्या जातीला सहसा आवडत नाही. त्यात कसला तरी हलकेपणाचा वास येतो. पण शब्द तर प्रचारातला आहे. मग व्युत्पत्तिशास्त्र कशाला ? तेव्हा शहाण्णवी (९६ गावांचे अधिकारी), 'शहा-नवीस', 'सेनापती', शेणा म्हणजे बुद्धी यावरून 'बुद्धिजीवी' (म्हणजे पंतोजी), श्रेणयः (म्हणजे व्यापारी) असल्या विद्वान कसरती करून शेणवी शब्दाला प्रतिष्ठा आणण्याचे प्रयत्न केले गेले आहेत. गोव्यात शणै अथवा शेणइ आदरार्थीच वापरतात.

रामभाऊ गुंजीकरांच्या 'सरस्वती मंडल' (१८८४) पासून सारस्वतांचा इतिहास शोधण्याचे अनेक प्रयत्न झाले आहेत. पंजाबातील सरस्वती या (लुप्त) नदीपासचा कुरुक्षेत्र प्रदेश हे त्यांचे मूलस्थान. सरस्वतीचा उगम गौरीशंकराला भिडवून जातीच्या उगमालाही उत्तुंगपणाचा स्पर्श दिला गेला आहे. सत्ययुगात म्हणे सर्व ब्राह्मण ऋषींना सारस्वत म्हणत. असो. एकदा बारा वर्षांचा दुष्काळ पडला. दक्षिणेतल्या दुर्गादेवीच्या दुष्काळासारखा. वेदाध्ययन करणारे हे ब्राह्मण प्रायः नष्ट झाले. तेव्हा जेहेत्ते कोण्या सारस्वत नामे ऋषीने (आपद्धर्म जाणोन) मत्स्यभक्षण करून वेदरक्षण केले. असे माशांनी वेद तारले. पुढे दुष्काळ संपला, पण मासे संपले नाहीत. त्या पुरोगामी ऋषीच्या वंशजांनी मत्स्याहाराने धार आलेल्या बुद्धीने वेदांचा कीस पाडण्याचे व्रत निर्धाराने पाळले. हे खास सारस्वत. पुढे ते परशुरामकाळी विंध्याद्री ओलांडून दक्षिणेकडे आले. खुद्द परशुराम हा सारस्वत, असा दावा आहे. असो बिचारा ! त्याने समुद्र हटवून कोकणपट्टी आखून घेतली आणि तन्निमित्ते दिग्विजय यज्ञ केला. त्यासाठी गौडदेशातूनही व्युत्पन्न सारस्वतांची आयात केली. सागरातील मत्स्यविशेष नदीतील बांधवांपेक्षा अधिक रुचकर हे या सारस्वतांस उमगताच ते कोकणस्थ झाले. विशेषतः गोमंतकात त्यांनी ठाण मांडले. काही शतकांनी फिरंगी आणि म्लेंच्छ यांच्या बळजोरीला वैतागून त्यांची थोडी पांगापांग झाली; पण शक्य तो समुद्रकिनारा धरून राहिले. अशी सागरनिष्ठा !

सारस्वतांची बहुतेक धर्मपीठे अर्थात याच भागात आहेत. स्मार्तांची कवळे आणि चित्रापूर येथे, आणि वैष्णवांची गोकर्ण व काशी येथे. या मठांचे माहात्म्य कालमानाने

ओसरले असले, तरी त्याबाबतची श्रद्धा अत्याधुनिक बहिरंगाच्या कुटुंबांतूनही घट्ट मूळ धरून राहिल्याचे अनेकदा आढळते. पण विशेष प्रसंगींचे पूजा-नैवेद्य-तीर्थादी संस्कार सोडल्यास, नेहमीच्या गृहस्थाश्रमी व्यवहारात असल्या मटांचा काही जाच नसतो. दक्षिण कोकणात ब्राह्मण म्हणजे सारस्वत; चित्पावनादींना तेथे 'भट' म्हणतात. असा नवखा 'भट' तेथील ब्राह्मणाच्या खाणावळीत गाफीलपणे जेवायला बसल्यावर आमटीच्या वाटीत हात घालताच त्याच्या अंगावर कसा काटा उभा राहतो याचे रसभरित वर्णन शेकडो वेळा होते. मराठेशाहीत पंडितसभेने सारस्वत हे षट्कर्माचे अधिकारी, म्हणजे संपूर्ण ब्राह्मण, असल्याचा निर्णय दिला होता; पण व्यवहारात—विशेषतः पेशवाई पराक्रमामुळे—ते जरा घरंगळलेच. एकूण दक्षिणेत आहारधर्माचा बडेजाव अधिकच! कश्मीर-बंगाल्यांत खाण्यावर ब्राह्मण्य नाही; येथेच हे रसनेचे विधिनिषेध! म्हणून सारस्वत त्रिशंकुवत् लोंबकळत राहिले. ब्राह्मणांत नाहीत आणि ब्राह्मणेतरांतही नाहीत. पण कित्येकांना याची (उगाच) खंत वाटून आपण बिलकूल ब्राह्मण आहोत असा अट्टाहास त्यांनी धरला; आणि दुष्काळात तोंडघाईला आलेल्या पूर्वजांचे (दंतकथेतले) पाप सोडल्यास सारस्वत ज्ञाती (निदान त्यातील प्रतिष्ठित भाग) नेहमीच शाकाहारी होती अशी कैफियत त्यांनी मांडली. हरहर! कोरड्या देशावरील हतभागी सारस्वतांचे आणि जलचरसंपन्न कोकणपट्टीत राहूनही धार्मिक (गैर)समजुतीमुळे आत्मक्लेशाचा अकारण बडिवार करणाऱ्या अनैसर्गिक सारस्वतांचे अपवाद सोडल्यास समस्त सारस्वतवृंद मत्स्याहारीच नव्हे तर मत्स्यप्रेमी होता, आणि आहे. गेल्या पन्नासपाऊणशे वर्षांत आहारनिष्ठ ब्राह्मण्याचा दंभ माजल्यामुळे खाल्ल्याशिवाय राहवले नाही तर खाल्ल्याचा वास मारण्याच्या सोवळ्या क्लृप्त्या निघाल्या. मासळी आणि तत्सम प्रामाणिक शब्दही ओवळे झाले. तसला संभावित सारस्वत 'बाजार' खातो. ताज्या मासळीचा सुवास स्वैपाकघरात मावतो; पण 'सुक्या'चा गंध भिंती भेदून जाण्याइतका उग्र, तेव्हा ते चुलीवर (किंवा चुलीत) चढले की भक्तीचा आवेग येऊन तो उदबत्त्यांची अख्खी जुडी देवापुढे लावतो. हे मासळीचे; मग मटणाचे संकट केवढे असेल! जित्रानिशी गेलेल्या शेळी-(बोकडा)ला चमत्कारिक टोपणनावे ठेवली जातात. कोणी 'डबल टी' म्हणतात, कोणी आणखी काही. हे मात्र खरे की जुन्या चालीरीतीच्या बऱ्याच सारस्वतांत (विशेषतः कारवारकडे) मटण निषिद्ध असते; ती चालरीत सुटली तरी 'रविवारचा बडा बेत' यापुरतेच ते असते. तशा अर्ध-ब्राह्मणांना अंडीही नामंजूर. खाल्लीच तर डॉक्टरचे नाव घेऊन. मग कोंबडीचे नाव कशाला? याशिवाय, सणासुदीला, गुरुवारसारख्या वारी, श्रावणमासी खायचे नाही अशा पवित्र तडजोडीही असतात! गेल्या दहापंधरा वर्षांत या बाबतीत झपाट्याने बदल झाले आहेत.

जात म्हणजे पोटजाती आल्याच; त्यांच्यात लहानमोठेपणाची दुखणीखुपणी असणारच. ग्रंथांतरी सासष्टकर, बारदेशकर, पेडणेकर, लोटलीकर, भालावलीकर, आणि कुडाळदेशकर असे भेद नमूद आहेत. त्याशिवाय केवळ प्रादेशिक भेद. (वस्तुतः वरची नावेही प्रदेशांवरून पडलेलीच; पण ती पूर्वजवस्तीदर्शक.) प्रत्येक पोटजात आपण इतरांहून वरिष्ठ असे मानते. कुडाळदेशकर हे त्यातल्या त्यात जरा निराळे पडतात, आणि आपणांस आद्यगौड म्हणवतात. त्यांच्या आणि सारस्वतांच्या एके काळी लेखी झटापटी झाल्या. त्यांत खूप इतिहास पिंजून काढला गेला. कुडाळच्या जवळपास आणि वसई तालुक्यात ही पोटजात विशेष आढळते. सामंत, ठाकूर, तेंडोलकर ('डु' नव्हे) ही त्यांची खास आडनावे. त्यांच्या स्वतंत्र संस्थाही आहेत. हे सहसा शाकाहारी—म्हणून सच्च्या सारस्वतांना ते मागासलेले वाटतात की काय नकळे! या व इतर सारस्वतांत रोटीबंदी नसली तरी बेटीबंदी खरीच. म्हणजे जुन्या जमान्यात. नव्या 'बेस्त्यां'ना कोण बंदी करणार? असो. गोव्याचे, कारवारचे, मंगळूरचे सारस्वत थोडे भाषाभेदाने अलग पडतात; आणि भूगोलाने थोडा रुचिभेद आणि चालीरीतींचे बारीकसारीक फरकही येतात. 'मंगळूर'करांनी 'कॅनरा सारस्वत' नावाखाली संस्थांचा निराळा प्रपंच केला आहे. बेळगाव-शहापूरचा बाणही तसा निराळा. 'मुंबईकर' ही चीज आणखी वेगळीं. माळव्यातले अगदीच दुरावले. पण प्रत्येकाने आपला ताठा मगदुराप्रमाणे राखला. त्यातही सावंतवाडीच्या परिसरातील सारस्वत स्वतःला अस्सल मानतो. आणि इतरांविषयी तुच्छतेने बोलतो. आणि तुच्छतेला त्या भाषेसारखी (म्हणजे, मालवणी कोकणीसारखी) दुसरी भाषा नाही! या सर्व पोटभेदांचे एकीकरण व्हावे यासाठी अनेक 'सुधारकां'नी प्रयत्न केले. पण या नेमस्त धक्क्यांपेक्षा काळाच्या ओघानेच भिंती खिळखिळ्या केल्या आहेत. काहीजण त्या अजूनही केविलवाणेपणे लिंपू पाहतात.

सारस्वतांची मुख्य देवस्थाने गोव्यात आहेत. मंगेश, शांतादुर्गा, महालक्ष्मी, इत्यादी देवता. विशेष उत्सवांना तेथे गर्दी लोटतेच, पण उन्हाळ्याच्या दिवसांत विश्रांती आणि धर्माचरण या जोडहेतूने शेकडो परस्थ सारस्वत मुलाबाळांसह येतात. आणि धर्मकृत्ये करून (वा करवून) आणि आंबे-फणस खाऊन तुष्ट शरीराने आणि मनाने गावी परततात. भक्ती क्षीण झाली तरी तिला ओढून आणावे अशी ती स्थाने आहेत. निसर्गाचे वरदान आहेच; पण देवस्थान म्हटल्यावर माणसाची जी हीन बाजू सहसा दिसते, ती नाही. सगळे निर्मळ आणि प्रसन्न; भिक्षुकांचा आणि भिक्षेकऱ्यांचा लाचार कोलाहल नाही.

ही पुराण दैवते. ऐतिहासिक आणि आधुनिक काळांतील सारस्वत दैवतेही आहेत. संतापी परशुरामापासून पंतप्रधान नेहरूंपर्यंत. (असे ऐकले की तीस वर्षांपूर्वी अखिल भारतीय सारस्वत परिषदेचे कार्यकर्ते पंडित मोतीलाल नेहरूंना अध्यक्षपदाचे विचारण्यासाठी गेले. तेव्हा पंडितजींचा संयम ढळला होता!) कविकुलगुरू कालिदासही सारस्वत—सरस्वतीचा लाडका सुपुत्र या कौटुंबिक अर्थाने नव्हे, तर त्या जातीत जन्म घेतलेला म्हणून! संस्कृत विद्येतील त्याचा थोर ज्ञातिबंधू म्हणजे 'सिद्धांतकौमुदी'कार भट्टोजी दीक्षित. म्हणजे काव्य आणि व्याकरण दोन्ही आली. पुढे महेश्वरभट्ट सुखठणकरांच्या संस्कृत टीकाही गाजल्या. मोडी लिपीचा जनक हेमाडपंत हा सारस्वत हे आठवले की, मराठ्यांच्या वकिलातींपासून आजच्या सचिवालयापर्यंत लहानथोर कारकुनी फर्डेपणा करण्याबद्दल नावाजलेल्या या जातीचे व्यावसायिक रहस्य जणू सापडल्यासारखे वाटते. आपले प्राचीन कविमंडळ पाहिले, तर संतांच्या दिंडीत जरा अग्रभागी असलेल्यांत सोहिरोबानाथ आंबिये हे एकुलते एक सारस्वत सापडतील; मागील दाटीत आणखी पाचसात. पण ते बारीक नजरेने टिपावे लागतील. पंतकवींत कोणी नाही. आधुनिकांत—खरे म्हणजे अत्याधुनिकांतच—चारपाचजण तरी ठळक आहेत. अशी 'कालिदासारम्य' सारस्वत कविपरंपरा! आधुनिक साहित्याच्या इतर शाखांतही ठळक सारस्वत नावे आहेत. पुन्हा भूतकाळाकडे वळावे : पुणे दरबारी कोणी सारस्वत चढला नाही. ग्वाल्हेरला त्याला अवसर मिळाला. जिवबादादा बक्षी हा शिंद्यांचा उजवा हात. मराठी इतिहासातील एकमेव शेणवी सेनापती! अव्वल इंग्रजीत नव्या शिक्षणात आघाडी धरल्यामुळे असेल, या जातीची भरभराट सुरू झाली. विद्येच्या त्या नव्या होषात डॉ० भाऊ दाजी (लाड) यांनी मोठे संशोधनकार्य केले. पुढे डॉ० भांडारकर आणि तेलंग यांनी दिगंत कीर्ती मिळवली. शंकर पांडुरंग पंडित होतेच. त्या संशोधकमालेतील अलिकडचा दुवा म्हणजे डॉ० वि० स० सुखठणकर.

एकंदरीने सारस्वत हा हाडाचा कारकून किंवा पंतोजी. त्याने इमानेइतबारे नोकरीपेशा सांभाळला आहे; त्यात यशही मिळवले. काही स्वतंत्र व्यवसायांतही—वकिली, वैद्यकी सारख्या—थोडी माणसे पुढे आली. पण व्यापारधंद्यांत त्यांची गती नाही. फार तर पुस्तके छापली आणि विकली; किंवा संसारोपयोगी साहित्याचा चिल्लर कारखाना चालवला! यापलीकडे धाव एखाद्याचीच. अर्थात् ही महाराष्ट्रीयांचीच कथा आहे! पण त्यांतही शेणव्यांत हा उणेपणा विशेष. कलाक्षेत्रात (दोन) हातांच्या बोटांवर मोजण्याइतकी नावे निघतील. कालपरवापर्यंत आपल्या आंबट समाजजीवनात संगीत छचोर मानले गेले—आणि नृत्य व नाट्यही! पण दक्षिण कोकणातील (विशेषतः

कारवारकडील सारस्वतांत स्त्रियांनी घराघरातून संगीत खेळते ठेवले—पण घरापुरतेच की लग्नमंडईपुरते?). असो. क्रीडाक्षेत्रात, मुख्यतः क्रिकेटमध्ये, चार मातबर नावे आहेत.

नोकरी उत्तम, सरकारी नोकरी उत्तमोत्तम, या सारस्वत-ब्रीदात साहजिकच आय० सी० एस०सारखी वरिष्ठ सरकारी नोकरी म्हणजे परब्रह्मच! ते ज्याला लाधले त्या पुरुषर्षभाचे अपार कौतुक असे. त्यासाठी मुलीही 'तयार' करणारी धनवंतांची कुटुंबे असत. अशा मुलीला बोलणे, बसणेउठणे, खाणेपिणे, देहशृंगार, गृहशृंगार, इत्यादी बाबतींत साहेबी सफाई आणण्याची कोशीस होई. इतक्या घोर तपस्येनंतरही देव पावला नाही (आणि देव एक तर होऊ घातलेल्या किंवा होतकरू देवी दहा तरी असत!) तर नाइलाजाने एखादा दुय्यम देव पाहायचा : बॅरिस्टर, निदान इंग्लंडची यात्रा घडलेला, अशी पुढे उतरती श्रेणी असे. अशा वातावरणात 'राजनिष्ठा' हा सद्धर्म होता. 'उच्च' सारस्वत कुटुंबात—म्हणजे मुंबईत गावदेवीला राहणाऱ्या—कोणी राजकारण बोललेच तर ते अती नेमस्त असे.

सारस्वतांत भाषाभेद आहेत. 'मराठी' आहेच. मुळापासून देशावर राहिलेल्यांत घरीदारी तेच. (अर्थातच स्थानिक लकबींसह, म्हणजे बेळगाव-शहापुरी साजुकपणा, कोल्हापुरी मसाला, इंदुरी हिंदीपणा, पुणेरी ग्रांथिकता आणि मुंबईकरी भेसळ.) 'कोकणी' (म्हणजे कोकणात राहणाऱ्या अथवा तेथे मुळे असलेल्या) सारस्वतांमध्ये अनेकदा घरी कोकणी, पण दारी मराठी—अथवा माजघरात कोकणी पण दिवाणखान्यात मराठी—असे असते. कित्येकदा दांपत्यापैकी एक मराठी, एक कोकणी—पण असा द्विभाषिक व्यवहार (संसारजन्य आदळआपट सोडल्यास) गुण्यागोविंदाने चालतो. कधी वयोमानाने फरक पडतो; मोठी पिढी कोकणीभाषी, मागची मराठीभाषी. कोकणी सुटत चालले, ते काहीसे सरमिसळ व्यवहारामुळे; पण बरेचसे त्यातील कमीपणाच्या भावनेने, लाजेने. कोणतीही बोली 'अशुद्ध' असा पुस्तकासारखे बोलू पाहाणाऱ्यांचा अडाणी अहंकार असतो. त्या वर्गाच्या वरचष्म्यामुळे असे झाले. याने 'बोली' सुकून जाते आणि 'भाषा'ही दुबळी बनत जाते.

पण 'कोकणी' ही अनेकांस वाटते तशी एक बोली नाही. तिच्या तीन प्रमुख तऱ्हा आहेत. प्रदेशाप्रमाणे. रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागातील मालवणी कोकणी, गोमंतकी (कारवारीसारखीच), आणि मंगळुरी. 'मराठी'भाषिकांस या समजायला वरील क्रमानेच अधिकाधिक कष्ट पडतात. फक्त मालवणी हेल, गोमंतकी मार्दव, आणि मंगळुरी

हिसका सहज स्मरणात राहतात. घालूनपाडून बोलायला, आणि मुद्याला हात घालणाऱ्या (आणि म्हणून अश्लील) म्हणींसाठी मालवणी ही थोर बोली आहे. ते वैभव तोंडातोंडी वाया जाते याचे वाईट वाटते. गोमांतकी म्हणीही तशा अळणी नाहीत. असो. या तीन कोकणी बोलींची कल्पना येण्यासाठी—

मराठी : द्वारकेचं लग्न मोठ्या थाटात झालं.

मालवणी कोकणी : द्वारक्याचे लगीन मोठ्या उवाज्यान झालां.

गोमंतकी (कारवारी) कोकणी : द्वारक्याले लग्न भारी कडाक्यान जाले.

मंगळूरी कोकणी : द्वारकेली होरडीक चांग थाटाने जाली.

*(एका लेखावरून)*

कोकणी (म्हणजे गोमंतकी-मंगळूरी) ही बोली नसून स्वतंत्र भाषा आहे असाही पंथ आहे. या भाषाकारणात राजकारणही आहेच!

सारस्वतांत दर्शनी वेगळेपणा नाही. देहयष्टीचे, वर्णाचे, चेहरेपट्टीचे विविध प्रकार त्यांच्यात आहेत. वेषभूषा आता इतरांसारखीच; पूर्वी विशेष लकबी असत, जसे मुंबईकरांचे बंदरी पागोटे, कोकणी सारस्वतांचा रुमाल, इत्यादी. धोतराची मंगळूरी लपेट ओळखता येते. सराईत कानाला मात्र त्याचे वेगळेपण अजून जाणवेल, निदान बहुतेकांबाबत. नाव समजले तर जात उमगण्याचा बराच संभव आहे. अर्थात् देशपांडे, कुळकर्णी, असली मोघम नावे सोडून. उदाहरणार्थ, नाडकर्णी, रेगे, कामत, वागळे, तेलंग, संझगिरी, गायतोंडे, कानविंदे, राजाध्यक्ष, असले काही ऐकले की शेणवी समजून चालावा—मग त्याचे बोलणे 'केसरी'च्या अग्रलेखाइतके 'शुद्ध' का असेना!

इतर काही वैशिष्ट्ये सापडतील—त्यांतील बरीचशी कोकणप्रेमातून आलेली. नारळ फोडल्याशिवाय त्याचा स्वैपाकविधी सुरू होणार नाही. आता शहरात नारळ महागला तरी तो खरवडून मिळेल ते 'चून' भाजीआमटीत घालील. आमसोले घातलेली नारळाची कढी हवीच. ज्याच्या स्वैपाकघरात नारळाची शेंडी नाही तो खरा सारस्वत ब्राह्मण नाही! त्याची बरीचशी पक्वान्नेही नारळात सामावलेली. त्याला इतर मोठी व्यसने नाहीत; फार तर विडी-तपकिरीचा नेमस्त रंगेलपणा. पण खऱ्या कोकण्याला जेवणावर मुखशुद्धी म्हणून 'कातळी' हवी...गरिबांच्या पैशाचेही असे खोबरे होते.

इतर जातींप्रमाणे सारस्वतांत नव्याजुन्याचे मिश्रण आहे. कदाचित थोड्या अधिक

प्रमाणात असेल; कारण शहरवासी समाज आणि शिक्षणाचा प्रसार फार (स्त्रियांतही). उलट, आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात जो परंपरेचा दाब आहे तोही सुटला नाही. त्यातच वर सुचवलेला ब्राह्मण्याचा सोवळा सोस! पण गेल्या दहापंधरा वर्षांत दिशा बदलल्याची चिन्हे आहेत. हे नवे वळण जात-पोटजातींचे जाळे ओलांडून वा तोडून जाईल असाही रंग आहे. कोणाला हाही अनाचार वाटेल; 'संस्कृती'चे कसे होणार याची चिंता लागेल. ती संस्कृती जाती-पोटजातींची. शेवाळ माजल्यामुळे मनोरम दिसणारी! 'सारस्वत संस्कृती' असा शब्दप्रयोग गंभीरपणे करणारे आहेतच!!

# शामगढ आणि ट्रॅन्झिस्टर

माझे विद्वान मित्र डॉक्टर...पण नाव नको; त्यांच्या भार्येला ते आवडायचे नाही कदाचित. ते खरोखरीचे विद्वान आहेत मात्र. आपली एक संभावित प्रथा म्हणून उगाच विशेषण नाही जोडले. असो. सांगत होतो ते असे. अलीकडेच ते मला म्हणाले, "माझ्या मते सर्व पुस्तकांत अत्यंत मनोरंजक पुस्तक म्हणजे रेल्वेचं टाइम-टेबल." आणि ते त्यांच्या विद्वत्तेला आणि मोठ्या पदाला साजेलशा आवाजात म्हणाले; थिल्लरपणे आणि विनोदाच्या सुरात नव्हे. ते विद्वान असूनही विनोदी असल्याबद्दलचा त्यांचा सार्थ लौकिक आहे हे सांगायला हवे. मला ते ऐकून फार फार बरे वाटले. लहानपणीच मला ते पटले होते—म्हणजे प्राथमिक पाठ्यपुस्तकांपलीकडे इतर काही फारसे वाचले नव्हते तेव्हापासून. वय वाढत चालले तशी कधी सक्तीने, कधी लाजेकाजेस्तव, कधी देखाव्यासाठी, तर कधी आवडीनेही अधिकाधिक पुस्तके हातावेगळी होऊ लागली; तऱ्हेतऱ्हेची बरीवाईट पुस्तके. (पुस्तके बरी की वाईट याबाबत काळगतीने उलटापालट होत आली. माझ्या स्वतःच्या मतात आणि इतरांच्याही!) तरीसुद्धा, तुलनेला एवढे वाढते क्षेत्र मिळूनसुद्धा, रेल्वे-टाइमटेबलचे आकर्षण कधी उतरले नाही. विद्यार्थिदशेत, विशेषतः तिच्या शाळकरी अवस्थेत, असताना ते वाचीत बसल्याबद्दल वडीलधाऱ्यांची बोलणी खाल्ली; तेव्हा साहजिकच ते चोरून आणि अधिक चवीने वाचू लागलो. ती सवय वडीलधाऱ्यांत जमा झाल्यावरही जाईना. पिंडदोषच म्हणा. रेल्वेच्या प्रवासात मात्र ते उजळ माथ्याने वाचायचे; किंवा तशीच काही निष्पाप सबब असेल तर; एरव्ही एकांतात. मग त्याबद्दल इतके ठासून बोलणे कोठले ? म्हणून उपरिनिर्दिष्ट सन्मित्राविषयीचा आदर दुणावलाच, पण स्वतःविषयीचाही थोडासा वाढला—किंवा आपल्या उणेपणाचे एक कलम कमी झाले असे समाधान वाटले म्हणा !

मग या नव्या आत्मविश्वासाच्या आवेगात म्हणावेसे वाटू लागले की ज्यांना त्या पुस्तकाची लज्जत कळली नाही त्या कंबख्तांना शंभर हाय हाय ! ती त्यांना सांगून काय कळणार ? अहो, ती नुसती गावांची यादी नसते—टपालखात्याच्या किंवा इतर उजाड सरकारी याद्यांसारखी. ती गावे नसतातच; ती छोटीमोठी स्टेशने असतात. एखादे बिनफलाटाचे, मुकाट बसलेले, निर्जन, शापित वाटणारे; एखादे अवाढव्य, झगझगणारे,

अपरात्रीही किंचाळणारे; पण प्रत्येकाचे वेगळे व्यक्तित्व असते; एकेकाचा खास स्वर असतो, वास असतात. तेथे थांबणाऱ्या, अथवा धडाडत जाणाऱ्या, गाड्यांचे त्यांना वास लागतात. आता कोळसे जाळणारी, धगधगणारी इंजिने कमी होत गेली की कित्येक वास हरपणार! काजळही पुसले जाणार!

त्यांतील बहुतेक स्टेशने डोळ्यांनी पाहिलेली नसली तरी मनात उभी असतात—कुब्लाखानच्या महालासारखी, अर्धीमुर्धी. कधी नावाच्या, त्याच्या नादाच्या, सूचनेतून त्यांचे शिल्प स्फुरते; वाचलेला वा ऐकलेला एखादा असंबद्ध तपशील आठवणीच्या तळाशी रुतलेला असतो त्याभोवती कधी, वाळूच्या कणाभोवती मोती धरावा तसे, चित्र धरते. पुढे प्रत्यक्षात ती निराळी दिसली तरी फिकीर नसते. अनेकदा वाचलेल्या स्टेशनचे प्रथमदर्शन रोमांचकारी असते, आणि कित्येकदा अनेक दर्शने घडली तरी ते रोमांच उतरत नाहीत. जणू प्रत्येक वेळी कसलेतरी नवलाईचे लावण्य सुखवते. पाहणारा मात्र 'देखणा' हवा. माझे दुसरे एक मित्र आहेत. (तेही विद्वान : प्राध्यापक असून विद्वान!) अहमदाबादला नोकरी करीत, पण एरव्ही मुंबईकर. तेव्हा मुंबई-अहमदाबाद अशा सारख्या उलटसुलट फेऱ्या होत. त्या बहुधा रात्रीच्या मेलगाडीने. पण गाडीत ते कधी सलग झोपले नाहीत. स्टेशन आले की नेम केल्यासारखा खाली उतरून ते तारवटलेल्या डोळ्यांत भरून घेत; मग पुढचे स्टेशन येईपर्यंत झोपेचा आणखी एक घुटका. दिवस हा कामाचा, तेव्हा रात्र प्रवासाला सोयीची असे तीर्थरूप सोंग फार-जण आणतात; त्यांच्यात मूलपणा कधीच नसावा—लहानपणीही! पण, कोण जाणे, रात्री इतर काही गोष्टींप्रमाणे स्टेशनेही अधिक साजरी दिसत असतील!

टाइमटेबलने चेतवलेली कल्पनाशक्ती सगळी यात्रा करून येते—कधी चिल्लर गाडीतून थबकत-रेंगाळत, तर कधी एक्स्प्रेस गाडीतून झेप घेत...ज्या कल्पनेला अशी यात्रा जमत नाही किंवा मानवत नाही ती अभागी; तिला गती नाही!

पण गाड्यांचे वेळापत्रक एवढाच आपल्या वाचनमननाचा विषय नसतो; त्या ग्रंथात आणखीही सौंदर्ये असतात. अमुक गाडीचे काही डबे तमुक गाडीला जोडतात हे वाचले की शंटिंगचे आवाज खणखणीत घुमू लागतात. ज्या गाडीने प्रवास करायला किमान अंतराची अट असते तिच्याबद्दलचा आदर वाढतो. असेच आणखी कितीतरी. पण सर्वांत रोचक बाब आणखी निराळीच. काही स्टेशनांच्या नावांपुढे, तेथे कसल्या भोजनाची सिद्धता असते—सामिष की निरामिष—की नुसतेच फराळाचे दुकान

असते याच्या अक्षरखुणा असतात. जेवणाच्या खास डब्याचा अलंकार मिरवणाऱ्या खानदानी गाडीच्या वेळापत्रकात तर लहानमोठ्या विविध भोजनसंस्कारांसाठी त्या डब्यात शिरण्याच्या आणि तेथून बाहेर पडण्याच्या वेळा अगत्याने दाखविलेल्या असतात. कधी ती गाडी एखाद्या क्षुल्लक स्टेशनावर थांबते ती सामान्य उतारूंसाठी नव्हे, तर भोजनभाऊंना पंगत साधण्यासाठी! धन्य! आणि एकदोन पानांवर तर चक्क खाद्यपेयांचे दर असतात. ज्या वयात फारसा प्रवास घडत नसे, आणि घडलाच तरी तसले शोक परवडण्यासारखे नव्हते, त्या वयात तसल्या पानांमुळे पचनरस स्त्रू लागत, क्षुधा प्रज्वलित होई. संस्कृत नाटकातील विदूषकाची पक्वान्नांची नावे घोळवल्यामुळे होई तशी. पण आपल्याला अजूनही—इतका प्रवास घडला, असल्या माफक शोकांपुरता पैसा असला आणि वयोमानाला शोभून दिसणारे अग्निमांद्य लाभले तरी—त्या पानांचा वास आवडतो, मनात दरवळतो. वस्तुतः पदार्थ तेच, बाहेर किंवा घरी खातो तेच, पण या पानांत त्यांची रुची वाढते खरी!

हे अर्थात 'छापील' नेमस्त जेवणखाण—त्यात थोडा प्रतिष्ठेचा भाग असतो. त्याने बाहेरच्या बघ्यांच्या मुद्रेवर हेव्याची पोटदुखी उमटते ती आपल्याला मानवते; तेवढाच स्वाद वाढतो. पण त्यात ठरीवपणा फार. न्याहारीला तेच टोस्ट आणि तेच अंड्याचे पदार्थ. सगळी अंडी बेटी एकाच गोत्रातील असल्यासारखी वाटतात. दोन्ही जेवणांचेही थोडेफार तेच. त्यांतील साहेबी थाटाचे—म्हणजे काट्या-चमच्यांशी झटापट करायचे आणि महागडे—जेवण साहेबाच्या काळी असे तसेच असते, तसेच सपक. ते आता आपला साहेबीपणा सांभाळण्यासाठी, अथवा त्याचे दाम दुसऱ्याच्या खिशातून जायचे आहेत या तृप्तीसाठी, मनोभावे जेवायचे असते. थाळींचा देशी थाट लोकप्रिय होत आहे; निदान खिशाला त्याचा तेवढा पश्चात्ताप होत नाही. तो सपक नसला तरी एकंदरीने एकसुरी असतो. भारतीय एकात्मतेसाठी ही पाक-योजना असावी! दक्षिण देशाची द्राविड अस्मिता मात्र याही प्रकरणात तिखट आहे; तेथील मोठमोठ्या स्टेशनांतीलही भोजनगृहांत केळीच्या पानावरील सारभातम् ओरपताना त्याचा ठसका समजतो. आपल्या मराठी मुलुखात असला अराष्ट्रीय कोतेपणा नाही!

पण ही प्रहरांनी बांधलेली पोटपूजा, आवश्यक यज्ञकर्म म्हणून उरकायची. शिवाय, वेळीअवेळी, उमाळे येत असतातच. सराइतांचे त्याबाबतही वेळापत्रक असते. कोणत्या स्टेशनावर काय खास चीज मिळते याची बारीक नोंद तेथे आढळेल. मुंबई-पुणे मार्गावर कर्जत-लोणावळ्याला निष्ठेने बटाटेवडे खाणारी माणसे हा ढोबळ प्रकार; भोवतालचे

करतात म्हणून आपण करायचे असा घाऊक निष्ठेचा विधी—आणि सामान्यज्ञानाचा. त्यात स्वतंत्र प्रज्ञेचा विलास नाही. तो थोड्या जाणकारांपुरता असतो—आमच्या अनंतरावांसारख्या. माहितीच्या रेल्वे आणि बसमार्गावरील लहानसहान स्टेशनांचीही खाद्यवैशिष्ट्ये त्यांना मुखोद्‌गत आहेत. अशा थोर निष्ठावंतांच्या टाइमटेबलात त्या त्या स्टेशनांच्या नावांपुढे ती वैशिष्ट्ये न छापता नमूद असतात...

माणसाच्या नावाप्रमाणे स्टेशनच्या नावालाही रेखीव व्यक्तित्व हवे; कुर्डुवाडी, म्हसवाडी, शेणोली, ही काय नावे झाली ? म्हणजे आपल्या काही ललित-लुलित नाटककादंबऱ्यांत आणि चित्रपटांत माणसांना आणि गावांना देतात तशी कचकड्याची (म्हणजेच 'काव्यमय') नावे नकोत मला. चमेलीपूर आणि...असली फूल-छाप नावे बालिकाबुद्धीला शोभून दिसतात. त्यापेक्षा कुर्डुवाडी परवडले! खरे म्हणजे माणसाप्रमाणेच नाव का आवडते, भुरळ घालते, हे सांगता येत नाही. कर्जतनंतर घाटाच्या तोंडाशीच एक बिनफलाटाचे, बिनउतारूंचे, लुटुपुटूचे स्टेशन आहे; त्याचे नाव पळसदरी (की पळसधारी ?) आपल्याला पसंत. तशीच बेळगावच्या वाटेवरील रायबाग आणि घटप्रभा...आणि कितीतरी आठवतात. एकेका नावाला आपली स्वतःची झळाळी आहे; बाजारी जिल्हई नाही.

अशाच एका नावाने फार वर्षांपूर्वी माझ्या मनात घर केले. जेव्हा प्रवास कल्पनेतच अधिक घडत असे; प्रत्यक्षात कधी सठीसामासी. त्या निर्हेतुक 'कलात्मक' म्हणतात त्या आनंदासाठी केलेल्या टाइम-टेबलच्या वाचनात बी० बी० सी० आय० च्या (म्हणजे आताच्या 'वेस्टर्न'च्या) दिल्ली मार्गावरील शामगढ या स्टेशनवर मन जडले. 'फ्रंटिअर'सारखी मिजासखोर गाडी तेथे थांबते म्हणून असेल कदाचित, ते जाड टाइपात टाकतात. मात्र पोचण्यासुटण्याच्या दुहेरी वेळा दाखवणारे, आणि त्याला शोभेसा ऐसपैस जेटा मारून बसणाऱ्या तालेवार स्टेशनांपैकी ते नव्हे. पुन्हा त्या मार्गावर गाड्याही मोजक्याच. म्हणजे फाजील गजबज नसणार. निवांत, टुमदार. दर नवे पारायण चित्रात तपशील भरू लागले. वीसपंचवीस वर्षे चित्र असे भरत होते, पण पुरे होत नव्हते...

आणि ते साक्षात् पाहिले तेव्हा दृष्टिस्पर्शाने पाहताक्षणीच पुरे केले. तेच ते. छायाचित्रात नेहमी पाहिलेले स्थळ प्रत्यक्षात भेटल्यावर होते तसे झाले : छायेच्या यांत्रिक बंदिशीत न सामावणारे एखादे अकल्पित रूपरहस्य चमकून उठते. दृश्य तेच, पण अगदी तेच नव्हे !

त्याला जवळजवळ एक तप झाले. या बारा वर्षांत किती वेळा शामगढ पाहिले हे नक्की सांगता येणार नाही, इतका तो प्रवास अंगवळणी पडला आहे; पण नजरेतून त्याचे कौतुक अजून उतरले नाही. रंग ताजेतवाने आहेत. 'फ्रंटिअर'ने जाताना ऋतुमानाप्रमाणे शामगढ सकाळी नऊ-साडेनऊच्या सुमारास कोवळे किंवा चढते उन्ह खात बसलेले, आणि येताना सायंकाळी साडेपाच-सहाच्या सुमारास मावळती ऊन्ह किंवा सावल्यांची शिरशिरी अंगावर घेत बसलेले दिसते. एकच सरळसोट उघडा फलाट, मध्यभागी चिमुकली धाब्याची इमारत, उरलेल्या भागाच्या बाजूला हारीने खडे राहिलेले सडसडीत उंच वृक्ष; फलाटाच्या दोन्ही टोकांना इंजिनात कोळसा ओतण्यासाठी बांधलेले उंच...त्याला काय म्हणतात, कोण जाणे! या बारा वर्षांत त्यात काही बदल झालेला नाही. इतरत्र स्टेशनांचे आधुनिकीकरण झपाट्याने होत आहे. उघड्याबागड्या फलाटांवर छपरे चढली—उतारूंचे ऊनपावसापासून संरक्षण करण्याच्या स्तुत्य हेतूने. पण त्या एकसाची छपरांनी स्टेशनेही एकसारखी दिसू लागली, कोंदट वाटू लागली. पण यातून शामगढ अजून सुटले आहे. तो लांबलचक फलाट अजून तसाच मोकळामोकळा आहे; म्हणून त्या वृक्षांचे बांधेसूद वैभव अजून तसेच उठून दिसते.

न चुकता दर खेपेस मी शामगढला उतरून शतपावली करतो. एक लहानसा बुक-स्टॉल आहे, त्याच्याकडे उगाच नजर टाकतो, कारण तेथील वृत्तपत्रे तेवढी ताजी नसतात—आणि पुस्तके आपल्याला न आवडणारी किंवा न परवडणारी असतात. त्या पहिल्या भेटीत मात्र मी तेथे एक मामुली पुस्तक घेतले होते. ते खिळखिळे झाल्यामुळे अलीकडेच टाकून दिले. त्याच्या मलपृष्ठावर मी माझी सही, खाली शामगढ आणि तारीख—मोठ्या लफ्फेदारपणे नोंदले होते हे सगळे. आणखी त्या स्टेशनात पाहावे-घ्यावे असे नेहमीचे काही नाही. पानदेखील चांगलेसे मिळत नाही. हो, दोनतीनदा उन्हाळ्यातल्या संध्याकाळी तेथे पाणचट लस्सी घेतल्याचे आठवते; अन्यत्र तिच्याकडे कदाचित ढुंकूनही पाहिले नसते इतके तिचे दर्शनही पाणचट (म्हणजे प्रामाणिक) होते

इंजिनचे कोळसा-पाणी चालू असता त्या दहापंधरा मिनिटांत मी गाडीकडेच अधिक पाहतो—म्हणजे गाडीकडेच, आतल्या माणसांकडे वगैरे नव्हे. (तसली आंबटचिंबट रसिकता वेळीच सरली!) अशी सलग गाडी, आणि तीसुद्धा देखणी गाडी, सहसा पाहायला मिळत नाही...मग आपण क्षणभर स्टेशनवर गाडी पाहायला आलेल्या शाळकरी मुलाच्या स्तिमित आणि आशाळू नजरेने तिच्याकडे पाहतो, आणि गाडी सुटता सुटता शाळकरी आणि धपापणाऱ्या चलाखपणाने आत चढतो.

अशा वेळी उगाच पायांत बंगाली धोतराचा बोंगा घोटाळल्यासारखे वाटते. न्यू थिएटर्सच्या दिवसांपासून बंगाली चित्रपट आगगाडीवर भाळले आहेत. असाच उघडा-भावडा उजाड फलाट, संथ भपकारे टाकीत सुटणारी गाडी, आणि चालत्या गाडीतून कसल्या तरी दुःखाचे ओझे घेऊन उतरणारा किंवा चढणारा नायक. हा खास बंगाली वाण आजतागायत, सत्यजित रायपर्यंत, चालत आला आहे. गाडीच्या चाकांच्या लयीत नायकाच्या अनवट दुःखाचे स्पंदन चालू राहते. मग आपलेही कसलेतरी अर्धसुप्त, अनामिक दुःख ती लय धरू पाहते. बंगालला काव्याचे आणि संगीताचे देणे आहे म्हणतात. कोण जाणे, पण आगगाडीचे संगीत आणि काव्य बंगाली चित्रपटांइतके कोणी टिपले नसेल. आगगाडीतील प्रणयाचे सवंग काव्य अनेकांनी चिवडले—कथाकारांनीही, आणि त्याला साथ देणारे संगीत.

त्या आठवणीने अजून आठी चढते—सात वर्षे लोटली तरी. आम्ही 'डी-लक्स' गाडीने दिल्लीला जात होतो. माझ्याबरोबर दोन थोर कवी होते. आत गारवा होता, निळसर तावदानातून बाहेरची एप्रिलची आग प्रसन्न वाटत होती, आणि आमच्या गप्पांना रंग भरला होता. तोच कसल्या उटवळ संगीताने त्याचा बेरंग केला. दोष संगीताचा नव्हता. खरे म्हणजे ते संगीत नव्हतेच मुळी. मांडीवरील डबड्याच्या खुंटीशी चाळा करीत गीतांची कर्कश खिचडी कालवणारा तो तरुण उटवळ होता; त्याला कौतुकाचे उत्तेजन पुरवणारे दोन साथीदार होते. विशीपंचविशीतल्या त्या धनिक-वणिक बाळांची छबी तुम्हांला अंदाजाने उभी करता येईल. चपचपीत केसांच्या झुलपांपासून ते चकचकीत बुटांच्या निमुळतेपणापर्यंत सगळे काही सहीसही पडद्यावरच्या चालू दैवतापासून उचलले असावे : तशी कृतार्थता चेहऱ्यावर होती. ट्रॅन्झिस्टर ही तेव्हा नवलाईची, म्हणून महागाईची, वस्तू होती. तिच्या मालकीचा तोरा आणि संतोष त्या चेहऱ्यावर ओघळत होते. मधूनच संगीताच्या एखाद्या फराट्याने कसल्या फिल्मी मुहब्बतीची याद आल्यामुळे त्या तुष्टपणात भकास छटा चमकून जाई.

आमचा वैताग व्यर्थ होता. इतर सहप्रवाशांपैकी कितीजणांची सहानुभूती आम्हांला मिळाली असती हे सांगणे कठीण. काहीजणांची नक्कीच मिळाली नसती हे स्पष्ट होते : एका डोळ्यात कौतुक आणि किंचित् आदर, दुसऱ्या डोळ्यात हेवा आणि किंचित् मत्सर, अशा मुद्रेने ते त्या संगीतनिर्मात्या तरुणाकडे पाहत होते.

पण आमच्या सुदैवाने मधूनमधून त्या तरुणाला आपल्या त्या अलंकारासह गाडीतून

फेरी मारण्याची लहर येई; आणि तो आपल्या श्रीमंतीचे ते आणि अन्य प्रत्यंगे दाखवीत डब्याडब्यातून ठुमकत जाई; मागून ते सखेसोबती असतच. रात्र पडेपर्यंत हे चालले. आमचा वैताग थकला, पण त्या गब्रूचे प्रदर्शन थकले नव्हते.

दुसऱ्या दिवशी त्या थंड्या गाडीच्या बाहेर पडलो तो दिल्लीच्या जाळात; पण जिवाला बरे वाटले. संगीताचा धाक संपला होता.

चार दिवसांनी मी एकटाच 'फ्रंटिअर'ने परतीच्या प्रवासाला निघालो. दिवस चढू लागला तसा राजस्थानच्या उकाड्याने आणि धुळीने आणि काळ्या धुराने बेजार झालो. कोटा मागे पडल्यावर दिवस कलू लागला. विंध्याच्या पहाडातील वसंतपालवीने आणि मधूनच पेटून उठलेल्या गडदलाल पळसाने दृष्टीला जरा गारवा दिला. आणि पाहता पाहता शामगढ आले. फलाट आणि ती झाडे भेटली तेव्हा मनालाही गारवा आला. दिवसभरच्या एकटेपणाचा ताण एकदम सैल झाला. त्या खुषीत, सावकाश कपडे झटकून आणि तोंडावर हात फिरवून, मी डब्याबाहेर पडणार तोच समोर एक घोळका फलाटा-वरून जाताना दिसला. शामगढला आणि असा घोळका ? निरखून पाहिले तो त्याच्या आघाडीला तोच ट्रॅन्झिस्टरधारी युवक आणि त्याचे सखे होते; आणि त्यांच्यामागून आश्चर्याचे चीत्कार करीत विस्फारल्या डोळ्यांचे काही इसम चालले होते. शामगढचीच माणसे असावीत ती; सहज किंवा काही जुजबी कामासाठी स्टेशनवर आलेली. छातीशी ते छोटे गाणारे यंत्र घेऊन चालणारा तो शानदार जवान पाहून ते हुरळले असणार. शामगढला हे व्हावे ना ?—तो गोंगाट आणि ती गर्दी. मी फलाटावर उतरलोच नाही. दुसऱ्या बाजूच्या खिडकीपाशी सृष्टिशोभा शोधीत बसून राहिलो.

या मधल्या वर्षांत ट्रॅन्झिस्टरची नवलाई ओसरून गेली, म्हणून किंमतही हटली. माझा त्याविषयीचा ग्रह मात्र मावळेना. या मुंबईत कोठेही फिरायला म्हणून जा, ट्रॅन्झिस्टर चुकत नाही. खेळ पाहायला जा, उपाहारगृहात जा, खरे म्हणजे कोठेही जा, तो भोंगा चालू असतो, आणि ते भोंगे मिनिटामिनिटाला बदलत असतात. त्या खोक्यातून सबंध गाणे कोणी ऐकत असेल असे वाटत नाही. दिल्लीतल्या कॉलेजांत तर म्हणे अनेक विद्यार्थी ट्रॅन्झिस्टर घेऊन वर्गात येतात; आणि आलटूनपालटून ते सुरू ठेवतात. गुरुजींनी आवाज चढवला तर आणखी शिष्य आपले यंत्र सुरू करतात. आमच्या मुंबईचा विद्यार्थी गुरूंशी मुकाबला करायचा झाला तर, मला वाटते, स्वतःच्या निसर्गदत्त ध्वनियंत्रावरच अधिक विसंबतो.

ट्रॅन्झिस्टर जवळ असणे यात आता फॅशनचा भाग राहिला नाही, की पैशाची प्रौढी उरली नाही. कोणीही घ्यावा. पानवाल्याजवळ तो असतो यात काही मोठेसे नाही; पानवाला म्हणजे तो जरा षौक करणारच. पण झाडूवाल्याकडे—किंवा तशा दिसणाऱ्या माणसाकडे —तो पाहिला म्हणजे वाटते, त्याची बरी खोड मोडली. सात वर्षांपूर्वी गाडीत आणि स्टेशनात (तोही शामगढच्या) ट्रॅन्झिस्टर मिरवणारा तो पुरुष अजूनही तसेच करीत असेल? त्यावरून आठवले. हे जग अनित्य आहे असे एका विद्यार्थ्याला म्हणायचे होते; तो लिहून गेला : This is a transistory world.

मी उद्या दिल्लीला चाललो आहे. येताना ट्रॅन्झिस्टर आणणार आहे; मुलांना तो हवा आहे म्हणे! तेथे स्वस्त पडतो म्हणून तो घेऊन ठेवण्याविषयी तेथील एका स्नेह्याला केव्हाच लिहून ठेवले आहे. मागच्या खेपेस आणायचा राहून गेला.

एवढेच की येताना शामगढच्या फलाटावर तो घेऊन फिरणार नाही. मला फिरवणार नाही. पण ते टळणार, कारण मला शामगढ लागणार नाही. मी विमानाने येणार. पुढे कधी दिल्लीला आगगाडीने प्रवास करताना ट्रॅन्झिस्टर बरोबर घेतला तरी शामगढला तो बॅगेत ठेवण्याचा बंदोबस्त करीन हे निश्चित!

# तिला चिरशांती लाभो !

सोमवार, १२ एप्रिलला, रात्री पुणे स्टेशनवर शेकडो लोकांनी एका आगगाडीला भावपूर्ण म्हणतात तसा निरोप दिला. ती पुणे-बंगळूर मेल. मिरजेपर्यंतची शेवटची मीटरगेज गाडी. त्या रात्री मिरजेपर्यंतच्या कित्येक स्टेशनांवर तो संस्कार झाला. उलट दिशेने जाणाऱ्या शेवटच्या गाडीबाबतही झाला. मग दोन दिवस सुतक पाळल्यासारखे गाड्यांचे व्यवहार बंद होते. सामसूम. एक कूळच नष्ट झाले. आणि १५ तारखेपासून नवा कोरा संसार सुरू; मोठ्या गाडीचा, ब्रॉड गेजचा. मग त्या पहिल्या गाडीचे गावोगाव उत्साहपूर्ण स्वागत झाले. हजारो लोकांनी केले. हारतुरे, मेवामिठाई, वाद्यवृंद, छायाचित्रे, सगळे सोपस्कार थाटात आणि चढाओढीने झडले. सोहळ्याच्या यजमानपदाचा अधिकार कोणाचा यावर एका शहराच्या पुढाऱ्यांत तंटाबखेडा माजून रंगत चढली. पुढारीपण सार्थकी लागले. गाजायला हवे तसे गाजले.

अशी दक्षिण महाराष्ट्रातील ती छोटी मेन लाइनची—हमरस्त्याची—गाडी इतिहासजमा झाली; मिरजेला तिला लुचणारी पिलावळ पोरकी झाली. त्यापैकी मिरज-सांगलीकरीण तर तिच्यासहवर्तमान गेली. मिरज-कोल्हापूरवाली महिन्याभराने आटपली. आता राहिली एकुलती एक मिरज-पंढरपूर-कुर्डुवाडीवाली. तिचीही वारी फार काळ चालू राहील असे वाटत नाही; तशी बोलवा आहे, तयारी आहे. गेलेल्या आगगाड्यांचा कोठे परलोकबिरलोक असेल—का असू नये ?—तेथे या छोट्या गाडीला चिरशांती लाभो. तथास्तु !

एक सज्जन उपचार म्हणून हे म्हणत नाही. खरोखरच लाभो ! कारण बापडीला इहलोकी शांती लाभली नाही, समाधान नाही. लाभली ती कुचेष्टा, अवहेलना, आबाळ आणि कृतघ्नता. ऐंशीएक वर्षे ती आपल्यापरीने उरस्फोडीने धापा टाकत राबली; नव्या सफेत भाषेत, तिने लोकसेवा केली. पण त्या तपाचे फळ काय मिळाले ? पोरासोरांनी दगड मारावे. दात विचकावे, पचकन विनोद करावे हे. तिचा आकार आणि तिची चाल यांवर सगळा कटाक्ष. तसे पाहिले तर असल्या छोट्या गाड्या देशभर होत्या, आहेत. त्या काढून मोठ्या गाड्या आणायच्या म्हणजे माणसांचा, आणि मुख्यतः मालाचा, प्रवास सुखकर होईल, असे स्वातंत्र्य आल्यापासून इतर अनेक चित्रांप्रमाणे घोकले-घोळवले

जात आहे—म्हणून फारसे काही होत नाही. पण जे थोडेसे झाले त्यात पहिला फटका या लायनीला बसला. अशी कमनशिबी. तसल्या इतर लायनींची चालचलणूक मोठी चटपटीत होती असे नव्हे. काठेवाडातील, म्हणजे आजच्या सौराष्ट्रातील, अशा आगगाड्यांचा मंदपणा तसा जगजाहीर होता. (मोह टाळता टाळवेना, तेव्हा अग्निमांद्य म्हणून टाकावे.) गाडीचे वेळापत्रक आणि पंचांग यांचे ग्रह कधी जमले नाहीत. अंतर पडायचे ते घटकापळांचे नाही, दिवसांचे. कधी कधी तर अधिक महिना धरावा लागे म्हणतात! (म्हणून का पती गेला ग काठेवाडी, की एक वा अनेक पतिव्रता तशा निर्धास्त असत. गाण्यातून मात्र त्या हळव्या होत!) असो. पण त्या गाडीला ज्या देशी संस्थानांच्या पिवळ्या जंजाळातून वाट काढायची असे, त्यांच्या अधिपतींप्रमाणे हजार गुन्हे माफ असत. खरे म्हणजे त्या बहुतेक टीचभर संस्थानांच्या आपल्या कुंपणांपर्यंत लायनी असत. (आणखी एक कोटी गळ्यापर्यंत आली आहे. गुजरातीत रेल्वे 'कुंपणी' का म्हणतात ही थोर शंका मला लहानपणीही येत असे!) त्या मायबाप संस्थानांपूर्वीच त्या लायनींचे विलीनीकरण झाले. म्हणजे प्रत्येकीचे वेळापत्रक स्वतंत्र राहिले नाही. त्यामुळे त्यांचे चरित्र किती सुधारले, कोण जाणे! याविषयी मतभेद असतीलच. संस्थाने खालसा झाल्यामुळे त्यांची प्रजा आणि शहरे दीनवाणी दिसतात, त्यांचे सांस्कृतिक, आध्यात्मिक वगैरे स्वातंत्र्य हरपले, हे कित्येकांचे हुकमी दुःख आहेच. तसेच कदाचित त्या गाड्यांविषयीही असावे. पण पूर्वीचे सांगतो. तेव्हा त्या काठेवाडी गाड्यांना थट्टेने 'बापूनी गाडी' म्हणत. बापू म्हणजे मला वाटते, ते इवलेसे, पण मोठ्या पागोट्याचे, संस्थानिक. त्या शब्दालाच माहात्म्य चिकटले ते पुढे...

एकूण काय की आपल्या पुणे-मिरज गाडीत काही जगावेगळे व्यंग होते असे नाही. पण एकेकीचे नशीब. ही तशी सुस्थळी पडली नाही. बरीचशी उजाड, भरड प्रदेशात. हिलाही थोडासा संस्थानी संपर्क लाभला, पण एकंदरीत ती संस्थानेही सपक होती; त्यांना काठेवाडी रंगढंग नव्हते. त्यांची कळा जरा भिक्षुकीच होती. त्यातही पुन्हा अनेकदा त्या टीचभर पिवळ्या शिंतोड्यांतही मोठी पाती-छोटी पातीची फाळणी असे. अशी भातुकलीतील राज्ये! मोटारी आल्यावर त्यांचा रस्ता जवळचा, सोयीचा, मोठ्या गावांतून जाणारा, म्हणून त्यांनी माणसे फूस लावून नेली.

पण ही मला वाटते कागदोपत्री कारणे. खरे कारण म्हणजे या गाडीची तालेवार शेजारीण —आताची 'सेंट्रल', पूर्वीची जी० आय० पी० रेल्वे. त्या शेजीबाईचे खानदान केवढे! भारतातील ती सर्वांत पहिली, म्हणजे सर्वांत ज्येष्ठ, म्हणजे आपल्या हिशेबाने सर्वांत श्रेष्ठ.

आकाराने तर मोठीच; वर झपाटाही मोठा. पंचेचाळीस वर्षांपूर्वी तिची इंजिने विजेरी झाल्यापासून तर तो आणखी वाढला—आणि तिचा झगझगाटही. पुणे हे महाराष्ट्राचे नाक असा त्याचा दबदबा. नेमक्या त्याच नाकेल्या, चिकित्सेखोर शहरी या दोन गाड्या शेजारी आल्या. तुलना होऊ लागली. तो तर शेजारधर्माचा भाग! जुन्या गोष्टीतल्याप्रमाणे गरीब बिचारी धाकटी मोठीच्या सावटात आणखी सुकली, हिंपुटी वगैरे झाली. पण जुन्या गोष्टीतल्याप्रमाणे शेवट मात्र गोड झाला नाही. नव्या गोष्टीतल्याप्रमाणे, धाकटी खंगली, झिजली, आणि संपली! हे काहीसे जातीपातीसारखेच. ब्रॉडगेज म्हणजे रेलसमाजातील जणू ब्राह्मण, मीटरगेज म्हणजे हलकी जात. महाराष्ट्राच्या हाडातला हिशेब आहे हा. पूर्वी त्याच्या परवचा उघड म्हणत, आता खासगीत म्हणतात—कोठे उलट्या म्हणतात! अर्थात महाराष्ट्रधर्म, एकात्मता, इत्यादी सार्वजनिक पताका आहेतच. असोत.

स्वातंत्र्यानंतर या गाडीचे तसे विशेष चांगले झाले नसले तरी तिचे नाव दोनदा बदलले. तेवढेच नवेपण! आता ती साउथ सेंट्रल रेल्वे आहे; त्यापूर्वी सदर्न रेल्वे होती; त्यापूर्वी, मला वाटते अगदी जन्मादारभ्य, ती मद्रास अँड सदर्न मराठा रेल्वे हा नावाचा बोंगा सावरत धावत असे. त्याचेच एम० एस० एम० हे संक्षिप्त आद्याक्षरी रूप. तेच कुचाळकीच्या तोंडी पिढ्यान्‌पिढ्या बसले होते; चावून चिकट झाले होते, पण चव उतरली नव्हती. त्या नावाचा असा काही गुण की आंबट लोकांनादेखील विनोद सुचायचा. विनोदाचे रजिस्टर्ड विषय फारच अल्प असत, अशा त्या संभावित काळात या गाडीने अशा चोरट्या इच्छुकांची थोडी सोय पाहिली होती. मग सांगूनसवरून विनोद करणाऱ्यांचे काय?

त्यात थोरामोठ्यांनीच धडा घालून दिलेला. बाळकराम, म्हणजे आपले राम गणेश गडकरी, पहिले. त्यांच्या तिंबूनानाला कसल्याशा अपराधाबद्दल न्यायाधीशाने जी सक्त शिक्षा दिली त्यातील एक कलम असे: दर वीक-एंडला पुणे-मिरज हा दुहेरी प्रवास करणे. नंतर आले चिमणराव, म्हणजे आपले चिंतामण विनायक जोशी. त्यांनी दोन इरसाल गोष्टी सांगितल्या. एकदा म्हणे त्या रेल्वेची मेलगाडी धावत होती. शेजारूनच रस्ता होता, त्यावरून गाडीच्याच दिशेने चाललेला आपला स्नेही ड्रायव्हरला दिसला. ड्रायव्हर म्हणाला, "चल गड्या इंजिनमधून. पुढच्या गावी सोडतो तुला." स्नेही दिलगिरीने म्हणतो कसा, "आलो असतो बाबा, पण माझी जरा घाई आहे; कोर्टात काम आहे तिथं." दुसऱ्या गोष्टीतली एम० एस० एम०ची गाडी मध्येच थांबली. गार्डने ड्रायव्हरला विचारले, "काय झालं?" ड्रायव्हर म्हणाला, "म्हैस आडवी

आली." गाडी जरा पुढे गेली, पुन्हा थांबली. पुन्हा तोच प्रश्न, तेच उत्तर. असेच तीनचारदा, पुन्हा पुन्हा, तेच. शेवटी गार्डने वैतागून विचारले, "अरे, अशा किती म्हशी आज मोकाट सुटल्यात?" ड्रायव्हरने वैतागून उत्तर दिले, "नाही, साली तीच तीच म्हैस आडवी येतेय!"

हे प्रसिद्ध चुटके इतर अनेकांप्रमाणे मीही वेळोवेळी वापरले. मूळ न लपवता. बैठकीत हमखास गुण देतात असा अनुभव आहे. वापरले नसल्यास एकवार वापरून पाहावेत. वाटल्यास मूळ सांगू नये. श्रोते तेवढे बहुश्रुत नाहीत एवढी काळजी मात्र घ्यायला हवी.

त्या गाडीचा माझा पहिला अनुभव आठवतो. नवव्या वर्षीचा अनुभव आठवावा तेवढा नक्कीच आठवतो. आगगाडी दैवतासमान असण्याचे ते वय. माझी भक्ती तर विशेष जाज्वल्य असे. नरसोबाच्या वाडीला जाण्यासाठी पुण्याला रात्री एम० एस० एम० च्या गाडीत आम्ही बसलो. त्या इंजिनात कोळशाऐवजी लाकडे जाळतात असे कोणी सांगितले. आणि त्यामुळेच असणार, त्याचे आवाजही चमत्कारिक वाटू लागले. हाय! इंजिन हा तर आपल्या भीतियुक्त आदराचा विषय! जागावेसे वाटते, पण झोप आवरत नाही, अशा अर्धसुषुप्तावस्थेत त्या रात्री दैवतावरील निष्ठेला तडा गेला. किंवा दैवतांतही उच्चनीच असते हे उमगले म्हणा. त्याच सफरीत पुढे शिरोळ (आताचे जयसिंगपूर) ते कोल्हापूर हा प्रवास घडला. त्याने आमच्या बालविनोदबुद्धीला सारख्या गुदगुदल्या केल्या. अशी त्या गाडीची चाल होती. अंकगणितातल्या त्या उपद्रवकारक पालीप्रमाणे ती मागे जात असल्याचाही मधूनमधून भास होई; आणि जेव्हा खरोखरच पुढे जाई तीसुद्धा कधी पालीलाही ओशाळे वाटावे अशा वेगाने. त्या वीसबावीस मैलांना तीनचार तास लागले असे आठवणीला इतकी वर्षे वाटत आले आहे. ते खरे असेलही!

पुढे काही वर्षांनी बाळकराम, चिमणराव, इत्यादींचे विनोद वाचले, आणि इतरांचे ऐकले. त्यांनी ती आठवण हालवली आणि घट्ट केली. पुढे कॉलेजातील एक मित्र सुटीत बेळगावला जाताना आपण सातारा रोड की कोठल्याशा स्टेशनवर रिफ्रेशमेंट रूममध्ये सावकाशीने ऑम्लेट खात बसलो असता आपले होईपर्यंत गाडी कशी खोळंबून राहिली याचे वर्णन वारंवार आणि मोठ्या चवीने करी. ती कथा माझ्याही तोंडात बसली होती. ऑम्लेटची नवलाई असण्याच्या त्या काळात त्या कथेला माझ्यापुरती तरी वेगळी रुची चढली असावी.

पुढे मग त्या गाडीने बेळगाव अनेकदा घडले, आणि नंतर कोल्हापूर. कोल्हापुरात तर दोन वर्षे वास्तव्यच होते. तेव्हा उठल्यासुटल्या मुंबईच्या खेपा होत, आणि त्या आगगाडीनेच होत. तिच्या उण्यांची उजळणी म्हणत, आणि बसचा प्रवास कमी वेळाचा, कमी खर्चाचा, हे सपशेल मान्य करीत, मी गाडीचीच कास धरत असे. असे लागेबांधे जमले होते. गेल्या वर्षीच्या पावसाळ्यात गाडीने दोनदा कोल्हापूरला जाणे झाले. गाडीचा मार्ग रुंदावण्याचे काम चालू होते. या सबबीच्या आधारावर बाईने मिरज-कोल्हापूर प्रवासात तासभर अधिक वेळ खाल्ला. पण आपली तक्रार नव्हती, घाई नव्हती. भोवती हिरवे होते, हवा हिरवीगार होती. किती वेळात किती अंतर मागे टाकले या काळकामवेगाच्या मठ्ठ गणिताला अर्थ नव्हता.

आता जो तो ते गणित मांडून आपापल्या कुवतीप्रमाणे उत्तर काढीत आहे. मुंबई ते कोल्हापूर हा थेट प्रवास सुरू झाल्याने किती तास आणि मिनिटे वाचतात, रात्री मुंबईला बसले की सकाळी कोल्हापूर कसे भेटते, कामाचा दिवस कसा पुरा पदरात पडतो, इत्यादी फायदे ऐकून घ्यावे लागतात. चटपटीत संभावितांच्या हिशेबी खरोखरच ते थोर आहेत. त्यांच्या कामसू देहाला कमीत कमी वेळात एका स्थळाहून दुसऱ्या स्थळाप्रत पोचवण्याहून, राष्ट्रभाषेत म्हणायचे म्हणजे, आणखी थोर ‘यातायात’ काय ?

पण काही जणांचा पिंडच बेटा असा सैल असतो की त्यांचा प्रवास तसल्या तासामिनिटांच्या तंग मोजमापाने अवघडल्यासारखा होतो. तसला घायकुता हिशेब त्यांच्या अंगी लागत नाही. त्यांचा प्रवास केवळ कोठेतरी पोचण्यासाठी नसतो. तो प्रवासासाठी असतो. त्यांच्या गाडीगाडीला वेगळेपण असते. चणीचे आणि चालीचे आणि ढंगाचे. अटकर बांध्याच्या गाडीचा नखरा निराळा. ज्याला हे उमगले नाही त्याने व्यर्थ प्रवासाचा प्रपंच केला. मालगाडीतल्या डागात आणि त्याच्यात काय फरक ? किंवा त्याच्या वळकटीत आणि त्याच्यात ?

आता ही नवी गाडी पुण्याहून कोल्हापूरला त्याच मार्गाने, जवळजवळ त्याच मार्गाने, जाते म्हणतात. तीच गावे, तीच स्टेशने आणि नद्या आणि घाट. पण सगळे तेच कसे असेल ? या ऐसपैस थोराड गाडीतून ते निराळे दिसत असेल. आवाज निराळे असतील. कोठे उजाड पट्टे आहेत तेदेखील गाडीच्या दिमाखाने आणि वेगाने साजरे दिसत असतील. मध्यरात्री राजेवाडीला घेतलेल्या अंजिरांचा स्वाद तोच कसा बरे असेल ?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२५
२४९३५
निबंध
१७।२।८४

...आणि वर्षानुवर्षे त्या गावांची, माणसांची, पुस्तकांची सांगड मनात खुळखुळत असे. जणू ती त्या रेल्वेने एकत्र ओवलेली होती. सासवड म्हटले की अत्रे, आणि साताऱ्याचा डोंगर-परिसर म्हणजे रामदासस्वामी. त्या डोंगरापारच्या 'दऱ्याखोऱ्यांतला कवी' —एकेकाळी राजकवी, आता महाराष्ट्रकवी —यशवंत. आणि औंध संस्थान म्हणजे बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे खुले आत्मचरित्र आणि 'साष्टांग नमस्कार'—आणि माडगूळकर बंधूंना, विशेषतः थोरल्यांना, कुंडलच्या गदगदून येणाऱ्या आठवणी. त्यातच गोविंदाग्रजांच्या हरवलेल्या कुंडलची चमक. रहिमतपूर म्हणजे जुन्या काळचे दुसरे लोकप्रिय रविकिरण, गिरीश. कऱ्हाड आठवले. तेव्हा कऱ्हाडला माहात्म्य प्राप्त झालेले नव्हते. कृष्णाकोयनेचा सुरेख संगम आणि फार तर ओगलेवाडीचे कंदील लोकांना ठाऊक. आम्हा काहीजणांच्या भूगोलात ते एका दुर्लक्षित कवीचे गाव म्हणून नोंदलेले होते. तो कवी म्हणजे पंडित सप्रे—'आद्य वात्रट कवी'. आणि किर्लोस्करवाडीचा महिमा काय वर्णावा ? तीसचाळीस वर्षांपूर्वी त्या काळच्या तरुण मंडळींना 'किर्लोस्कर मासिक' हे मुखपृष्ठापासून कित्यासारखे होते! पुढे त्याला 'स्त्री'ची जोड झाली, नंतर 'मनोहर'...पण दबदबा कुटुंबप्रमुख 'किर्लोस्कर'चाच असे, मग ते कुटुंब पुरोगामी म्हणून कितीही गाजलेले असो! आता मंडळी पुण्यात स्थायिक झाली आहेत.

झुंजुमुंजू की काय म्हणतात त्या वेळी गाडी मिरजेच्या अंगणात यायची. अर्धमिटल्या डोळ्यांना त्या ब्राह्ममुहूर्तावर सांगली फाट्यापाशी देवलांची शारदा उभी असलेली दिसे. आता म्हणे सांगली हमरस्त्यावर आली आहे. त्या वर्दळीत ती कोठची दिसायला ?

आणि कोल्हापूर. शाळकरी लालित्य आणि बालिश संस्कृतनिष्ठा यांच्या बळावर कोणी त्याचे कलापूर केले तरी त्या बलदंड शहराला ते कचकड्याचे नाव शोभत नाही, म्हणून ते रुळले नाही. पण कोण जाणे, उद्या सरकारनेच (म्हणजे राज्यशासनाने) हुकूम (म्हणजे शासकीय आदेश) काढून ते नाव चिकटवले नाही म्हणजे मिळवली! आम्हांला मात्र ते लाल मातीचे, आखाड्यांचे आणि उस्तादांचे शहर नव्हते. आमचे उस्ताद होते, पण ते लेखणीचे. साहित्याने भारलेल्या, वावचळलेल्या वयात तेथील त्रिपुटी आमच्या सदैव तोंडी असे : फडके, खांडेकर आणि माधव जूलियन. विद्यार्थिदशेत कोल्हापुरात एका दिवसाचा मुक्काम असताना ज्या अंधाऱ्या खाणावळीत जेवायला गेलो तेथे माधव जूलियन पूर्वी जेवत असत असे समजले तेव्हा त्या आंबट वरणाचे मिष्टान्न झाले. तेच त्या काळी फडके-खांडेकरांबाबत होई. आता होत नाही. फक्त खांडेकरच तेथे उरले आहेत. ते शिरोड्याचे, असे झाले; त्यांची मुळे तेथे; उलट दिशेला त्यांची

अगदी जुनी, अजाणती म्हणा, मुळे सांगलीत. मधल्या कोल्हापूरने पस्तीस वर्षे तरी त्यांच्या विस्ताराचा, स्थैर्याचा, गौरवाचा, भार सांभाळला. पण ते आपले शिरोड्याचे! फडके तेथे नोकरीसाठी आले, नोकरी संपताच गेले. माधवरावही नोकरीसाठीच आले; त्या नोकरीवर असतानाच पण अकाली गेले. पण त्यांनीही देह ठेवला तो पुण्यात. शेवटची काही वर्षे त्यांचे घरही पुण्यातच असे. त्यांच्या कवितेला कोल्हापूरचा वास लागला नाही; सगळा वास होता पुण्याचा, डेक्कन जिमखान्याचा, आणि अट्टाहास होता 'अज्ञात ठिकाणी' जाण्याचा, राणीबरोबर. फडक्यांच्या काहीतरी पाऊणशे कादंबऱ्या! म्हणजे पाऊणशे सुंदर तरुण नायक आणि पाऊणशे तरुण सुंदर नायिका. या दीडशे सौंदर्यांपैकी कोल्हापूरची किती—हे वि० वा० पत्कीच फार तर सांगू शकतील. त्यांच्या कोठल्याशा, कितव्याशा, एका कादंबरीत, आगगाडी कोल्हापुरात शिरत असता नायक-नायिका प्रेमळपणे बोलत असतात असे अंधुक स्मरते. असाच आणखी एखादादुसरा अपवाद असेल. एरव्ही त्यांच्या नायक-नायिकांच्या प्रेमाचा रंगमंच हा सहसा मुंबई-पुण्याचा, अथवा बदल म्हणून आणि रंगत वाढायला, समुद्रकिनारा अथवा हिल-स्टेशन यांपैकी एखाद्या लोकप्रिय रम्य स्थळाचा! गाडीत काही घडले तरी ती पुणे-मुंबईची. वांगणी स्टेशनवरून शेदोनशे वेळा मी धडाडत गेलो असणार. जवळजवळ प्रत्येक वेळी आठवणीला खाज येते ती फडक्यांच्या आरंभीच्या एका कादंबरीतील परागंदा नायकाला नायिकेने तेथील फाटकाजवळ उभा असल्याचे गाडीतून पाहिले याची! म्हणजे फडकेही कोल्हापुरात तसे रुळले नाहीत एकंदरीत. ते त्या शहरची शोभा होते, पण तेथे न रुजता.

...हे सगळे नंतर उमगत गेले—अतिचिकित्सेची बाधा जडल्यावर. पण बुद्धीला उमग तरी स्मरणातील हट्टी गुंतागुंत तशीच राहिली आहे. त्या छोट्या गाडीशी ही नावे बांधलेली आहेत, मग तिचे पांग ते फेडोत वा न फेडोत.

आणखी एक: त्या मिरज-कोल्हापूर पट्ट्याला संगीताचे केवढे वरदान मिळाले. मिरज म्हटले की अबदुल करीम आणि किराणा घराणे आणि त्याची स्वरसमाधी; रुकडीचे इवलेसे स्टेशन, त्याची मनात गाठ बसली आहे ती बळवंतराव रुकडीकरांच्या तबल्याशी. आणि कोल्हापूर? तोबा तोबा. संगीताच्या बंद्याने त्या स्टेशनवर उतरावे ते कान पकडून. अल्लादियाखाँसाहेबांसारख्या भीष्माचार्यांपासून मुजऱ्याला सुरुवात. कोठे थांबावे कळणार नाही अशी रथी-महारथींची गर्दी. तेच चित्रकलेत, तेच चित्रपटकलेत. कसली कसली भव्य माणसे त्या इवल्याशा गाडीने वर्षानुवर्षे इमानेइतबारे वाहिली. कोणी तिचे देखणे

चित्र तरी काढले असेल का ? चित्रपटात आगगाडी वारंवार लागते. निर्जन स्टेशनवर उतरून पडणाऱ्या निराश, फटिंग (म्हणजेच काव्यात्म) बंगाली नायकाच्या एके काळी ती फार उपयोगी पडे; आता सरसकट पडते. पण अगदी कोल्हापूरच्या चित्रपटवाल्यांनीही आमची ही नाजुक गाडी काही पडद्यावर आणल्याचे आठवत नाही. तरी तिला हवी तेवढी निर्जन स्टेशने आहेत ! का ती चालू वाजाच्या तमासगिरणीला आणि तिच्या पाटलाच्या पोराला पेलू शकत नाही ?

अशी फरफट झाली त्या गाडीची. वैगुण्यांची अतिशयोक्ती झाली, बाष्कळ हसे झाले; तिच्या गुणांची कदर झाली नाही; साधी कृतज्ञता लाभली नाही. गाड्यांना शाप देता येतात का, कोण जाणे ? येत असेल तर तिची गादी बळकावलेल्या मोठ्या गाडीला सावध राहिले पाहिजे. नाहीतरी येत्या काळात वर विमानांचा सुळसुळाट आणि खाली मोटरींचा सुळसुळाट होणार अशी लक्षणे आहेतच. म्हणून तरी तिने सावध राहायला हवे.

मला मात्र बेळगावला जायला हवे. फार वर्षे गेलो नाही. म्हणजे मिरजेपासून पुढे तरी मला त्या चिमुकल्या गाडीतून निवांतपणे, घड्याळ बंद ठेवून, जाता येईल. लौकरच जाईन म्हणतो.

# शेवटची ट्रॅम

'जिथे मारते कांदेवाडी, टांग जराशी ठाकुरद्वारा', त्या नाक्यापाशीच माझी बहुतेक जाणती हयात गेली. खुणा सांगून आमचे घर काही तुम्हांला ओळखू येणार नाही. आजूबाजूच्या घरांसारखेच आहे ते. तिमजली, कललेल्या गॅलरीचे, लाकडी कठड्यांचे; दर्शनी भाग काळवंडून गेलेला, पाठीकडून शेवाळलेले. खालच्या मजल्यावर तीनचार क्षुद्र दुकाने. एक 'क्षुधा-शांति-गृह'. क्षुधेचे नवे थेर तेथे चालत नाहीत. सामोसा हा 'मॉव्साचा'च पदार्थ अशी मालकाची, म्हणजे सोमणांची, श्रद्धा. बुंदीचे आणि रव्याचे लाडू, चिवडा, शंकरपाळे, चकल्या, शेव, असले काचेच्या बरण्यांत मुरलेले घरंदाज खाणे हे तेथले खास. (गुरुवार सोडून) कांद्याची भजी, वांगीपोहे आणि उपासाच्या दिवशी साबुदाण्याची खिचडी व शेंगदाण्यांची उसळ; आणि रविवारी सकाळी मिसळ–तो तेथील सर्वांत चटोर पदार्थ. (त्याची तारीफ गिरगावात फार जुनी आहे. म्हणून हल्ली रविवारी सकाळी पोरीही येतात. नाइलाजाने मालक त्यांना आत घेतो.) दुसरे दुकान दूधवाल्या सरजू भैय्याचे, बिनपाटीचे; दोन पिढ्यांनी त्याच कढईत दूध उकळले. सरजूपेक्षा आमची प्रभी (कोविद) अधिक फर्मास हिंदी बोलते; म्हणून तिला कौतुकाने तो दुधाची धार अधिक घालतो. त्याचे दही अडीअडचणीला ("अमंगळ असले तरी") भोवतालच्या गृहिणींच्या उपयोगी येते, आणि गुरुवारच्या दत्तापुरते तो पेढे ठेवतो. त्यानंतर नाना बोडसांचे 'श्री पर्शराम मार्ट'—ती अक्षरे आमच्या स्मरणात स्पष्ट आहेत, पाटीवरून केव्हाच उडून गेली. पाट्या, पेन्सिली, वह्या, अंकलिपी, पेपरमिंट, पंचांग, जानवीजोड, उदबत्त्या, कापूर, सुताची रिळे, बटने यासारखी त्यांची रुटूखुटू विक्री. त्यातच पायरीपाशी एका माळणीची सोय केलेली...नानांचे आणि सरजूचे बिऱ्हाड दुकानाच्या मागील अर्ध्या भागात...

वरच्या मजल्यावरची बिऱ्हाडे त्याच सुरातली. बहुतेक सगळे कारकून, कोणी लहान, कोणी मोठे. एकदोन कारकून-मुलीही आहेत. पण त्या 'तशा' न दिसण्याचा प्रयत्न करतात; फार तर, मराठी शाळामास्तरणीइतपत दिसतात. चाळीचे वळण रक्तात आहे, आणि पुन्हा कोणी 'पसंत आहे' म्हणताच अशाच एखाद्या चाळीत संसाराला लागायचे आहे हे त्यांना पुरेपूर ठाऊक आहे. त्या दोघींतली एक तर बायकांच्या विद्यापीठाची पदवीधर आहे! पुरुषांपैकी चांगले तिघेचौघे पदवीधर आहेत; पण आता त्यांच्या बायक

सोडल्यास, त्याचे कोणाला कौतुक? तीसएक वर्षांपूर्वी बापटांचा पुरुषोत्तम बी० ए० झाला त्या वेळची खळबळ चांगली महिनाभर टिकली; पुढे पुरुषोत्तमाने वेगळे बिऱ्हाड केले ते नटव्या बायकोच्या नादी लागून !...असो. त्यानंतर पाचसात वर्षांनी अभ्यंकरांची द्वारकी मॅट्रिक झाली. तेव्हाही थोडीफार खळबळ झाली. पण ती सर्वस्वी कौतुकाची नव्हती !... आता मुलींच्या मॅट्रिकची महती उरली नाही; तेव्हा होती. एकोणिसशे चाळीस ते पन्नास या काळात समाजात फार झपाट्याने बदल झाला म्हणतात; पण आमच्या चाळीत फारसा घडला नाही खरा. धोतराऐवजी पायजमे, तुमानी कोटाऐवजी बुशकोट, आणि नऊवारीऐवजी पाचवारी कुमारिका दिसू लागल्या; कोठे केशरचनेबाबत जरा फेरफार झाले असतील. पण ते वरवरचे. अजून दुपार सोडल्यास बायकांचा वावर मागील दारानेच अधिक; संध्याकाळनंतर त्यांचे आवाज सहसा ऐकू यायचे नाहीत. लिमयांच्या सुमीचा गळा खरोखरच गोड; आणि एकदा ऐकले की गाणे सहीसही उचलते पोरगी. पण 'पुरुषमंडळी घरात असता' तिला म्हणायला लावायचे म्हणजे कोण प्रयास; आणि म्हटलेच तरी दबल्या सुराने. आणि तेही हिंदी गाणे नव्हे. मराठीच. एकोणिसशे एकूणसाठ साली हे तुम्हांला खरे नाही वाटणार; पण असते एकेका घराची प्रकृती. वस्तीचा गुण नाही. आमच्या समोरच्या 'नील-प्रभा मॅन्शन'मध्ये (पूर्वीची देवरुखकरांची चाळ; आता मालक आणि नाव बदलले.) गाळ्यागाळ्यात लता आणि आशा असाव्यात; चोवीस तास 'सिलोन रेडिओ' चालू असल्याचा रस्त्यापलीकडेही भास होतो...

या प्रकृतीशी ज्यांचे पटले नाही त्यांनी पाय काढला. कसल्या कसल्या सबबी निघाल्या; वाढत्या संसाराची तर पुन्हा पुन्हा; कुटुंबातल्या धुसफुशी होत्याच; पण त्या नसतात कुठे? पण माणसाचे घराशी जमले नाही की तुटले हेच खरे. घर वाकले नाही; नव्या थेरांना त्याने हुसकले. दाराखिडक्यांना पडदे लावण्यापासून ते घरात अंडी आणण्यापर्यंतच्या लहानमोठ्या नावीन्यांपर्यंत. दारांवरून आठवले. रात्री निजानीज होईपर्यंत दारे सताड उघडी. एरव्ही ते बंद ठेवण्याचा 'साहेबीपणा' कोणी करून पाहिला; पण धकला नाही. दाराची खीळ बेटी दिवसा लावली तरी लागत नसे ! "ब्लाकांत राहायला जा म्हणावं;" म्हणजे कोणी कडवा विरोध करीत असे असे नव्हे; पण घराचे वातावरणच आंबायचे; गुदमरल्यासारखे होऊन कोणीतरी बाहेर पडायचा. पुन्हा दारे मोकळी, आणि घर ताठ.

—तसे घर अगदीच मठ्ठ होते असे नाही. पाहुण्याला चहा द्यायच्या स्टुलावर जाळीचा

रुमाल आला, किंवा पोलादी कपाट आले, किंवा स्टेनलेसच्या ताट-वाट्या आल्या, तर त्याने गैर मानले नाही; निदान काणाडोळा केला. शेंबवणेकरांनी गतवर्षी 'ट्यूब लाइट' बसवून घेतला; तेही खपून गेले. थोडी शोभा चालायचीच...रामदास आणि टिळक यांच्या जोडीला आता गांधी अथवा नेहरू अथवा गौतम बुद्ध यांची चित्रेही एकदोन बिऱ्हाडांत आली, आणि टिकली.

बहुतेक बिऱ्हाडे वडिलार्जित; दहांपैकी आठ-नऊंची आडनावे वर्षानुवर्षे तीच राहिली आहेत. एखादा मुलगा उसळून बाहेर पडो, उरलेले कुटुंब तेथेच राहिले. कुटुंबांचे जागेशी घट्ट लागेबांधे. आमचेच पाहा. आजोबा म्युनिसिपालिटीत, मागून वडीलही. तेव्हा नोकऱ्याही वंशपरंपरेसारख्या; वडलांचे कामही 'डी' वॉर्डातच. काका रेल्वेच्या नोकरीचे निमित्त काढून बाहेर पडले. आम्ही पोरबुद्धीने कधी वडलांना म्हणावे, "दादा, आता ही जागा सोडून चांगली मोठी जागा घेऊ या कुठं तरी. दादरला छान आहेत, आणि स्वस्तही आहेत..." (पस्तीस सालचे हे.) पण व्यर्थ! "दादरला?" असे खोचकपणे विचारताना दादांच्या चेहऱ्यावर भाव असा की जणू दादर कुठं ठाण्याच्या खाडीपार आहे. "मी इथंच राहणार. उद्या तुम्ही शहाणे झालात आणि पैसे फार झाले की जा दादरला. नाही तर...नाही तर अगदी अंधेरीला तडफडा." दादांचा भूगोलच बंदिस्त. रिटायर झाले, चार पैसे गाठीशी आले तरी चाळीशी घट्ट. म्हणत कसे, "माझं काय वाईट झालं इथं? लागतं ते सगळं जिना उतरला की मिळतं. सिनेमेदेखील दोन आहेत जवळ. पुन्हा दारात ट्रॅम."—तेही खरेच. त्यांचे स्नेही याच भागात; फणसवाडीतले आबा रिसबूड म्हणजे सर्वांत दूरचे; अधूनमधून एखाद्या रविवारी त्यांच्याकडे सातहातीचे किंवा झब्बूचे चार डाव टाकायचे. कधीकाळी सभा वगैरे असली तर चर्नीरोडवरील ब्राह्मणसभेत. कांदेवाडीतील गणपति-उत्सव असतोच, आणखी जवळपास एकदोन. त्यांना तसा देवाचा नाद, पण "भटवाडीच्या दोन देवळापासून ते ठाकुरद्वारच्या काळ्या रामापर्यंत सगळे देव आहेत आपल्यासाठी." आणि मग ते (न चुकता हसून) म्हणत, "तोच आपला धार्मिक वॉर्ड." अशी त्यांची निष्ठा. चार वर्षांखालीच गेले ते. "सोनापूरही जवळच," असे ते कधी कधी म्हणत त्याची आठवण भडभडून आली तेव्हा.

जे दादांचे तेच कानामात्रेच्या फरकाने शेजारच्या तात्यांचे आणि दाजींचे आणि वामनरावांचे आणि चिंतोपंतांचे. घर आणि कचेरी यांमध्ये आखलेल्या मार्गावरून नाकासमोर जायचे, यायचे; इतर गोष्टींशी कर्तव्य नाही. कसल्या उचापती नाहीत, भलती हाव

नाही. ‘सुप्रिटेण’ होणे ही एकुलती एक महत्त्वाकांक्षा; चार पोरेवाळे होऊन पोरींना स्थळे मिळावीत आणि पोरगे नोकरीला चिकटावेत ही सांसारिक योजना. कोकणातल्या गावी वर्षाआड जाता आले, आणि येताना थोडी आंब्याची साठे आणि काजूगर आणि आमसुले आणता आली तर घरातल्या कुळाचाराप्रमाणेच वाडवडलांशी निष्ठा ठेवल्याचे समाधान. तेवढाच देहाला प्रवास. फार तर कोणी कधीकाळीं पंढरपूरची यात्रा केलेली असते, किंवा कोणाला पुण्या-नाशकाला “अगदी घरातलंच कार्य उभं राहिलं” म्हणून नाइलाजाने जावे लागलेले असते. एरव्ही परप्रांत म्हणजे परदेशासारखा. ओरिसा काय नि ऑस्ट्रिया काय, इतिहासाच्या पुस्तकातल्या कसल्या ‘मुसलमानी’ वंशावळयांसारख्या या भूगोलातल्या नामावळया. खरे म्हणजे, परप्रांत सोडाच, देशावरची गावे तेवढीच परकी. इतकेच की तेथून कोठून तरी—साताऱ्याहून, नाहीतर सांगलीहून—एखाद्या घरात कधी पत्र येते. ‘नागपूर-वऱ्हाडकडे’ कोणाचा तरी ‘दूरचा’ नातेवाईक असतो. वामनराव पोष्टात नोकरीला; त्यांच्या हाताला मात्र ‘कुठकुठल्या गावांचा’ सराव झालेला. पाय मात्र सगळ्यांचे येथेच रोवलेले; आणि मनेही. उगाच पसारा नको, वेग नको; तो सगळा चवचालपणा. दार्जींचा एक ‘उनाड’ चुलत मेव्हणा कसल्याशा कंपनीचा फिरता एजंट आहे. तो कधी येतो आणि पोरांना डेक्कन क्वीन, फ्रंटिअर मेल, फ्लाइंग राणी, ग्रँड ट्रंक असल्या नावांनी थक्क करतो. दाजींना मात्र कसेसेच होते. ऑफिसातला तो फाजील होर्मसजी ‘टिफिन’च्या वेळी मुद्दाम कटलेस, चिकन् फ्राय, खिमा, ऑम्लेट, असली संध्या केल्यासारखी नावे घेतो तेव्हा होते तसेच...

मुंबईतल्या मुंबईतही तेच. जुन्या शहराने घासाघासाने नवी उपनगरे पचवली, माणसांचे लोट येऊन महामुंबई अफाट पसरली. पण आमचे हे बेट तसेच राहिले; भोवतालच्या न रंगांपासून अलग, पाय पोटाशी घेऊन संपर्क टाळणारे. वाणी, शिंपी, कापडवाले, कोळसेवाले, न्हावी तेच; पिढीला पिढी. वाहन लागलेच तर शक्य तोवर ट्रॅम किंवा व्हिक्टोरिया. आता पिवळ्या चुणचुणीत टॅक्सींचा इतका सुळसुळाट झाला; त्याही तुमच्या मंद आणि खिळखिळीत व्हिक्टोरियाहून स्वस्त. पण नाही. या चाळीबाहेर टॅक्सी उभी राहिलीच तरी ती सहसा कोणा चाळकऱ्यासाठी नव्हे. का कोण जाणे, तो छचोर भपका वाटे. तात्यांना एकदा ऑफिसातच खूप ताप भरला म्हणून खुद्द त्यांच्या साहेबाने टॅक्सी बोलावली; पण तात्या उतरले जरा अलीकडेच, गिरगाव रोडवर. तेथून ते कसेबसे, झुकांड्या खात, घरापर्यंत आले. आगगाडीसुद्धा नकोच. तात्यांचे ऑफिस चर्चगेटजवळ—वडीलही (बापू म्हणत त्यांना) तेथेच नोकरी करीत; आगगाडीने जात-येत. तीस वर्षांपूर्वी विजेच्या गाड्या आल्या; एका आठवड्यातच बापूंनी सांगून

टाकले, "या महिन्याचा पास संपला की आगगाडी बंद; महाग पडली तरी ट्रॅम बरी." कारण म्हणे या विजेच्या गाड्या एकदम सुटतात; लौकर वेग घेतात. असे बापू हादरले. ऑफिसमध्ये कोणी म्हटले, "बापू, ट्रॅमसुद्धा त्याच विजेवर चालते ना तुमची?" बापूंचे उत्तर : "आपल्याला काय माहीत? आमची ही ट्रॅमची वीज संथ आहे, घायकुतीची नाही. आणि आपल्याला कुठं घाई आहे? पाच मिनिटं लौकर वसू जेवायला." बापूंच्या ऑफिसातील सहकाऱ्यांना हा चेष्टेचा विषय होता. पण चाळीला ते पटले. कोट-विभाग हीच कारकुनांची मक्का; त्या दैनिक वारीला ट्रॅमसारखे निवांत वाहन नाही अशी चाळीची धारणा. पुढे बसगाड्या धावू लागल्या तरी ती डगमगली नाही; त्यांचे दरही चढे, आणि चिंतोपंत म्हणत त्याप्रमाणे, "तीही मोटारच; टॅक्सीची अक्का!" ट्रॅमने एक किंवा फार तर दीड आण्यात कोठेही जाता येई; अगदी कालपर्यंत 'चेंज' तिकिटे मिळत; कोठे 'चेंज' घ्यायची हे व्यवहारज्ञान नव्याने प्रवास करणाऱ्या चाळकऱ्याला समजावून सांगितले जाई. बोरीबंदरचा द्राविडी वळसा टाळून सरळसोट 'फाउंटन'ला जाणारी आठ नंबर म्हणजे "त्यापुढं तुमची ती मेल गाडी झक् मारते." तिच्याविषयी शिळोप्याला बोलत, तिच्यासाठी सकाळी ऑपेरा हाऊसपर्यंत पायपीट करीत. बायकामुलांनाही तिचे माहात्म्य ठाऊक होते; आवर्जून ती एकमेकांना दाखवीत. तीनचार वर्षांपूर्वी तो मार्गच उखडून टाकला तेव्हा आमच्या घराला केवढा धक्का बसला. महिनाभर आम्ही त्याविषयी बोलत असू. गिरगावकरांची सोय जाणून कॉर्पोरेशनने त्याच मार्गावर आणि सवलतीच्या एक आण्याच्या दरात 'के' बस सुरू केली, पण आमच्यासारख्यांची भावना जाणली नाही. आम्ही ट्रामसाठी ताटकळलो, बोरीबंदरचे अपसव्य केले आणि अशी वेळेची खराबी केली; पण निष्ठा सोडली नाही. म्हणजे निदान बहुतेकांनी. तसा एखादादुसरा 'क्रियानष्ट' असेल...

मला आठवते, आम्ही लहान होतो तेव्हा गावची—म्हणजे आमच्या गुहागरची—कुणी पाहुणी मुले आली—किंवा शेजाऱ्यांकडे आणखी कुठची—की, तासन् तास आम्ही गॅलरीत उभे राहून ट्रॅमगाड्यांची मोजदाद करीत असू. 'सहा नंबर' आणि 'आठ नंबर' यांतला फरक, कंडक्टरपाशी तिकीट कसे मागायचे, वरचा दांडा मागेपुढे कसा करतात, तिकिटाला भोक का पाडतात, बायकांसाठी कोणती बाके, असले ज्ञान आम्ही चाळकरी मुले असे धाडधाड बोलून दाखवीत असू की बिचारे पाहुणे तोंड वासून ऐकत, आणि गावी परतल्यावर तेथील सोबत्यांपुढे त्याची उजळणी करीत. मला आठवते, कधी जवळपास कोणी मोठे माणूस असले तर ते आमची चूक दुरुस्त करी; अथवा आणखी गहन तपशील सांगे. चिंतोपंतांना तो उत्साह मोठा. आपण हुशारीने 'चेंज' तिकीट

घेऊन दोनतीन कामे एका आण्याच्या प्रवासात कशी उरकतो हे ते पुन्हा पुन्हा सांगत. तेच कशाला, करंदीकरांच्या रमाकाकूंना कसलासा 'लाइट' घेण्यासाठी मधूनमधून परळच्या इस्पितळात जावे लागे; त्याही आमच्यांत लुडबुडत. आपण 'कंटक्टराची' नाही तर 'डायव्हराची' कशी 'खरडपट्टी काढली' ते रंगून सांगत. आम्हांलाही आवडे ते ऐकायला; कारण एवढे ट्रॅमचे सोडले तर रमाकाकू आमचीही खरडच जास्ती काढत.

असे आम्ही ट्रॅमचे आवाज कानात ठेवून वाढलो. पावणेपाचच्या सुमारास पहिल्या ट्रॅमच्या टणठणाटाने घराला जाग येई. पूर्वी रात्री नवाला दोनतीन मिनिटे कमी असताना शेवटची 'आठ नंबर' कोटाकडे जाई; पोराबाळांना अंथरुणात पडायचा तो इशारा असे. तासाभरात मोठी माणसेही गप्पा आणि इतर उद्योग आवरून घेत; पण कोठे काही लांबले किंवा झोप येईना म्हणून पडल्यापडल्या खुसखुस चालली तरी साडेबाराच्या शेवटच्या ट्रॅमनंतर सामसूम व्हायचीच. आता घराला निश्चल आणि गाढ झोप लागायची.

आणि घराची झोप उडाली ती त्या वार्तेने. कोणीकोणी धीर दिला की अशा भुमका मधूनमधून उठतातच. त्यांच्याकडे फार लक्ष देऊ नये. पण असल्या बातम्या खऱ्या ठरायच्याच! एके दिवशी सकाळी वर्तमानपत्रांत छापूनच आले—अगदी अधिकृत वृत्त म्हणून—की एक ऑक्टोबरपासून गिरगावच्या ट्रॅम बंद...

त्या शेवटच्या पंधरावीस दिवसांत घर कावरेबावरे झाले होते. जाणाऱ्यायेणाऱ्या प्रत्येक ट्रॅमकडे वाकवाकून डोळे भरून पाही. आणि पूर्वीपेक्षाही अधिक गदगदा हाले. आता पूर्वीची दुश्चिन्हे आठवू लागली. 'आठ नंबर' तशी गेली. सॅंढर्स्ट रोडचीही गेली; आणि कालपरवा कुलाब्याची आटपली. तेव्हा आम्ही थोडे चरकलो होतो. पण ते एवढेसे तुकडे छाटले गेले; हा गिरगावचा म्हणजे ट्रॅमचा राजमार्ग; त्याच्यावर घाला येईल असे कसे वाटेल?

आता ती ट्रॅम शेवटचे दिवस मोजत होती, खरे म्हणजे आम्ही मोजत होतो...शेवटी-शेवटी तर तास. आमच्या चाळीत मुलांच्या हाती शाळेची फी आणि बारीकसारीक खरेदी याशिवाय पैसा देण्याची रीत नाही; पण आता बिऱ्हाडाबिऱ्हाडातून ती मोडली.

"जा रे, फिरून या ट्राममधून. मजा करून घ्या." दोनतीन पोरे तर माटुंग्यापर्यंत जाऊन आली. पोरांचेच कशाला ? बहुतेक राव आणि पंत चारदोन अकारण फेऱ्या मारून आले. माझेच घ्या. मी त्या शेवटच्या रविवारी सकाळीं दादरपर्यंत गेलो; संध्याकाळी कोटात. अर्थात काहीतरी निमित्त होतेच...पण कोणी कोणाला निमित्त विचारीत नव्हता—बायकासुद्धा. अगदी शाळकरी विमल-कमलपासून ते वाकलेल्या आजीबाईपर्यंत. करंदीकरांच्या रमाकाकूंनी तेवढ्यात पुन्हा 'लाइट' सुरू केला—एक दिवसाआड परळला जाऊन येत. आमची ही इतकी व्यवहारी; पण एकोणतीस तारखेला प्रार्थनासमाजाजवळ कायसेसे आण्याभराने स्वस्त पडते म्हणून तेवढ्यासाठी ट्रॅमने गेली...

बुधवारी सप्टेंबरची तीस तारीख. त्या दिवशी घराची काय घालमेल झाली असेल तुम्हीच कल्पना करा. कोणाचे चित्त ठिकाणावर नव्हते. संध्याकाळी आम्ही जड पावलाने ट्रॅममधून उतरलो; आणि ती पुढे गेल्यावर वळून वळून तिच्याकडे पाहत होतो. दुपारभर म्हणे बायका कसली कसली कामे काढून बाहेर गॅलरीतच होत्या. आणि संध्याकाळी 'पुरुष घरी आल्यावर'देखील कधी नव्हे त्या आतबाहेर करीत होत्या. मुलेही घोळक्यांनी शेवटची फेरी मारून आली.

...रात्रीची जेवणे कशीबशी चिवडून पुन्हा माणसे बाहेर आली. पुरुष आणि मुले बाहेर, वयस्क स्त्रियाही. इतर स्त्रिया उंबरठ्याशी बसल्या. तान्ही मुले सोडल्यास सगळे जागत होते...जुन्या जुन्या आठवणी निघाल्या...तो लांब मिश्यांचा धिप्पाड भैया ड्रायव्हर—"बस पुढे जाऊ द्यायचा नाही"...दुसरा तो पोरगेलासा; पायाखालची घंटा तालात वाजवायचा...आणि कोणी 'गमत्या कंडक्टर'...मुलेही मोठ्यांसारखी बोलत होती—त्यांच्या चिमुकल्या आठवणी, त्यांत काही ऐकलेले, काही मनचे, अशी भर...मध्येच बोलणे खुंटे. दोन मिनिटे स्तब्ध. पुन्हा कोणीतरी सुरू करी.

घटका भरत आली. ज्याच्याज्याच्याकडे मनगटी घड्याळ होते त्याने त्याने ते लावले होते; इतर भिंतीवरचे घड्याळ दिसेल अशा बेताने पुंजके करून बसले होते...आता एकच ट्रॅम राहिली, शेवटची; साडेबाराची. हळुहळू, जणू नकळत, एकएकजण उभा राहिला...अरे! पण साडेबारा होऊन गेले—वर पांच मिनिटे व्हायला आली...की शेवटची ट्रॅमही रद्द केली या लोकांनी ?...सगळे कावरेबावरे झाले!—म्हणजे मघा गेली तीच शेवटची ? आपण बोलण्याच्या नादात नीट पाहिलेही नाही तिच्याकडे!—एकदोन पोरे धडपडत खाली गेली—आज त्यांना कोणी मना केले नाही.

त्या पोरांनी तिकडूनच अर्धवट ओरडून, अर्धवट खुणेने, सांगितले, "आली!" जो तो कठड्याला भिडला—पुरुष-स्त्री पाहिले नाही; हे अघटितच. सगळे घर श्वास रोखून क्षणभर पुढे कलले...ट्रॅम दिसेपर्यंत ती येत असल्याचे कळले नाही. तिच्या आवाजावरही आतील उतारूंचे आणि रस्त्यावरच्या लोकांचे आवाज चढले होते. खोटे वाटेल, पण आमच्यापैकीही दोघेतिघे मोठ्याने ओरडले...आमच्या हिला त्याचे हसू आले.

या वेळी म्हणजे ट्रॅम सुसाट जायची. आज अडखळत गेली, निदान गेल्यासारखी भासली. खरे सांगू, नीट काही दिसलेच नाही. तिकडे पाहू की आजूबाजूच्या माणसांकडे पाहू असे झाले होते...नीटसे कोठे पाहिलेच नाही—इतकेच आठवते, की खूपसे लोक होते, कसला तरी घोष करीत होते, काही जण ट्रॅमच्या पायऱ्यांवर उभे होते, ट्रॅम चालवण्याच्या पितळी दांड्यावर हार होता.

इतक्या सावकाशीने ट्रॅम गेली तरी घर हादरलेच—एका वेळी दोन ट्रॅमगाड्या आणि चार बस जाऊन हादरणार नाही असे.

चकाकत्या रुळांकडे पाहत चारपाच मिनिटे आम्ही स्तब्धपणे उभे होतो...कोणीतरी बाईने करड्या आवाजात मुलांना झोपायला येण्यास बोलावले...लोक पांगले...सामसूम झाली.

इतरांचे कोण जाणे, मला किती वेळ झोप येईना. आली ती अडखळत, फरफटत. मधून-मधून ट्रॅमच्या खणखणाटाने जाग येई. घर शिरशिरल्यासारखे होई. वेडगळ स्वप्नांचे तुकडे सरकत...मीच खाकी वेष चढवून, पोटऱ्यांवर खाकी पट्टी बांधून, भलामोठा चढाव घालून जोराजोराने घंटा वाजवीत आहे आणि उलटसुलट जाते फिरवल्यासारखे ते पिवळेधमक दांडे डाव्याउजव्या हातांनी वेगाने फिरवीत ट्रॅम दौडवीत आहे आणि तिकिटांना भोके पाडून उतारूंना देत आहे आणि मधूनच वरचा दांडा मागचा पुढे करून ठेवीत आहे.

पहाटे पावसाची केवढी सर आली; अर्ध्या झोपेलाही ते कळले...आणि तिने पांघरुणात गुरफटून घेतले.

शेवटी जाग आली तेव्हा चांगले सात वाजून गेले होते...असे कधी झाले नव्हते... भोवतीही विशेष हालचाल नव्हती; असल्यास न बोलता...मी कठड्याशी उभा राहिलो; आणखीही एकदोघे होते कोणीतरी. त्या कुंद हवेत रूळ उठून दिसत होते. पाऊस केव्हाच पडून गेला तरी अजून घराच्या पागोळ्यांवरून मोठमोठे थेंब पडत होते.

# जुने चित्र

तीन वर्षे होऊन गेली. एकदा संध्याकाळचे श्री० ना० पेंडसे आणि वा० रा० गानू आले. निवांत बैठक जमली. जुन्या गोष्टी निघाल्या. हायस्कुलात ते माझ्या एकच वर्ष मागे होते; पण आमचा परिचय अगदीच ओझरता होता. आपापल्या वर्गात किंवा तुकडीत रमलेली आम्ही मुले. आणि वर्गतुकड्यांचे बांध फोडून मुलांनी एकत्र हसाखेळावे अशी त्या शाळेची प्रकृती नव्हती. कधीकाळीं संमेलनानिमित्त जेवणावळ असलीच तरी त्या पंगतींचे वेळापत्रकही वर्गाप्रमाणेच. उगाच गोलंकार नाही; वर्गभेद कडकपणे पाळलेले—तेव्हाच्या जातिभेदांसारखेच. म्हणून तो गानू, त्याचा दोस्त तो पेंडसे, आणि हा राजाध्यक्ष अशी आडनावांपुरती जुजबी ओळख. पण मध्ये तीस वर्षे गेली ना! असा काळ लोटला की स्नेहाचे रंग उडतात, वठून गेलेली आपुलकी काही केल्या मान धरीत नाही, आणि अवघडल्यासारखे होते, असा अनेकदा अनुभव येतो. पण हाही काळाचा चमत्कार की कित्येकदा जे मुळातच अगदी पुसट त्यावर त्याचा असा झटक्यात हात फिरतो, आणि कसल्याशा चित्राप्रमाणे, सगळे लख्ख दिसू लागते. नसत्याचे असते होते. या मधल्या वर्षांच्या पाशांनी आम्ही बांधले गेलो; स्नेहाला जुनेपण, मुरलेपण आले; ज्या आठवणी निघाल्या त्यांत आम्ही समभागी होतो. अनुभव सरमिसळ झाले. ते अनुभव शाळेचे, आणि शाळेभोवतालच्या गावाचे—दादरचे.

खरे म्हणजे आम्ही शाळेवर फार थोडे बोललो; दादरवरच बहुतेक बोलत होतो. कोणा फार जुन्या, कधीच आपल्यांतून गेलेल्या, जवळच्या माणसावर बोलल्यासारखे. मला वाटते, त्या जवळिकीने आम्ही आता कधी नव्हे ते असे एकमेकांत गुंतलो होतो. शाळेने नाही केली ती करामत. ती निमित्तवजा होती.

पेंडसे सांगत होते की आपल्या 'कलंदर'मध्ये ते दादर आपण थोडेसे उभे केले आहे. 'कलंदर', मला वाटते, तेव्हा छापले जात होते. म्हटले, गृहस्थ आपली ती बुरोंडी आणि गारंबी आणि हर्णै सोडून या कादंबरीपुरता तरी जरा बाहेर पडला एकूण! पण दादरही तसेच जिवंत करील हो! आणि इतर वाचकांना, बहुतेकांना, ओळखता आले नाही तरी मला येईल! माझे पोरपण तेथे गेले नाही का?—कळू लागल्यापासून चौदा वर्षे होईपर्यंत. माझी तीच गारंबी आणि बुरोंडी. आणि त्यानंतरही वर्षानुवर्षे—खरे

म्हणजे अगदी परवापरवापर्यंत—उठसूठ दादरला जायचो; निमित्त काढकाढून. आपल्या गावी गेल्यासारखा.—हे सगळे मनातल्या मनात म्हटले.

आणि त्यातच मधूनमधून बोलतही होतो. पेंडशांनी कुठली जुनी वाडी काढली—किंवा गल्ली किंवा दुकाने—की ती नेमकी कुठे कुठे होती, आज त्यांचे रूपांतर कशात झाले आहे, याचा मी विस्तार करायचा; आणि मी काही दाखवले की पेंडशांनी बारीकसारीक तपशील भरायचा. अशी जणू जुगलबंदी चालली होती—आठवणींचे तुकडे टाकत टाकत. उठावाला गानूंची साथ होती.

दादर ते माहीमचा पट्टा तेव्हा दोनतीन रस्ते सोडल्यास वाड्यांनी व्यापला होता. उंचउंच माड, तळाशी कोठे मोसमी भाज्या लावलेल्या; मध्येच एखादी झोपडी, अथवा झोपडीवजा मोठे घर—आडवे पण टेंगणे; क्वचित् दुमजली सुखवस्तू बंगला; इथूनतिथून पायवाटा—नवख्याला चुकविणाऱ्या. या सगळयांचे आजही कोठेकोठे अर्धेमुर्धे अवशेष—अजबखान्यात ठेवल्यासारखे—दिसतील. तशाच गल्ल्या. कशातरी वाड्यांमधून, घरांना आणि बांधांना धरून, भेलकांड्या खात, अजागळपणे जात. मध्येच पसरट, मध्येच आवळलेल्या. पावसाळ्यात राड, एरव्ही धूळ; आणि बारा महिने कसलेकसले वास! त्यांतल्या कित्येक गल्ल्यांचे नेटके रस्ते झाले. आजच्या एकदोन भपकेदार राजरस्त्यांचेही कूळ शोधलेच तर तशा गल्लीत सापडेल. लढाईत उखळ पांढरे होऊन एखादा भंगड माणूस पाहतापाहता मातबर व्हावा तसे अशा काही भागांचे झाले. पण सरसकट सगळयांचेच भले झाले. तेव्हाचे बऱ्यापैकी रस्ते रुंदावले; डांबर-सिमिटाने नितळ झाले. त्यांना आखीव फरशीचे फूटपाथ आले. वाढत्या लोटांना आता ते पुरे पडत नसतील—पण त्यांना नवे रूप मिळाले तेव्हा ते किती प्रशस्त आणि साजरे दिसत ते चांगले आठवते.

उदाहरणे किती सांगावीत? एवढा चौडा गोखले रस्ता. दोन्ही अंगांना सुबक इमारती घेऊन झुलतो. तीसपस्तीस वर्षांपूर्वी तो मुळातच नव्हता. त्याला गल्लीकुचीचेही संशयास्पद कूळ नव्हते. वाटेतल्या वाड्या नि झाडझाडोरा नि झोपड्या यांवर नांगर फिरवीत त्याने मुसंडी मारली—आजच्या रणगाड्यासारखी. आणि एवढा गाजलेला, शानदार शिवाजी पार्क—प्रेमिकांची हौस पुरवणारे, क्रिकेटच्या सामन्यांची आणि सांस्कृतिक उत्सवांची आणि लाखांनी हजेरी मोजायची असते अशा राजकीय सभांची सोय पाहणारे ते ऐसपैस मैदान आणि ती रेखीव वस्ती तेथे नव्हतीच. ते सगळे

वाड्यांतून आणि भाजीच्या वाफ्यांतून, माड आणि झोपड्या उपटून, उभे राहिले. तेव्हा भर दिवसा तो भाग ओलांडून समुद्रकाठी पोचताना आमच्या बालमनाला धाडसाची लज्जत मिळायची. दातारांच्या अथवा ऐतिहासिक कादंबऱ्या आम्ही वाचीत असू, त्याची आठवण घट्ट धरून इकडेतिकडे पाहत सोबतीने जायचे आम्ही. त्या समुद्राकडे तेव्हा कोणी विशेष फिरकत नसे. शेजारच्या स्मशानभूमीला शोभेलशी शांतता तेथे नांदायची. आता त्याची 'चौपाटी' झाली. सुटीच्या दिवशी संध्याकाळी गुदमरणाऱ्या गर्दीतून माणसे हवा खात फिरतात...

तेच दादरच्या पूर्वेकडील भागाचे. माटुंग्याच्या उंबरठ्यापर्यंत पसरलेली हिंदू कॉलनी कोणाला अनादी वाटत असेल. पण तशी नाही ती. तीसपस्तीस वर्षांपूर्वी सगळे सपाट होते तेथे. एकापुढे एक मैदाने. कुठे कुठे क्रिकेट चालायचा. मध्यावर मोठ्यांचा आणि कोपऱ्याकोपऱ्याने छोट्यांचाही. अशाच एका कोपऱ्यात मोठ्या चेंडूने डोळा निकामी व्हायची पाळी आली होती माझ्यावर...ती मैदाने तुडवीत माटुंग्याच्या किंग्ज सर्कलला जाणे हेसुद्धा अगदी सफरीच्या अवसानात होई. मुख्य म्हणजे टिळक पूलच जाग्यावर नव्हता. 'अभूतपूर्व' हा शब्द तेव्हा ठाऊक नव्हता (तसल्या तोंडभरू शब्दांचे व्यसन लागायला अजून वेळ होता)—पण तो पूल तसा काहीसा होता, हे मोठ्यांच्या बोलण्यातून आम्ही टिपलेले. ते अजस्र धूड उभे राहत होते तेव्हा आ वासून आम्ही त्याच्या भोवतीभोवती असू. अर्धे पुरे झाल्यावर त्यावर हुंदडत असू, चढणीच्या रस्त्याची पाखे दगडांनी बांधून टाकताच हात न टेकता त्यावरून वर जाण्याची कसरत मला फार प्रिय. आणि पक्के आठवते की दुपारच्या सुटीत एकदा माझी कोणातरी दोस्ताबरोबर पुलावरून धावायची शर्यत लागली. काही अंतर काटले आणि गपकन दिसले की पूल संपला; अजून तो पुरा झाला नव्हता हे विसरलो होतो आम्ही. पूल संपण्याआधीच आमचे ब्रेक नीट लागले म्हणून बरे, नाहीतर...अजून डोळ्यापुढे ते चित्र आहे. पण कोण जाणे हा 'रोमांचकारक' प्रसंग त्या वेळच्या बालप्रतिभेने किती नटवला आणि मधल्या वर्षांनी किती गडद केला तो! नक्की सालही आठवत नाही. दोस्त कोण, तेही. बहुतेक चंदू ठाकूर असावा. त्याला विचारता येईल. पण नको. त्याने आपल्या लहानपणची कादंबरी रचून ठेवली असेल त्यात हा प्रसंग नसेलही. हे सगळे स्मरणातून निघत आहे. आधार आणि पुरावा आणि तारखा असला संभावित प्रपंच हवा आहे कुणाला?

आणि हे आत्मचरित्रही नव्हे; तेव्हा तसली मखलाशी नकोही. हे एक जुने चित्र आहे;

जपून ठेवलेले, किंवा मुद्दाम न जपताच सुरक्षित राहिलेले. तरीही इतके जुने, म्हणजे कोठे रंग उडाले असणार, कोठे निराळी छटा चढली असणार, कोठे सुरकुती पडून रंग गडदही दिसत असेल...

चित्र-शिल्पांसारख्या कला म्हणे कालबद्ध असतात. एक विशिष्ट क्षण त्यांत स्थिर होतो. पुढचेमागचे कल्पनेतून पुरवायचे. माझ्या या चित्रात कितीतरी वर्षे आहेत. कोठे अगदी सरमिसळ झालेली; कोठे तुकड्यांसारखी अलग राहिलेली. पण अधिक जुनी ती धूसर असे नव्हे. आपल्या प्राचीन चित्रकलेत—मोगली किंवा राजस्थानी—अंतर-भेद यथार्थपणे दाखवण्याचा हेतू नसतो. मागचेही पुढच्याच पातळीत घेऊन बसते. माझ्या या चित्रात कालभेदाचे तेच होते...कधी मागचे ते अधिक ठळक असेही झाले असेल. हे काळाचे कवटाळ. त्याची भुलभुलाई...

त्या चित्रातला एक तुकडा किती स्वच्छ दिसत आहे. जरा अधिक जुना; सदतीस-अडतीस वर्षांपूर्वीचा वेस्टर्न (तेव्हाच्या बी० बी० सी० आय०) रेल्वेच्या स्टेशनपासूनचा, पश्चिमेकडील. दोन फलाटांचे टुमदार स्टेशन. ते जुने प्रचंड कमानींचे छप्पर तेवढे राहिले आहे आता. स्टेशनात पूल नव्हता. गर्दी माफक असे. विशेषतः कारकुनांची—सकाळी आणि संध्याकाळी. स्टेशनाच्या दक्षिणेला लागूनच फाटक. तसेच जरा पुढे जी० आय० पी० चे (हल्लीच्या सेंट्रलचे)—त्यातून सगळी रहदारी. नेमक्या त्या रस्त्यावरूनच हल्लीचा पाय-पूल जातो. मालगाडी मध्ये अड(मड)ली की चांगलाच खोळंबला रस्त्यावरचा ओघ. इतर गाड्यांनी— लोकल अथवा बाहेरगावच्या—उगाच थोडी खोटी होत असे...पण त्याबद्दल वर्तमानपत्रांच्या संपादकांस कोणी लिहीत नसावे. मला वाटते, फार घाई नसेच कोणाला तेव्हा. आम्हांला अर्थात नव्हतीच. उलट, बाहेरगावच्या गाड्यांची वेळ साधून आम्ही खोळंबायचो. शेवटी गाडी पुढ्यातून गेली की—आम्हीच धडधडायचो. विशेषतः फर्स्ट क्लास अथवा डायनिंग कारमधील नवलाचे दिवे पाहिले की आत लखकन व्हायचे. आमच्यांत तर तटच होते दोन. 'बीबी'चे अभिमानी आणि 'ज्यायपी'चे. मी पहिल्यातील. कारण त्या काळी मला दूरचा कधी प्रवास घडायचा तो त्या रेल्वेने. त्या त्या गाड्यांचे फुशारकीचे वर्णन प्रतिपक्षाला आम्ही ऐकवत असू. गडकऱ्यांनी इंदूबिंदूंनी ग्रासलेल्या कामण्णाला बी० बी० आणि जी० आय० पी० च्या जोडकचाट्यात सापडलेल्या मुंबई शहराची उपमा दिली आहे. आम्हांला हे माहीत असते तर गडकऱ्यांशी भांडलो असतो. ते तेव्हा हयात नव्हते हे सोडून द्या. इतक्या निकट त्या दोन रेल्वे मुंबईत कोठेच येत नाहीत. मधला तो शेदीडशे वारांचा रस्ता

मंतरल्यासारखा वाटे. अहो, त्याच्या दोन्ही बाजूंनी दोन पंजाबमेल जायच्या! इंदूबिंदूंचे आम्हांला तेव्हा काय समजणार, पण तो रस्ता म्हणजे कामण्णा असे असते तर आपण जन्मभर कामण्णा व्हायला राजी झालो असतो. हो, त्याच रस्त्याच्या कडेला दादरचा भाजीबाजार भरत असे. तेथील शंकराचे देऊळ अर्थात अजूनही तेथे आहे. पण आता ते हमरस्त्यावर नाही. शंकराला एकलेपणाची सवय खरी, पण वरून पूल गेल्यापासून त्याची उपेक्षा चालू झाली. त्याच्या वामांगी मारुतिरायाचा सवत सुभा असे. शनिवारी आपल्याला रुईचा हार चढवून, स्वतःच्या कपाळावर आपल्या देहावरच्या शेंदराचे बोट लावणारे एक हाडकुळे पोरगे रायांना आठवत नसेल. तो मी. अर्थात तसे आणखीही कितीतरी असतील. देवदेवळांचे कांड फार असे त्या काळी. मात्र माझा हा भक्तीचा सोहळा बारमाही नसावा; वार्षिक आणि सहामाही परीक्षांचे वेध लागले की त्याला भरती येई असे वाटते. त्यांतही पहिली आषाढी, दुसरी कार्तिकी...या शंकराच्या देवळात किती पुराणे आणि कीर्तने ऐकली मी! नेहमीच काही भाविकतेने नव्हेत... उडवण्याइतके नाक आल्यावरही कुतूहलाने ऐकली...

'वीबी'च्या स्टेशनाबाहेरील दृश्याविषयी बोलणार होतो—तो रेल्वेच्या वासाने पूर्वेकडे झुकलो. या दृश्यात बैलांचे 'रेकले' आहेत. घोड्यांच्या 'व्हिक्टोरिया' त्या मानाने कमी; तिची प्रतिष्ठा मोठी. टॅक्सी त्या काळी होत्या की नाही कोण जाणे. लहान शहरगावात गाडीतळ असे, तसा तो भाग दिसायचा. खूपशी मोकळी जागा. कडब्याचे गवत पडलेले—घोड्याबैलांचे उच्छिष्ट. वाहनांना बाहेर पडायला रस्ता एकच—फाटकातून सरळ वडाखालच्या मारुतीकडे जाणारा. स्टेशन आणि लेडी जमशेटजी रोड यांमध्ये रस्ते, वस्ती, नव्हतीच. खोलगट जागी पाणी साचे. रात्र पडली की सगळे सुन्न. कोठे एखादा गॅसचा दिवा मिणमिणत असायचा; खुद्द स्टेशनात गॅसचे तुरळक दिवे भगभगत असत. भर दुपारीही हालचाल कमीच. तो सगळा भाग म्हणजे आता एक प्रचंड बाजार झाला आहे. त्या इमारती आणि दुकाने आणि विशेषतः संध्याकाळचे तुडुंब वाहणारे ते रस्ते...

पण शहरोशहरी हेच झाले आहे. माणसांची पैदास वाढली; त्यांतली बहुतेक शहरांनी जिरवली. दूरची लढाईदेखील शहरांनाच मानवते; ती पुष्ट होतात—सूज आली असे ज्याने त्याने म्हणण्याइतकी. कालच्या पडीत जमिनीवर घरे आणि माणसे तरारून आली. त्या जमिनीच्या भाग्याप्रमाणे कोठे टोलेजंग इमले आणि त्यांना शोभेशी माणसे; कोठे खुराड्यांची लक्तरे आणि त्याजोगती माणसे...इतर शहरांप्रमाणे मुंबईलाही हे दुहेरी वैभव लाभले. दादरला तेवढा दुहेरीपणा कधी नव्हता, व अजूनही नाही. ज्या 'गलिच्छ

वस्त्यांच्या उच्चाटणा'विषयी आपण ही पंधरा वर्षे हिरीरीने बोलत आलो त्यांनी दादर डागळलेले नाही. दुसऱ्या टोकाचेही अतिरेक नाहीत. मजल्यांची डोळे फिरवणारी चवड तेथे अजूनही नाही. कारण त्याची वाढ झाली ती उपनगरासारखी—त्या बंधनात आणि त्या मोकळिकीने.

आजचा दादरकर कोटात किंवा गिरगावात जाण्यासाठी निघाला की "मुंबईला जाऊन येतो", असे म्हणतो की काय कोणास ठाऊक ? कालपरवापर्यंत म्हणत असे. पार्लेकर म्हणायचा, ते पुराव्याने. माहीमच्या खाडीपर्यंत मुंबई शहर हे भूगोलातच होते—आणि नगरव्यवहारात. दहा वर्षांपूर्वी जोगेश्वरी-भांडूपपर्यंतची उपनगरे मुंबईत सामील झाली; पाच वर्षांपूर्वी बोरीवली-मुलुंडपर्यंतची. पाचदहा वर्षांत जिभेचे जुने वळण सुटत नाही. पण दादरचे काय ? त्याची जीभ अशी पिढ्यान्‌पिढ्या स्वतःविषयी इतकी लीन कशी राहिली ? परगावच्या माणसांना ही भाषा चमत्कारिक वाटे. ती मुंबईला म्हणून दादरला येत, आणि त्यांचा यजमान मुंबईला म्हणून आणखी दोन कोस दक्षिणेकडे जाई ! पण हा नुसता तोंडी व्यवहार नव्हता. मला आठवते की त्या काळच्या 'बीबी'च्या टाइम-टेबलात ग्रँटरोड ते कुलाबा या स्टेशनांपुरता कंस टाकून त्यालगत 'मुंबई' हा शब्द आडवा छापत ! उरलेली मुंबई नव्हे ! 'जीआयपी' तसे करीत नसे. तिच्या लेखी या शहराची एकात्मता अविवाद्य होती !

पण लेखी वा तोंडी म्हणा अगर म्हणू नका, दादरची रीतभात उपनगरी होती. दक्षिण मुंबईहून त्याचा स्वभावधर्म निराळा होता—गावधर्म म्हणा. राहायला दादर, उद्योगाला मुंबई—रंजनासाठीही मुंबई ! भाजी-किराण्यांसारखे जुजबी प्रकार सोडल्यास इतर खरेदीसाठी मुंबई—कापड-वहाणांसाठीही. समुद्राची हवा खायला मुंबईची चौपाटी (दादरचा चौपट लांबीचा किनारा सोडून). क्रिकेट, नाटक-सिनेमासाठी मुंबई. चांगलेचुंगले खायलाप्यायला, षोकमौजेला मुंबई. खरे म्हणजे मुंबईसाठी मुंबई. काहीतरी निमित्त काढून चक्कर मारायची. प्रवासखर्च नाही, कारण रेल्वेचे पास बहुतेकांपाशी असत. बाहेरचा वाचक ज्या रंगेल, मोहमयी नगरीबद्दल आसुसलेपणे वाची ती ही मलबार हिल ते कुलाब्याच्या दांडीपर्यंतची 'मनोहर मुंबानगरी'. पुणे-कोल्हापूरच्या फडक्यांची पात्रे रंगतीसाठी तेथे जावीत हे ठीकच. पण दादरचा कथालेखक आपल्या वल्लभांना तेथेच रवाना करत असे. इतकेच काय, दादरचे प्रेमपिपासू (म्हणजे जोड्यांनी) असलेच तर प्रेम करायला चौपाटीवरच जात असतील. तरणोपाय नाही. दादरचा समुद्रच अळणी असतो. एकेका स्थळाचा गुण !

दादर होतेच तसे संभावित. मध्यमवर्गांचे समस्त सद्गुण मनोभावे जोपासणारे. आणि मध्यमवर्गही तेव्हाचा. एका काळी टिळकांच्या कर्तृत्वाने भारलेला. ते गेल्यावर त्यांच्या गादीची प्रतिष्ठा ओसरायला दशकभर लागले. काही भागांत ही आणखी दहावीस वर्षे टिकली (काही डबक्यांत ती अजूनही रेंगाळत असावी) तर कोठे ती चारदोन वर्षांतच आटून गेली. मराठी मध्यमवर्गाला तडे गेले, आणि पाहता पाहता ते रुंदावले. जातिभेदाचा हाडांत मुरलेला रोग पुन्हा बळावला. पोटजातींना निराळेपणाची जुनी भावना नव्याने होऊ लागली. ज्ञातिसंस्था (उघड वा छुप्या), ज्ञातिवार नियतकालिके, ज्ञातिनिष्ठ इतिहाससंशोधन—अशा ज्ञातिकार्यांत मराठी शक्ती रमली. कोणत्याशा प्राण्याचे तुकडे झाले तरी ते अवयव आपला जीव राखून वळवळतात म्हणे. तसे हे निष्ठांचे तुकडे आमच्याभोवती वळवळत, फूत्कारत होते. "तुझी जात काय?" हा न बोलता विचारलेला प्रश्न सदैव पुढे ठाकायचा. काहीसा शाळेतही. दादरच्या दोन रेल्वेंप्रमाणे दोन मोठ्या शाळांतही असे दोन तट होते—एकीत ब्राह्मणांचे वर्चस्व, दुसरीत अब्राह्मणांचे. आमची पहिली; तेथे 'केसरी' हे धर्म-साप्ताहिक; केळकरांचे टिळकचरित्र हा ग्रंथसाहेब; 'टिळकांच्या आठवणी आणि आख्यायिका' या भारुडाला पुराणांची पदवी. आमच्या एका संस्कृत शिक्षकांनी वर्गात डा० भांडारकरांच्या विद्वत्तेविषयी तुच्छता दाखवली. आपण हलक्या जातींना संस्कृत शिकवतो ते केवळ कठोर कर्तव्य म्हणून, ही आठी त्यांच्या मुद्रेवर सदैव विलसत असे! 'विविधवृत्त'ला नुकतीच सुरुवात झाली होती. ते शाळेत आणणे किंवा त्याचा उल्लेख करणे हे हिंमतीचे काम होते. अच्युतराव कोल्हटकरांची पत्रेही वाळीत टाकली होती. केसरीपीठाविषयी अनादर दाखवणे, तसले काही वाचणे, हे पाप होते. दुसऱ्या शाळेत याला तोड म्हणून काय प्रकार होत हे ठाऊक नाही. याला अपवाद अर्थात होतेच; पण वळण हे.

गावातही तेच—पण मोठ्या आणि कडवट प्रमाणावर. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादाचे जहर फैलावत होते. दादरपुरती तरी ब्राह्मणेतरांची धुरा वाहत असत कायस्थ प्रभू. त्यांनी निराळी दैवते स्थापली. राम गणेश गडकऱ्यांसारख्या असीम प्रतिभेच्या लेखकाला कायस्थी देव्हाऱ्यात डांबले. (कोणा मठ्ठ ब्राह्मणाने त्यांच्याविषयी क्षुद्र उद्‌गार काढले म्हणून!) तेच 'बी' कवींचे. उभय पक्षांनी इतिहास खरवडून उखाळ्यापाखाळ्या काढल्या, पत्रांतून भडकपणे रंगवल्या. गणेशोत्सव हे तेव्हाचे सर्वांत महत्त्वाचे 'सांस्कृतिक समारंभ'. त्यांना याची झळ लागली. दादरला तीनचार तरी असत. एका ठिकाणी म्हणे व्याख्यान उधळून लावले, दुसरीकडे म्हणे मांडवावर दगड आले. पोरांना बोलायला, क्वचित् तंडायला, विषय झाला. दुखणे चरायला लागले, खेळांतही शिरले.

क्रिकेट संघांना ते रंग चढले; धावांच्या आकडेमोडीने वितुष्टाचे समाधान होईना. हमरीतुमरी चाले. माझ्या पोर-नजरेला त्याचे भेसूर रूप दिसले ते अशाच एका मामुली —रविवार दुपारच्या—सामन्यात. स्थळ हल्लीच्या 'ब्रॉडवे'समोर. तेव्हा ते छोटे मैदान होते. खेळ चालू असता मध्येच काही बाचाबाची झाली; आणि जवानमर्द यष्टिरक्षकाने यष्टी उपटून खेळणाऱ्यावर उगारली; त्याने आपली बॅट सरसावली. कोंडाळे जमले, जातिविषयक अपशब्द कडाडले. पुढे काय हाणाहाणी झाली—शब्दांची की आयुधांची —हे नीट कळण्याआधीच आम्ही दोनतीन पोरे जवळपास होतो ती भेदरून पळालो. ते सगळे तगडे बाप्ये होते. आम्ही त्या यष्टीइतके असू-नसू. हे दोन मुख्य प्रतिस्पर्धी काल पाहिल्यासारखे आजही डोळ्यांसमोर आहेत. खरे म्हणजे त्यानंतर अनेक वर्षे ते दृष्टीस पडत. तो कायस्थ प्रभू बॅट्समन तर हल्लीहल्ली पाहिल्याचे आठवते. गोरापान आणि सहा फुटी. त्या ब्राह्मण यष्टिरक्षकाचे किराणा मालाचे दुकान होते!

गांधीजींच्या तीसच्या चळवळीनंतर ही व्याधी बरीचशी मावळली; अढ्या राहिल्याच. त्या काही अशा सहजासहजी नष्ट होत नाहीत. मूर्ख अभिमान घर करून होते. त्यांना हुसकून लावायला वेळ लागतो, कणखरपणा लागतो. अर्थात् कित्येकदा हे भेदाभेद, सोवळेओवळे, गतानुगतिकतेने पाळले जाई. त्यात तुच्छतेची कल्पना नसे. पुढे कॉलेजात असताना एका निकटच्या मित्राच्या गावी कोकणात गेलो तेव्हा मला आंघोळीला गरम पाणी काढून घेता येत नसे; पंगतही निराळी होई. पण दादरमधील त्याच्या पदवीधर पालकाच्या घरीही काटकोनात जेवण केले मी. एरवी मला तेथे घरातल्यासारखे वाटावे इतकी ती माणसे प्रेमळ होती आणि इतक्यांदा मी तेथे जात असे. पण असे काटकोन टोचतच! मात्र त्या टोचण्यात कसलाच विखार नव्हता.

आमचे जरा त्रिशंकूसारखेच होई. सारस्वत स्वतःला ब्राह्मण म्हणवतात याचा पाक (म्हणजे पंचद्राविड) ब्राह्मणांना राग—आणि 'इतरां'नाही राग; निदान अविश्वास. आम्ही आहाराने 'ब्राह्मण' नाही हे रूढ अर्थाने उघड; पण आम्हांला त्या उपपदाचा सोस फार. कोणी 'शेणवी' म्हटले तर अपमान वाटे—असा त्या नावाला वास होता. (मग त्याला थोर व्युत्पत्ती धुंडाळण्याची आमची खटपट.) 'इतरां'हून आम्ही उच्च असा अडाणी अहंकारही होता. पण आहाराचे काय करायचे? मग ते चोचले चोरून पुरवायचे. मटन-मासळी लपवून आणायची; त्यांच्याबद्दल सांकेतिक शब्द वापरायचे. ती आणताना, शिजवताना, वास मारण्याच्या क्लृप्त्या काढायच्या. हा ब्राह्मण्याचा आटापिटा गमतीचा होता—तसाच लज्जास्पदही. पुन्हा पोटभेदांचा उचनीचपणा होताच.

...याचा केला तर केवढा ग्रंथ होईल!

(या जाति-कथेला टीप म्हणून भंडाऱ्यांविषयी दोन शब्द. दादरला ही जात संख्येने मोठी होती, एकंदरीत पैशाने मातबर होती; पण या जातीय वादात, अपवाद सोडल्यास, ती पडली नाही. प्रभादेवी-आगरबाजारच्या भागांवर तिची छाप होती असे स्मरते.)

या संथ मध्यमवर्गीय जीवनात पुढे वावटळी उठल्या, बराचसा सडलेला पालापाचोळा उडून गेला. काळाच्या सक्तीने तऱ्हेतऱ्हेचे बांध फुटले. वाइटाबरोबर काही बरेही वाहून गेले असणार. ते जात असताना बऱ्यावाइटाचा विवेक कोणाला असतो? नंतर उगाच पश्चात्-मार्मिकपणा दाखवायचा!

ते बंदिस्त जीवन होते. बाहेर कारकुनी आणि कुळाचारांत कर्मठ. टिळकपंथाने शिकवलेली परंपरानिष्ठा, अतिरेकी साधेपणा, आंबटपणा; इंग्लंडमध्ये शिळी होऊन गेलेली पण येथे अतीव आदराने स्वीकारलेली 'व्हिक्टोरिअन' शिस्तीची कुटुंबकळा. या दोहोंच्या जोड-काचाखाली, विशेषतः पोरपणी, मन मारायची सवय जडे. शाळांत ते अधिक उग्रपणे करत. हे करायचे नाही, ते पाहायचे नाही, असला धाकाचा पाढा. नाटक, सिनेमा, गायन ही महापातकांपैकी. (नृत्याचे नावच घ्यायचे नाही. घेतलेच तर त्याला 'नाच' म्हणायचे.) हॉटेलात जाणे निषिद्ध. केस ठेवायचे नाहीत; ठेवलेच तर त्यांची फार निगा राखायची नाही. कादंबऱ्या वाचल्याच तर त्या पालकांनी आणि शिक्षकांनी अगोदर 'पास' केलेल्या. मोठ्यांशी वाद घालायचा नाही...अशी नकारघंटा शाळेत आणि घरी. गबाळ कपडे म्हणजे शीलाची पताका. आमचे काही तरुण, हौशी शिक्षक नीटनेटके कपडे करीत—त्याने शाळेची शिस्त बिघडते अशी वर कुरबूर झाल्याची कुणकूण होती.

पण या उग्र, हट्टी, जुनाटपणाला कसलीतरी धारही होती. ध्येयवाद हा शब्द फसवा असो, पण त्याची ज्याला बाधा होते तो अगदीच वाया जात नाही. त्या शब्दाआड सोंगेढोंगेही खपतात, पण त्यांना हे ना ते पांघरूण सापडतेच. कधी वाटते की आम्हांला तेव्हा हल्लीच्या मुलांना मिळतात त्या सवलती आणि स्वातंत्र्य मिळाले असते तर...! कोण जाणे!

...ओघात आठवले. ते दादर पुरुषांचे होते. रस्त्यात स्त्रिया तशाच काही कारणास्तव

दिसायच्या. एरवी त्या घरात डांबलेल्या. मुलींच्या शाळेबाहेर नोकरी करणारी स्त्री म्हणजे पाहण्याची वस्तू असे. कॉलेजात जाणाऱ्या मुलीही हाताच्या बोटांवर मोजाव्यात अशा. कॉलेजे दूर तिकडे मुंबईत.

हे सगळे पश्चिम दादरचे. पूर्वेकडचे दादर निराळे. ते गंगाजमनी होते. इतर जमाती होत्या—गुजराती, पारशी, मुसलमान. कामगारवर्ग तिकडे थोडा अधिक होता. आपला पहिला चित्रपट त्याच भागात निघाला—म्हणून मला वाटते त्या जुन्या 'मेन रोड'ला दादासाहेब फाळक्यांचे नाव मिळाले. 'कोहिनूर फिल्म कंपनी' शेजारी होती, ती माझ्या अगदी लहानपणी. पण तेव्हा चित्रपटांचे माहात्म्य नव्हते. तेव्हा सोबत्यांपाशी या शेजाराची कधी प्रौढी मारण्याचे कारण नसे...रेल्वेने दुभंगलेले हे दादर म्हणजे आता दोन शहरे झाली. इतका त्यांचा ऐवज आहे. तेव्हा दोन्ही मिळून टपालाच्या नंबरापुरते एक गाव असले तरी या दोन भागांची चर्या निराळी राहिली. पश्चिमेकडचे हे अधिक मराठी दादर...आमची शाळा तेथे होती. दादरमधील माझी शेवटची तीन वर्षे तेथे गेली.

किती वर्षे लोटली त्याला. ती साधी वजाबाकी करू नयेसे वाटते. वय उतरणीला लागल्याची आठवण नको म्हणून असेल कदाचित; किंवा आतून आणखी काही नको म्हणत असेल...पेंडसे आणि गानू आणि मी बोलत होतो ते हे गणित टाळून. आम्ही जुने झाल्यापेक्षा ते आमचे दादर इतके जुने झाल्याचे कबूल करवत नसेल...

...बोलणे आंबटगोड होते. कारण आठवणी तशा होत्या. कडू काही उरले नाही. 'गेले ते दिवस' असले गहिवर काढण्याइतके आम्ही अजून वृद्ध झालो नाही, म्हणून असेल, जुनी दुखणीखुपणीही आठवणीला सलत होती. जुन्या संबंधांची आणि साहचर्यांची मुरलेली आपुलकी सुखवीत होती...

पुन्हा खूपशी सवड काढून भेटायचे आणि बोलायचे असे आम्ही प्रत्येक धावत्या भेटीत एकमेकांना सांगत असतो. तसे भेटलोच तर पुन्हा तेच बोलू—सुखांविषयी आणि दुःखांविषयी...अशीच आमची चित्रे पडताळून पाहू. घाई नाही. ती चित्रे आहेत तशीच राहतील—प्रत्येकाच्या मनाच्या एका कोपऱ्यात; अगदीच अडगळीत नव्हे.

# ग्रंथांची फुटली पेठ

"त्या एका आठवड्यात येथे एक कोटी रुपयांच्या पुस्तकांची विक्री झाली," हे एखाद्या पश्चिमी परदेशाबद्दल नव्हे; तशा आकडेवारीला कधीकधी सांगणाऱ्याच्या आत्मीयतेमुळे सूज चढू शकते. हे आपल्या प्रिय भारतातील एका शहराबद्दल—कलकत्त्याबद्दल—आणि सांगणाराही संपूर्णपणे विश्वसनीय—आणि या विषयाचा, पुस्तकी जगाचा, चालताबोलता माहितीकोश : कलकत्त्याच्या राष्ट्रीय ग्रंथालयाचे श्री० बा० जोशी. गेली बावीस वर्षे ते तेथे आहेत; परिसराशी एकरूप होऊन गेले आहेत. तसे होण्यात त्यांचे मराठी भाषा व संस्कृती यांवरील प्रेम आड आले नाही.

जोशी सांगत होते काही महिन्यांपूर्वी कलकत्त्यात भरलेल्या पुस्तक-प्रदर्शनाविषयी. तो आकडा ऐकून माझे मराठी मन थोडेसे हादरलेच. थोडेसेच. कारण बंगाल्यांच्या पुस्तकप्रेमाविषयी, म्हणजे सक्रिय प्रेमाविषयी, त्यांच्याकडून जवळजवळ प्रत्येक भेटीत ऐकत आलो होतो. दोन वर्षांपूर्वी शरच्चंद्रांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या कथा-कादंबऱ्यांचे अनेकखंडी, भरघोस किंमतीचे, संग्रह निघाले नि ते पाहतापाहता हजारोंनी कसे उडाले हे त्यांच्याकडून ऐकले होते. (आणि ते ऐकताना आपल्या हरिभाऊ आपट्यांची चौसष्ट साली जन्मशताब्दी 'साजरी' झाली त्यानिमित्त 'आर्यभूषण'ने त्यांच्या कादंबऱ्या माफक किंमतीत नव्याने काढल्या त्याची काय परवड झाली ती आठवण खुपली नसती तरच नवल!) मला वाटते, त्याच घाईगर्दीच्या भेटीत संध्याकाळी दक्षिण कलकत्त्याच्या एका भागात त्यांच्याबरोबर फिरलो, तेव्हा अंतराअंतराने पुस्तकांची दुकाने डोळ्यांत भरली. 'दुकाने' म्हणून नव्हे, म्हणजे आपल्या छानछोकीने किंवा आकारानेही नव्हे. खरे म्हणजे, त्यांतील बरीचशी उघड्या रस्त्यावर मांडलेली होती. पक्क्या जागेतली होती, त्यांचा प्रपंच चार वितींहून मोठा नसावा. तेव्हा जोशी म्हणाले होते की इथे अशी खूप तरुण माणसे असतात की पोटाची, कपड्यांची भ्रांत असली तरी आडगिऱ्हाइकी पुस्तके घेतील, वाचतील, त्यांवर वितंडवाद घालतील आणि विकून टाकतील. चळवळी, अतिरेकी, माथेफिरू माणसे; त्यांची माथी पुस्तकांनी फिरतात तर! इतर कशाने फिरण्यापेक्षा हे बरे की वाईट?

हे सगळे मनात स्वच्छ होते. तरीही, एका आठवड्यात एक कोटी रुपये म्हणजे जरा

फारच झाले. 'ग्रंथव्यवहारा'संबंधीच्या मराठी गणिताला भोवळ यावी इतके! जोश्यांनी 'टर्न-ओव्हर' हा इंग्रजी शब्द वापरला—म्हणजे उलाढाल. अर्थात नगदी उलाढाल. आपल्या साहित्यसृष्टीत उलाढाली चालू असतात. तसल्या नव्हे. आपण 'ग्रंथव्यवहार' या 'चालू' विषयावर चर्चा, संमेलने इत्यादी सांस्कृतिक कार्ये उरकतो; त्यांवर सार्वजनिक पत्रापत्री गाजवतो. मात्र त्यांत ग्रंथबाह्य बाबीच सहसा अधिक गाजतात.

त्या दिवशी हे बोलणे झाले ते कॉलेज स्ट्रीटवर. ती कलकत्त्याची खरीखुरी आणि बारमाही पुस्तक-पंढरी. ती या वेळी घडली. यापूर्वीच्या भेटीत ती मनात असूनही चुकली होती. या वेळी घोर निर्धार होता. अर्थात या पंढरीभेटीसाठी हात धरून न्यायला जोशीबुवांनाच पाचारण केले होते. तो त्यांचा अधिकार. आणि त्यांना सुचवायचा अवकाश, त्यांनी अर्ध्या दिवसाची रजाच काढली. अशा वारीसाठी माळकऱ्याला आग्रह लागत नाही!

अल्पसे विषयांतर. कलकत्तानगरीचे एक अन्य माहात्म्य वर्षानुवर्षे ऐकिवात होते; प्रत्यक्षात अनुभवले नव्हते. ते म्हणजे तेथील चिनी अन्नब्रह्म. तेव्हा त्याला सामोरे जाणे हा या खेपेतील उपनिर्धार होता. जोश्यांच्या चौकस माहीतगारीमुळे तोही योग आला —आणि योग्य स्थळी आला. स्वीट-कॉर्न-क्रॅबमीट सूप, चाउमेन, एग्-फ्राइड्-राइस, स्वीट-अँड-सॉअर फिश, या सगुणरूपांत ते ब्रह्म म्या पाहिले; आणि योग्य त्या भक्तिभावाने आत्मसात केले. आणि ते जातिवंत चिनी दुकानात. चार किंवा अधिक तारे, किंवा पहिली श्रेणी, मिरवणाऱ्या भपकेबाज हॉटेलात नव्हे! तेथे बहुधा टूम म्हणून साहेबी प्रकारांबरोबर, जणू तोंडीलावणे म्हणून, मेन्यूकार्डावर काही चिनी पाककृतींना जागा करून दिलेली असते. माझ्या काही जाणकार स्नेह्यांना त्या कृती 'पाक'-चिनी की नापाक, बनावट चिनी, याविषयी जबर संदेह आहे. मला आपला संशय आहे की पूर्वी, म्हणजे साहेबी रियासत येथे जारी होती तेव्हा, अति-साहेबी हॉटेलांतील मेन्यू कार्डाला कित्येक फ्रेंच पदार्थांची नावे—किंवा पदार्थांची फ्रेंच नावे—शोभा आणीत, त्यातलाच हा प्रकार असावा. ती आपल्या सवयीच्या इंग्रजी चष्म्यातून वेडीवाकडी वाटणारी फ्रेंच स्पेलिंगे आणि अशक्यप्राय उच्चार, यांनी गांगरलेला देशी साहेब एक तर त्यांच्या वाटेला जात नसे, किंवा त्यांवर अदमासे बोट ठेवून 'जे जे येईल' त्याला तोंड देण्यासाठीच सज्ज राही. त्या काळची अशी एक सत्यकथा आहे, की आपल्या काही वृत्तपत्रकारांना कोटातील अशा एका मातबर हॉटेलात कोणा गोऱ्या यजमानाकडून जेवणासाठी आमंत्रण होते. तेव्हाचे आपले बहुतेक पत्रकार म्हणजे बिचारे 'सिंगल'

चहा, चिवडा आणि—चिरूट कोठला—कैची किंवा पिवळा हत्ती छाप सिगरेट याला राजी असत. त्या जेवणाच्या मेन्यूकार्डावर एका 'कोर्स'च्या नावात Poisson हा शब्द होता. आपल्या स्पेलिंगविषयी रास्त अविश्वास असणाऱ्या कित्येक अतिथींना त्यात विषप्रयोगाचा डाव दिसला, आणि तोही सांगूनसवरून! कुजबूज सुरू झाली, की आपल्या देशभक्तीची ही किंमत मोजावी लागत आहे. 'पत्रकार म्हणजे देशभक्त' हे समीकरण तेव्हा पत्रकारांना तरी मान्य असे. होऊ घातलेल्या हुतात्म्यांच्या आविर्भावात मंडळी त्या 'कोर्स'साठी बद्धपरिकर झाली. आणि पुढ्यात आले माशाचे तुकडे. तेव्हा कोणा चौकस पत्रकार पाहुण्याला शोध लागला की तो विषसमान शब्द फ्रेंच आहे—आणि त्याचा निरुपद्रवी अर्थ : मासा!

असो. या विषयांतरातून पोट-विषयांतर फुगवायचे म्हणजे आपल्या मुंबईत चिनी हॉटेलांची संख्या उदंड झाली आहे आणि गेल्या काही वर्षांत त्यांपैकी बहुतेकांनी रंगीबेरंगी चिनी—म्हणजे आम्हांला चिनी वाटणारे—नेपथ्य, शानदार फर्निचर, वातानुकूलन आणि आवश्यक तेवढा अंधार यांची सोय इत्यादी उपायांनी आपली श्रेणी आणि आपले भाव वाढवले आहेत. जोश्यांनी मला नेले त्या कलकत्त्यातील हॉटेलाचा नूर इतर चार हॉटेलांसारखाच होता. गिरगावातील बऱ्यापैकी हॉटेलात शोभतील अशा टेबल-खुर्च्या, ओक्याबोक्या भिंती, भरपूर उजेड आणि, साहजिकच, परवडणारे भाव. पदार्थ मात्र फार रुचकर. मुंबईच्या मानाने चीनशी अधिक भौगोलिक जवळीक—हजारएक मैलांची—म्हणून असेल!

पुन्हा प्रस्तुत विषयाकडे वळावे—म्हणजे कॉलेज स्ट्रीटकडे. अगोदर एका ट्रॅमच्या गर्दीत, मग दुसरीच्या, असे दोन हप्त्यांत चेंगरत-घुसमटत आम्ही इष्ट स्थळी पोचलो. फार काळापासून कलकत्त्याची ज्वलंत परंपरा अशी, की सार्वजनिक भावनोद्रेक झाला की ट्रॅमगाड्यांना आग लावायची. म्हणून असेल, त्या जरा दीनवाण्याच दिसतात. अलीकडे बसगाड्यांवर ती जबाबदारी अधिक असते; आणि अनेक शहरांनी तो बंगाली धडा गिरवायला उत्साहाने सुरुवात केली आहे. कोण जाणे, बस जाळायला अधिक सोपी असावी आणि ती दुमजली असेल तर दुप्पट शोभेचा आनंद. पण मुंबईत एकंदरीने हा उत्सव कमीच! मुंबईकर किंवा मराठी माणसे बंगाल्यांहून कमी भावनाशील म्हणून असेल!

—आणि कॉलेज स्ट्रीटमध्ये वळलो. त्या एवढ्याशा रस्त्याला गराडा होता तो विद्यापीठ

आणि प्रेसिडेन्सी कॉलेजसारख्या केव्हाच शंभरी ओलांडलेल्या नामांकित शिक्षणसंस्थांच्या इमारतींचा. आतून कशा होत्या कोण जाणे! बाहेरून उंची सोडल्यास, साध्या वाटणाऱ्या, विद्यार्थ्यांच्या संतापाच्या खुणा आणि घोषणा मिरवणाऱ्या, रंगोटीहीन इमारती; पण कळाहीन मात्र नव्हेत. तसा आधुनिक शहरी, टापटिपीच्या दृष्टीला तो रस्ता कंगाल, कळकट वाटेल. लहानमोठ्या दुकानांची—मोठी थोडी, लहानच फार—दोन्ही अंगांना दाटी. बाहेर नावाची पाटी क्वचित. आत पुस्तकांची खेचाखेच. खरे म्हणजे, दुकानाच्या आणि त्यातील मालाच्या अंगापेक्षा नावाचा बोंगा मोठा, या आपल्या पुण्याच्या शब्दसंपन्न रीतीप्रमाणे तेथे 'वैश्विक ग्रंथ भांडार', 'ज्ञान-विज्ञानप्रसार केंद्र', अशा पाट्यांच्या पंगती दिसायला हव्या होत्या! असो. त्या बऱ्याचशा दुकानांत धड कपाटे नव्हती. फुटपाथवरच उभे राहून खरेदी करायची. फुटपाथही खडबडीत, अस्वच्छ, कसलेकसले वास मारणारे. तरीसुद्धा ते सगळे दृश्य कळाहीन नव्हते; त्याला आपली अशी खास कळा होती...

ती सगळी दुकाने पुस्तकांची होती. एकंदर अजमासे साडेतीनशे! नव्या पुस्तकांची, जुन्या पुस्तकांची. नव्या म्हणजे कोऱ्या पुस्तकांची आणि अगदी ताज्या पुस्तकांची. जुन्या म्हणजे वापरलेल्या पुस्तकांची आणि दुर्मिळ पुस्तकांची. दुर्मिळ पुस्तकांचे अनावर व्यसन असणारे आणि त्यासाठी सदैव पायपीट करणारे अ० का० प्रियोळकर तेथे पुस्तकांत कसे हरवले होते याची जोश्यांनी उमाळ्याने आठवण काढली. आणखी एका जोश्यांचीही—ते म्हणजे मुंबई विद्यापीठाचे माजी ग्रंथपाल आणि महाराष्ट्र राज्याचे माजी पुरातत्त्व आणि पुराभिलेख विभाग संचालक डॉ० पु० म० जोशी. त्यांनाही जुन्या पुस्तकांचा वास चढतो. त्या गर्दीत फिरताना वाटत राहिले, दोनचार महापंडितांना तरी आपला धक्का लागला असेल! त्या जाणिवेमुळे जरा अंग चोरूनच चालत होतो.

आणि कॉलेज स्ट्रीट म्हणजे त्या रस्त्याबरोबर त्याला फुटणारे गल्लीबोळही आले. त्यांतही वस्तीला पुस्तकेच. एखादा खास बाजार त्याला आखून दिलेल्या रस्त्यावर न मावून आजूबाजूच्या बोळांतून सांडतो, ओघळतो, हे मुंबईतील काळबादेवी, भुलेश्वर यांसारख्या भागांत पाहत आलोच. कुठे कापडाचा, कुठे भांड्यांचा, कुठे आणखी कसला. जुन्या दिल्लीच्या चांदणी चौकातील काही बोळांत—बोळकंड्यांत म्हणावे अशी त्यांची वेगभर रुंदी—दोन्ही बाजूंनी हारीने दुकाने लगडली आहेत ती खाण्याची. 'पराठा गल्ली' हे नाव मला वाटते त्या सगळ्या गुंत्यालाच लावतात. पण पुस्तकांची अशी दुकाने म्हणजे अघटितच! पुस्तकांचा बाजार म्हणजे कसेसेच वाटते; त्या वस्तूची

इभ्रत कमी होते—पण म्हणायचेच झाले तर तो येथे आहे.

असा विषय नाही म्हणे की त्यावर तेथे पुस्तके नाहीत. ज्ञानाच्या नव्या-जुन्या सगळ्या शाखा आहेत. तेच साहित्याचे. उच्च, मध्यम, अधम, सगळा आवाका तेथे आढळतो. एकदा वाचून न समजणाऱ्या नव्या कवितेपासून न वाचवणाऱ्या क्षुद्र कादंबऱ्यांपर्यंत. वाचकांच्या सगळ्या जाती-पोटजातींची तेथे सोय आहे. माझा अंदाज होता की ज्याला आपण ‘ ललित ’ म्हणतो त्या जातीच्या पुस्तकांचाच—अर्थात् काव्य सोडून—मुख्यतः उठाव असेल. तो खरा नाही असे समजले. राजकारण आणि त्याच्या दशातील विषयांवरील आणि कवितेच्या पुस्तकांना फार मोठी मागणी असते—कवितेचे नवे पुस्तक हजारोंनी खपावे हे येथे कपोलकल्पित वाटेल. किंवा एखाद्या भावड्या कवीचे दिवास्वप्न! प्रसंगोपात हजारोंनी कविताबाचन ऐकावे येथपर्यंत आता आपल्याकडे मजल आली आहे; हेही नसे थोडके! पण एका वर्षात आपल्या कवितासंग्रहाचा काही शेकडा उठला याने प्रथितयश वगैरे कवीलाही धन्य वाटावे—आणि अन्य ख्यातनाम वगैरे कवींना अस्वस्थ वाटावे—अशी बापुडवाणी परिस्थिती आहे. अर्थात् तेथे कविता आणि अन्य साहित्य खपते ते मुख्यतः बंगालीतील! काहीसे हिंदीतील, आणि व्यासंगाची पुस्तके इंग्रजीतीलही.

आणि दरवर्षी आठवडाभर पुस्तक-प्रदर्शन भरते तेव्हा तर या पुस्तकवेडाला उधाण येते. माणसांची झुंबड उडते आणि पुस्तके पुरी पडत नाहीत. या सोहळ्यासाठी किंमतीवर खास वटाव देतात; कमी खपाच्या पुस्तकांवर क्वचित पन्नास टक्क्यांपर्यंतही देतात. पण या लालचीमुळे पुस्तके उठतात असे नाही. पुस्तकांच्या बेहिशेबी प्रेमाने माणसे लोटतात. लहानमोठी, सधन, आणि तुलनेने निर्धन. स्थानिकच नव्हे तर जवळपासचीही. वाचनाचे पिसे लागलेली, व्यवहाराचे भान सुटलेली माणसे. ‘ काय म्हणावे अशा स्थितीला ? ’

मी मुंबईत आणि दिल्लीत तीनचार ‘ नॅशनल बुक फेअर्स ’ जवळून पाहिल्या आहेत —म्हणजे ‘ राष्ट्रीय ग्रंथप्रदर्शने ’ किंवा ‘ जत्रा ’. त्यांत प्रदर्शनाचा भाग फार मोठा होता. प्रचंड प्रवेशद्वार, रोषणाई, मोटमोठ्या प्रदर्शकांची झगझगीत ‘ कलात्मक ’ पद्धतीने सजवलेली, मोठमोठ्या भाड्यांची दालने, त्यांना शोभून दिसतील अशा साजातील विक्रेते आणि विक्रेत्या. या रम्य ‘ प्रदर्शना ’वरच काही लाख रुपये उडाले. आणि पुस्तके हे काही पुरेसे आकर्षण नव्हे, म्हणून गीत-नाट्य-नृत्यासारखे सांस्कृतिक मनोरंजन,

परिसंवादासारखे बौद्धिक आमिष, रसिकांना आवाहन करीत होते. आणि रसग्रहणाच्या दुसऱ्या एका अंगाचीही 'सुविधा' व्यवहारबुद्धीने योजिली होती—उपाहारगृहांची. काही खेळांचीही व्यवस्था केली असती तर 'जत्रे'ची सांगता झाली असती! असो. दहाबारा दिवसांच्या अशा प्रदर्शनात पुस्तकविक्री काही लाखांवर गेली नसावी. मुंबईत भरलेल्या प्रदर्शनातील मराठी पुस्तकांच्या विक्रीचा आकडा सांगण्यासारखा नसावा. खरे म्हणजे मराठी पुस्तकांची फारशी दुकानेच त्यात नव्हती. दिल्लीतील एका प्रदर्शनात पळवलेल्या पुस्तकांचा आकडा न सांगण्याइतका मोठा होता, असे एका प्रकाशकाकडून समजले. पण प्रदर्शनाप्रमाणेच त्याला भेट देणाऱ्यांचाही नूर प्रतिष्ठित आणि डोळ्यात भरण्यासारखा होता.

मराठी पुस्तकांच्या विक्रीविषयी लिहावे तेवढे अधिकच! आपली भाषा, साहित्य, परंपरा, संस्कृती, इत्यादींच्या अभिमानाने सदैव तापलेल्या या महाराष्ट्राच्या राजधानीत, या मुंबईत मराठी पुस्तक—बालवाङ्मय किंवा कसले स्तोत्र किंवा पंचांग किंवा पाठ्य-पुस्तक किंवा त्यांची 'मार्गदर्शिका' वगैरे नव्हे—विकत घ्यायचे झाले तर ते विकणाऱ्या दुकानाचा प्रथम शोध घ्यावा लागतो. काही वर्षांपूर्वी तर गिरगावातल्या दोन दुकानांशिवाय तरणोपाय नसे. आता मला वाटते गिरगावात साडेतीन दुकाने, दादरला एखाद दीड, आणखी कुठे अर्धेमुर्धे असेल. यांपैकी काही ठिकाणीही मराठी 'साहित्य' तसल्या 'इतर' पुस्तकांच्या वळचणीला, अंग चोरून उभे असणार. आणि पावसाळ्याच्या सुरुवातीला पाठ्य-पुस्तके आणि त्याहूनही अधिक मागणी असणाऱ्या त्यांच्या मार्गदर्शिका वगैरे तरारून उगवतात तेव्हा तर कवितेबिवितेचे पुस्तक मागणाऱ्याला अशा दुकानातून अस्पृश्यासारखे बाहेरच ठेवीत असतील—आणि वर 'खुळा' म्हणून त्याला हसत असतील. पुण्यात परिस्थिती इतकी लाजिरवाणी नसावी असे वाटते. इतर शहरांचे मला ठाऊक नाही.

कोण जाणे, पण सगळीकडेच कस उतरत चालला आहे; कालचे आज उरले नाही, अशी भावना त्रस्त करते. जोशी म्हणाले, या कॉलेज स्ट्रीटचेही वैभव ओसरत आहे. येथेही बाजारी, परीक्षार्थी पुस्तकेच हळूहळू पेठेवर आक्रमण करीत आहेत. तेही अटळ आहे का? कलकत्ता विद्यापीठ हे या देशातील तीन आद्य विद्यापीठांपैकी एक. त्याचे सव्वा शतक दोन वर्षांवर आले. त्याच्या आसऱ्यानेच ही पुस्तकांची पेठ वाढली. दिगंत कीर्तीच्या विद्वानांनी एके काळी त्या विद्यापीठाचे नाव उजळवले. आता त्याचे नाव वृत्तपत्रांतून चमकते ते भलत्याच कारणांसाठी—बेशिस्त, भ्रष्टाचार यांसाठी. आणि हे

कर्तृत्व फक्त विद्यार्थ्यांचेच नव्हे! प्राध्यापक आणि विद्यापीठाचे, विद्यालयांचे कारभारी हेही त्यातील आपला वाटा यथाशक्ती उचलत असतात. या अवकळेची सावली त्या रस्त्यावर पडली नाही तरच नवल. 'ग्रंथ हेच आजचे खरे विद्यापीठ' असे कोणीतरी कधीकाळी म्हणून गेला. वाक्य सूत्रासारखे, म्हणून उद्धृत करणे हे विद्वत्तेचे सोपे लक्षण, म्हणून आपण ते हजारदा वापरले असेल—तरीही ते खोटे नसावे! ग्रंथ आणि विद्यापीठ इतके परस्पराश्रयी आहेत; जवळजवळ एकरूप आहेत. तेव्हा विद्यापीठाचा बाजार होऊ लागला की ग्रंथांना, त्यांच्या सगळ्या व्यवहाराला, त्याची बाधा होणारच. आपले मुंबई विद्यापीठ हे आणखी एक आद्य विद्यापीठ. मात्र त्याची तशी साक्षात बाधा व्हायला, निदान त्याची काळवंडणारी सावली अक्षरशः पडायला त्याच्या आसपास पुस्तकांची पेठ नाही. पण नाही तेच बरे. या विद्यापीठाची, त्याच्या बाजाराची, सावली अगदी काळीकुट्ट असेल.

आणि कलकत्त्याच्या पुस्तक-पेठेचा दर्जा घसरत आहे, म्हणजे आज ना उद्या ती आपल्या पातळीवर येणार असे विपरीत समाधान आपण मानू नये. एक तर तेथील प्रदूषण 'नोटस्-गाइडस्'सारख्या परीक्षार्थी पुस्तकांच्या वाढत्या प्रसारातून आले आहे. अशा पुस्तकांवर बंदी घालण्याचा तेथील सरकारचा एकदा विचार होता, अजूनही असेल. आपण ते प्रदूषणच नैसर्गिक समजतो! आणि दुसरे, अधिक महत्त्वाचे, असे की खऱ्याखुऱ्या, निर्मळ साहित्याच्या प्रसाराला तेथे विशेष बाधा झालेली नाही. बंगाली माणूस अजूनही त्याच उत्साहाने, प्रेमाने कविता-कथा-कादंबरी आणि सामाजिक शास्त्रांवरील पुस्तके वाचतो—विकत घेऊन वाचतो!

हा लेख लिहीत असतानाच त्याच्या विषयाशी जवळून संबंध असलेली एक बातमी वाचली आणि दुरून संबंध असलेली एक बातमी ऐकली. पहिली अशी : सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार 'शंकर' यांच्या पूर्वीच प्रसिद्ध झालेल्या तीन कादंबऱ्या— 'सीमाबद्ध', 'जनअरण्य' आणि 'चौरंगी'—१९७६ मध्ये एका खंडांत प्रसिद्ध करण्यात आल्या. त्या खंडाच्या आतापर्यंत अठ्ठेचाळीस आवृत्त्या निघाल्या आहेत. नव्या आवृत्तीच्या प्रसिद्धीची तारीख जाहीर झाली की आदल्याच रात्री दुकानाबाहेर ग्राहक रांगा लावतात आणि सकाळपर्यंत बहुतेक आवृत्ती फस्त करतात. दुसरी बातमी अशी : दक्षिणेकडील एका शहरातील मुख्य ग्रंथालयात फ्रेंच भाषेतील पुस्तकांचा मोठा साठा होता. त्या पुस्तकांना पुरेसे वाचक मिळणे कठीण या 'विचाराने' ग्रंथपालाने त्या पुस्तकांची होळी केली!

# आंबोली

चौदा वर्षे उलटली आंबोलीला शेवटची भेट देऊन. या मधल्या काळात सातआठदा तरी उन्हाळ्याच्या सुटीत तेथे मुक्कामाला जायचे बेत केले असतील; पण ते तोंडीच राहिले—क्वचित लेखीही. मला वाटते, एकदोनदा प्रभाकरने जागादेखील पाहून ठेवली होती. पण ते राहूनच गेले. पुढच्या उन्हाळ्यात पुन्हा एकदा नव्यासारखा तो बूट निघणार; बोटीने वेंगुर्ल्याहून जायचे की आगगाडीने बेळगावहून; सावंतवाडीला आधी की मग; चार दिवस गोवे करून यायचे की नाही—शिमग्यापासून चर्चा सुरू होणार; चैत्राचा कोवळा हुरूप तिच्या अंगी लागेलदेखील. मोठी सुटी लागण्याच्या सुमारास उमेद वारे प्यालेली असते. पण एकाएकी कामे निघणार, कामांच्या सबबी निघणार. आणि शेवटी पुन्हा एकदा कोकणी वैतागाने प्रभाकर चिडचिडणार—"तुझां मेल्या असांच!"

होय, माझे असेच होत आले. आंबोलीला प्रथम जाऊन राहिलो त्याला अठ्ठावीस वर्षे झाली. तेव्हापासून मी तिच्याविषयी अखंड उमाळ्याने बोलत आलो. दुसऱ्या कोणत्याच स्थळाविषयी असा बोललो नाही. कोणाला वाटावे, मी वारंवार तेथे गेलो असणार; मोठे मुक्काम टाकले असणार. कोण जाणे, बोलण्याला होप्र चढला की मलाही तसेच वाटत असते का? पण मी आंबोलीला राहिलो ते मोजून चारदा. त्यांतले शेवटचे म्हणजे एकूणपन्नास सालचे, ते खरे राहणे—म्हणजे वीसएक दिवसांचे. उरलेल्या भेटी तशा उडत्याच—उगाच कोठे तीनचार दिवसांत उरकलेल्या. तसा मी महाबळेश्वरलाही चारदाच गेलो आहे; आणि अगदी तसाच—म्हणजे एकदा वीसएक दिवस आणि तीनदा घाईत. पण त्या स्थळश्रेष्ठाबद्दल कधी फारसा बोलत नाही मी. त्याचे वैभव आणि खानदान आणि रुबाब आपल्याला मान्य आहेत; पण ते आपले वाटत नाही खरे! तेथे कितीतरी शोभिवंत खरेदी केली; त्यातली काही अजून अडगळीत दिसते. पण त्या गावाला माझ्या आठवणींत स्वतःची अशी कायम जागा नाही. आंबोलीला आहे...

वस्तुतः आंबोलीतील ते शेवटचे लांबट वास्तव्य मुळीच सुखाचे नव्हते. चांगलेच तापदायक होते. 'वळवाचा' या फसव्या नावाने दर संध्याकाळी कोसळणारा उनाड पाऊस, त्याची पाठ धरून हातपाय पसरणारे धुके, आणि गारठा. तो गारठा छातीत

घर करून राहिला तो महिनोगणती. त्याने बेजार केले, झोप उडवली, अन्न तोडले. अजूनही कधी अकस्मात हाडांना त्याची आठवण होते आणि अंग शिरशिरते. पण त्या शिरशिरीतही सुखाची पुसट चमक असते का? असेलही. त्या आजारामुळे मी आंबोली टाळत आलो हे बिल्कूल खोटे. त्या मुक्कामात माझ्याबरोबर एक स्नेही सहकुटुंब होते; त्यांनी आंबोलीची सहकुटुंब धास्ती घेतली. मी नाही. हवेच्या दगाबाजीमुळे ते निर्मळ गाव बदनाम व्हावे हे आपल्याला मंजूर नाही. कोठल्याही गावावर तसा प्रसंग येईल. आणि माझ्यासारख्या फाटक्या माणसाला आजारी पाडायला काही विशेष कवटाळ लागत नाही. तो योगायोग. म्हणून आंबोलीची ओढ उतरली नाही...

ती ओढ दर्शनाने, ओळखीने, रहिवासाने घट्ट झाली तरी ती अंकुरली मात्र वाचनातून. बत्तीस-तेहतीस सालची गोष्ट. मो० ग० रांगणेकरांचे 'वसुंधरा' हे साप्ताहिक जोमात होते. मोठ्या कल्पकपणे रांगणेकर नवनवीन सदरे आणि लेखमाला पुरवीत होते; आणि त्यांच्या वासाने वाचक शनिवारची वाट पाहत. एका लेखमालेत रांगणेकरांनी मोठमोठ्या लेखकांना आपापल्या गावाविषयी अथवा प्रदेशाविषयी लिहायला लावले होते. 'आमच्या गावी काय पाहाल?' असा काहीसा मथळा होता त्या मालेचा. वि० स० खांडेकरांनी दक्षिण कोकणविषयी लिहिले. खांडेकर तेव्हा पहिल्या भरात होते. आम्ही विद्यार्थी तर त्या नावाचा, अगदी आद्याक्षरांसह, भक्तिभावाने जप करत असू. त्यांच्या लेखांची पारायणे व्हायची—कित्येकदा दोघांतिघांनी एकत्र बसून. कोकणावरील खांडेकरांच्या त्या लेखातले आता फारसे काही आठवत नाही; शिरोडा अर्थात् होतेच, आणि मालवणचा सिंधुदुर्ग. आम्हांला मोहून टाकणारे त्यांच्या शैलीचे खास नखरे होते. पण निश्चित आठवते ते एक वाक्य : "माझ्या हातातील हुकुमाचा एक्का मी शेवटपर्यंत राखून ठेवला आहे; तो म्हणजे आंबोली." त्या उपमानाने आम्हांला जिंकले; त्याचे उपमेय म्हणून आंबोलीचे माहात्म्य आम्ही सरळ मान्य केले—उरलेल्या परिच्छेदातील तिच्या सौंदर्याचे वर्णन त्यांनी अलंकारांनी केले होते ते धड न वाचताच!

खरे म्हणजे ते सौंदर्य मी त्यापूर्वी एकदा ओझरते पाहिले होतेही. एकतीसच्या एप्रिलमध्ये कोकणातील एका खेड्यात पंधरा दिवस काढल्यावर ज्या मित्राकडे राहिलो होतो तो, दुसरा एक आणि मी असे तिघे बेळगावला बसने निघालो होतो. दुपारच्या वेळी आंबोलीला पाचदहा मिनिटे बस थांबली होती. त्या प्रथमदर्शनी आंबोलीच्या प्रेमात पडलो असे म्हणायला छान दिसले असते; पण ते खरे नव्हे. दर्शन ओझरते म्हणून?

कोण जाणे, तशा प्रेमाला ओझरते दर्शनच अधिक फलदायी असावे! आणि कदाचित आंबोलीला पोचण्यापूर्वी दहा मैलांचा घाट गाडी चढली होती, त्याचे कडे आणि दऱ्या आणि वळणे डोक्यात गरगरत होती. आज इतक्या वर्षांनंतरही, अनेक प्रवास घडूनही, गाडी घाट चढू-उतरू लागली—मग तो कात्रजसारखा इटुकला का असेना—की मी पोर-टक लावून पाहतो; मग तो तर माझा पहिला घाट (लहानपणी बोरघाट दोनदा उलटसुलट घडला होता तो सोडून द्या. त्या वेळी बुबुळे धड स्थिरावली नव्हती आणि बोगद्यांची अंधारी धडधडच काळजापर्यंत—आणि संख्या मनापर्यंत—अधिक पोचली होती!) आणि तळकोकणची दमट चिकचीक मागे टाकून डोंगरी गारव्यात आलो याची खुशी हुडहुडीच्या अतिशयोक्तीने एकमेकांना पटवण्याच्या प्रयत्नात होतो. असो. लौकरच बस पुढे निघाली; नजरेत काही राहिले नाही. आणखी पंधरावीस गावे लागली, त्यांतलेच ते एक.

पण धड पाहिलेही नव्हते त्याला खांडेकरांच्या एका वाक्याने मनात रूप दिले. आणि ते वाचल्यानंतर दोनतीन वर्षांनी (नक्की म्हणजे पस्तीसचा मे सरता सरता) आंबोलीला पहिल्यांदा गेलो तेव्हा काही अनोळखी वाटेचना. रस्ता, घरे, दुकाने, माणसे आठवणींतून उठून आल्यासारखी पुनर्भेटीची सलगी करू लागली. बुजलो नाही; तेव्हा फार बुजरा असे मी, तरीही नाही. तेथे पोचलो ती संध्याकाळ अजून स्वच्छ दिसते—पाऊस तोंडावर आला होता; त्याच्या वासाने भोवताल कोंदले होते; घड्याळाला न जुमानताच उजेड सटकला होता. आम्ही पाचसहाजण गोव्यात आठवडाभर आणि दोनतीन दिवस सावंतवाडीत काढून तेथे आलो होतो. तेथील मोसमी तळ उठल्यासारखाच होता; राहिलेल्या तुरळक पाहुण्यांपैकी एक गट त्या संध्याकाळी फिरायला बाहेर पडताच भेटला; त्याची दोस्ती जमली ती अजून राहिली आहे.

त्या चार दिवसांत आम्ही काय काय केले ते सर्वच कसे आठवणार? प्रभाकर सोडल्यास आम्ही सगळे पंचविशीच्या आत होतो; अजून विद्या पुरी झाली नव्हती. मी सगळ्यांत लहान; पण प्रभाकर वृत्तीने माझ्याहूनही हिरवट. त्यात केलासवरलेला म्हणून त्याच्या बोलण्याला जाणकारीची धार असे. तोंडाला ताळतंत्र नव्हता. खाण्यापिण्यातसुद्धा. आम्ही उतरलो होतो सावंतवाडी संस्थानच्या प्रवासी बंगल्यात. त्याचा खानसामा जमाल याच्या पाककौशल्याची तारीफ त्या टापूत दरवळत होती. बेळगावहून म्हणे रसिकमंडळी गाडी काढून आंबोलीला येत ती जमालच्या हातची कोंबडी आणि सोलकढी खाण्यासाठी.

(त्यासाठी जातायेता नव्वद मैलांचा टप्पा!) तसल्या पाकप्रकारांत गम्य नसणारी माणसेही चवीने या कथा तोंडात घोळवीत. अलीकडे वेंगुर्ल्याच्या बंदरावरील सरकारी बंगल्यातील खानसाम्याविषयी तसल्याच रसाळ कथा ऐकतो; आणखीही कोठकोठल्या ठिकाणच्या. आपल्याकडील कित्येक स्थळांच्या लोकप्रियतेचे श्रेय कागदोपत्री विधात्याच्या करामतीला दिलेले असेल, पण प्रत्यक्षात ते अशा सुग्रणपणाचे असावे अशी शंका येते. ती सुग्रण करामत अभक्ष्य-प्रकरणातील, हे काय मुद्दाम सांगावे? सराइतांचे चोचले आहेतच; पण नवशिक्याच्या दीक्षाविधीलासुद्धा ही स्थाने सोयीची असतात. ऐकीव स्थानमाहात्म्याने बटूला अगोदरच लाळ सुटलेली असते, आणि तिने शंकास्पद खाद्यालाही रुची येते; शिवाय चोरून केल्याचा चमचमीतपणा! असो. या विषयांतराचा उद्देश जमालच्या गौरवाला हीण आणण्याचा नाही; ते पाखंड या हातून घडणार नाही.

आंबोलीपूर्वी कोंबडीचा परिचय होता तो अल्प आणि वरवरचा. तिचे रहस्य जमालच्या हातून ग्रहण केले. त्यानंतरच्या या इतक्या वर्षांत तिचे अनेक अवतार पाहिले. 'चिकन्'च्या साहेबी सपकपणापासून 'मुर्गी'च्या शाही मसालेदारपणापर्यंत रससिद्धीची विविध तंत्रे आत्मसात केली; 'तंदुरी'च्या अनलंकृत पण महागड्या थाटाचा आजतागायतपणाही केला. हे सर्व वैचित्र्य उत्साहाने आणि रुचीने चाखले. पण त्या पसाऱ्याने मूळ ज्ञानात भर पडली नाही; यापुढे पडण्याचा संभव नाही. जमाल चाळीस सालच्या सुमारास वारला. अडतीसमध्ये मी तेथे गेलो तेव्हा ऐकले की बुड्ढा पार थकला आहे; होत नाही त्याच्याने. तरी त्याने खुरडतखोकत करून घातले. पुन्हा त्याला पाहिले नाही. त्यासम तो. त्याची गादी त्याचा पुत्र अबदुल्ला याजकडे गेल्याचे कळले. तसली किमया वंशपरंपरागत असती तर काय हवे होते!

कोणी म्हणेल, विशीपंचविशीतील अधाशी (की आशाळभूत?) रुचीचे ते कौतुक आहे. असेलही. म्हणून निष्ठेला बाध येऊ नये. त्या रुचीचे खोटे नाही; ती केव्हाच हरवली; त्याचे दुःख होत असते. तिचे आणखी गुण आठवतात. आंबोलीशीच बांधलेला एक असाः बसच्या तळावरील दत्त्याच्या खोपटवजा 'हाटेला'तील बाकड्यावर बसून कांद्याची गार भजी आणि लालसर कडक चहा यांचा जोड-स्वाद घेत अर्धी सकाळ आम्ही नियमाने घालवीत असू. (आणि तोंडी लावायला येणाजाणाऱ्या गाड्यांतील पोरीबाळींची त्या हुरळलेल्या वयाला अनुरूप अशी चिकित्सा!) मला नाही वाटत मुंबईत तसल्या चहा-भज्यांकडे आम्ही ढुंकून पाहिले असते म्हणून; पाहिले असते तर नाक उडवण्यासाठी (पोरीबाळींकडेही कदाचित!). म्हणजे ती तरतरी केवळ रुचीची नव्हे, आंबोलीचीही...

ती तरतरी वाढण्यासाठी खूप फिरले पाहिजे; आंबोलीच्या पाण्यात लोखंड आहे (म्हणजे काय कोण जाणे!), ते जड, असे ऐकत असू; त्यावर विश्वास ठेवून फिरायला बाहेर पडायचो. पण एकंदरीने तोंडेच फार चालायची. असल्या डोंगरी स्थळांप्रमाणे आंबोलीलाही तयार देखाव्यांचे दोनतीन 'पॉइंटस्' आहेत; त्यांना एखादी भेट दिली की कर्तव्य केल्याचे समाधान मिळे. उरलेले फिरणे बेळगावच्या राजरस्त्याने. मला ते फार आवडायचे. लाल, रेखीव, निवांत रस्ता; दुतर्फा हारीने हिरवेगार वृक्ष; हलकासा चढउतार, मुरडल्यासारखे एखादे भिडस्त वळण. सकाळी झाडे उन्हाचे कवडसे त्या नितळ रस्त्यावर गाळीत. घोटाभर डबक्यातून पोरांनी मुद्दाम पाय बुचकळत चालावे तसे त्या उन्हात पाय भिजवावेसे वाटत. पण दोनचारदा खरा खुळावलो तो दुसऱ्या एका दृश्याने. एखादादुसरा पाऊस झाल्यावर, रात्र पडता पडता, वेढणाऱ्या अंधारात, अकस्मात पुढ्यातील झाड लाख काजव्यांनी फुलून उठे. पुढच्या क्षणी काही नाही. वाटे, भ्रम झाला का? पुन्हा ती रोषणाई झगमगे. अशी सौम्य हिरव्या प्रकाशबिंदूंची उघडझाप पाय खिळवून टाकी. पण सगळ्याच झाडांचे ते भाग्य नव्हते. बाकीची थोराड भुतांसारखी उभी राहून निश्चलपणे ते पाहत. मत्सराने? त्यांचे ते विरूप पाहून मी झटपट पाय उचलत असे.

उलट दिशेने गेलो की आमच्या प्रवासी बंगल्याच्या जरा पुढे घाटाचे तोंड लागायचे. एवढासा वाटणारा तो रस्ता खडकांच्या अजस्र भिंतीला घट्ट धरून हेलकावे खात खाली उतरताना पाहिला की उगाच धाकधूक वाटे; पुन्हा ते सगळे जरा उघडेबोडकेच. कड्याखालच्या खोल दऱ्यांतील झाडी काळी दिसायची. मैलोगणती दूरपर्यंत दिसायचे; हा अमका किल्ला, तो तमका, ते पलीकडे लांबवर काहीतरी दिसते ते फलाणे गाव. डोळ्यांना आणि ऐकीव आठवणीला आणि कल्पनेला तसा ताण देण्यात एकदोनदा उत्साह वाटे; मग नाही. 'पॉइंटस्'चेही तेच. आपण किती उंचावर आहो याची फुरफुर थंडावल्यावर त्यात फार रस राहत नाही. इतक्या दुरून सगळे एकसारखे वाटते; ते निवडून काढत बसायचे म्हणजे उगाच चळवळेपणा; जिवाला थंडपणा नाही. एका 'पॉइंट'हून म्हणे कोचऱ्याचा की कोठला समुद्र दिसतो. मग कोणी बोट दाखवले त्या दिशेला—तो न दिसताही पाहिल्याचे समाधान झाले. स्वच्छ उन्हात दूर अंतरावर कोठेही समुद्र दिसतो म्हणा!

या पॉइंट्सना पायवाटांनी रमतगमत जाण्याची गंमत अधिक पटे. त्यात वाट चुकल्याची कुशंका काही तरी धाडस करीत असल्याचा भाव आणी. त्याला आणखी लज्जत येई ती सर्पकथांनी. कोकण हे सापांचे माहेर असा त्याचा लौकिक. त्यात आंबोलीची खास

म्हणून सर्पटोळी (की अशाच काही घाऊक वाटणाऱ्या नावाची) नावाची जात असते; ती हिरव्या रंगाची असून सहसा झाडाच्या फांदीला वेटोळे घालून राहते म्हणून लक्षात येत नाही; व सूर मारल्यासारखा ती तुमच्या मस्तकावर दंश करते. हे तिचे आक्रमणतंत्र ऐकून होतो; म्हणून असे आडवाटांनी चालताना एक डोळा वर ठेवल्यासारखे चालायचो. हीसुद्धा कसरतच. कधीतरी करायला ठीक. एरव्ही आपल्याच खुषीत फिरायला, दुसरे-तिसरे डोक्यातून काढून टाकायला, बेळगावचा हमरस्ता आपल्याला पसंत. एकट्याने जायला फारच पसंत.

तेथील आणखी एक स्थळ आवडले. ते म्हणजे हिरण्यकेशी नदीचा उगम. मी तेथे एकदा की दोनदाच गेलो असेन तो त्या नदीच्या सुंदर नावाच्या वासाने. आणखी काही आठवत नाही.

पण गाव कसे लख्ख आठवते. घाट संपतो तिथेच उजव्या हाताला जरा उंचावर आमचा संस्थानी प्रवासी बंगला; त्याच्या मागील बाजूलाच अधिक टुमदार 'ब्रिटिश' प्रवासी बंगला. तिकडे आम्ही कधी वळलो नाही—त्या वेळी ब्रिटिश प्रजाजन (आणि काही काळ सेवक) असूनही! रस्त्याच्या पलीकडल्या अंगाला संस्थानिकांचा उन्हाळी राजवाडा. पुढे गेले की डाव्या हाताला तुरळक बैठी घरे—जांभ्याच्या दगडाची, तेथील आडमाप पाऊस पेलता येईल अशा मजबूत छपरांची, पण साधीसुधी. उजव्या बाजूला बऱ्याच आत—खूप मोठ्या मोकळ्या जागेपलीकडे—एक डोळ्यांत भरणारी बंगली होती : उंच चौथऱ्यावरची, लाल मंगळुरी कौलांनी उठून दिसणारी. कोणा जुन्या दिवाणांची होती. त्यापुढे बस थांबायची जागा. तेथे दत्त्यासारखीच आणखी एकदोन हॉटेले. खाजगी मोटार-'सर्विस'चा तो काळ. ही हॉटेले त्या त्या कंपनीच्या अडत्यांसारखी असत. त्याच 'वेटिंगरूम्स'; तेथे 'सिटा' सांगून ठेवायच्या. एकोणीस मैलांवरील सावंतवाडीशी आम्ही तेथून संपर्क राखत असू. निरोप जायचे-यायचे, सामान यायचे. टपालाहून वक्तशीरपणे—आणि पुन्हा लौकर. अर्थात् हा ड्रायव्हर-क्लीनर या लहरी दुकलीच्या मर्जीचा प्रश्न होता; पण आमच्या पाठीशी प्रभाकर 'मास्तरा'ची पुण्याई आणि दत्त्याचा वशिला असल्यामुळे सगळे सुरळीत होई. असो.

पुढे आणखी काही दुकाने—मीठमिर्चीची वगैरे, आणि टपालकचेरी. पुन्हा तुरळक बैठी घरे डाव्या-उजव्या अंगांना. आणि शिवेवर टोलनाक्याची एवढीशी कोठडी. जमाल

असताना अबदुल्ला या टोलनाक्यावर काम करत असे. आंबोलीहून घरी परतणारे प्रवासी भाविकपणे तेथील डोंगरी मध बरोबर घेऊन जात. (तो फार स्वस्त म्हणून कित्येकांना विशेष गुणकारी वाटत असावा अशी मला शंका येई.) अबदुल्ला या मधाच्या बाटल्या मिळवून ठेवी.

आम्हांला दिसे ते हे वीसपंचवीस घरांचे गाव; आडबाजूला आणखी घरे असणारच. ती खऱ्या स्थायिकांची घरे; आम्हांला ठाऊक होती ती उन्हाळी पाहुण्यांसाठी तात्कळणारी घरे; एरवी बंद असणारी. त्या जातीत ते दोन प्रवासी बंगले श्रेष्ठ. तेथे उतरायचे म्हणजे सरकारी सव्यापसव्य असायचे, आणि वर तीन दिवसांची मर्यादा. पण आम्हांला त्यांची झळ कधी लागली नाही—कारण, पुन्हा एकदा, प्रभाकर. तो बरोबर असण्याची गरज नव्हती; असा त्याच्या नावाचा महिमा. जमालचा पहिला प्रश्न : "मास्तर बरे आसत मां ?" आमची होईल तेवढी बडदास्त राखी; 'होईल तेवढी' म्हणायचे कारण, इतका अचाट पाऊस कोसळूनही तेथे पाण्याचे दुर्भिक्ष्य असे. पण आमच्या त्याबाबतच्या अपेक्षाही माफक होत्या. पिण्यापुरते पाणी हवे; आंघोळीबाबत फार आग्रह नसे. दुधाचीही टंचाई; पण त्याची निकड चहातील थेंबापुरती; आणि ती भासलीच तर दत्त्या पन्नास कदमांवर होता. भाजीपाला नसे; नसू दे; आम्ही काय भाजीपाला गिळण्यासाठी तेथे जात होतो ? आणि असे की शेवटची खेप सोडल्यास मी तेथे हटकून 'मोसम' उठल्यावर गेलो—म्हणजे तात्पुरत्या सोयीही संपलेल्या ! पण त्या सोयीगैरसोयींची फिकीर नव्हती. आम्हांला हवे ते जमालच्या हातांत होते; ते तो सढळपणे देई. आणि ते देताना तो पैशाची हाव ठेवत नसे. मग स्वतःलाच लाज वाटून त्याच्या 'बिला'हून अधिक त्याला द्यायचे ! ती बेफिकिरी अंगी लागायची. देहाप्रमाणे कपड्यांनाही धुण्यापाण्याची संभावित सक्ती कधी केली नाही. ती लाल माती, त्यात कधी चिखल; रंगीबेरंगी खाणेपिणे; सिगरेटची राख रक्षापात्रात टाकावी हा गृहस्थी संकुचितपणा मोडल्यामुळे शेजारी बसलेल्या स्नेह्याचे (त्याच्या आणि आपल्याही कळत-नकळत) रक्षापात्र करून टाकणे—या सगळ्यामुळे निराळी कळा येई; तिला उठाव द्यायला दाढीचे खुंट आणि पिंजारलेले केस असत. जीव कसा खुलायचा. मुंबईत दिवसभर गळ्याला नेकटाय आवळून फिरणारी आम्ही घडीची माणसे ! मुक्तीचे आणखी एक कलम म्हणजे वर्तमानपत्रे मिळत नसत. कोठे काय परिषदा–गुन्हे–वक्तव्ये झाली त्याची दखल नव्हती; ताप नव्हता. क्वेटाच्या भूकंपाची बातमी तो झाल्यावर आठ दिवसांनी समजली याचेच बरे वाटले. मुंबईत आठ तासांच्या विलंबाची रुखरुख लागली असती !

तो उंचावरचा जुनाट बंगला—बंगला कसला, एकापुढे एक अशा तीन मोठ्या खोल्या, बाहेर रुंद व्हरांडा—एकाकी होता. भोवतालच्या झाडांमुळे जवळपासचेही काही दिसत नसे. खोलगटीतून बसगाड्या जात, त्यांचे आवाज सोडल्यास नेहमीच्या जगाशी संपर्क नव्हता. म्हणून अडतीस जूनच्या आरंभी अगदी एकटे राहण्याचा प्रसंग आला तेव्हा प्रथम बरे वाटले. प्रभाकर मला तेथे सोडून निकडीच्या कामासाठी वाडीला गेला होता; त्याचे परतणे लांबत होते. आणि हे एकाकीपण जणू सीलबंद करण्यासाठी पाऊस सुरू झाला. खरा पाऊस; वळीवबिळीव नव्हे. आभाळ फुटल्यासारख्या धारा कोसळत होत्या —धारा कसल्या ? त्यांच्या अपारदर्शक भिंती उभ्या राहिल्या. आणि मागोमाग, त्या भिंतींनाही गवसणी घालणारे धुके पसरले. दहा पावलांवरचे दिसेना. पावसाचे अस्तित्व आवाजावरून, आणि छपरातील गळतीवरून, समजत होते. आणि शिवाय गारठा. कपड्यावर कपडे चढवून दिवसरात्र काढली; दिवस आणि रात्र यांचा फरक घड्याळात दिसायचा. बोलायला कोणी नाही. दिवसातून दोनदा जेवण आणि दोनदा चहा घेऊन जमाल लटपटत यायचा; तो जवळजवळ खुणांवरच भागवी असा त्याचा दमा उसळला होता. फार तर, "काय होयां ?" आणि "मास्तर नाय इले ?" इतक्यापुरता शब्दांचा व्यवहार. मीही तेवढ्यापुरताच बोले; जणू जीभ गारठली होती. गच्च केल्यामुळे भयाण (आणि अजस्र) वाटणारी ती कोठडी, ठराविक वेळेला जेवणखाण आणणारा माणूस सोडल्यास कडक एकान्त...त्यामुळे तसली सजा भोगणाऱ्या कैद्यांच्या कथा आठवून हसू यायचे. पण ते हसू हळूहळू थिजू लागले. एकान्त 'खायला उठला' या शिळ्या वाक्प्रचाराचा पुरा अर्थ लागला. वाचायचे किती ? त्यावरही लक्ष लागेना. लिहायचे व्यसन अजून लागले नव्हते. माणसे पाहायला दत्त्याच्या दुकानापर्यंत जाईन म्हटले तर ते शक्य नव्हते. आता बसचे आवाज वर पोचले तर ते असे दमेकरी वाटायचे की त्यांची ओळख पटेना. दोन की तीन दिवस आणि रात्री अशा काढल्या; आणि त्या रात्री खचलो. मध्येच झोप गेली. तेच आवाज आणि ओल, आणि गारठा...बारीक करून ठेवलेल्या कंदिलाच्या अंधुक प्रकाशात खोलीचा विस्तार अक्राळविक्राळ दिसू लागला. छत कोठल्या कोठे वर चढल्याचा भास झाला. हा सगळा भास, हे कळत असूनही त्या गारठ्यात घाम फुटला. आणि त्याच क्षणी एकांताची हौस, निश्चय, बेफिकिरी इत्यादी सगळे काही ढळले. पाऊस थांबो न थांबो, सकाळी वाडीला निघून जायचे असा नवा निश्चय केला. पुन्हा झोप लागली. सकाळी उठून बाडबिस्तरा बांधला, जमालचा निरोप घेतला आणि बसतळावर आलो. पावसाने तेवढ्यापुरती खैर केली होती. दीडदोन तासांत वाडीला पोचलो. तेथे चक्क ऊन होते आणि छान मुंबईसारखे उकडत होते. प्रभाकर तेथेही नव्हता. दुपारच्या बसने बेळगावला निघालो. आंबोली

धुक्या-पावसांतच पुन्हा मागे टाकली.

पण तिने माझा असा नक्षा उतरवला तरी—की म्हणूनच ?—माझे मन तिच्यावर अधिकच जडले ! धुक्यावरही जडले. पावसाची मला मुंबईकराला काय नवलाई ? (पुढे पुन्हा एकदा मला आंबोलीच्या धुक्याने कसे नामोहरम केले, लोळवले, त्याची प्रौढी मी वर सांगितलीच आहे.)

मात्र त्यानंतर अकरा वर्षे आंबोली घडली नाही. मध्ये एकदा (की दोनदा ?) त्या मार्गाने गेलो असेन तेवढाच. पण तिचा जप टाकला नाही. कधीतरी प्रभाकरने बातमी आणली की हवेचे ठिकाण म्हणून संस्थान आंबोलीच्या विकासाची योजना आखीत आहे (ही भाषा अर्थात् हल्लीची; तेव्हाची नव्हे !); दीडदोनशे रुपयांत 'प्लॉट' देणार, सगळ्या सोयी करणार. "तू घेऊन टाक मेल्या एक." त्याने सुचवले; मी होय म्हटले. आंबोलीला घर बांधले की दर उन्हाळ्यात मी तेथे आणि वाडीलाही येईन या स्नेहाच्या हौसेपेक्षाही त्या रूपात तरी माझ्यासारख्या व्यवहारशून्य माणसाकडून थोडी बचत होईल हे हितचिंतन त्यात अधिक असावे. आमच्या एका व्यवहारनिपुण स्नेह्याने मात्र, असे घर बांधणे मूर्खपणा होईल, त्यातून काही 'रिटर्न' मिळणार नाही, हे हिशेबाने सिद्ध केले; म्हणून ते मला पटले नाही. जमिनीपुरते पैसे माझ्यापाशी होते; घरापुरते कोठून आणणार याची काहीच कल्पना नव्हती. पण आंबोलीला आपले घर असावे या विचाराचा होष चढला होता. म्हणून प्रभाकरला जागा घेऊन टाकण्यास कळवले...दोनतीनदा आठवण दिली. पण का कोण जाणे, ती जागा कधी घेतली गेलीच नाही !

आता महाराष्ट्र सरकारने आंबोलीचा विकास हाती घेतला आहे. जमिनीच्या किंमतीत थोडी सवलत असणार—पण लढाईपूर्वीच्या किंमतीची आठवणही काढता कामा नये. आणि घरबांधणी ? आपल्यासाठी नाही ते, हे उमगण्याइतके व्यवहारज्ञान आता आले आहे. वय अगदीच व्यर्थ गेले नाही; पैसा साचला नाही तरी थोडा अनुभव गाठीशी राखून आहे. तेही नसे थोडके !

आंबोलीला सरकारने 'हॉलिडे होम' सुरू केले आहे. कोठे असेल बरे ते ? की जुन्या प्रवासी बंगल्याचेच नामांतर आणि आश्रमांतर केले आहे ? एस० टी०चा सुबक

स्टँडही झाला असणार. बेळगाव-सावंतवाडी रस्ता काँक्रीटचा झाल्याचे तर केव्हाच ऐकले. त्याच्या कडा तरी लाल असतील. कडा ? त्या लाल भूमीवर ताणलेला तो पांढरा पट्टा कसा दिसत असेल ? नाही, दगडमातीचा रस्ता जाऊन काँक्रीटचा गुळगुळीत रस्ता आला म्हणून त्या पुरातन सौंदर्याला आणि संस्कृतीला तडे गेले, आसुरी, आधिभौतिक, यांत्रिक आधुनिकतेची कुरघोडी झाली, म्हणून मला सार्वजनिक उसासे सोडायचे नाहीत. खाजगी बससर्व्हिसमधील 'आपुलकी' नाहीशी झाली आणि सरकारी 'हॉलिडे होम'ला धंदेवाईक 'हॉटेल'ची 'कार्यतत्परता' (व तसले अन्य 'गुण') येणे शक्य नाही ही पोपटपंचीही करायची नाही. आंबोलीला चार प्राथमिक सोयी झाल्या तर एरवी असली हवा ज्यांच्या आवाक्यात नाही अशा माणसांना तिचे सुख मिळेल यात मला दुःख होण्याचे काय कारण ?

मलाही गेले पाहिजे. चौदा वर्षे झाली आंबोली पाहून. प्रभाकरला लिहायला हवे. पण शेवटी तेच; जाणे होईलसे वाटत नाही. कितीतरी अडचणी काढता येतील; संसारात ती सोय असते. पण आंबोलीलाच पुन्हापुन्हा असा नाट का लागावा ?...

...आत कोठेतरी नकार असावा. तीच आंबोली आता दिसेल का ? नाही, हा "कृष्णाकांठीं कुंडल आतां पहिलें उरलें नाहीं"चा हळवा सूर नाही, की तिच्यात आधुनिक सुधारणा झाल्याबद्दलच्या शोकाचे गोमटे सोंग नाही. त्या झाल्या नसत्या, अगदी तिची पूर्वीची संस्थानी चर्या राहिली असती, तरी नको वाटले असते. ती कशाला बदलायला हवी ? मी बदललो आहे. विशीत तिचे रूप "होतसे दर्शन न होतां दर्शन" अशा अवस्थेत मनात साठवले, त्याला पन्नाशीत कशी दाद मिळणार ? तिशीतदेखील थोडा विक्षेप होता ! ते रूप म्हणजे प्रतिकृत नव्हते; ते शब्दातून उपजलेले होते. पुढे पाहिलेल्या आंबोलीची त्याला मी केवळ चौकट दिली. आता ते डोळ्यांना दिसणार नाही; डोळेच उजाड झाले, निस्तेज झाले. डोळ्यांसाठी नसलेले ते मनातील रूपच जपावे.

...वर्ड्स्वर्थच्या त्या दोन प्रसिद्ध कविता आठवल्या. 'यारो अन्व्हिझिटेड' आणि 'यारो रिव्हिझिटेड'. यारो नदीच्या परिसरात जाण्याविषयी त्या कविता आहेत. पहिल्या कवितेत तो म्हणतो :

*We have a vision of our own*
*Ah! why should we undo it?*
....
*For when we're there, although 'tis fair,*
*'T will be another Yarrow.*

तेव्हा त्याने ते स्थळ पाहिले नव्हते, त्याविषयी ऐकले होते. अकरा वर्षांनी ते पाहिले; ते कमी पडले. त्यातून दुसरी कविता निपजली. तिच्या शेवटी शेवटी या ओळी आहेत :

*But that I know, where'er I go*
*Thy genuine image, Yarrow*
*'T will dwell with me...*

माझे जरा निराळे. असू द्या. पण खरी आंबोली कोणती?

# अक्रूर

तीसपस्तीस वर्षांपूर्वी एका विक्षिप्त वाटणाऱ्या टोपणनावाने वाचकांचे कुतूहल जागृत केले होते. त्या नावाने प्रसिद्ध होणारे लेखनही जरा वेगळ्या ढंगाचे असे म्हणून विशेष. 'पुरुषराज अळूरपांडे, मौजे पारलई' हे ते टोपणनाव—संपूर्ण, म्हणजे पत्त्यासह. ते एकाच लेखकाचे असे अर्थात बहुतेकांना वाटले. तसा सोपा अंदाजही त्यांनी आपापल्या परीने बांधला; कोणाला त्यात दोन लेखक दिसले. प्रत्यक्षात होते तीन. त्यांपैकी एक, रामचंद्र वामन अलूरकर, हे मेच्या पंधरा तारखेला गेले. पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे व मी हे आणखी दोन लेखक. या टोपणनावाखालचे सर्व—म्हणजे सातआठ—लेख बडोद्याच्या 'अभिरुची' या मासिकात प्रसिद्ध झाले. त्यांतील पहिलाच लेख छापला जात असताना संपादकांना त्यावर घालायचे नाव तातडीने कळवायला हवे होते. म्हणून मीच ते झटपट बनवून टाकले. सहकाऱ्यांची अनुमती गृहीत धरून. आता नावाची फोड करण्याची गरज नाही. फक्त अलूरकरांना 'ळ'कार दिला तो जुन्याच्या वासासाठी! आणि त्याचसाठी आमच्या पार्ल्याचे 'मौजे पारलई' करून टाकले!

पण नावाच्या या खुलाशावरूनही फार अंदाज बांधू नयेत! खरे म्हणजे हा सहलेखनाचा उद्योग सुरू व्हायच्या एक वर्षापूर्वीच आम्ही पांगलो होतो. पु० ल० पुण्याला, मी बोरीवलीला,-अलूरकर मात्र पार्ल्यातच राहिले. माझी-अलूरकरांची वारंवार भेट होई, त्या मानाने पु० लं०ची व आम्हा दोघा मुंबईकरांची साहजिकच कमी. पण पु० ल० पुण्यात राहत असले तरी ते पार्लेकरच अधिक होते. त्यांच्या जुन्या घरी खेपा होत, आणि शिवाय त्यांची लंबीचवडी गप्पिष्ट पत्रे भेटीतले अंतर भरून काढीत.

आमच्या या उद्योगाला सहलेखन म्हटले खरे, पण त्याचा अर्थ असा नव्हे की ते सगळे तिघांनी एकत्र बसून उरकले, किंवा एकाने लिहिलेले उरलेल्यांना दाखवून प्रसिद्ध केले! तिघांनी अक्षरशः एकत्र बसून लिहिलेला लेख एकच. (नटी-सूत्रधार संवाद, दिवाळी १९४३). तो आमचा दुसरा लेख. आणि दोघांनी (पु० ल० व मी) एकत्र बसून तयार केलेला एक (कवींचा नवा कारखाना, जुलै ४४). अगदी पहिल्या लेखाची (धा चा मा, जुलै ४३) कथा अशी : मला व अलूरकरांना बोलताबोलता सुचलेली एक गमतीची कल्पना आम्ही पुण्याला पत्र लिहून पु० लं०ना कळवली : त्यांनी जवळजवळ उलट

टपाली तिच्यावर आधारलेला लेखच पाठवला; त्यात एक अक्षर बदलायची सोय ठेवली नव्हती! तशीच आम्ही त्याची बडोद्याला रवानगी केली. उरलेले सर्व लेख, कोणीतरी एखाद्याने लिहावे, आणि प्रसिद्ध झाल्यावर उरलेल्यांनी वाचावे, असे घडले! किंबहुना, ते लिहिण्यापूर्वी त्याविषयी एकमेकांशी बोलणेही झालेले नसे. मग हे सहलेखन कसे; आणि लेखक एकच असल्याचा आभास कशासाठी?

असे जे 'एका' नावाने लिहिले गेले ते आणि त्यासारखे आणखी कितीतरी त्यापूर्वीची तीनचार वर्षे आमच्या सदैव बोलण्यात असे : ते विषय, ती विडंबने, त्या टीका; आणि ते कोठेही—भेटू तिथे : आगगाडीत, रस्त्यावर, हॉटेलात, कोणाच्या तरी घरी—पण फार करून अलूरकरांच्या घरी. अलूरकर त्या वेळी एकटे राहत; तेव्हाच्या पार्ल्याला शोभणाऱ्या छोट्या बंगलीवजा घरात. परवाच पाहिले. त्या घराचा आजच्या पार्ल्याला शोभेसा उभा आकारहीन विस्तार झाला आहे. अलूरकरांच्या एकटेपणाचे आणि बंगलीच्या निवांतपणाचे सार्थक करीत आमचे त्रिकूट तेथे तासन् तास जमत असे; आणि जमले की साहित्य, संगीत, नाट्य, चित्रपट असल्या भारदस्त विषयांचा, आणि चहा, पाने आणि सिगरेटी यांचा फडशा पाडीत असे. त्या विषयांतील जे खरेखुरे भारदस्त, सच्चे, त्यांसंबंधी आम्ही उमाळ्याने बोलत असू; आणि जे सोंगाडे त्याची उत्साहाने चिरफाड करीत असू—आणि तेच तेव्हा फार बुजबुजले होते; निदान आम्हांला तसे वाटे. आणि आम्हा तिघांची मते तंतोतंत जमत : एकमुखाने बोलल्यासारखी. ती गप्पाष्टके मुरली, जणू नकळत, आणि पुढे आकस्मिकपणे त्यांचे लेखन तयार झाले. त्यांना लेखरूप मिळावे असा पुसटही विचार आमच्या मनात नसे. किंवा लेखक व्हावे अशीही फारशी महत्त्वाकांक्षा नव्हती—म्हणून त्या टोपणनावाने झालेले लेखन कोणी केले याला तसे महत्त्व नव्हते!

अलूरकर गेले, आणि त्यांच्या आणि त्यांच्या त्या 'मठी'च्या आठवणी तरारून उठल्या आहेत. त्या मठीचा अवतार काहीसा त्यांच्यासारखाच होता : साधा, सुस्त, थोडासा अस्ताव्यस्तच. तेथे गृहस्थीपणाचे पोशाखी उपचार नव्हते; म्हणून खरे घरपण होते. आम्ही घरातल्यासारखेच होतो. आम्ही घालू ती रीत. धूम्रयज्ञासाठी कसलेही कामचलाऊ रक्षापात्र चाले; ते नसले तरी अडत नसे. पानांच्या शिरा नखलून कोठेही टाकाव्यात; पिचकारी मात्र खिडकीतून, एवढे बंधन पाळायचो. कवितेप्रमाणे जर्दाचीही तौलनिक चर्चा होई—त्यात आमचे सर्वांचे घराणे औंधाच्या इब्राहिमचे असले तरी हट्टी अभिमान नव्हता. कवींत आमच्या प्रेमाची काही खास स्थाने होती, आणि चेष्टेचीही.

तेच संगीतात. अनिलांनी तेव्हा आम्हांला भारले होते. त्यांचाही आमच्यावर लोभ होता. पु० लं०नी त्यांची दोन गीते ध्वनिमुद्रित केली होती. 'बी' आम्हांला फार प्रिय; आणि नवीनांपैकी ना० घ० देशपांड्यांवर आम्ही फार लट्टू. बोरकरही तेव्हा नव्यासारखेच. 'सावळया रुखावळींत धूर मात्र कांपरा' ही त्यांची ओळ पु० लं०च्या तोंडी सदैव खेळे ती तिच्या चित्रमयतेइतकीच 'रुखावळी'च्या कोकणी रुचीमुळे! पण त्यांच्या 'माझी आगबोट चालली दर्यात ग'विषयी मात्र आम्हांला संशय होता. माधव जूलियनांविषयीचे संशय बळावत चालले होते. कुसुमाग्रजांच्या लोकप्रियतेला पूर आला तेव्हा आम्हीही काही काळ त्या धारेला लागलो होतो. पण कुणा अनोख्या कवीची एखादी चमकदार कविता वाचनात आली की आम्ही ते शुभवर्तमान एकमेकाला उचंबळून सांगायचो. अत्र्यांची 'झेंडूची फुले' तर वर्षानुवर्षे नित्यपाठातील; पण पंडित सप्र्यांचा इवलासा 'अर्धचंद्र'ही दिसताच बराचसा तोंडात बसला. आमचे सवालजबाब चालत—पण इतरांच्या ओळींचे. आणि या सोहळयात कवितेइतकेच गद्यही सामील असे; त्यात विशेष भर असे विनोदावर. एक तर त्याची-आमची तार जुळे, आणि तो मैफलीत सहज 'टाकता' येतो. एखाद्या धारदार वाक्याने, कधी एखाद्यादुसऱ्या शब्दाच्या खमंग योजनेने, एखाद्या नितळ नाजुक श्लेषाने किंवा कोटीने, आम्ही हरखून जात असू. ते जिभेवर वागवायचो—कवितेइतक्याच स्वादाने. येथे गाजलेल्या अत्र्यांइतकेच दुर्लक्षित शामराव ओक आणि प्र० श्री० कोल्हटकर आमचे 'हीरो' होते.

इंग्रजी पुस्तकेही होतीच; पण कवितेची नव्हेत. मुख्यतः कथा, कादंबऱ्या आणि नाटके. नाटकांची अळूरकरांना विशेष ओढ. शॉ, इब्सेन, वाइल्ड वगैरे नेहमीची मंडळी असतच. पण पीरांदेलो, ओनील, चापेक, मेटरलिंक यांसारख्या नव्यांचा शोध लागला की आम्ही खुषीत असू. एकांकिकांचे अळूरकरांना खास आकर्षण. स्टाइनबेक, झ्वाइग, एर्न्स्ट टॉलर, यांसारखे गद्यकार आमच्या मनात भरले होते. ते दिवस 'पेंग्विन'च्या पहिल्या बहराचे. सहा आण्यांत दीडदोनशे पानांचे पुस्तक. ही नवनवीन कोरी नावे आम्हांला विशेष ओढून घेत. पण आजतागायतपणाच्या हव्यासाने, किंवा सोंगाखातर, सदैव काखेत तसली पुस्तके बाळगणारे आणि तोंडात तसली नावे मोठ्याने घोळवणारे साहित्यिक आम्हांला हास्यास्पद वाटत—विशेषतः, अति-नवेपणाच्या सोसाने, धर ताजे पुस्तक आणि कर त्याचा अनुवाद अशी सवय लागलेले साहित्यिक. म्हणून असे एखादे सुंदर नवे पुस्तक वाचनात आले की आम्ही म्हणायचो, "अमक्यातमक्याला या पुस्तकाचा सुगावा लागू देता कामा नये!"

आणि या पुस्तकी गप्पांच्या साक्षीला संगीताचा धबडगा असे; म्हणजे पेटी-तबल्याच्या हत्यारांनिशीच नव्हे. आणि त्याचे कंत्राट अर्थातच पु० लं०कडे; मी आणि अळूरकर श्रवणभक्त : पु० लं०ना दाद द्यायची आणि चिथवायचे. त्यांना फारशी चिथावणीही लागत नसे; अनेकदा ते ती स्वतःच देत. इतके त्यात रंगत. एखादी कविता वाचता वाचता तिला चाल लावायची; त्या कवीची दुसरी एखादी कविता कोणा गायकाने भ्रष्ट केली असेल, त्याची नक्कल करायची; नकलेतून नकला स्फुरायच्या : गायकांच्या, गायक-नटांच्या, नुसत्याच नटांच्या, आणखी कोणाकोणाच्या. त्या वेळी काव्यगायनाचा जमाना ओसरत होता आणि भावगीतगायनाचा जोमात येत होता. या उभय जातींचे विडंबन करताना पु० लं०ना भारी चेव येई. पुढे वीस वर्षांनंतर पु० लं०चा बहुरूपी (किंवा एकपात्री) अवतार 'न भूतो न भविष्यति' असा गाजला; त्याचे मूळ शोधण्याचा उपद्व्याप कोणी केला तर ते काहीसे अळूरकरांच्या मठीत सापडण्याचा संभव आहे! मात्र तेथील हे संगीत विनोदापुरते नव्हते; साहित्यातल्याप्रमाणे संगीतातीलही जे कलदार त्याची खुली कदर होती. मग ते कडक शास्त्रीय असो की चित्रपटातील हलकेफुलके वाटणारे असो. वझेबुवा–फैय्याजखांच्या ख्यालाइतकीच रोशनआराची ठुमरी, वत्सलाबाई कुमठेकरचा गझल, सुंदराबाईची लावणी प्रिय; आणि सैगल, पंकज मलिकच्या बंगाली मार्दवाइतकाच 'खजांची'पासून चित्रपटसृष्टीवर आक्रमण करू लागणारा पंजाबी ढंग आम्हांला हवाहवासा वाटे. "पहलेही मुहब्बतसे इन्कार किया होता" या 'शादी'-मधल्या खुर्शीदच्या गझलाने आम्हांला काही काळ कब्जात घेतले होते. अळूरकर व मी दोघेच असू, तेव्हाही त्याची अस्फुट पारायणे करीत असू.

अळूरकरांना चित्रपटांचे फार वेड. नामांकित इंग्रजी चित्रपट चुकवत नसतच; पण हिंदी, मराठी, सर्व काही पाहत. खांडेकर-विनायकांच्या ध्येयवादापासून ते फिअरलेस नादिया आणि जॉन कावस यांच्या बेफाम स्टंटपर्यंत. आम्ही नादियावरून त्यांची चेष्टा करीत असू. पण ते स्वतःच तिची चेष्टा करत—आणि तेवढीच खांडेकर-विनायकांचीही करत, म्हणजे त्यांच्या चित्रपटांतील तकलुपी गोष्टींची. 'प्रभात'च्याही आणि अन्यांच्या. पण चांगल्या गोष्टींची हाती काही न राखता तारीफ करत. त्यांची रसिकता चौरस होती, समृद्ध होती, आणि तिला चिकित्सेचे पाणी होते. त्यांच्यापाशी जातिवंत विनोदबुद्धी होती; पण जिची जात सदैव खळखळून वाहणारी असते ती नव्हती; तर पृष्ठभागाआड संथपणे सरकणाऱ्या थोड्याफार 'गुप्त' प्रवाहाची होती. काही जवळचे स्नेही सोडल्यास इतरांना तिचा फारसा गंध नव्हता. अळूरकर तसे अबोल होते; त्यांनी लिहिलेही फार थोडे. हे खरेच, पण त्यांच्या विनोदबुद्धीचीच ती जात होती : बुजरी, संकोची आणि

अतिसंयत. त्यांच्या रसिकतेचीही प्रकृती तशीच होती. मैफलीत गाण्याची धुंदी चढे, पण ती स्वत:शीच फुलू देत; तारस्वरातील 'वाहवा'ने इतर श्रोत्यांची दाद मिळवू पाहणारी ती सार्वजनिक रसिकता नव्हती.

त्या रसिकतेचे विषय शिष्ट, आकुंचित नव्हते, मोकळे होते. रुचीच्या पुस्तकी वा पोशाखी व त्यासारख्या पूर्वग्रहांनी बांधलेले नव्हते. सिनेमातल्या नादियाप्रमाणेच कादंबरीतल्या रहस्यकथा आणि तसला मसाला त्यांना आवडे. त्याची लज्जत चाखल्यावर जणू चूळ भरून ते एखाद्या कसदार कवितासंग्रहाचा अथवा नाटक-कादंबरीचा चवीने आस्वाद घेत. त्यांच्या उशाशी अथवा पिशवीत अनौळकर आणि शरच्चंद्र चतर्जी गुण्यागोविंदाने एकत्र नांदत असत. शरच्चंद्रांवर मोठी भक्ती. 'श्रीकांता'ची पारायणे होत. म्हणून पहिल्या मुलाचे ते नाव ठेवले असावे! आणि पुस्तकांप्रमाणे खाण्यातही जे तामसी, चरबट, त्याचाही ते आदर करीत—भर रस्त्याकाठी अस्तन्या वर सारून. पाणी-पुरी, दही-पकोडा—फार काय, ओली भेळसुद्धा—या त्या काळी हीन खाद्यजाती समजल्या जात; आणि जुन्या चौपाटीच्या एका कोपऱ्यात त्या ओवळ्यात वसत. डॉ० बाबू बोपर्डीकर, माधव खरे इत्यादी समानधर्मीय स्नेह्यांसहवर्तमान अळूरकर तेथे मनोभावाने जात. आता त्या खाद्यजातींची प्रजा फार वाढली आहे. आणि कोटातील वातानुकूलित हॉटेलांतूनही त्यांची प्रतिष्ठापना झाली आहे.

वाचनात बाबू समव्यसनी; संगीतात माधव—त्याचा त्या काळी मठीत वावर असे. बाबूने पार्ले सोडले. इतर पार्लेकर स्नेह्यांपैकी त्रिंबक पेठे कधी हजेरी लावी. परस्थांपैकी दोनतीनदा राजा बढे, एकदा कवी निकुंब आल्याचे आठवते; पण एकंदरीने स्नेह्यांचा गोतावळा कमीच. उगाच ओळखी करण्यावाढवण्याचे अळूरकरांच्या स्वभावात नव्हते; किंवा 'अरे-जारे'च्या एकवचनात उतरण्याचे. ते आणि मी प्रथम कॉलेजात एकत्र आलो. आणि पार्ल्याचाच आमचा आणखी एक सहाध्यायी—संस्कृतचा 'जगन्नाथ शंकरशेट स्कॉलर'—लक्ष्मण शिवराम देऊसकर असे आमचे तेव्हा त्रिकूट जमले. कॉलेजच्या मराठी वाङ्मय मंडळात आम्ही धडपडत असू. त्याचे कार्यक्रम, संमेलन, नाटकाच्या तालमी असा धांगडधिंगा चाले; त्यात आणखी मित्रही असतच. पण आम्ही तिघे गावकरी सहसा एकत्र जायचो; गावातही खूप वेळ एकत्र—बहुधा देऊसकरच्या घरी. बोलण्याचा एकला विषय : चालू मराठी साहित्य (नियतकालिकांसह). मिळेल ते फस्त करायचे, आणि एकमेकांना उत्साहाने सांगायचे. कित्येकदा रात्री उशिरापर्यंत रस्त्याच्या कडेला बांधावर बसून टकळी चालू ठेवायची. नव्यानव्या कविता (दुसऱ्यांच्या)

म्हणायच्या. अत्र्यांची विडंबने विशेष प्रिय; "दावूं गाउनि आमुच्याच कविता आम्ही गटारावरी"—अत्र्यांची एक ओळ थोडी फिरवून हा विनोद आम्ही न चुकता प्रत्येक वेळी करीत असू! अळूरकर या काव्यसोहळ्यात जोरदार भाग घेत; त्यांचा आवाज तेव्हा बुलंद असे, आणि पार्ल्यातील रस्ते तेव्हा रात्र पडल्यावर निर्मनुष्य असत! तेव्हा शाळा करीत असलेल्या पुरुषोत्तम देशपांडेच्या अस्तित्वाची आम्हांला खबर नव्हती!

कॉलेजात आम्ही एकत्र होतो, पण अळूरकर सायन्सला व मी आर्टस्‌ला. साहित्याचे इतके प्रेम असणाऱ्याने सायन्सची वाट धरावीच का? कारण त्या वाटेनेच देशाची प्रगती होणार आहे, इतर वाटा कुचकामी, हा देशभक्त समज त्या काळी लोकप्रिय होता; आणि अनेक पालक आपल्या पाल्याला कान धरून त्या वाटेवर ढकलीत—मग त्याला त्या दिशेची गती असो, नसो. अळूरकरांना 'अजावात' (त्यांच्या आवडीचा एक शब्द) नव्हती; आणि वाट चुकली ती जन्मभर भोवली. थोडे खडत कसेतरी बी० एस्‌सी०पर्यंत पोचले. सुखाची नोकरी कधी लाभली नाही. काही दिवस रेडिओ मेकॅनिक म्हणून वणवण गावोगाव हिंडले, आणि निवृत्त होईपर्यंत उरलेली वर्षे 'बेस्ट'च्या ड्रायव्हर-कंडक्टरांच्या हजेरीची पत्रके भरण्यात वाया गेली. राहून राहून वाटे, साहित्याचा किंवा आर्टस्‌मधील इतर एखाद्या आवडीच्या विषयाचा अभ्यास कॉलेजात केला असता तर वाचनाचे वेड त्याच्या अंगी लागले असते; एखाद्या प्रतिष्ठित व्यवसायाचा मार्ग लाभला असता, आणि त्यांचे व्यक्तित्व पुरें फुलले असते. पण ते झाले नाही, आणि कधी बोलून दाखवली नाही तरी ती खंत उरात वाळगत दबल्यासारखे राहिले. त्यांचा अबोलपणा कदाचित यातूनही आला असेल. आणि त्यातच एका पायाचे अधूपण. पहिल्या वयात प्रकृती दणकट होती; तिनेही पस्तिशीत दगा द्यायला सुरुवात केली. पन्नाशीआत पक्षघाताचा झटका आला. सगळे कोलमडल्यासारखे झाले. विशेषतः आर्थिक स्थिती; ती तर मुळातच दुबळी होती. पण अळूरकरांनी ओठांत दात घट्ट रोवून, दुर्दैवाची करुण भाषा न करता, ती खडतर वर्षे पार पाडली. मूळचा प्रसन्नपणा हरवू दिला नाही. त्या काळात आधार होता तो पत्नीचा, आणि तो भक्कम होता.

अशा या बहुतांशी गांजल्याखडलेल्या आयुष्यात ज्या आवडींनी आणि विरंगुळ्यांनी अळूरकरांना स्वतःला सावरण्यास मदत केली त्यांत दोन खेळ होते: बुद्धिबळ आणि ब्रिज. आणि दोहोंत ते पारंगत होते. वडील व चुलते राष्ट्रीय दर्जाचे बुद्धिबळ-खेळाडू, तो वारसा तिकडून आला असावा. वडील आमचे गणिताचे प्राध्यापक. अळूरकरांचे बुद्धिबळातील कौशल्य ऐकून ठाऊक, कारण मला त्या खेळात गम्य नाही. ब्रिज कमी

गअम्य म्हणून त्यांचे ते कौशल्य अनुभवाने ठाऊक. कित्येक वर्षे आम्ही काही स्नेही —बहुतेकजण कॉलेजातील समकालीन—रविवारचा उत्तरार्ध ब्रिजच्या निमित्ताने एकत्र घालवत असू. श्री० मधुकर पंडित यांच्याकडे. अलुरकर नेमाने हजर राहत. आम्हांपैकी ते व आणखी दोघेतिघे खेळात वाकबगार. बाकीचे जागा भरून काढायला, त्यांना नैतिक पाठिंबा द्यायला, आणि आवाज करायला. अलूरकरांचा खेळ आक्रमक, पण आवाज कमी!

एकंदरीनेच अलूरकरांचा आवाज कमी. प्रकृतीचाच दोष—की गुण? उगाचच आवाज करणारी, आणि त्याच्या बळावर वजन मारणारी मनुष्ये पाहिल्यावर त्याला गुणच म्हणावेसे वाटते. अलूरकरांनी लिहिले तेही फारच थोडे. त्यांचे कुशाग्र वाचन, भाषेची बारीक जाण, चौरस रसिकता, आणि मुख्य म्हणजे तल्लख विनोदबुद्धी—असा समृद्ध साज ज्याच्यापाशी त्याने मुकेमुके का राहावे? त्रेचाळीस साली 'अभिरुची' मासिक निघाले; कित्येक वर्षे पु० ल०, गोडसे आणि मी यांच्या बरोबरीने अलूरकरही त्याच्या जणू अंतर्गृहात होते. तेव्हा त्यांनी मधूनमधून त्यासाठी थोडे लिहिले, तेही आग्रह केल्यावर आणि अळंटळं करीत.

थोडे म्हणजे किती? तीन चित्रपट-परीक्षणे, पहिल्या दोहोंत मिळून तीन मराठी चित्रपटांचे व तिसऱ्यात त्या वर्षातील काही हिंदी बोलपटांचे. पुस्तकपरीक्षण एक : त्यात दोन पुस्तके. (पु० रा० लेल्यांचे 'डेक्कन कॉलेजात' व गो० के० भटांचे 'प्रणय'). त्यांत वेगळे काय? त्या काळच्या नियतकालिकांत सामान्यपणे आढळणाऱ्या 'लिहून आलेला मजकूर' जातीची शिफारसवजा चित्रपट-परीक्षणे पाहिल्यावर अलूरकरांची जात ध्यानी येईल. आणि शब्दबाजी न करता पुस्तकातील बरेवाईट इमानाने सांगणारी परीक्षणे तेव्हा अपवादांसारखीच होती. अलूरकरांत या दोन्ही क्षेत्रांतील जाणकारी होती, आणि विनोदबुद्धी सदा जागृत असल्यामुळे शब्दबाजीचे पाप त्यांच्या हातून घडणे शक्य नव्हते! याशिवाय अलूरकांनी दोन एकांकिकांची रूपांतरे केली. त्रेचाळिसच्या, म्हणजे पहिल्याच, दिवाळी अंकात 'अळणी संसारात' हे ए० ए० मिल्नच्या 'ए मॅन इन् द बोलर हॅट'चे. त्यावरची त्यांची टीप उद्धृत करण्यासारखी आहे : "...हे प्रामाणिक रूपांतर आहे. फक्त मध्यवर्ती कल्पनेचा आधार घेतला आहे किंवा ते स्वैर आहे हे खरे नव्हे." यातीच मखली ध्यानात येण्यासाठी त्या वेळच्या, आणि नंतरच्याही, काही रूपांतरकर्त्यांची चलाखी आठवून पाहावी. शेवटी दिलेली टीप गमतीची आहे : "या एकांकिकेचा प्रयोग कधी कुठे झाला नाही, व होणार नाही अशी आशा आहे." हे सगळे लेखन पहिल्या दीडएक वर्षातले. नंतर एकदम एकुणपन्नासच्या दिवाळी अंकातील 'कोहिनूरच्या

थोबाडीत' हे ॲलन मंकहाउसच्या 'द ग्रँड कॅम्स डायमंड'चे रूपांतर. दोन्ही एकांकिका विनोदी; त्यांचा बराचसा भर अर्थात संभाषणांवर, आणि ती सफाईदार आहेत, मराठी वळणाची आहेत. भाषांतरी नाहीत.

हे लेखन, आणि पुरुषराज अळूरपांडेच्या लेखनातील सहभाग, एवढीच अळूरकरांची छापील कमाई. असे अंधुकपणे स्मरते की माझ्या शब्दाखातर एका अल्पजीवी मासिकात त्यांनी, दोनदाच असतील फार तर, टिपणे लिहिली होती, आणि ती टिपणे प्र० श्री० कोल्हटकरांच्या शैलीत होती. ती शैली त्यांनी आत्मसात केली होती; तिला पुन्हा थोडीशी अत्रे आणि शामराव ओक यांची फोडणी दिलेली असे. खटपटीने नव्हे, सहज. उदाहरणादाखल दोन वाक्ये : 'पहिली मंगळागौर'च्या परीक्षणात दिग्दर्शक श्री० जुन्नरकर यांच्यावर विनायकांची छाप पडली आहे हे सांगून "विनायकांच्या 'अमृत'चा लागलेला जबर ठसका आठवला की अजून छातीत कसे धस्स होते!" पु० रा० लेले यांच्या 'डेक्कन कॉलेजात' या कादंबरीच्या परीक्षणारंभी : "राजकारणाच्या आखाड्यातला हा मल्ल काही गफलतीने ललित गद्याच्या हौद्यात उतरला असावा असेच क्षणभर वाटले." खरे म्हणजे अळूरकर पत्रे लिहीत त्यांत असला विनोद शब्दाशब्दातून असे—निरनिराळ्या तऱ्हेचा, पण कोट्या ही खास तऱ्हा. विनोद साधण्यासाठी अतिशयोक्तीचा आक्रस्ताळेपणा नाही. सगळे सौम्यसौम्य—हास्याची लकेर आणणारे, खो खो मिळवणारे नव्हे. प्र० श्री० कोल्हटकरांनीही थोडेच लिहिले—अर्थात इतके थोडे नव्हे—पण त्यांची उपेक्षा झाली; श्री० कृ० कोल्हटकरांचे चिरंजीव असूनही—की त्यामुळेच? अळूरकरांनी त्यांचा बाज उचलला—पण जवळजवळ लिहिलेच नाही. कोल्हटकर 'बापू' म्हणून परिचितांत प्रसिद्ध; आमचे अळूरकरही 'बापू'च. ते घरातले, आतांपुरते, नाव; पण आम्ही निकटच्या मित्रांनीही त्यांना 'बापू' म्हणण्याचा घरगुतीपणा सहसा केला नाही!

आपुलकी म्हणजे घरगुतीपणा असे सोपे समीकरण कोणी मांडू नये. अळूरकरांनी अनेकांना आपुलकी दिली, पण घरातले म्हणण्याइतके ते कितीजणांच्या जवळ गेले, कोण जाणे! तसे ते एकटेएकटेच राहिले असे मला वाटते. भडभडून न बोलणारे, लेखनकला असताही न लिहिणारे. शारीरिक व्यंगामुळे आणि परिस्थितीच्या दबावामुळे आत्मविश्वासाला तडा गेला होता, की तो प्रकृतिधर्मच? विनोदशून्य माणसाला कशाविषयी संशय नसतो—स्वतःविषयी मुळीच नसतो; म्हणून तो जबर विश्वासाने लिहीत, बोलत सुटतो. ज्याची विनोदबुद्धी फार सूक्ष्म आणि फार प्रबळ तो स्वतःविषयीच संशयखोर बनतो—असे काहीतरी विपरीत अळूरकरांबाबत घडले असेल का?

# अनिल

'अनिल' या नावाचे आता फारसे कौतुक उरलेले नाही. शहरगावच्या शाळेत 'अनिल' म्हणून हाकारले तर दीड-दोन डझन तरी पोरे चड्डया सावरीत ओ देतील. पण वीसपंचवीस वर्षांपूर्वी तसे नव्हते. तेव्हाची गुलहौशी आईबापे वसंत-शरदच्या फार पुढे गेली नव्हती. त्यापूर्वीच्या पिढीतील कविलोकांनी घ्यायची, अथवा नायकांना द्यायची, ती नावे. साहित्याचा 'जीवना'वर निदान नावापुरता तरी असा परिणाम होतो एकूण. तोपर्यंत पिढीच्या अंतराने 'तशा' नावांतील काव्य पातळ होऊन व्यवहाराला पचू लागत असावे. अनिल कवींच्या काव्याप्रमाणे त्यांचे नावही संभावितांना पचायला आवश्यक तो काळ जावा लागला. त्यांच्या काव्यशैशवातील गोष्ट आहे म्हणे : कोण्या एका कवीने वऱ्हाडी मोकळेपणाने त्यांच्या घराबाहेरून पुकारले, "अनिल आहेत का?" तेव्हा त्यांच्या वडिलांनी स्वच्छ जबाब दिला, "येथे अनिलबिनील कुणी नाही." राठ, कळकट, कोंदट नावांच्या त्या सच्छील जमान्यात 'अनिल' हे जरा छचोरच वाटले असणार. कवितेच्या खाली शोभून दिसले तरी चालत्याबोलत्या माणसाला ते लावायचे म्हणजे काय!

—पण अशा प्रेमळ कविबांधवांचे आणि भावड्या भक्तांचे सोडा, माणूस म्हणून कोणी आत्माराम रावजी देशपांड्यांना 'अनिल' या नावाने विशेष हटकले नसेल. ते आजवर वावरले ते एकंदरीने आद्याक्षरांच्या आधाराने : 'ए० आर०' किंवा (पुढे मराठीकरण रुळल्यावर) 'आ० रा०'. ही आद्याक्षरे लाभलेली आणखी बरीवाईट माणसे महाराष्ट्रात आहेत—पण आडनावाविना ती नसल्यासारखीच. आणि नावाचा हा संक्षेप सुटसुटीतच नव्हे तर फार सोयीचा, किंबहुना आवश्यक. कोल्हापूरकडे पाटील अथवा कुळकर्णी, तसे वऱ्हाडात देशपांडे. ती विशेषनामे नव्हेत, सामान्यनामेच. त्या काळी साहित्यक्षेत्रात सात देशपांड्यांचे वऱ्हाड झुलत होते : त्यांतील दोन दांपत्ये. स्त्रियांचा उल्लेख तोंड भरून करायचा असतो—तेव्हा त्यांच्याबाबत आद्याक्षरे कुचकामी. त्यांना ठीक कुसमावतीबाई आणि विमलाबाई म्हणायचे—अगदी घरंदाज नऊवारी नावांनी. पुरुषांच्या नावांशी मात्र कोणीही घाईची सलगी करावी. ए० आर० ('तथा' आ० रा०) आणि पी० वाय० (त्यांचा 'पु० य०' क्वचितच व्हायचा) हे दोघे आणि त्यांच्या बायका सहाध्यायी—त्यामुळेच प्रेमविवाहित. लोकांच्या आठवणींत त्यांची सांगड घट्ट बसलेली.

निबंध २४१३५ १५४२।८४

उरले ना० घ०, गु० ह० आणि वा० ना०. त्यांना मात्र कधी इंग्रजी आद्याक्षरांचा विटाळ झाला नाही. यांपैकी तिघे केवळ कवी म्हणून गाजले. वा० नां०च्या काव्याहून टीकेचा अधिक बोलबाला झाला. पी० वाय० आरंभी कादंबरीकार म्हणून पुढे आले. नंतर पुरोगामी म्हणून—आणि विविध भूमिकांत. पण त्यांनाही कवितेची बाधा चुकली नाही. त्यांनी कोण्या एके काळी सपत्नीक उमरखय्यामी निर्माल्यमाला बनवल्याचे नमूद आहे. असो, नावनिशीबाबत एवढा प्रपंच केला तेव्हा हेही सांगून टाकावे की आ० रां० चे घरगुती नाव आप्पा(साहेब) आहे.

एकोणीसशे तीसच्या आगेमागे ही कविमंडळी चमकली. त्यांपैकी प्रत्येकाचा बाज निराळा होता. पण नियतकालिक टीकेच्या सोप्या वर्गवारीत त्यांना उगाच एकत्रित करण्यात येऊ लागले, आणि त्या मोघम शिक्केबाजीत अनिलांवर गूढगुंजनाचा आळ आला—आणि चिकटला. अर्थात् 'फुलवाती'च्या प्रस्तावनेनेच तो ओढवून घेतला असे म्हटले पाहिजे. प्रस्तावना, परीक्षण, आणि अभिप्राय इत्यादींवरच बहुतेकांच्या साहित्यिक रसिकतेची गुजराण होते, तेथे मूळ काव्य समजून वाचण्याची यातायात कशाला ! आणि वाचताच समजणार नाही ते काव्य गूढगुंजनाच्या अडगळीत टाकायची सोय त्या बाळबोध पिढीत होती. ते खरोखरच दुर्बोध आहे का, हे पाहण्याऐवजी त्या प्रकाराला गूढगूंजन म्हणावे की शून्यशोधन की छायावाद की सायुज्यवाद, या भाकड चर्चेतच कित्येकांना गोडी होती. खुद्द अनिलांनीच 'प्रतीतिधर्म' हे नाव सुचवून चर्चा आणखी चिघळवली. त्यातच 'निःशब्दाला शब्द', 'अभावाचा भाव' असल्या शब्दप्रयोगांची त्यांची लकब ! परिणामी वाचक त्यांच्या निरुपद्रवी रूपकांकडेही संशयाने पाहू लागला. हे वीस-पंचवीस वर्षांपूर्वी. काळाचा उपरोध असा की तेव्हा दुर्बोध म्हणून झिडकारलेला हा कवी आता फार सुबोध—अगदीच सपक—म्हणून अट्टाहासाने 'नव' होऊ आणि राहू पाहणाऱ्यांच्या बिकट हिशेबी घसरत चालला आहे. "गूढ हेंच आहे, गूढताहि नाहीं."

शिक्के पुसट व्हायचेच. आणखी आठदहा वर्षांनी अनिल म्हणजे 'ते मुक्तछंदवाले' अशी नवी अढी जनमनात बसली. आद्य मुक्तछंदकार कोण हा वाद विद्वत्तेच्या शिळोप्याला वर्षानुवर्षे पुरेल. तो येथे नको. पण त्या वेळी तरी मुख्य आरोपी म्हणून बोट दाखवले जाई ते अनिलांकडेच. पस्तीसच्या 'प्रतिभा वसंत अंका'त 'प्रेम आणि जीवन' ही त्यांची मुक्तछंदातील दीर्घ कविता आली. चाळीस साली 'भग्नमूर्ती' हे त्या दातील खंडकाव्य प्रसिद्ध झाले. दरम्यान त्या छंदाच्या रंगरूपाविषयी आ० रा० आणि

वा० ना० 'वागीश्वरी'तून थोडा वाद खेळले—पण तो थोड्यांनी वाचला, आणि त्यांहून थोड्यांना कळला. खरा स्फोट झाला तो 'भग्नमूर्ती'नंतर. मुक्तछंद म्हणजे काय हे ज्यांना निश्चित माहीत नव्हते (आणि अजूनही कदाचित माहीत नसेल) त्यांनी कवितेच्या पावित्र्यावर घाला पडल्याचा आकांत केला. गद्याची मोडतोड म्हणजे मुक्तछंद, या सवंग भ्रमाच्या आधारावर अनेकांनी विनोद पिकविला. ज्यांना कोणत्याच छंदाचे सोयरसुतक नव्हते त्यांनीही दात विचकले. या धुमश्चक्रीत मुक्तछंदाचे सारथ्य अनिलांवर पडले. ते त्यांनी फाजील कसोशीने पार पाडले म्हणा किंवा काळाची करामत म्हणा, लौकरच मुक्तछंदाचा इतका जम बसला की नको त्याने आणि नको त्यासाठी तो लिहिणे सुरू केले! अर्थात् हाही अपराध अनिलांचाच!

अनिलांवर आणखी एक छानसा शिक्का बसला तो सुमारे दहा वर्षांपूर्वी. तो म्हणजे 'मानवतावादी'.

> *"संवेदना साऱ्या जगाची*
> *हृदयांत आहे भरभरून*
> *नातें नवीन असें कांहीं*
> *जोडून आहोंत आम्ही*
> *मानव तेंहि मानव आम्ही!"*

ही त्या 'वादा'ची बैठक. तिला उडता का होईना, राजकारणाचा वास आहे; तेव्हा साहित्य हेच ज्यांचे राजकारण अशा अतिमानव साहित्यिकांना तो वाद खुपला. पुन्हा एकदा शिक्क्यावरून शब्दाशब्दी...

कविता फारशी वाचायची नसतेच. कोठे चारदोन कवितांना पाठ्यपुस्तकांत अथवा कोणा लाडक्या गवयाच्या गळ्यात जागा मिळून त्यांचे भाग्य उजळते तेवढेच. एरव्ही सुशिक्षित मराठी माणसाला अनिलांची ओळख वर सांगितली तशी. अर्थात् ती दूरची ओळख.

पण ज्यांनी अनिलांना जवळून पाहिले त्यांना ते प्रतीतिधर्मी, मुक्तछंदाचे प्रवर्तक, मानवतावादी, इत्यादी बिल्ल्यांच्या गोळाबेरजेपेक्षा कितीतरी अधिक आहेत हे पाहताच उमगते. ते संपूर्ण, माणूस आहेत—नाही, म्हणजे सर्वगुणसंपन्न नव्हे; अगदी माणूस, पण सर्वांगांनी वाढलेला. ज्यांच्यात कवितेचे अथवा तशाच एखाद्या कलेचे इंद्रिय पुष्ट असते अशी माणसे अनेकदा अन्य अंगांत रोड, दुबळी, पिंकुटलेली असतात. जणू ।.

भरपाई केल्यासारखी. (ती पुष्टताही कधी मानीव, फसवी, सूज आल्यासारखी असते —पण आपण सच्च्या कलावंतांविषयी बोलत आहोत!) प्रतिभेच्या वेगळेपणापेक्षा वागणुकीतील वेडेचारांचे कौतुक होते. काव्याबाबतचे अनेक संकेत, तसाच कवीबाबतचा हा की तो 'नॉर्मल' नसावा. हसणाखेळणारा, प्रसन्न, निकोप माणूस कवी असेल अशी सहसा शंका येत नाही. त्या दृष्टीने अनिल कवी असून कवी नाहीत!

आता हे लिहिणे म्हणजे कदाचित विनोदासाठी अतिशयोक्ती वाटेल. पण तेव्हा, म्हणजे अनिल कवी झाले आणि कवी म्हणून वाढले त्या काळी, तसे वाटले नसते. (एकूण कविजात सुधारली म्हणायची!) 'झेंडूचीं फुलें' तेव्हाचीच, यात सगळे आले. कवी हा विनोदाचा हुकमी विषय बनला; परिणामी तो विनोदच हुकमी झाल्यामुळे फिकटला तरी मूळ विषयाची सार्थता सरली नाही. ते आत्मसंतुष्ट कवी, त्यांची ती प्रसिद्धीसाठी धडपड, त्यांचे हेवेदावे, कळपबाजी आणि त्यांच्या त्या उबवलेल्या 'भावना'—यांचे त्या कवींखेरीज अन्यांना हसू येणारच. अनिलांजवळ असल्या विनोदी कविकथांचा अमाप साठा आहे. ते तसली कथा रंगवून सांगतात, खळखळून हसतात—पण त्यात कधी आकस नसतो. आढ्यताही नसते. कसलाही लहानमोठा लेखक असो, अनिल त्याच्याशी गप्पा रंगवतील. कवीला शोभेल असा माणूसघाणेपणा त्यांच्यांत नाही वेळ असला तर "चला, अमक्याची भेट घेऊ" असे म्हणतील. 'अमका' हा अगदी सुमार इसम आहे, आणि तो त्यांच्याविरुद्ध क्षुद्रपणाने बोलतो, याची आठवण आपण त्यांना दिली, तरी ते हसून म्हणतील, "अरे, असेना का तो तसा! आपल्याला काय करायचं आहे? आपण चार गोष्टी करू. थोडी गंमत पाहू." तसली माणसे अनिलांकडे आली तर त्यांचीही ऊठबस अगत्याने होते. कोणाचा राग नाही. मुक्तछंदाचा वाद चालू होता ते दिवस आठवतात. कित्येक मठ्ठ माणसे पुन्हापुन्हा त्याच त्याच प्राथमिक शंकांनी त्यांचे डोके उठवीत—खरे म्हणजे उठवण्याची शिकस्त करीत. पण ते बेटे उठत नसे. शांतपणाने, पुन्हा एकदा पान लावून, अनिल श्रीगणेशा घालून देत.

मात्र अनिलांकडे फक्त साहित्यिकांची वर्दळ असते असे नव्हे. त्यांचे संबंध आणि आवडीचे विषय चौरस आहेत. त्यांच्या व्यवसायाची गाडी इतक्या उशिरा न्यायदानाकडून शिक्षणदानाकडे येऊनही उगाच नाही इतकी उत्तम रुळली. 'भग्नमूर्ती'चा वाचक त्यातील मुक्तछंदाइतकाच त्यांतील शिल्पकला, प्राचीन इतिहास, इत्यादींविषयीच्या जड आणि सचित्र तपशिलाने बिथरला होता. अनिलांच्या अनेक छंदांपैकी पुरातत्त्वसंशोधन हा एक आहे. उत्खनन, लेणी, भूर्जपत्रे यांसारख्या कानटोपी

घालून बोलण्याच्या ज्येष्ठ विषयांवर अनिल रंगतीने बोलतात. त्यावर त्यांनी थोडेसे लिखाणही केले आहे. या तद्रूपतेमुळे त्यांच्या विचाराची वाट कधी जुन्या परंपरेच्या अभिमानाकडे झुकली तर त्याचे नवल नाही. जुन्या मराठी कवितेचाही त्यांचा खोल व्यासंग आहे—विशेषतः ज्ञानेश्वराचा. चाळीस साली दूरवरच्या एका कुग्रामात त्यांची बदली झाली; तेथे वेळ खायला उठे म्हणून त्यांनी 'अमृतानुभवा'वर असा धोशा लावला की त्यानंतर काही काळ लौकिक विषयांवर त्यांना बोलायला लावणे जरा कठीण जाई. पुढे दुसऱ्या एका गावी त्यांनी संस्कृत साहित्यशास्त्राची एका शास्त्रीबुवांकडे संथा घेतली. आणि त्या गीर्वाण तिरिमिरीत त्यांनी 'प्रक्षोभ' या नव्या रसाची स्थापना करून चक्क संस्कृतमध्ये त्याचे निरूपण केले. तत्त्वज्ञान हा त्यांचा विद्यापीठातील खास विषय. तो परीक्षेनंतरही चेंगटपणे त्यांच्यापाशी राहिला आणि रुजला. चित्रकलेचाही त्यांनी अभ्यास केला. शांतिनिकेतनात घालवलेल्या काळात त्या कलेचे बंगाली वळण मनात भरले, तरी पुढे इतर वळणेही त्यांच्या रसिकतेने पचवली. तीच व्यापक रुची संगीतातही निसर्गप्रेम हा (नुसत्या प्रेमाप्रमाणे) हरएक कवीचा जन्मजात गुण मानला जातो. आणि तेही डोळस नसते; बहुधा प्रेमासाठी प्रेम असते. ज्या निसर्गाविषयी इतके पाघळायचे त्याची साक्षात् ओळख नसली तरी चालते. सगळ्यांच्या माहितीतील चार फुलापक्ष्यांची वेलबुट्टी काढली की छान दिसते. पण अनिलांनी झाडे-फुले-पक्षी-किडे यांचा जीवशास्त्राच्या प्राध्यापकासारखा (सहकुटुंब) अभ्यास केला आहे. (सहकुटुंब म्हणजे कवि-कुटुंबासह.) यामुळे चिमणी-पोपट, गुलाब-शेवंती ही अनुमानधपक्याने ओळखण्याइतकीच निसर्गज्ञानाची धाव असणाऱ्या माझ्यासारख्याला देशपांडे दंपतीबरोबर उघड्यावर फिरायला जाताना जरा अवघडल्यासारखेच होते! तात्पर्य काय, की या कवीत तऱ्हेतऱ्हेच्या ज्ञानशाखांची गर्दी आणि गुंतागुंत झाली आहे. कवित्वाला विद्वत्व वर्ज्य असे कोणी मानतात ते खरे नसावे तर! खरे म्हणजे जो नुसताच कवी तो 'अगदीच' कवी होत नसावा का, अशीही शंका येते!

पण या माणसाचा मूळ पिंड रसिकाचाच, विद्वानाचा नव्हे. जी विद्वत्ता हौसेने केली ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वात जिरली, एकजीव झाली. कधी त्यांच्या लिहिण्याबोलण्यात ती बोचत नाही. रसिकताही खुली, पण उच्छृंखल नाही. चोरून चैन करायची आणि मग आपण त्या गावचे नाही, असा आविर्भाव आणायचा, असा सदाशिवपेठी बाणा नाही; तसा आपल्या शौकांचा गाजावाजा नाही. चांगलेचुंगले खाणेपिणे हवे. वर रामटेकचे तलम पान आणि सातारचा गोडबोले जर्दा. या जर्द्याशी तीस-पस्तीस वर्षे एकनिष्ठा राखल्याचा अभिमान, ज्यामुळे तो अधिकच 'जमतो'. दिल्लीला खुशबूदार जर्द्यांच्या तऱ्हातऱ्हांचा।.

घमवमाट; पण त्यांना विनवासाचा गोडवोलेच हवा. आणि हे सगळे इतरांनाही उदार आग्रहाने देतील. साहित्यिकांच्या जगात 'घर आपलें' मानून आग्रहाने घेणारेच फार! म्हणून का अनिलांकडे अशा लोकांची एवढी ये-जा असते?

असे हे संपन्न जीवन आहे या कवीचे. ते केवळ पैशामुळे नव्हे. कारण पैसापैसा करून किरटे आणि कंगाल जीवन जगणारे लोक असतातच—साहित्यिकांतही आहेत. त्या प्रकृतीच्या काहीजणांना अनिलांच्या समृद्धीने पोटदुखी झाली. ते सरकारी नोकरीतील हुद्देदार याचाही अशा विनसरकारी बुभुक्षितांनी विपरीत अर्थ लावला. दैन्यातही कलेशी इमान राखणारा हा श्रेष्ठच; पण समृद्धीतही कलेचा कस उतरू न देणारा हाही कलावंत म्हणून कमी नव्हे. 'दरिद्री कलावंत' हे जणू भूषण मानणारा एक बावळट ध्येयवाद आहे. तो पसरवणारा एक स्वार्थी वर्गही आहे. असल्या सबबींवर लाचारी पचवणाऱ्यांना आणि ती वसूल करणाऱ्यांना हा ध्येयवाद फार उपयुक्त वाटतो. असो. 'येथें जगांतच आहे जीवनानंद' हा विश्वास अनिलांच्या कवितेप्रमाणे संसाराच्याही मागे आहे.

*"आनंद! आनंद!! आनंद!!!*
*आनंद दशदिशा*
*धुंद नभनिशा*
*आनंद, आनंद, आनंद!"*

अशा धुंदीची आणि तृप्तीची कविता अनिलांनी लिहिली. अतृप्तीची, कढ—उसाशांची रडवेली कविता काळजाला भिडावी, असा माणसाचा धर्म आहे का?—पण तो धर्म अठरा-विशीच्या हिरव्या वयाचा; पुऱ्या वाढीने फुललेल्या माणसाचा नव्हे. पण पुष्कळसे कवी आणि पुष्कळसे वाचक त्या आंबटचिंबट हिरवटपणासाठी आसुसलेले असतात. "कांहीं प्रीतिशाहीर। निराशेचा सूर प्रेमीं भरती। प्रेममरणाची गोडी गाऊनी। घालती सांगड." ही सांगड जुनी आहे. विरह—वेदना—मरण हा मसाला नेहमीच चटकदार वाटत आला आहे. या मरणाने बरीचशी दुबळी कविता जगवली. अनिलांची वृत्तीच निराळी.

*"नाही मी प्रीतीशाहीर*
*प्रीतीचें रडगाणें गाणारा*
*शाहीर आहें मी तेजस्वी गाणें*
*गाणारा प्रीतीच्या आशावादाचा..."*

हा आशावादही शाळकरी नाही. पुस्तकी सद्गुणांचे स्तोम माजवून जीवनोल्हासाला पायबंद घालणारा नाही. त्या उल्हासाच्या मुक्तसंचाराचा आहे. त्यात वैराग्याचे सोंग नाही. अनुरागाचा ढंग आहे, भोगाचे संगीत आहे. त्याला काळाची तमा नाही.

*"विरक्ति ? छे ! सदानुरक्ति ! भक्ति ? प्रेमभक्त मी*
*तरंग ऊर्मि प्रीतिच्या अजून यौवनांत मी !!*
*... ...*
*अजून यौवनांत मी नि दंग जीवनांत यां*
*... ...*
*अरे कशास जीवना विचार आणसी मना*
*उदंड पाज आजची उद्यांचि तीहि आण ना*
*पुरे भरावयास पात्र हें नको करूं कमी*
*तिथें सदा अतृप्त मी अजून यौवनांत मी !*
*... ...*
*नसें मुमुक्षु, मुक्त मी, अजून यौवनांत मी !*

असा हा चिरयौवनाचा कवी—आणि चिरयुवा.

या वृत्तीने अनिलांचा संसारही भारला आहे. त्यांचे खरे परमभाग्य हेच. या प्रेमकवीचा आवेग उसना नाही; त्याची प्रेमकविता स्वप्नांनी सजवलेली नाही, की परिस्थितीचा विसर पडावा म्हणून रंगवलेली नाही. "घराकडे येतां" जग विसरणारी साफल्यभावना त्यात आहे. शुद्ध काल्पनिक अथवा घर विसरण्यासाठी केलेल्या प्रेमावरील कविताच फार असतात; तसा ताण येथे नाही!

आरंभीच अनिलांवर मारलेल्या शिक्क्यांचा उल्लेख आहे. त्यांत 'प्रेमकवी' हाही घालता येईल! तसा तो द बिस्त कवींवर मारला जातोच! पण 'फुलवाती'तील नाजुक प्रेमकवितांनी त्याला विशेष अर्थ दिला. पण त्याचा त्याहूनही खास अर्थ एके काळी लोकांच्या मनात ठसला होता. अनि ांचा प्रेमविवाह महाराष्ट्रात फार गाजला. आंतरजातीय विवाह म्हणजे त्या काळी केवढी बंडखोरी! त्यातच आणखी कितीतरी नाट्यपूर्ण घटना होत्या. 'रोमँटिक' हा शब्द चुकीच्या अर्थाने आपल्याकडे त्या सुमारास रूढ होत होता. अनेक बऱ्यावाईट कवींनी तो स्वतःला लावून-लाववून घेतला; त्या शब्दातच सुख मानले. अशा कवींच्याच नव्हे तर शेकडो सुशिक्षित

युव-युवतींच्या एकमताने रा० रा० आत्माराम रावजी देशपांडे आणि कु० कुसुम जयवंत यांचे हे प्रकरण म्हणजे 'रोमँटिक' प्रेमाचा कळस होता. त्याने अशांना काही काळ हूरहूर आणि परोक्षपूर्ती पुरवली असणार! या प्रकरणाचा पुरा रोमहर्षक तपशील कळायला उभयतांपैकी एकाच्या आत्मचरित्राची वाट पाहावी लागणार. त्याबाबत त्यांनी आजवर आळीमिळीच राखली आहे. हा त्यांच्या सुसंस्कृततेचाच भाग आहे; नाही तर कसल्या तरी फुसक्या सुताने (एकतर्फी) 'रोमँटिक स्वर्गा'ला पोचल्याचा कित्येकांबद्दल इतका गवगवा झाला आहे!

—येथेच थांबावे. हा अनिलांवरचा लेख आहे. त्यांच्या काव्यावरचा अथवा त्या काव्यावर त्यांच्या पत्नी कुसुमावतीबाई यांच्या व्यक्तित्वाचा काय परिणाम झाला याविषयीचा नाही. तसे असते तर बारीक चिकित्सा करून 'फुलवाती'त फुलांच्या प्रतिमा इतक्या दाटीवाटीने का आल्या याचा अर्थ लावीत बसावे लागेल! नाही तरी एका प्रेमळ कवीने फूल म्हणजे कुसुम आणि वात म्हणजे वारा म्हणजे अनिल, अशी चलाख उपपत्ती लावली आहेच!—ते असो, पण कुसुमावतीबाईविषयी न लिहिता फक्त अनिलांविषयी लिहिण्याची कसरत याहून न लांबवलेली बरी!

## बाबुराव चित्रे

तीन महिन्यांपूर्वीची गोष्ट. एक स्नेही परदेशी जाणार होते, त्या निमित्ताने आमच्याकडे रात्री जेवण होते. सर्व मंडळी जेवली; विमलाबाई चित्रेसुद्धा साधारणतः वेळेवर आल्या. पण बाबुरावांचा पत्ता नव्हता. शेवटी ते बराच उशीर करून आले तेव्हा त्यांचे अपेक्षापूर्तीच्या स्मिताने सर्वांकडून स्वागत झाले. वाट पाहत असताना बाबुराव आणि घड्याळ यांच्या संबंधांविषयी अनेक जुन्या विनोदांची ताज्या दमाने उजळणी झाली; विमलाबाईंची त्यांना मूक मान्यता होती. त्यांची मान्यता आम्ही धरूनच चाललो (कारण नवरा वक्तशीर नसल्याचा आरोप कोणत्या स्त्रीला अमान्य होईल?)—पण त्या दिवशीचा त्यांचा मूकपणा जरा वेगळा वाटला खरा; म्हटले नेहमीप्रमाणे प्रकृती नरम असावी, पण प्रकृतीप्रमाणे या बाईंचे बोलणे नरमगरम होत असल्याचे आम्हांला ठाऊक नव्हते! असो.

बाबुरावांच्या मुद्रेवर नेहमीचे अर्ध-स्मित होते; पण आज त्याला वेगळा उठाव होता. तो आवरण्याचा प्रयत्न करीत, नमेल तेवढ्या सहजपणे—पण काहीसे कबुली दिल्याच्या आविर्भावात—त्यांनी आपण आजोबा झाल्याची बातमी सांगितली. आम्ही क्षणभर पाहत राहिलो. हा एवढासा पुरुष, चड्डी चढवली तर मॅट्रिकच्या वर्गातसुद्धा मागच्या बाकावर खपून जाईल, आणि हा पितामह! 'अभिरुची' जेव्हा जाणत्या लेखक-वाचकांच्या मनात भरले—म्हणजे पंधराएक वर्षांपूर्वी—तेव्हा बडोद्यासारख्या दूरच्या गावाहून असले चमकदार पण वजनदार मासिक काढणारा संपादक 'दिसतो कसा आननीं' हे पाहण्यासाठी आदरमिश्रित कुतूहलाने कित्येक जण येत. आणि परत जात ते स्मितमिश्रित आदराने. हा पोरगेलासा संपादक महिन्याच्या महिन्याला इतके प्रगल्भ आणि बेडर लिखाण पुरवतो? मग त्यांना कोणी गमतीने बाल-संपादक म्हणायचे; आम्हीसुद्धा आपापसांत म्हणायचो. लहानग्यांच्या मासिकाचा एखादा बाल-संपादक आम्हांला माहीत होता—त्याचे (शारीरिक) बाल्य चेंगटपणे पाचसात वर्षे रेंगाळलेले असले तरी पुढे चक्रवाढ व्याजाने भरपाई केल्यासारखे देहाचे मुद्दल वाढले होते. बाबुरावांची काठी ही वीस वर्षे होती तशीच आहे; त्यापूर्वी मी पाहिली नव्हती. आणि काळ निदान चेहऱ्यावर आपला रेघी हिशेब जाताजाता मांडून ठेवीत असतो, तोही बाबुरावांबाबत खुद्द त्यांच्याप्रमाणेच बेहिशेबी झालेला दिसतो. पन्नाशीचे वळण पायाशी आले तरी केस

आपले कडेपर्यंत काळेच. आता अशा साजाने का नातू खेळवायचा? बाबुरावांनी आजवर पुष्कळच विसंगत गोष्टी केल्या; त्यांत आणखी एकीची भर...

विमलाबाई त्या दिवशी अबोल आणि बावरलेल्या होत्या. त्या आजी झाल्याच्या जाणिवेने की परदेशी निपजलेला नातू दिसणार कधी या उत्कंठेने—की आपला प्रियकर-आणि-पती आजोबा झाला या विक्षिप्त वाटणाऱ्या कल्पनेने? कोण जाणे!

ही पत्नी आपल्या पतीला तशी सर्वांगांनी अनुरूप; पण गेल्या दहा वर्षांत तऱ्हेतऱ्हेच्या दुखण्यांना निकराने तोंड दिल्यामुळे तिला थोडी वडिलकीची दर्शनी झाक आली आहे (एरवी ती आजवर मर्यादशीलपणे पतीच्या एक पाऊल मागेच राहिली.) त्या वडिलकीमुळे चमत्कारिक वाटले असेल?

हे आकार-पुराण जरा आणखी लांबवावे. 'अभिरुची'च्या पहिल्या वर्षात ती अगदीच इवलीशी, खिशात दडवून नेता येईल अशी, होती. तिच्यासाठी काही लिहावे असे एका साहित्यिकाला मी सुचवले तेव्हा तो स्वच्छ म्हणालाच, "एवढ्याशा अंकासाठी लिहिणं आपल्याला नाही जमणार." त्याचेही खोटे नव्हते; तो स्वतःच थोराड होता—लेखणीनेही. दुसऱ्या वर्षीपासून कागदाचा आकार जरा मोठा धरला; जाडी कधीच वाढली नाही. दिवाळी अंक मात्र भरदार असायचे. अर्थात् अंक म्हणजे जवळजवळ सगळाच वाचायचा मजकूर. जाहिराती उगाच गालबोटासारख्या. दीडपट-दुप्पट आकाराच्या अंकाइतकाच ऐवज त्यात असायचा. चव्वेचाळीस साली—म्हणजे दुसऱ्या वर्षी, विशेषतः उत्तरार्धात—कागदावर नियंत्रण येताच 'अभिरुची' आणखी सुकली. काही अंक तर चौदा पानांचे काढावे लागले. ते गंडांतर संपताच पुन्हा सावरली—पण शेवटपर्यंत कधी विशेष भरली नाही.

आपल्या नऊ वर्षांच्या हयातीत 'अभिरुची' तशीच किडकिडीत राहिली, पण फिकुटली नाही. तिची अवखळ धडपड हटली नाही. आणि तिच्या चाहत्यांचा वर्ग निश्चितपणे वाढत राहिला. म्हणजे वर्गणीदार वाढत राहिले असे मात्र नव्हे. 'अभिरुची'चे वर्गणीदार किती होते याचा निश्चित आकडा खुद्द बाबुरावांनाच छातीवर हात ठेवून कधी सांगता आला नव्हता. त्या नावांच्या आणि पत्त्यांच्या याद्या (दर नावाला पत्ता हवा आणि तो एकच हवा ही रूढी पाळून), वर्गणी आली न आल्याची आणि अंक गेला न गेल्याची नोंद, इत्यादी कारभारी उपचार त्यांच्या प्रकृतीला कधीच मानवले नाहीत; आणि

या बाबतीतही त्यांची गृहिणी त्यांच्या प्रकृतीला नेहमी जपत असे. ती जोड-संपादक होती हे निराळे—पण येथे प्रकृतिभेदच नव्हता मुळी. असे हे 'पार्वती-परमेश्वरौ' थाटाचे साहित्य-जोडपे. वेळच्या वेळी वर्गणी देऊन अंक न मिळणे आणि वर्गणी तुंबवली तर दोन-दोन अंक मिळणे हे इतक्यांदा होई की त्याला चमत्कार म्हणणे कठीण. 'अभिरुची'ने वाचकाच्या वाङ्मयीन आवडीला चांगले वळण लावले (असे आजवर अनेकांनी सद्‌गदितपणे म्हटले), पण तिने त्याला काही अ-वाङ्मयीन गुणही शिकवले. एक सोशिकपणाचा : असल्या गैरव्यवहारापासून उपद्रव झाला तरी तिकडे आपुलकीने काणाडोळा करण्याचा. दुसरा धीर धरण्याचा : खोळंबा झाला तरी गडबडू नये हा. काटेकोरपणे बोलायचे म्हणजे 'अभिरुची'ला विलंब होत नसे—कारण महिना संपताना प्रसिद्ध होण्याचा पायंडा तिने सुरुवातीलाच पाडला व एकंदरीने हयातभर नेकीने पाळला. पण मासिक म्हणजे महिन्याच्या आरंभी प्रसिद्ध व्हावे (म्हणजे मुद्दामच उशिराची तारीख नेमून घेतली नसल्यास) या सामान्य संकेताने बिनसराईत वाचकाची उगाच चलबिचल व्हायची. अगदी एकतीस तारखेला 'अभिरुची'चे अंक प्रसिद्ध झालेले आहेत—म्हणजे मावळत्या महिन्यांचे. वर्षारंभ अंकाचा विशेष ताण पडायचा —नव्या वर्षाचे नवे बेत म्हणून, आणि तो फेब्रुवारीत आल्यामुळे अठ्ठावीस तारीख सांभाळावी लागते म्हणून! चार वर्षांतून एकदा काय ती एका दिवसाची सवलत! अर्थात् या उफराट्या नियमितपणाचे श्रेय सर्वस्वी बाबुरावांना देता येणार नाही. विमलाबाईंचेच नाही म्हणत मी—अर्थात् त्या अर्धांगीचा त्यात वाटा होताच—पण आमच्यासारख्या सहकाऱ्यांनीही त्यांना हातभार लावला. उत्तरार्धात दिवसगतीने आमचा आळस झडत जायचा—"चंद्रकोर वद्यांत जशी." पण खरे सांगायचे म्हणजे मनोमन साक्षीने व्हायचे हे. बाबुरावांचे दुसरे किंवा तिसरे स्मरणपत्र आले की त्या लावी पक्षिणीप्रमाणे आम्ही कार्यप्रवण व्हायचे. तोपर्यंत नुसत्या तारखा फडफडल्या म्हणून काही आम्ही तिच्या भोळ्या पिलांप्रमाणे गलबलून जाणारे नव्हतो! आणि बाबुरावही धीरगंभीर असणार यावर आमची निष्ठा असे. त्यांची तातडी उगाच तार ठोकण्यापर्यंत सहसा पोचली नाही. मग 'ट्रंक कॉल'चे कशाला? तसले भेदरट संपादक आपण पाहतोच!

—दिवाळी सणाचेही तेच. अलीकडे, मला वाटते, सव्वाशेच्या वर दिवाळी अंक निघतात. तेव्हा कदाचित पाऊणशेपर्यंत असतील. पण संपादकाच्या धावपळीचे तंत्र आणि वेळापत्रक जवळजवळ तेच असावे. खपाच्या चढाओढीत टिकले पाहिजे. तेव्हा दिवाळीच्या चारआठ दिवस अगोदरच अंक बाजारात यायला हवा, तेथे पाहताच उठाव

होईल असे मुखपृष्ठ हवे, आणि चित्रपटांच्या जाहिरातींतल्याप्रमाणे टळक ठशांतील नटनटी—म्हणजे लेखक—पाहिजेत. हे सगळे—आणि त्याचा मुख्य आधार म्हणजे जाहिराती—जमवायला मृगाच्या पावसापासून सुरुवात करावी लागते. पुण्यासारख्या गर्दीच्या लग्नसराईत आचारी, वाजंत्री आणि कार्यालय यांना जेवढ्या अगोदर सुपारी देता येईल तेवढा घोर कमी; तेच दिवाळी अंकाचे लेख आणि चित्रकार इत्यादींविषयी. बाबुरावांनी असली बाजारी धांदल कधी केली नाही. कारण त्यांना असल्या चढाओढीशी कर्तव्य नव्हते. त्यांचा वाचक बांधलेला होता—वर्गणीने नव्हे, आपुलकीने. स्टॉलवर जे मुखपृष्ठांचे मीनाबाजार भरत—आणि अजूनही भरतात—त्यांत पोटभरू स्टॉलवाले 'अभिरुची'ला धड स्थानही देत नसत. इतर अंकांपैकी बहुतेकांची मुखपृष्ठे हवी तेवढी छटेल आहेत याची प्रसिद्धीपूर्वी ते खात्री करून घेत. 'अभिरुची'ला तसले मुखपृष्ठ नसेच! तिच्या पहिल्या दिवाळी अंकाचे मुखपृष्ठ अनेकरंगी होते—पण त्यावर जिराफ होता. नंतरच्या दिवाळी अंकांवर चित्रकलेच्या नव्या नव्या तऱ्हा आल्या, पण बाबुरावांनी रंगीत बाईला तेथे कधी नाही बसू दिली! पांचपन्नास प्रती अधिक खपवण्याचा मोका घालवला. या अव्यवहारी वेडाचे श्रेय अर्थात् बरेचसे चित्रकार गोडश्यांनाही आहेच—पण त्यांचे श्रेय तेवढ्यापुरतेच नव्हते!

असो. बाबुरावांची दिवाळीची हालचाल सुरू होई ती गणपतिविसर्जनानंतर. मग त्यांनी मुंबईला यावे. आम्ही तिघाचौघांनी अंकाची योजना आखावी; लेखकांना पत्रे जाईपर्यंत नवरात्र जवळ आलेले असे. असू द्या. निवडक लेखक (म्हणजे अभिरुचीच्या निवडीचे, जाहिरातीच्या नव्हे.) आपले वेचक लिखाण अगत्याने पाठवून देत; वेळाबाबत कोणी कुरकूर करीत, पण कमअस्सल माल सहसा कोणी पाठवला नाही. या चालीने निदान भाऊबीज उजाडायचीच; कधी दोन दिवस पलीकडे. आम्ही म्हणू, तुळशीच्या लग्नापर्यंत दिवाळी असते. परवाच गोडश्यांशी बोलताना आठवण निघाली. कोणतासा दिवाळी अंक होता. काही कारणाने तो मुंबईत छापून घ्यावा लागला; सगळा मजकूर एका छापखान्यात आणि वेष्टन दुसऱ्या छापखान्यात. बाबुरावांनी आणि गोडश्यांनी रात्रीचे दिवस केले, मुद्रकांनीही नेट धरला. पाडव्याला दोन्ही ठिकाणी छपाई आटपली होती, फक्त अंकाची बांधणी व्हायची उरली. आणि एकाएकी बाबुराव गहाळ झाले. कोठे ते, गोडसे त्यांचे स्थानिक यजमान त्यांनाही ठाऊक नव्हते. दोन दिवसांनी बडोद्याहून पत्र आले तेव्हा समजले की बाबुराव भाऊबिजेच्या ओवाळणीसाठी जरा घरी जाऊन येत आहेत!
—पण आश्चर्य हे की अशा वेडबंबू कारभारानंतरही 'अभिरुची'चे दिवाळी अंक उठून दिसत. पानन्पान कलदार असे. कोठे हीण मिसळलेले नसे. अर्थात् हे जाणकारांच्या

नजरेतून. तसला जाणकार वाचक बाबुरावांनी जमवला; त्या वाचकाला अंक एकतीस तारखेला निघाल्याची क्षिती नव्हती; त्यापूर्वीच निघालेले पुढील महिन्याचे अंक बाजूला ठेवून तो 'अभिरुची' पाही. अशी बाबुरावांची कमाई.

या सगळ्यांतला विनोद सोडला (आणि तो आम्हांला अजून पुरतो), आणि बाबुरावांनीही ते हसण्यावारी नेले तरी अनियमितपणा एखाद्या हट्टी रोगासारखा इतका अंगात मुरावा याची त्यांना खंत वाटत नव्हती का? नव्हती असे कसे होईल? पण दुसऱ्या एखाद्याचे केव्हाच अवसान गळाले असते. एक तर त्याने गाशाच गुंडाळला असता किंवा तेवढ्याच गोष्टीवर जीव टांगून मनस्ताप करून घेतला असता. यांतील पहिले करण्याएवढे बाबुराव कधीच कचदिल नव्हते, आणि दुसरे करण्याएवढा तारतम्यबुद्धीचा अभाव त्यांच्यात नव्हता! उत्तम अंक काढणे आणि तारीख सांभाळणे यांतील तर-तम ते जाणत होते. पण मला वाटते, यातले इंगित हे की बाबुरावांचा आत्मविश्वास जबर होता—आणि आहे. पुढे त्यांच्यावर इतकी संकटे आली की त्यांची अर्धीमुर्धी माहिती असलेले स्नेही हादरून गेले, पण खुद्द बाबुराव 'जैसे थे' राहिले, वाकलेसुद्धा नाहीत. ते काय असल्या टीकेने खचणार!

आजची एक खास लकब वापरून म्हणायचे म्हणजे असला जबर आत्मविश्वास हा बाबुरावांचा महान गुण आणि महान दोष आहे. 'अभिरुची'सारखे कर्तृत्व स्वतःवर आणि स्वतःच्या उद्दिष्टावर कडक निष्ठा असल्याशिवाय कधी साध्य झाले आहे? आणि अशा निष्ठेशिवाय का वादळी आपत्तीच्या अशा लाटांवर लाटा आल्या तरी माणूस डोके वर ठेवू शकतो? कित्येकांत आत्मविश्वासाबरोबरच आत्मप्रेम असते; तसे बाबुरावांत असते तर त्यांनी आपल्या धैर्याची गाथा गायिली असती—स्वतःविषयी लिहिले असते, लिहवले असते. पण असा मिरवू पाहणारा आत्मविश्वास हा मुळातच थोडा कच्चा, आणि काहीसा सोंगाड्या असला पाहिजे. बाबुरावांनी गेल्या दहाबारा वर्षांत तडाखे सोसले ते ओठ दाबून. निकटच्या मित्रांनादेखील त्यांची कल्पना नव्हती—मग तिऱ्हाइतापुढे त्यांची वाच्यता करणे दूरच. या करंगळीएवढ्या दिसणाऱ्या माणसाने कुठून आणली ही दगडाची छाती? नाही तर ही ठिसूळ, लेचीपेची, लंबीचवडी पात्रे कशी धीरोदात्त नायकाच्या साजात झुलतात आणि कोठे काळजात खुपले तर कसे आसवे, उसासे आणि किंकाळ्या दाखवतात? निर्मम वृत्तीने सुख झेलावे ही शिकवण आटोक्यातील आहे, पण त्याच वृत्तीने दुःख पेलण्याचे सामर्थ्य हे येरा गबाळांसाठी नाही. पुस्तके वाचून ते येत नाही. (नाही तर अद्ययावत् पुस्तकांचे आपले भारवाही

केव्हाच स्थितप्रज्ञ झाले असते !) ध्यानमनननानेही नाही. बाबुरावांच्या धकाधकीत कुठले मनन नि कुठले ध्यान ? ती वृत्ती उपजत आली असावी.

पण तोच आत्मविश्वास मोठा दोषही ठरला. त्याच्या होषात बाबुराव नुसतेच पुढे धडक देत राहिले. मागे काय कोसळले ते त्यांनी पाहिले नाही, की पुढे काय वाढून ठेवले आहे तेही त्यांना धड दिसले नाही. कोणी दाखवून देण्याचा यत्न केला तरी उमगले नाही. दाखवणारे कधी नाराज झाले, क्वचित् जवळचेही दुरावले, दुखावले; पण बाबुरावांना त्याचे भान तरी नव्हते किंवा ते असूनही धरलेले सोडण्याची त्यांची तयारी नव्हती. मोठा हट्टी, हेकट माणूस असे त्यांनी म्हणवून घेतले—आणखीही पुष्कळ आणि वाईटसाईट म्हणवून घेतले असणार, पण ढीम नाही. बाबुरावांनी कधी वाद घातला नाही, दुराग्रह धरला नाही. मऊपणाने, कळकळीने दुसऱ्याचे म्हणणे ऐकले, आणि स्वतःचे केले ! अनेकांचा आत्मविश्वास वाचाळ आणि वाफ सोडणारा असतो. बाबुरावांचा अबोल आणि थंड आहे; म्हणून त्याचा दाब एवढा प्रखर असावा. कधी वाटते की, फुशारकी सोडाच, पण निदान त्यांनी आपले स्पष्ट समर्थन केले असते तरी त्यांनी दुसऱ्याचे थोडे ऐकले असते. पण नाही. म्हणजे असे नव्हे की हा गृहस्थ घुमा किंवा तुसडा किंवा बेपर्वा आहे. बाबुरावांचा वैरीदेखील त्यांना असे म्हणणार नाही. इतके ते सौम्य आणि मनमिळाऊ आहेत...पण अशा काहीतरी त्यांच्या स्वभावात गाठी आहेत म्हणा, किंवा गुंतागुंती ! वस्तुतः त्यांना कसलीच घमेंड नाही. पण कधी तक्रार येई की त्यांचे पत्र निष्कारण उग्र होते किंवा तोडून टाकणारे. तेव्हा—म्हणजे पंधरा वर्षांपूर्वी—चढत असलेल्या एका कथालेखकाने मला दोनतीनदा म्हटले असेल, "अभिरुची आपल्याला फार पसंत. मला तिच्यासाठी लिहायचं आहे. पण तुमच्या संपादकांचं पत्र असं आलं की म्हटलं न लिहिणंच बरं ! अशीच पत्रं लिहितात का हो ते ?" मी त्यांना जीव तोडून सांगितले की बाबा रे, तुझा काहीतरी गैरसमज होत आहे. चित्र्यांसारखा दिलदार प्राणी मिळायचा नाही. पण तो तेच वाजवत बसला. बाबुरावांचे त्याच्या कथांविषयी फार चांगले मत होते हेही मला माहीत होते ! बरे, मोठ्यांनाही सडेतोड लिहिणारा हा संपादक असे म्हणावे, तर गावोगावी असे छोटे आणि नवथर लेखक होते की जे प्रेमळ प्रोत्साहन दिल्याबद्दल—आणि तेही तीर्थरूपी आव न आणता—आणि वर यायला हात दिल्याबद्दल या संपादकाचे फार फार ऋणी होते. या सगळ्याचा अन्वय कसा लावायचा ?

म्हणजे बाबुराव नेहमी आपलाच हेका चालवीत असा जर यावरून कुणाचा ग्रह झाला असेल तर आमचे लिहिणे फसले म्हणायचे ! 'अभिरुची'बाबत त्यांना आम्ही

सहज एखादी सूचना करावी आणि त्यांनी ती तत्परतेने स्वीकारावी असे नेहमीच होई; त्यांच्या सूचनेची थट्टा केल्यास मोकळेपणाने हसून त्या थट्टेत ते सामील होत आणि ती सूचना विसरून जात, हेही कितीदा झाले! आत्मविश्वासाचा आवेग वाढला की खरोखरच त्यांना विलक्षण योजना सुचत. त्यांच्या पार न पडलेल्या योजनांचा मोठा ग्रंथ होईल. आणि तो बराचसा विनोदी होईल! 'अभिरुची'ची ओढाताण होत असताही एखादी नवी जबाबदारी ते अंगावर घेऊ पाहत. १९४७ चा जुलै महिना सरत आला होता आणि एके दिवशी बाबुरावांचे तातडीचे पत्र आले. त्यांच्या तातडीच्या पत्रांची मला सवय झाली होती. त्यात १५ ऑगस्टपासून एका इंग्रजी मासिकाचा आरंभ आपण करणार असे होते : लेखक कोण, सदरे कोणती, मी काय लिहायचे—सबकुछ. हे दोनतीन दिवसांत तिरिमिरीत ठरवलेले! (कारण त्यापूर्वीच्या पत्रांत त्याबद्दल अवाक्षरही नव्हते; आणि त्यांच्या दोन पत्रांतील अंतर सहसा याहून अधिक नसे.) आणि सगळे उलटटपाली हवे—आणखी लेखकांची नावे, इत्यादी. कळेना की बाबुराव माझीच चेष्टा करीत आहेत की काय! की स्वतःची? ही दुसरी शंका त्यांना मी उलटटपाली बोलून दाखवली—आणि जरा फटकळपणेच! झाले, बाबुरावांनी कल्पना सोडून दिली! आम्ही सर्वांनी पुढे तिच्याबद्दल त्यांना चेष्टेने फाडून खाल्ले, पण सद्गृहस्थाने कधी आपला साधा बचाव केला नाही. मूग गिळून हसण्याचे त्यांना छान जमत असे. साप्ताहिक काढण्याचा पेटका त्यांना मधूनमधून येतच असे. दैनिकाचा आला होता का? आठवण नाही आता. पण तोही येईल असे आम्ही थट्टेने इतक्यांदा म्हणालो की खरोखरच तसे झाले असावे असा भास होतो. पुरुषोत्तम देशपांडे म्हणायचे की बाबुरावांनी सकाळचे दैनिक काढले तर संध्याकाळपर्यंत अंक निघत जाईल!

पण त्यांची एक मोठी योजना पार पडली—ती विपरीत अर्थाने—आणि होत्याचे नव्हते झाले! 'अभिरुची' निघाली त्याच सुमारास बडोद्याहून छापखाना हलवण्याचा विचार बाबुरावांत बळावू लागला. त्यांचा आत्माराम छापखाना लहानसाच; पण रेखीव कामाबद्दल बडोद्यात त्याचे नाव होते. ('अभिरुची'वर विशेष प्रेम नसणाऱ्यांनीही सुंदर आणि शुद्ध छपाईचे श्रेय तिला दिले.) पण त्याची (आणि 'अभिरुची'चीही) वाढ करायला बडोद्यात वाव नाही असा बाबुरावांचा ग्रह होता. तेथील मित्रांनी सांगून पाहिले, पण तो वाढतच राहिला. नव्या गावी जायचे, नव्याने डाव मांडायचा, अशी ईर्ष्याही होती. कोठे जायचे याचा पुरा विचार केला नव्हता. आरंभी नागपूर डोक्यात होते. त्याला कारण एकच : ते अनिलांचे गाव. अनिलांवर तेव्हा मोठी भक्ती, आणि अनिलांनीही त्यांच्यावर फार लोभ ठेवला. पण सोनारानेच कान टोचले: खुद्द अनिलांनी

त्यांना पटवून दिले की छापखान्याची खूप वाढ होण्याच्या दृष्टीने नागपूर कुचकामी! मग मुंबई हाती धरली; आणि शेवटी छापखाना बडोद्याहून मुंबईला हलवला. त्याला आता आठनऊ वर्षे झाली—पण ते सगळेच एखाद्या दुःस्वप्नासारखे झाले. मुंबईत जागेसाठी, नवीन यंत्रांसाठी, आणि या दोहोंना लागणाऱ्या रोख रकमेसाठी बाबुरावांनी कसकसल्या उलाढाली केल्या त्यांची संगतवार माहिती फक्त त्यांनाच असेल. माझ्यासारख्या दूरस्थ मित्राला सोडाच, पण ज्यांच्यात रात्रंदिवस बसणे-उठणे त्या बडोदेकर मित्रांनाही त्यांची फारशी कल्पना नव्हती. स्वभावातला तो गुंता येथे आड आला. स्नेह्यांपेक्षा त्रयस्थांवर त्यांनी अधिक विश्वास टाकला—सावधपणाचे इशारे मानले नाहीत. आणि सगळा अवघड (आणि मला तुटकपणे ठाऊक असलेला) इतिहास आवरायचा म्हणजे पन्नास-एकावन्न सालच्या सुमारास मुंबईला आलेला छापखाना दोनतीन वर्षांत विखरून गेला—जाग्यावर राहिला नाही. दरम्यान बडोद्यातील घरदार विकून टाकले होते—केवढे मोठे होते ते! सगळे सगळे गेले आणि आपल्या मोठ्या कुटुंबासहित बाबुराव मुंबईत निर्वासित झाले...

काय होते आणि काय झाले? पण बाबुरावांची (आणि विमलाबाईंचीही) चालचलणूक अशी सुरळीत आणि प्रसन्न की परक्याला काही शंका येऊ नये. कसला ताठरपणा हा, आणि कसले काळीज! या सातआठ वर्षांत काय काय घडले? हातचे गेले, शिरावर बोजे आले; नोकऱ्या मिळाल्या, त्याहून अधिक सुटल्या! संसाराचा रगाडा केवढा. सात मुले; आजारपण येऊन-जाऊन असायचेच. आणि तेही पडशा-खोकल्याच्या कौतुकाचे नव्हे, तर भारदस्त. हा सगळा खेळ इवल्याशा जागेत. संसाराची—भांड्याचिरगुटांची—कळा गेली; पण माणसांची कळा कशी टवटवीत राहिली. तिचे खानदान हरवले नाही. कोठून आली ही रग? अजून चित्र्यांकडे पूर्वीसारखेच माणसांचे अगत्य आहे. चहापाण्याला खंड नाही; घरंदाज कायस्थी जेवणाचा आग्रह आहे. मित्रमंडळींनी यावे, वाद रंगावेत, थट्टामस्करी खळखळावी, याची ओढ आहे.

...बडोद्याचे वैभव खालसा झाले—चित्र्यांचे म्हणतो. पण मनाचे दारिद्र्य आले नाही. ती संपन्न, उदार मने जपत ही माणसे मुंबईच्या मोडक्या अशान्त आसऱ्याला आली; थोडी बडोद्याची सावली घेऊन आली. जेथे काहीच उरले नाही, सगळी पडझड, त्याची आठवणदेखील नकोशी वाटते; पण चित्रे मंडळींची मुळे बडोद्यात खोल रुजली, पसरली आहेत; त्यांत इतरांची गुंतली आहेत. त्या बंधांनी मुंबईतील उपरेपणातही आधार मिळाला.

•

हल्लीच बडोद्याला गेलो होतो. खारीवाव रस्त्यावरून जाताना आठवणी भरून आल्या : चित्र्यांचे सगळे तेथेच होते—छापखाना, घर, इतर मालमत्ता. बरोबर वीस वर्षांपूर्वी त्यांची-माझी भेट झाली तेथे. त्यापूर्वी चार वर्षे अनिलांकडून त्यांच्याविषयी, उभयतां-विषयी, ऐकत होतो. "फार छान जोडपं आहे ते. नवीन दृष्टी आहे; काहीतरी करून दाखवण्याची उमेद आहे. तुम्ही जरूर भेटा त्यांना," असा त्यांचा आग्रह असे. त्यांच्यावर पुरुषोत्तम आत्माराम चित्रे आणि विमल गुते या कार्यकर्त्यांची छाप पडली ती सप्टेंबर १९३७ मध्ये त्यांच्याच अध्यक्षतेखाली भरलेल्या बडोदे शारदोपासक संमेलनात. प्रस्तुत कार्यकर्त्यांचा जोड-उत्साह, क्वचित् रुसवे, (फुगवे म्हणवत नाही!) इत्यादींवरून पुढे काय घडणार याचा त्या प्रेमकवीला वास आला, व लौकरच ते घडलेही! अनिलांशी बोलण्यात व पत्रांत असे कित्येकदा येई की असे एखादे मासिक हवे, जे साहित्यातील, विशेषतः कवितेतील, नव्या प्रयोगांना स्थान देईल, स्पष्ट बोलेल, कोणाचे मिंधे राहणार नाही. १९४० मध्ये 'प्राची' या नावाच्या अशा एका मासिकाची नागपुरात सिद्धताही झाली होती. पण दुर्दैवाने त्याच्या मुद्रण-प्रकाशनाची जबाबदारी जे उचलणार होते त्या श्री० प्रयागींचा खून झाला. तसले मासिक चालवण्याची कर्तबगारी बाबुरावांत आहे असा अनिलांचा विश्वास होता. अर्थात् मी बाबुरावांना भेटलो तो काही त्याविषयी बोलण्यासाठी नव्हे. ओघात तेही निघाले, इतकेच. चहापाण्याबरोबर मनमोकळ्या गप्पा झाल्या; साहित्यिकांच्या गमती काढून हसलो. मीही हसायला गंमत पुरवली—आरामखुर्चीतून खाली पडून! (ती विमलाबाई पुढे वारंवार काढीत असत!) त्यानंतर एक वर्ष उलटले. त्यात काही तुरळक पत्रव्यवहार झाला. पण १९४२ च्या शेवटी शेवटी बाबुरावांनी तो धक्का दिला. 'अभिरुची'ची तपशीलवार योजना त्यांनी आखली होती—आणि ती प्रसिद्धही केली. त्या प्रसिद्धिपत्रकातील पहिल्या अंकातील लेखकांच्या यादीत माझेही नाव होते; आणि तेसुद्धा बर्ट्रँड रसेल व अवनींद्रनाथ टागोर यांच्या मध्ये! जिवाला जरा बरे वाटले, आणि बरेचसे अवघडल्यासारखेही झाले. त्यातच माझे नाव 'मंगेश वामन राजाध्यक्ष' असे छापून 'तो मीच का' असा किंचित संदेहही उत्पन्न केला होता. पत्रातून तो मीच असा सखेद खुलासा आला. आता रसेल आणि टागोर अशा जागतिक खाशा पंक्तीत मी कसा घुसलो याचा खुलासा हवा : चित्र्यांनी 'अभिरुची' काढली ती हल्लीच्या अमृत–श्री–नवनीतच्या, म्हणजे 'डायजेस्ट'च्या धर्तीवर अन्यत्र प्रसिद्ध झालेले साहित्य (जसे रसेल व टागोरांचे) व थोडेसे स्वतंत्र (जसे माझे!) देण्यासाठी. मला ही कल्पना आवडली नाही (अर्थात् मला लाभलेले स्थानमाहात्म्य सोडून); अनिलांसारख्या इतर स्नेह्यांनाही नाही आवडली. पण ती जाहीर झाली होती. मात्र आमच्या म्हणण्याला मान देऊन चित्रे दांपत्याने उसनवारी कमी

करीत करीत पाचव्या अंकापासून ती पूर्णपणे थांबवली; आणि 'अभिरुची'ला तिचे खास रूप दिले.

पण 'अभिरुची'चा पहिला अंक (फेब्रुवारी १९४३) जेव्हा हाती पडला तेव्हा निराळ्याच तऱ्हेच्या आणि संपूर्णपणे अनपेक्षित स्थानमाहात्म्याने मी हादरलो. पहिल्या पानावर संपादकांची नावे होती; त्यांत सौ० विमल चित्रे आणि श्री० पुरुषोत्तम आत्माराम चित्रे यांच्या मध्ये माझे नाव झळकत होते! त्या क्षणापर्यंत आपण अशा ठिकाणी पोचू याची अंधुक कल्पनाही नव्हती. त्याच दिवशी निषेधाचे पत्र लिहून पुढील अंकापासून माझे नाव तेथून काढण्यास सांगितले. कारणे दोन : मी सरकारी नोकर असल्यामुळे पूर्वानुमतीशिवाय संपादकी करण्याला तांत्रिक अडचण होती, आणि अडीचशे मैलांवरून वाङ्मयीन शेळ्या हाकण्याचे कसब माझ्यापाशी नव्हते. पुढील अंकापासून माझे नाव तेथून उठले आणि पति-पत्नींतील छापील अंतराय नाहीसा झाला! पण त्या पहिल्याच अंकात माझ्या नावातील मध्यमपदाबाबत पुन्हा एकदा बाबुरावांनी गफलत केली. संपादकाच्या जागी नव्हे, तर एका टिपणाच्या खाली माझी आद्याक्षरे छापली होती ती 'मं० वा० रा०' अशी होती. अशी बाबुरावांची गडबडघाई. तिचीच दुसरी बाजू म्हणजे उत्साह; तो दृष्ट लागावा असा होता—आणि कळकळही!

असा आमचा संबंध जडला. आणि दोनतीन महिन्यांत तो इतका घट्ट झाला की जणू आमचे वर्षानुवर्षांचे ऋणानुबंध होते. माझे काही स्नेही हळूहळू या बंधात गोवले गेले. चित्र्यांचे होतेच. लौकरच 'अभिरुची'चे जणू एक कुटुंब असावे अशी जवळीक वाढली. मुद्दाम जमवलेल्या 'साहित्यिक कुटुंबा'त अनेकदा जो हळवा प्रेमळपणा कटाक्षाने जोपासला आणि दाखवला जातो त्याचा इथे लवलेशही नव्हता. इतरांचे सोडा, विमलबाईंनी त्याची केव्हाच रेवडी उडवली असती. अशी त्या बाईत स्त्रीदुर्लभ द्वाडबुद्धी होती—आणि आहे! हवापाणी, मुलाबाळांचे कुशल, असले वाचिक उपचार काढायची तेथे सोय नव्हती. शांताराम सबनीसचा द्वाड—द्वाड कसला, हूड—उपरोध तर अगदीच पुरुषी; थोडा अस्वलीच! कोणी जरा आव आणला की त्याला चेव चढलाच; नकोसे करी मग तो त्याला. अशा निकोप, खेळीमेळीच्या, दिलखुलास बैठकी होत. आम्ही परस्थ अर्थात मधूनमधून जात असू. स्थानिक कुटुंबीयांपैकी प्रभाकर शिंदे इंजिनियर, त्याचा भाऊ सुधाकर आणि अरविंद तांबे हे वकील, आणि शांताराम साहित्याचा विद्यार्थी आणि शिक्षक असला तरी सांगूनसवरून बिनसाहित्यिक. तेव्हा उगाच कानटोपी घातल्यासारख्या अति-गंभीर आणि कृत्रिम 'साहित्यिक' चर्चांना तेथे

बंदी होती. गप्पाष्टके चालत त्यांत माणसे, खेळ, खाणेपिणे, चित्रपट, राजकारण यांबरोबर पुस्तके आणि लेखक येत. किंबहुना 'साहित्य' हा पुस्तकी शब्दही तेथे क्वचितच निघे. केवळ (उच्च) साहित्याला 'वाहिलेल्या' नियतकालिकांचा सहसा असतो तसल्या सोवळ्या, कोंदट, अस्पर्श्य दिमाखापासून 'अभिरुची' बचावली याचे श्रेय उभय संपादकांइतकेच हे व असले अ-साहित्यिक स्नेही यांना दिले पाहिजे. उत्तम लेखन आणि लेखक यांविषयी तसल्या स्नेह्यांना प्रेमादर होता; पण लेखक हा कोणी असामान्य प्राणी असतो हा दावा त्यांना मंजूर नव्हता. त्यांच्यासारख्यांमुळेच 'अभिरुची'चे स्वरूप नेहमी चौरस राहिले. आणखी स्थानिक कुटुंबीय होतेच. भाषाशास्त्री डॉ० ना० गो० कालेलकर यांची प्रकृती निराळीच; पुढे अहमदाबादेहून बडोद्यात आलेले डॉ० ना० ग० जोशी यांची आणखी तिसरीच. या उभय डॉक्टरांची विद्वत्ता 'अभिरुची'च्या अंगी लागली. आणखी एक गाढा व्यासंगी या गोतात पुढे ओढला गेला—प्रा० दिनेश माहुल्कर. रा० रा० नातूंचीही ऊठबस असे. याशिवाय स्थानिक ज्येष्ठांपैकी कमलाबाई टिळक, प्रा० दांडेकर, डॉ० भावे इत्यादींचे साहाय्य चित्र्यांनी मिळवले.

पहिल्या दिवाळी अंकाच्या वेळी गोडसे, पु० ल० देशपांडे, अलूरकर व मी बडोद्याला गेलो. गोडसे हे चित्रकलेप्रमाणे साहित्याचेही दर्दी, आणि त्याशिवाय असल्या अंकांच्या मुद्रणाचा त्यांना अनुभव. चित्रे स्वतः मुद्रक. आम्ही उरलेले नुसतेच उत्साही. अंकाच्या छपाईच्या संयोजनात ते दोघे मग्न होते तेव्हा आम्ही तिघांनी 'पुरुषराज अळुरपांडे' या टोपणनावाखाली गमतीदार प्रयोग करून पाहिला. आणि तो जमलाही! असो. काय दिवस गेले ते! कसला तरी कैफ चढला होता. बाबुरावांचे आणि गोडश्यांचे छापखान्यातील काम संपले की, किंवा कित्येकदा ते चालू असताही, गप्पांचे सत्र चालू असे. मध्ये रुचिपालट म्हणून देशपांड्यांचे संगीत. इतर स्नेही जमले की गप्पांची रंगत आणखी वाढे. आणि वर चित्र्यांचा रसिक पाहुणचार. अर्धी रात्र उलटून गेली तरी गोष्टी संपलेल्या नसत. गोडसे तसे जरा अबोलच, पण त्यांना या बैठकींत असा बोल फुटे की आम्ही एकचित्ताने ऐकत राहावे. अंक निघाला आणि आम्ही पांगलो. असा संच पुन्हा कधी दिवाळीत जमला नाही. एकदोनदा, मला वाटते, मी आणि गोडसे गेलो होतो तिथे. पुढेपुढे अंकाचे मुखपृष्ठ मुंबईत गोडश्यांच्या देखरेखीखाली छापले जाई. एखादादुसरा अंकही तेथेच छापला.

इतर अंकांच्या संपादनाशी दुसऱ्या कोणाचा फारसा साक्षात संबंध नसे. एखाद्या लेखाबद्दल टपालाने विचारविनिमय होई, पण सगळ्या खस्ता खात बाबुराव आणि

विमलाबाई; आणि यशाचे श्रेय इतरांना वाटून मोकळे होत! खस्ता मात्र कित्येकदा स्वतःच अधिक बिकट करून ठेवायच्या. काही चालढकलीने, तर काही अनागोंदी कारभारामुळे. कवितांच्या फायलीत जर दुधाच्या बिलांची गर्दी झाली तर आणखी काय व्हायचे?

पण त्या दोघांनाही कविता समजत! त्यामुळे काम आणखी वाढे! कवीचे नाव आणि कवितेची लांबी यांवर कविता 'कंपोज'ला देण्याचा तेव्हाच्या काही संपादकांचा शिरस्ता असे म्हणतात. ते सोपे काम. चित्र्यांसाठी नव्हते पण ते. त्या दोघांनाही कवितेची विलक्षण आवड आणि बारीक समज होती. आणि त्या गुणांमुळे 'अभिरुची'चा काव्यविभाग किती उठून दिसे. कथा, टीका यांत त्या मासिकाचे वैशिष्ट्य नेहमीच थोडेफार गाजले, पण कविता हे त्याचे खास वैभव. अंकाच्या आरंभी कविता एकत्र छापण्याचा त्याचा प्रघात पुढे इतरांनी उचलला; कवितेची प्रतिष्ठा सुचवण्याचा हेतू त्यामागे होता. कवितेच्या नव्या धर्तीचे 'अभिरुची'ने उत्साहाने स्वागत केले (इतर बहुतेक दारे तिला बंद होती.), पण जुन्यांचाही अधिक्षेप केला नाही. अशी विमलाबाईंची आणि बाबुरावांची काव्याबाबतची दृष्टी मोकळी होती; तिला जुनी झापडे नव्हती आणि नवीही नव्हती. असली तीक्ष्ण दृष्टी दुधाच्या बिलांच्या गळाठ्यातूनही खरी कविता नेमकी हुडकून काढी!

आणखी कित्येक गळाठे असत. चित्र्यांचे राहते घर चांगले दुमजली होते; त्याशिवाय शेजारीच छापखाना होता. पण 'अभिरुची'चे स्वतंत्र कार्यालय नव्हते—निराळे टेबलही नव्हते. घरात शिरताच एक छोटी खोली लागे; त्यात सर्व काही असे. भेटीला आलेल्यांपासून (आणि त्यांना खंड नव्हता), तो 'रमी'च्या नोंदकागदापर्यंत काय काय असे तेथे! त्यांतच 'अभिरुची'साठी आलेले बरेवाईट साहित्य, तिचा पत्रव्यवहार इत्यादी असायचे. पुस्तकांचा खच पडलेला असे; त्यांत चित्र्यांची स्वतःची पुस्तके, परीक्षणासाठी आलेली पुस्तके, यांबरोबर (ज्येष्ठ) चिरंजीव दिलीपच्या रहस्यकथा असायच्या. पुढे दिलीप चमकला—आणि तोही केवळ सोळासतराव्या वर्षी—तो 'नव्यांतला नवा' कवी म्हणून आणि काव्यचिकित्सक म्हणून. पण त्याने आपला पिंड काही वर्षे तशा वाचनावर पोसला. त्यामुळेच तो पुढे रहस्य-कविता लिहू लागला, आणि ती गहन कोडी सोडवणाऱ्या वाचकाला धनंजयाचे गुप्त चातुर्य लागे—हा विनोद अनेकांनी केला असणार. पण आईबाप 'अभिरुची'सारख्या 'उच्च' मासिकाचे संपादक आणि मुलगा वाचतो गुन्हेगारीच्या कथा, याचाही अचंबा कित्येकांना वाटला असणार. पण बाबुरावांनी किंवा विमलाबाईंनी त्याला बंदी केली नाही. ("कवितालेखनाला करायला

हवी होती," असे कोणी म्हटले असेल!) त्यांनी मुलांना छोट्या मित्रांसारखे वाढवले. त्यांना आपल्या शारीरिक प्रकृतीचे देणे दिले तसे मानसिक प्रकृतीचेही—चौरस रसिकतेचे आणि निकोपपणाचे. अशी त्या घराची रीत होती. कुटुंबीय मित्रांसारखे होते, आणि मित्र कुटुंबीयांसारखे. बाबुराव काही कुटुंबप्रमुखासारखे कधी दिसले नाहीत. दिसणे कठीण; पण बोललेही नाहीत. आपल्या इतर घरांतल्यासारखे लहानमोठेपणाचे, शुष्क शिस्तीचे, दबलेले वातावरण नसायचे. ताई (म्हणजे बाबुरावांची आई) घराचे सगळे बघायच्या (अजून, इतक्या वयातही, बघतात)—पण त्यांचा आवाज आम्ही कधी ऐकला नाही. बाकी सगळीच मुले. त्यांत बाबुरावांची बहीण वत्सला आणि विमलाबाईंची बहीण नलू असत. सगळीच संक्षिप्त आकाराची माणसे; समानतेला शारीरिक बैठक चांगलीच मिळाली होती. माझ्यासारखा लहानखोर पाहुणादेखील या सगळ्या मेळ्याकडे जरा 'वरून' पाही! मग शांताराम अथवा अरविंद आले की बाळराज्यात कोणी 'इतर प्राणी' घुसल्यासारखेच वाटायचे!

अशा अनेकविध प्राण्यांचे ते संग्रहालय होते, व तसे दिसले नाहीत किंवा बोलले नाहीत तरी बाबुराव ते चालवीत—त्यांना गुण्यागोविंदाने एकत्र नांदवीत! वाङ्मयाप्रमाणे माणसांबाबतही बाबुरावांची रुची अभिजात होती—आणि मोकळी, उदार होती. असा त्यांच्याभोवती मेळा जमला. पुन्हा आपुलकीचा नाटकी देखावा नाही. या प्रेमळ परिवाराची दोन 'संमेलने' आठवतात. 'अभिरुची'चा तिसरा आणि चौथा हे दोन वाढदिवस बडोद्याहून दहाबारा मैलांवर महीकाठी फाजलपूर येथे साजरे केले; संध्याकाळ आणि रात्र तेथे काढली. बरेचसे कोरडे पडलेले नदीचे विशाल पात्र, उंच दरडीवरचा बंगला, समोर रेल्वेचा प्रचंड पूल—आणि आमची दंगल. कॉलेजच्या पिक्‌निक्‌सारखी. वर उल्लेखिलेल्या कुटुंबीयांखेरीज माझे स्नेही प्रो० टोणगावकर, डॉ० गो० के० भट, बडोद्याचे गोळे दांपत्य, हे स्पष्ट आठवतात. (टोणगावकर आता चित्रे-परिवारातच आहेत.) या आठवणींनी दुखवल्यासारखे होते; सुखही होते...

चित्रे आणि 'अभिरुची' यांच्या आठवणी येऊ लागल्या की असेच बेचैन व्हायला होते; वाटते, हे करायला हवे होते आणि ते करायला नको होते; कधी डाचते की आपण बाबुरावांच्या उण्यांची फारच चेष्टा केली; त्यांच्यासाठी भरपूर खपलो नाही—केवळ दुरून तोंडाची आणि लेखणीची पाटीलकी केली. 'अभिरुची' पुन्हा सुरू होईल का? गेल्या नऊ वर्षांत हा प्रश्न आम्ही अनेकांनी एकमेकांना पुन्हापुन्हा विचारला. त्रेपन्नच्या मेचा अंक तसाच अर्धा छापून पडलेला आहे! ही अशी वाताहत का झाली?

असल्या गुणी माणसाच्या श्रमांवर, वित्तावर आणि उत्साहावर असे पाणी का पडले? त्यांनी यातून काय मिळवले? अपयशाचा धनी झाला हा माणूस, म्हणून कोणीही काहीही बोलावे. धाडस फळले असते तर त्याच लोकांनी डोक्यावर घेतले असते. पण ज्यांना बाबुरावांविषयी मनापासून हळहळ वाटते अशी अनेक माणसे आहेत—मोठमोठी आहेत. कसलीही हळहळ वाटणे म्हणजे नेभळेपणा असे समजणाऱ्या गोपाळराव गोखल्यांसारखी ठणठणीत माणसेही आहेत...

मला आणखी एक निराळी हळहळ त्रास देत असते: मराठी वाचकाची वाङ्मयीन रुची सुधारण्यासाठी ज्यांनी इतके केले—आणि इतके घालवले—त्या चित्र्यांना, बाबुरावांना आणि विमलाबाईंना, तो ओळखतो का? कसा ओळखणार? संपादक पडद्याआडच राहतो. आणि त्या दोघांनीही संपादनापायी स्वतःच्या लिखाणाचा बळी दिला. बाबुरावांचा एक छोटासा कथासंग्रह आहे. पण प्रकाशक बाबुरावांनी त्याच्या विक्रीची व्यवस्था कधी नीट केलीच नाही! विमलाबाईंनी थोड्या कविता लिहिल्या, चुणचुणीत परीक्षणे लिहिली—पण टोपणनावाने. साहित्य इतके रोमरोमी भिनलेले हे वेडे जोडपे—पण साहित्यात आपल्या नावासाठी त्यांनी काही करून ठेवले नाही; दुसऱ्यासाठी जीव टाकला. असली निःस्वार्थी, निस्संग माणसे...

कालच बाबुराव आणि विमलाबाई मृणालच्या लग्नाचे आमंत्रण द्यायला आली होती. तिला घेऊनच. गंमत वाटली. चिमुरडी मृणाल बी० ए० झाली. त्यापूर्वीच आपले लग्न (परजातीत) ठरवून ठेवले होते तिने. आपल्या छोट्या-मोठ्या आईबापांचे हात तिच्या पाठीवर—नव्हे, खांद्यावर—होतेच. त्यांनीही तसेच कॉलेजात लग्न ठरवले होते—पंचवीस वर्षांपूर्वीच्या संस्थानी बडोद्यात. सयाजीरावांनी बडोद्याला थक्क करणारा मुलामा दिला खरा, पण त्याआड काही बुरसलेले, जातीपातीच्या वशिल्यावर आणि हेव्या-दाव्यावर प्रबळ झालेले, नासकेकुजके भाग होतेच. चित्र्यांनी त्यांना दाद दिली नाही, त्यांची फिकीर केली नाही. पुढे चित्रे कुटुंब मुंबईला हलल्यावर, मागे राहिलेला त्यांचा ग्रंथसंग्रह आणि इतर सामान अशाच कोणी लोकांनी जाळून टाकले. पण त्याविषयीही बाबुराव बोलत नाहीत—अशा गोष्टींपार आहेत ते ...

दिलीप, मृणाल आणि इतर मुलांना असा थोर माणुसकीचा वारसा मिळाला आहे; कुणी न सांगता त्याला ते जपतीलच. पण एक सांगतो, मृणाल, स्वतःच्या लग्नाला तुझे वडील तासभर उशिरा गेले होते; तसे मात्र तू करू नकोस.

# नानांचे नवे खेळणे

नाना म्हणजे श्रीधर बाळकृष्ण रानडे. त्यांची साठी उलटल्यावर पाचसहा वर्षे तरी लोटली. पण हे काळाचे धोपटमार्गी अंकगणित त्यांच्या बाबतीत निरर्थक आहे—त्यांच्या चिमुकल्या मोटारगाडीप्रमाणेच. वीस-एकवीस वर्षांपूर्वी नानांची ओळख झाली तेव्हाचे नाना आणि आजचे नाना यांत फरक नाही. तेच त्यांच्या गाडीचे. ती गाडी आज जेवढी म्हातारी आहे तेवढीच तेव्हाही होती; आणि नानांत तेव्हा जेवढा पोरपणा होता तेवढा आजही आहे. उगाच काळाच्या मुर्वतीखातर चेहऱ्यावर चार सुरकुत्या अधिक जमल्या असतील अथवा डोक्यावरचे चार केस कमी झाले असतील. पण ते खरे नव्हे.

नानांची एकसष्टी कोणी साजरी केली नाही हेच बरे. त्यांची मोठी कुचंबणा झाली असती नाहीतर. नकोत त्या गोष्टी कराव्या आणि बोलाव्या लागल्या असत्या. खरे म्हणजे, नानांच्या अकालप्रौढ पिढीत चाळिशीच्या आत माणसाला एकसष्टीची आंवट कळा येई. वैराग्याच्या राखुंडीने जीवनचर्या काळवंडून जाई. हसणे, खेळणे, गंमत करणे निषिद्ध. आणि कधी सणावारी असले काही केलेच तरी ते मठ्ठ कर्तव्यबुद्धीने करायचे. नानांना तर श्राद्धपक्षांतसुद्धा पोक्त बनणे अजून जमले नाही. अशा माणसाला समवयस्कांनी कसल्यातरी संशयाने चार हात दूर ठेवला तर ते समजू शकते. वस्तुतः नाना आता पुण्यात स्थायिक झाले आहेत. त्या पेन्शनरांच्या पंढरीत त्यांनी भल्या सकाळी आपल्या खास दिंडीबरोबर फर्ग्युसन अथवा लॉ कॉलेज टेकडीवर फरफटत जायचे; टिळकांचे आणि नेहरूंचे राजकारण, आपापले हपिसर, अथवा प्रत्येकाचे बद्धकोष्ठ, यांवर तौलनिक चर्चा करायची; सरत्या दुपारी जमून एखाद्या सद्ग्रंथाचे सामुदायिक डुलक्या घेत श्रवण करायचे; आणि संध्याकाळी तरुण पिढीच्या अधोगतीची चिकित्सा करायची...पेन्शनर असूनही नाना यांतले काही करीत नाहीत. त्यांच्या मनाला अजून पोक आलेले नाही. सरकारीच नव्हे, साहित्यातीलही पेन्शनरांनी आणि बुजुर्गांनी त्यांना फारसे जवळ केले नाही. त्यांची नवी खुळे आणि उतावळा उत्साह केवळ कालवशात ज्येष्ठ झालेल्या संभावितांना कसा मानवणार?

म्हणजे असे नव्हे की नानांनी धक्के खाल्लेच नाहीत. आपला वाटा त्यांनीही भोगला. संसारातील चढउतार रेटले. दोन लग्ने झाली. मुलगा नाहीच. मुलासारख्या वाढवलेल्या

दोन्ही मुली परगृही गेल्या—एक तर परदेशी. दुरावे, गैरसमज, कुचंबणा, हे सगळे सोपस्कार झाले.

व्याधी, मृत्यू, सगळे काही. पुन्हा असेही नव्हे की हा कोणी 'समे कृत्वा' वृत्तीचा, सुखदुःखांपार पोचलेला स्थितप्रज्ञ आहे—किंवा दगडी मनाचा अतिपुरुष वा बोथट काळजाचा बेरड आहे. आहे ते उलट. नाना अती हळवे आहेत आणि ससासारखे भित्रे. कोठे रागद्वेषाचा फुस्कारा ऐकला की अंग काढतील. तंटाझगडा नकोच. आपल्या चिंता घेऊन कोठे कोपऱ्यात कुरतडत बसतील. त्यांना कसलीही चिंता पुरते. प्रवासाला निघाले—मग तो मुंबईतील लोकलचा इटुकला प्रवास का असेना—की दहा वेळा टाइमटेबल पाहतील आणि घड्याळ रेडिओशी व इतरांच्या घड्याळांशी ताडून पाहतील आणि गाडी चुकून वेळेआधी आली तरी घाई होऊ नये अशा हिशेबाने स्टेशन गाठतील. उतरताना तेच. तास-अर्धा तास अगोदरच जामानिमा, सामानाची बांधाबांधी आणि हिशेबताळे; आणि शेवटी दाराजवळ ठाण मांडतील. धांदलच धांदल.

कोणी म्हणेल, असल्या धांदलीतदेखील संसारी भित्रेपणाइतकाच पोर-उत्साहाचा भाग असतो. तेही खोटे नव्हे. पुणे-मुंबई प्रवास दोनशेदा करूनही दोनशेएकाव्या वेळी नवखेपणाच्या उमेदीने बोगदे मोजणारे मन आहे नानांचे. बोरघाटातले प्रत्येक वळण, सुळका आणि दरी पाहून त्यांचे डोळे लुकलुकतात, आणि ते सगळे दर खेपेला जणू नव्याने तोंडपाठ करतात. पण त्यांचे मन किटत नाही.

नानांचे चालणे लगबगीचे, बोलणे गडबडीचे. मानेला झटके देत हिसक्यात बोलतील. मध्येच एखादा शब्द टुणकन उडी मारतो. नाना जीवशास्त्राचे अध्यापक. प्रयोगशाळेत त्यांनी वर्षानुवर्षे तन्मय होऊन बेडूक कापले. उपद्व्यापी मुलाने खेळणे उस्कटून पाहावे तसे कापले असतील. खेळण्याशी मूल तद्रूप व्हावे—जाणता-अजाणता, त्याची चाल आणि चमक उचलावी तसेच काही नानांचे झाले असेल का?—अर्थात अजाणता!

नाना रानडे म्हणजेच रेडिओचे तिंबूनाना. १९४० च्या पुढेमागे कित्येक वर्षे मुंबई रेडिओतील आणि हल्लीचा काही काळ पुणे रेडिओतील मुलांच्या कार्यक्रमांचे नेतृत्व त्यांच्याकडे होते. त्या कार्यक्रमापूर्वी नाना जी धावपळ करीत ती पाहून आम्हांला 'गंमतजंमत' वाटे. कधी मला ते कार्यक्रमाची कल्पना सांगत, कधी त्यासाठी लिहिलेले वाचून दाखवत, तेव्हा खरे म्हणजे मी ऐकण्यापेक्षा पाहणे अधिक करीत असे. पुढे तो

कार्यक्रम ऐकणाऱ्या, रेडिओसेटभोवतीच्या कोंडाळ्यातील त्यातल्या त्यात भाबड्या पोरांच्या चेहऱ्यावर जे विकार नाचतील ते सगळे अगोदरच सहीसही नानांच्या चेहऱ्यावर नाचून जात. कार्यक्रमात नावीन्य असावे हा त्यांचा ध्यास; कसल्याकसल्या कल्पना काढतील. माझी खात्री आहे की जे जीवशास्त्र त्यांनी तीस वर्षे शिकवले, त्याने शिणवले नसेल इतके त्यांचे डोके या बाल-उद्योगाने शिणवले. म्हणूनच का नानांचे 'जावळ' एवढे विरळ? त्या कार्यक्रमांत नाना जीवशास्त्राचे हलकेफुलके धडे देत तशीच अर्थहीन शब्दांची गाणीही घालत—'गात' म्हटले पाहिजे, आणि तीही अनेकदा सहकुटुंब. (हे त्या जुन्या कार्यक्रमासंबंधी म्हणत आहे. सौ० शालिनीबाईंचा भारदस्त आवाजही त्या अर्थहीनतेत तेव्हा सामील असे.)

साहित्यातही नानांचा मोठा अधिकार मानतात तो या बालशाखेतच. त्यांच्या स्वतःच्या नावावर विशेषसे बालवाङ्मय आढळणार नाही. कारण त्यांनी लिहिलेले तसले बहुतेक सगळे वाऱ्यावर उडून गेले. पण त्यांनी इतरांना उत्तेजन दिले, त्यांचे लिहिणे तपासले, सूचना केल्या. नानांनी पंचवीस वर्षांपूर्वी प्रथम मुलांसाठी क्रमिक पुस्तके संपादली तेव्हा तशा पुस्तकांच्या स्वरूपात मोठा बदल घडून येत होता. पूर्वीच्या त्या छडी खाल्ल्याशिवाय न पचणाऱ्या कविता आणि त्याच जातीचे गद्य 'धडे' जाऊन त्यांऐवजी मुलांना रुचेल, त्यांची मने वेधून घेईल, असे साहित्य त्यांच्या हाती दिले जाऊ लागले. त्याचे श्रेय घाटे, अत्रे यांच्याप्रमाणे नानांचेही. खानोलकरांच्या सहकार्याने नानांनी संपादित केलेली 'महाराष्ट्र रसवंती' शाळा सोडून एक तप लोटलेल्या माझ्यासारख्या अनेकांनी पुन्हापुन्हा आवडीने चाळली आणि हेव्यानेही. आमच्या वेळी काव्याविषयी विरक्ती निर्माण करण्याच्या एकमेव हेतूनेच जणू पाठ्यपुस्तकांचे संपादन आणि अध्यापन होत असे—म्हणून नंतरच्या विद्यार्थ्यांचा हेवा.

त्यातच संपादक हा नुसता दाखलेवाला शिक्षक नाही, तर स्वतः कवी. तो काळ रविकिरण मंडळाच्या झळाळीचा. जगरहाटीप्रमाणे पूर्वीच्या पिढीने मंडळाविरुद्ध अभ्रे उठवल्यामुळे नव्यांच्या दृष्टीत ती झळाळी मावेना. ते सप्तर्षी—आणि ती अरुंधती—या प्रतीकांचेही आम्हांला केवढे कौतुक असे. एकमेकांना आम्ही ती नावे पाठ म्हणून दाखवत असू. त्यांतले एकुलते एक दांपत्य म्हणजे नाना व त्यांच्या पहिल्या पत्नी मनोरमाबाई. दांपत्याने कविता लिहिणे हेच केवढे अक्रीत. म्हणून त्यांच्याभोवती आणखी एक खास वलय. त्यात मनोरमाबाई अकाली गेलेल्या. या हळहळीचा त्या वलयाला जणू मुलामा; पण हे चाहत्यांच्या दृष्टीतून. नानांनी कधी त्याचे हळवे पुराण केले नाही. पुन्हा कवी

म्हणूनही ते मागेमागेच राहिले. यशवंत, गिरीश हे लोकप्रिय काव्यगायक. विशेषतः यशवंतांच्या व्यथेचा सूर पांढरपेशा काळजाला चटकन भिडला. माधव जूलियनमध्ये तर नावापासून रहस्याची छटा. त्यांच्याविषयीच्या काही अकारण कुजबुजीमुळे ती गडद झालेली. आणि वर, काव्याचा नवा थाट. या तीन कवींनी मंडळाची सार्वजनिक आघाडी सांभाळली. पुढे आम्ही वाचले आणि ऐकले की ती आघाडी घडवण्यात, बळकट करण्यात, किंबहुना मंडळाला रूप देण्यात, नानांचे कर्तृत्व मोठे होते. आपण दुय्यम भूमिका करून मुख्यतः पडद्यामागून अथवा विंगेतून नाटकाची सूत्रे हलवायची, प्रमुख पात्रांची भूषा आणि नेपथ्य आणि प्रॉम्प्टिंग सांभाळायचे, आणि त्यांतल्या त्यात चहापाण्याचेही बघायचे, असले शतावधानी प्राणी रंगभूमीवर असतात म्हणे. त्यांचीच नाना ही साहित्यिक आवृत्ती.

नानांना ही मंडळाची खोडच जडलेली आहे. पाचसहाजण सहज पण वारंवार जर एकत्र आले, तर त्यांना तशा एखाद्या दावणीत बांधण्याचा नाना खटाटोप करतील. मग ते त्या ‘मंडळा’ला एखादे तऱ्हेवाईक नाव देतील. सहलीचा कार्यक्रम ठरवतील, आणि त्या कार्यक्रमाची ‘कार्बन कॉपी’ प्रत्येक सभासदाला देतील.

पुढे रविकिरण मंडळ उताराला लागले. माधवराव पटवर्धनांच्या मृत्यूने त्याला मोठा हादरा दिला, आणि खुद्द नानांनाही. पण जुन्या आठवणी व जुन्या निष्ठा यांचे प्रस्थ माजवून आणि त्यात गुरफटून घेऊन वर्तमान आणि भविष्य काळाविषयी बेफिकीर राहणे हा नानांचा स्वभावधर्मच नाही. ते जीवशास्त्री—म्हणून उत्क्रांतिवादी. कोणताच टप्पा हा शेवटचा व संपूर्ण असे मानणारे नाहीत. पुढच्याचा शोध घेतील. त्याचे निशाण नाचवतील. चाळीस सालच्या पुढेमागे नानांनी मुक्तछंदाचा पुरस्कार केला. (‘उत्साहाने’ हे क्रियाविशेषण त्यांच्या प्रत्येक क्रियेबाबत गृहीत धरावे.) त्याच सुमारास त्यांचा मर्ढेकरांशी स्नेह जमला. ‘शिशिरागम’ या त्यांच्या पहिल्या संग्रहाची उस्तवार नानांनी केली. एके दिवशी सकाळी नानांनी इस्माइल कॉलेजच्या ‘कॉमनरूम’मध्ये ते हस्तलिखित आणले. पातळ कागदांवर बारीक पण दाणेदार अक्षरात कोरल्यासारख्या तीसएक कविता होत्या. नाना ज्यालात्याला ते दाखवीत होते. आम्ही काहीजणांनी या त्यांच्या नव्या ‘लष्करच्या भाकऱ्यां’ची चेष्टाही केली. त्या कवितांचे रविकिरण मंडळाशी, विशेषतः माधव जूलियन यांच्याशी, काही लागेबांधे होते, पण त्यामुळेच नानांची आपुलकी उतू जात होती असे नव्हे. हा कवी पुढे मराठी कवितेचे रंगरूप पालटून टाकील हे भविष्य नानांनी ताडले होते असेही नव्हे. पण कसल्या तरी

नावीन्याचा वास त्यांना लागला होता, आणि त्याने ते सैरभैर झाले होते हे मात्र खरे. सात-आठ वर्षांनी नवकवितेची द्वाही फिरली तेव्हा नानांचा आवाज त्यात होताच. पु० शि० रेग्यांची कविता जेव्हा रसिक समजल्या जाणाऱ्यांनाही नुसतीच विक्षिप्त वाटे तेव्हा नाना तिच्या वेगळ्या गंधाने हुरळले होते. तिची चिकित्सा करताना त्यांचे डोळे चमकत—एखाद्या नव्या जातीचा बेडूक पाहिल्यासारखे! या माणसाचे साहित्यिक घ्राणेंद्रिय मोठे तीक्ष्ण—आणि सर्वग्राही!

नव्याविषयीची ही आस्था आणि धडपड सर्वांना कशी रुचणार? त्यांच्या काही जुन्या सहकाऱ्यांना, आणि त्या पिढीतील आंबलेल्या साहित्यिकांना, हा सगळा शिंगे मोडून वासरांत शिरण्याचा थिल्लरपणा वाटला; कोणाकोणाला तर त्यात व्यवहारकुशल चलाखपणाही दिसला. या प्रवादांनी नाना दुखावले; पण ते लहान मुलाच्या दुखावण्यासारखे झोपी जाईपर्यंत. दुसऱ्या दिवशी पुन्हा ताजेतवाने उद्योग. कालच्या कुत्सितपणाचा डूक धरला नाही. नानांचे आपले सगळ्यांशी बरे—अत्रे आणि वरेरकर दोघांशीही एकसमयावच्छेदेकरून. कोण जाणे, कदाचित नानांचे रागलोभ जरा अधिक निश्चितपणे वाटले गेले असते—खरे म्हणजे फक्त लोभच—तर त्यांचे साहित्यिक कल्याण झाले असते का? फार मित्र असल्यामुळे एका सशाची फार कुचंबणा होते अशी काहीशी कथा आहे. तशासारखेच त्यांचे झाले नाही ना? जुन्यांनी नवे म्हणून आणि नव्यांनी जुने म्हणून त्यांना फार घट्ट केले नाही. ते मध्येच कुचंबत राहिले.

—याचाही त्यांना विषाद नाही. साहित्यिकांत, विशेषतः कवींत, frustration चा (त्या इंग्रजी शब्दासह) विकार फार. कोणाला कशामुळे तो होईल सांगता येत नाही. नानांना त्याची बाधा नाही. कुढण्याचे इंद्रियच त्यांना नाही. कानामागून येऊन तिखट झालेल्यांशीही ते गोड. कोणीही म्हणावे, "नाना, एक योजना आखायची आहे" की कागद, लेखणी, सिगरेट, असली आयुधे घेऊन नानांनी मांडी ठोकलीच. त्यांना तपशील फार प्रिय. लहानलहान बाबी लिहिताना त्यांच्या लेखणीला जणू लाळ सुटते. 'ट्रिप'ला जाणारी शाळकरी मुले खाण्याचे पदार्थ अगोदर कटाक्षाने लिहून काढतात तसे. लिहिणे म्हणजे नानांचे परब्रह्म. "तुम्ही बोलता फार," असे ते मला नेहमी बजावीत—म्हणजे नुसतेच बोलतो, बोललेले लिहून ठेवीत नाही! त्यांच्या बाबतीत तरी सहसा बोलणे व लिहिणे ही जोडक्रिया असते. तोंडात सिगरेट अथवा चिरूट, आणि हातात लेखणी...हे सगळे कागद ते जपून ठेवतील; म्हणून त्यांच्याकडे मुद्रित ग्रंथांइतकेच 'हस्तलिखितां'चे रुमाल आढळतील. प्रत्येक लिहिलेला कागद म्हणजे 'बोलका ढलपा' असे जणू आश्चर्य.

लेखणीतून शाई झिरपते हा जणू चमत्कार.

नानांचे हे लिहिण्याचे व्यसन सुटणे कठीण! उद्या लेखनबंदी झाली तर नाना सुकून जातील. धान्यटंचाईपेक्षा कागदटंचाईची त्यांना अधिक फिकीर. "स्वामी तिन्ही जगाचा, शाईविना भिकारी"—अशी निष्ठा!

पण नाना हा एक-व्यसनी माणूस नाही. इतरही आहेत. म्हणजे धूम्रपानासारखी 'रजिस्टर्ड' व्यसने आहेतच; त्यांशिवाय आणखी काही. पुन्हा सद्व्यसनी, म्हणून इतरांना सहभागी करण्याची बुद्धी; चोरून करण्याचा, कंजूष, स्वार्थी दुर्व्यसनीपणा नाही. साहित्यकांच्या जमातीत आपली दमडी वाचवून दुसऱ्याच्या जिवावर रंगेलपणा भागवणाऱ्यांची गर्दी फार. अशांच्या धूम्रसौख्यावर नानांनी आजवर केवढ्या पैशांची राख केली असेल हे खुद्द नानाच काय पण शालिनीबाईही सांगू शकणार नाहीत. असल्या उसन्या रंगरावांतही कित्येक मोठे चोखंदळ असतात; त्यांचेही चोचले नानांनी पुरवले. लग्नाचा प्रसंग कधीही येवो, आपण तयार असावे म्हणून उतावळा महेश्वर कुंडलीपासून मुंडावळ्यांपर्यंत सगळे साहित्य बॅगमध्ये कोंबतो आणि तिला विसंबत नाही; नानांची पिशवी तशीच धूम्रातिथ्याला सदैव सज्ज असते. ही साधना किती खडतर हे जाणत्यालाच ठावे. नानांकडे एकाच वेळी तोकड्या, मध्यम, लंब्या, वाटोळ्या, चपट्या हे सिगरेटचे आकारभेद सापडतील; सुवासिक, कडक, फिक्या, 'रोस्टेड' तंबाखूच्या असले रुचिभेद आढळतील. चिरूट असतात आणि सिगारही. आणि पाइपचा तंबाखू, तोही जातीजातीचा, आहेच. अतिशयोक्ती करायची असती तर या यादीत विड्या आणि हुक्का हे दलित आणि अमिरी प्रकारही घातले असते; पण ते नसतात. हुक्का ठेवण्याची आकांक्षा नानांनी फार काळ बाळगली; पण पिशवीत या इतर गर्दीबरोबर सहज मावेल इतका सुटसुटीत हुक्का अजून निघाला नाही याची त्यांना (आणि त्यांच्या स्नेह्यांनाही) फार हळहळ वाटते. आणि नानांना फिरता पाहुणचार हवा; सगळेच पाहुणे काही घरी चालून येत नाहीत! असो. याशिवाय, आगपेट्यांच्या एक-दोन प्रकारांबरोबर नाना 'लायटर'ही बाळगतात; इतकेच नव्हे, तर परक्या घरी, ते आपले समजून, यजमानांचे आतिथ्य केल्यावर गृहिणीच्या मनःस्वास्थ्यासाठी पोतडीतून गरजेप्रमाणे एकदोन रक्षापात्रेही काढतात!—आणि आपल्या तंबाखूची आपण व इतरांनी केलेली रक्षा बरोबर घेऊन जातात!

ही रक्षापात्रे म्हणजे नेहमीची उघडी वाटीवजा भांडी नाहीत. तेथेही क्लृप्ती. हल्ली

कसली तरी छोटी नळकांडी नाना वापरतात. वर टोपण. फिल्म ज्या नळकांड्यांतून मिळते तशी दिसणारी. त्यावरून नानांचे दुसरे एक महान व्यसन आठवले—फोटो घेण्याचे. नानांनी आजवर हजारांनी छायाचित्रे काढली असतील; पण अजूनही एखादे घेताना नानांत नवथरपणाची हिरीरी आणि धांदल असते. कॅमेऱ्याच्या जोड-अवजारांशिवाय त्यांचे चालत नाही. निसर्गदृश्यासाठी रंगीत फिल्टर हवा, स्वतःसकट फोटो घेण्यासाठी ऑटोमॅटिक रिलीज् हवा, आणि कसली कसली 'मीटर्स' हवीत. तंत्राचा सगळा तपशील तोंडपाठ. मग ते गणित जमवण्यासाठी नानांची केवढी खटपट. टेपने अंतर मोजतील. उजेडाप्रमाणे चेहऱ्याची आणि इतर अवयवांची, आणि जड वस्तूंचीही, हालवाहालव करतील, हसण्याचा कोन सांगतील, स्वतः प्रात्यक्षिक दाखवतील. या गोंधळात ज्याचा फोटो काढायचा तो कितीही सराईत असला तरी लहान मुलासारखा बुजतो आणि बिचकतो...शेवटी ठसा उमटतो तो नानांच्या गडबडीचा—फिल्मवरदेखील, असे म्हणावेसे वाटते. प्रत्येक छायाचित्र हा जणू नवा प्रयोग; आणि प्रयोग म्हटला की तो अपूर्ण असणारच. नानांचा इरादा असावा छायांना अर्थ देण्याचा; नुसते प्रतिबिंब काढण्याचा नव्हे! कवी कॅमेरा चालवू लागला की असे होते. एकदा आम्ही चाफळला गेलो होतो. नानांनी मला व आणखी दोघांना एका झाडाच्या फांद्यांवर दोन्ही बाजूंस पाय सोडून बसण्याची 'पोज' दिली. शेवटी आम्हांला स्वाराचा रुबाब काही जमला नाही, पण फांदीला घोड-कळा आली (असे फोटोत भासले!). या वेडाचा अधिक सार्वजनिक आविष्कार म्हणजे 'छाया-नाट्य'; त्याचे काही प्रयोग नानांनी करून दाखवले. लेखक, दिग्दर्शक, निर्माते श्रीधर बाळकृष्ण रानडे आणि सर्वांत अधिक रंगलेला प्रेक्षक म्हणजे नाना! मुलांच्या खेळांत होते तसेच; त्या बालभावाला वयाची बाधा झाली नाही. वीस वर्षांपूर्वी एकदा म्हणे नाना आपल्या मुलींना घेऊन सर्कसला गेले होते; तेव्हा, मुद्दामच त्यांनी लहान मुलाचे सोंग आणले. हत्ती येताच ते डुलू लागले, वाघसिंह पाहताच त्यांनी अंग काढले, आणि विदूषक दिसताच शिटी वाजवून उडी मारली. आजूबाजूच्या प्रेक्षकांना निराळाच संशय आला. (हे 'मुद्दाम' केले असे नाना तेव्हा म्हणाले खरे!)

नानांना सर्वांशी नीट जमवून घेता आले; नाही फक्त आपल्या वयाशी. त्यांची हौसमौज ओसरता ओसरेना. खाणेपिणे, खेळणे-फिरणे—सगळ्या लालसा पन्नाशीतही पंचविशीची ऊब टिकवून राहिल्या. टेनिसमधून आणि सरकारी नोकरीतून ते, मला वाटते, एकाच वेळी निवृत्त झाले; आणि तेही धावपळीचे, धडाडीचे टेनिस; उगाच शोभेसाठी किंवा पचनक्रियेला मदत होण्यासाठी नव्हे! आता नानांची सत्तरी हाकेवर आली, पण कोणी

सांगितले की नाना काल टेनिस खेळत होते म्हणून, तर चटकन अविश्वास वाटणार नाही आपल्याला; डोळ्यांपुढे चित्र येईल ते चेंडूसह उशी घेणाऱ्या नानांचे; वॉल्ट डिझ्नेच्या 'कार्टून'सारखे...

—पण नानांचे कोणतेही चित्र त्यांच्या पोतडीशिवाय अपुरेच राहील. त्या पोतडीतून फक्त धूम्रपानाच्या चिजाच बाहेर पडतील असे नाही. त्यात चाकू-कात्री, सुई-दोरा-सुतळी ही हटकून मिळतील. एखादी कुलूप-किल्लीही असेल आणि टॉर्च; त्याशिवाय स्क्रू-ड्रायव्हरसारखी आयुधे. पेन्सिल विशेष वापरीत नसले तरी पेन्सिल तासण्याचे यंत्र हवे. कधी काय उपयोगी पडेल सांगता येत नाही अशी त्यांची धारणा; त्यांतही नव्या सोयी आणि युक्त्या असलेल्या चिजा. त्या तुम्हांला दाखवतील, समजावून सांगतील—आणि तुमच्याहीपेक्षा उत्सुकतेने पाहतील आणि ऐकतील! म्हणून त्यांना कवी अनिल गमतीने "गॅजेट् (gadget) ऑफिसर" म्हणतात...

त्यात मुलांची गमतीची खेळगी असतात हे काय सांगायला पाहिजे? विशेषतः कोडेवजा खेळगी—तुकड्यांतून आकृती करण्यासारखी. मोठ्यांना ते कोडे घालतील, त्यांना ते न सुटल्यास "कशी फजिती झाली!" म्हणून टाळ्या पिटतील, आणि सोडवून दाखवतील...ती खेळणी मुलांसाठीच कशावरून? किंवा कोणतीही खेळणी? आणि पासष्ट वर्षांचे नाना मूल नाहीत कशावरून? की त्यांना सगळेच खेळण्यांसारखे? असेलही. त्यांची कविता आणि इतर लिखाण आणि फोटोग्राफी ही सगळी खेळणीच, म्हणून त्यांतील आनंद त्यांनी पुरा लुटला. पण कोठे तडा गेला तर त्याचे मोठे दुःख नाही; चिडाचीड नाही. एक गेले, दुसरे. एका गोष्टीवर जीव टांगल्याचा आव नाही.

काही दिवसांपूर्वीची गोष्ट. मालतीबाई बेडेकर, अनंत काणेकर आणि मी नानांकडे चहा घेत बसलो होतो. मध्येच नानांनी कसल्यातरी वादाचे पिल्लू सोडले. त्याच्या नादाने आम्ही पाहुण्यांनी थोडी शब्दाशब्दी केली. नानांची चुळबूळ चालू होती. मध्येच आम्हांला थांबवून त्यांनी म्हटले, "ऐका", आणि, अहो आश्चर्यम्, आमचे सगळे बरेवाईट बोलणे पुन्हा आमच्या कानांवर पडू लागले. आम्ही थक्क झालो; नानांच्या तोंडावर जादूगाराचे नकली गांभीर्य आणि डोळ्यांत वात्रट पोराचा हर्ष होता. धीरगंभीर पावलांनी जवळच्या एका टेबलाशी ते गेले; त्यावरील रुमाल आणि पुढ्यातील पानाफुलांनी खचलेली फुलदाणी त्यांनी दूर केली आणि दात विचकले. तेथे टेप-रेकॉर्डर होता—नानांचे नवे खेळणे!

म्हणजे सगळीच जुनी खेळणी टाकून दिली असे नव्हे. फार जुन्यांपैकी एक म्हणजे त्यांची ‘ बेबी मॉरिस ’ मोटरगाडी. परवा फर्ग्युसन कॉलेज रोडवर ती आपल्या चाकांनी जाताना पाहिली तेव्हा तिच्या आणि नानांबद्दलच्या आदराने ऊर भरून आला. या तीस वर्षांत वेळोवेळीं तिला अनेकांनी लोटत नेली आहे; ठिकठिकाणच्या मोटर-दुरुस्ती-कारागिरांनी तिच्यापुढे हात टेकले आहेत—आणि जोडलेही आहेत. मी नानांना अनेकदा म्हणतो, “ तुम्ही ती कंपनीला विकून टाका; जाहिरातीसाठी तिचा त्यांना केवढा उपयोग होईल! तुम्हांला भरपूर किंमत देतील!—नाही तर जुन्या बाजारात मोडतोडीचा भावही धड मिळायचा नाही. ” नाना तोंड भरून हसतात. जणू म्हणतात, “ खेळणं जुनं झालं म्हणून कोणी विकतं का? ”

REFBK-0024135

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३०२५
क्रा. क्र. २४१३५
निबंध १४२८४
ग्रं. शाखा (स्थळ प्रत)